# स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

**सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत इतिहास विषयाच्या विद्यावाचस्पती**

**(पीएच.डी.) पदवीसाठी सादर केलेला संशोधन अहवाल**


संशोधक

**गांगुर्डे सुरेखा दिनेश**

PRN NO.02112006195

मार्गदर्शक

**निवृत्त प्रा.डॉ.अभंग चंद्रकांत जगन्नाथ**

इतिहास विभाग प्रमुख,

के.जे.सोमैया आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय,

कोपरगाव


मे - २०१८

# प्रतिज्ञापत्र

मी गांगुर्डे सुरेखा दिनेश शपथपूर्वक लिहून देते की, **“स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास”** या विषयावरील शोधप्रबंधातील सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केली असून तिचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. सदर माहितीचा या शोध प्रबंधाव्यतिरिक्त अन्यत्र कोठेही उपयोग केलेला नाही.

ठिकाण : पुणे

दि.   /   / २०१८ संशोधक विद्यार्थी

(गांगुर्डे सुरेखा दिनेश)

# <u>मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, **गांगुर्डे सुरेखा दिनेश** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे च्या सामाजिक इतिहास या विषयाच्या विद्यावाचस्पती (Ph.D) या पदवीसाठी **"स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास"** या विषयावरील शोधप्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे.

सदर शोधप्रबंधामध्ये त्यांनी नमुद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे.

ठिकाण : पुणे

दि. / / २०१८

मार्गदर्शक

डॉ.चंद्रकांत अभंग

पुणे

# ऋणनिर्देश

'स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास' हा शोधप्रबंध पूर्ण करताना मला अतिशय समाधान वाटत आहे. ज्या शहरात मी लहानची मोठी झाले त्या शहरासंदर्भात संशोधन करुन या शहराप्रती असणारे ऋण मला व्यक्त करता आले असे वाटते.

या प्रबंध लेखनाबाबत माझे मार्गदर्शक डॉ. चंद्रकांत अभंग यांचे बहुमोल मार्गदर्शन मला लाभले. संशोधनासाठी लागणारी चिकाटी, शिस्त व विवेक यांची दीक्षाच त्यांनी दिली. त्यांच्या ऋजु व्यक्तीमत्वामुळे संशोधनातील शंका-कुशंका विचारताना मला कधीही संकोच वाटला नाही. त्यांनी स्वत:च्या संग्रहातील मौल्यवान कागदपत्रे आनंदाने वेळोवळी उपलब्ध करुन दिली. तसेच मोडी कागदपत्रांचे लिप्यांतर करुन दिले. त्यांचे आभार मानताना मन कृतज्ञता भावनेने भरुन आले आहे. खेरीज ज्यांच्या विचारांनी महाराष्ट्रातील इतिहासप्रेमी विद्यार्थी गेली पस्तीस वर्षे भारावून गेला आहे. त्या डॉ. राजा दीक्षितांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्य मानते. दीक्षित सरांच्या वेळोवेळी होणाऱ्या भेटी गाठींमधुन प्रबंधलेखनाला चालना मिळत गेली असे मला वाटते.

हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष मा. शिरीष मोडक, सचिव मा. सुनिल रामदासी, कार्याध्यक्ष डॉ. ब्रीजलालजी सारडा, मा.प्राचार्य डॉ. अमरजा रेखी, उप-प्राचार्य डॉ. राजेंद्र शिंदे, कार्यालयीन प्रबंधक अशोक असेरी, श्री. सत्रे डी. टी., श्री. सामल अतुल, श्री. सागर अरकल, श्री. अमोल मदने, श्री. अमोल सामल, श्री. अनिरुध्द कुलकर्णी यांचे प्रोत्साहन सदैव मिळाले. त्याबद्दल मी ऋण व्यक्त करते.

अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बार्नबस, ग्रंथपाल डॉ. फुगणार, दिपा निसाळ वाचनालयाचे ग्रंथपाल संदीप ननावरे व त्यांच्या सुविद्य पत्नी रोहिणी, अहमदनगरचे ग्रंथ संग्राहक श्री. शब्बीर शेख व त्यांच्या पत्नी रिझवाना, मा. राजेंद्र देशपांडे, पेमराज सारडा महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. राजेंद्र मारवाडे या सर्वाचे मी मन:पूर्वक आभार मानते. उपरोक्त ग्रंथप्रेमींनी वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेल्या ग्रंथसहाय्याचे मोल अनमोल आहे.

श्री. गणेश व प्रीती गाडगे, डॉ. अतुल व दया जेठे, प्रा. सुजाता सोनवणे, प्रा. डॉ. राजमोहंमद शेख, प्रा. कृष्णा व अर्चना पाटील, माझी मैत्रीण अंजली लोया, सौ. उज्वला वैराळ, सौ. श्वेता विटवेकर या स्नेह्यांचे सहकार्य संशोधन काळात मिळत गेले त्याबद्दल या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. बी. डी. कुलकर्णी, इतिहास विभाग प्रमुख डॉ. नलिनी वाघमारे यांचेही मी मन:पूर्वक आभार मानते.

माझे बंधू सचिन, राहुल गांगुर्डे आणि अजित थोरात, वहिनी सौ. सविता व सौ. सुजाता, माझी बहीण सौ. रेखा पारधे, तिचे यजमान श्री. संतोष पारधे, माझ्या पाठीशी सदैव राहिले. त्याच बरोबर माझे सासरे ॲड मधुकरराव साळवे, व सासू सौ. लीला साळवे यांचे शुभाशिर्वाद मला मिळाले. माझे कालकथित आई वडिल निर्मलाबाई व दिनेश गांगुर्डे यांच्या प्रेरणेने मी शिक्षण घेतले, संशोधन केले, त्यांच्या पवित्र स्मृतीस मी वंदन करते.

माझी मुले चि. अभिनव व चि. आदित्य चि. परेश, चि. कुणाल, कु. प्रगती, कु. किमया, कु. प्रिती, कु. मुग्धा, कु. श्रावणी, चि. आर्णव, चि. वैभव, यांनी संशोधन काळात मला कधीही अडचणीत आणले नाही. मला समजून घेतले.

माझे पती श्री. प्रदीप साळवे यांनी पाठबळ, प्रोत्साहन व सोबत केली नसती तर कदाचित मी हे लेखन करुच शकले नसते. त्यांचे व माझे कृतार्थ सहजीवन ही माझ्यासाठी मोलाची ठेव आहे इतकेच नोंदविते.

सागर तनपुरे, वैभव दुधलमल व गौरव मुळे यांनी उत्तम टंकलेखन वेळेत करुन दिले त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते.

सुरेखा दिनेश गांगुर्डे

# अनुक्रमणिका

## स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास


| प्रकरण क्रमांक | प्रकरणाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| प्रकरण पहिले | प्रास्ताविक | १ ते १६ |
| प्रकरण दुसरे | अहमदनगर शहरातील राजकीय परिवर्तन | १७ ते ८५ |
| प्रकरण तिसरे | अहमदनगर शहरातील आर्थिक परिवर्तन | ८६ ते १४५ |
| प्रकरण चौथे | अहमदनगर शहरातील सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन | १४६ ते २१७ |
| प्रकरण पाचवे | अहमदनगर शहरातील शैक्षणिक परिवर्तन | २१८ ते २५९ |
| प्रकरण सहावे | निष्कर्ष | २६० ते २७८ |
| | संदर्भ ग्रंथसूची | २७९ ते २८३ |
| | परिशिष्ट | २८४ ते ३२६ |

# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

**प्रस्तावना :-**

मानवाचा इतिहास हा अनेकविध परिवर्तनांचा इतिहास मानला जातो. मानवी समाज विविध बदलांमधून जात-जात स्वत:ची जडणघडण साधत असतो. हा प्रवास कधी अनेक शतकांचा असतो तर कधी अनेक वर्षांचाही असू शकतो. तथापि बदल किंवा परिवर्तन हा मानवी जीवनाचा व मानवी समाजाचाही स्थायी भाव आहे. समाज जीवनातील अनुकूल व प्रतिकूल घडामोडी स्थित्यंतरे यांचा लेखाजोखा इतिहासात मांडला जातो. इतिहास हे सामाजिकशास्त्र असल्यामुळे समाजात घडणारे राजकीय, सामाजिक, आर्थिक वा सांस्कृतिक परिवर्तन इतिहासाच्या अभ्यासक्षेत्रात मोडते. मुळात माणूस हा समाजशील प्राणी असून तो समाजाशिवाय राहू शकत नाही हेच सत्य असल्यामुळे माणसाचा स्वतंत्रपणे विचार न करता संपूर्ण मानवी समाज हेच अभ्यासक्षेत्र मानून अभ्यास करता येतो.

कुटुंब, गाव, तालुका, जिल्हा, राज्य, देश व संपूर्ण जग हेही व्यापक परिप्रेक्ष्यात एक समुदाय म्हणून विचारात घेता येतात व त्यांच्या स्वरुपाचा अभ्यास करता येतो. विशेषत: नैसर्गिक व राजकीय संकटे, सत्ताबदल जर झाला असेल तर दुष्काळासारख्या समस्या असतील तर मानवी समाजात अनेकाविध बदल घडतात. सतराव्या शतकापासून जगाच्या इतिहासात अशा अनेक घटना घडामोडी घडल्या ज्यामुळे यथार्थ स्वरुपाचे परिवर्तन घडून आले. यात वाफेच्या इंजिनाचा शोध ही महत्वापूर्ण घटना मानता येते. या शोधामुळे औद्योगिक क्रांती झाली, मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढ झाली. या उत्पादनाला बाजारपेठ मिळविण्यासाठी ब्रिटीशांनी केलेल्या प्रयत्नांची परिणती पुढे वसाहतवादात झाली. भारतही दीडशे वर्ष इंग्रजांच्या अधिपत्याखाली राहिला. या दीडशे वर्षात भारतात अनेकविध बदल झाले. या बदलांची सरुवात जरी बंगालमधून झाली असली तरी त्याचे लोण भारतभर पसरत गेले.

महाराष्ट्रातही इंग्रजी राजवटीमुळे अनेक स्थित्यंतरे झाली. पुणे, मुंबई अशा शहरांमध्ये जसा इंग्रजांमुळे मोठा बदल दिसू लागला तसाच तो अहमदनगर जिल्ह्यातही झालेला दिसून येतो. अहमदनगर जिल्ह्यात इंग्रजी आमदनीत झालेल्या सर्वकश परिवर्तनाचा इतिहास प्रस्तुत प्रबंधात अभ्यासावयाचा आहे.

समाजाच्या मूलभूत संरचनेतील परिवर्तन म्हणजे 'समाज परिवर्तन' होय. समाजाची संरचना मूल्ये, नियमने, गट किंवा उपगट आणि भूमिका यांनी बनलेली असते. यांपैकी कोणत्याही घटकात परिवर्तन झाल्यास सामाजिक परिवर्तन घडून येते. परिवर्तनाचे अनेक घटक किंवा कारक असतात. उदाहरणार्थ, लोकसंख्यात्मक, तांत्रिक, जैविक, सांस्कृतिक, इत्यादी.

परिवर्तनाचे परिणाम संपूर्ण समाजाच्या जीवनावर व त्याच्या विविध अंगोपांगांवर होत असतात.

सामाजिक संरचनेतील परिवर्तन म्हणजे सामाजिक परिवर्तन. सर्वाधिक महत्वाचे परिवर्तन म्हणजे सामाजिक मूल्यात होणारे परिवर्तन असते. हॅरी जॉन्सनच्या मते सामाजिक परिवर्तन म्हणजे मूलभूत अर्थाने समाजरचनेतील बदल असतो. समाजाच्या विविध भागांच्या परस्परसंबंधांच्या स्वरुपात बदल झाला म्हणजे समाजरचनेत बदल होतो.

तंत्रविज्ञानात्मक प्रगतीचे सामाजिक परिणाम निश्चित स्वरुपाचे असल्यास त्यांचे स्वरुप दूरगामी तसेच महत्वपूर्ण असते. यंत्रांच्या शोधामुळे उत्पादन प्रचंड प्रमाणावर सुरु झाले. समाजात श्रमविभाजन व विशेषीकरणाची वाढ झाली. व्यापार व उद्योगधंद्याचा विस्तार झाला. मानवी जीवनाची पातळी उंचावली. आर्थिक संकट व बेकारी वाढली. औद्योगिक कलह विशिष्ट प्रकारचे आजार (एड्स-कॅन्सर) व अपघात वाढले (भोपाळ वायुगळती). जनमानसावरील धर्मश्रध्दांचा पगडा होता, तो कमी झाला. अंधश्रध्दा कमी झाल्या. एकत्र कुटुंबाचे प्रमाणही कमी झाले. स्त्रिया अर्थार्जन करु लागल्या. कुटुंबातील बरीचशी कामे समाजातल्या इतर संस्था करु लागल्या. झोपडपट्ट्या वाढल्या.

मनोरंजनाचे व्यापारीकरण झाले. कुटुंबव्यवस्थेत व धर्मव्यवस्थेत बदल झाला. गुन्हेगारी, वेश्यावृत्ती, व्यसनासक्ती, स्वैराचार, वर्गसंघर्ष यांसारख्या सामाजिक समस्या निर्माण झाल्या.

सारांश, तांत्रिक विकासामुळे कुटुंबापासून तो धर्म, नीती व सामाजिक स्तरीकरणापर्यंत सर्व थरांत महत्वाचे बदल घडून आले.

त्या दृष्टीकोनातून ‘स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास’ हा समाजजीवनाशी निगडीत असलेला विषय निवडला आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील परिवर्तनाचा हा अभ्यास स्थानिक इतिहास लेखन व संशोधनाचाच एक भाग आहे. इतिहासाची व्याख्या करताना डॉ. राजा दीक्षित म्हणतात, 'व्यक्ती, समाज, स्थल आणि काल या अनुबंध चतुष्ट्यातील सर्वांगीण कहाणी म्हणजे इतिहास होय'.

हा इतिहास राष्ट्राचा असतो तसा तो जिल्ह्याचाही असू शकतो. आधुनिक युगात 'सबाल्टन स्टडीज' अथवा 'वंचितांचा इतिहास' या संकल्पनांचे महत्व वाढत आहे. त्याचबरोबर स्थानिक इतिहास लेखनाकडेही संशोधक आकर्षिले जात आहेत. हा स्थानिक इतिहास ‘localized history’ ही असू शकतो असतो व ‘History of localities’ ही असू शकतो. या प्रकारच्या अभ्यासालाच ‘स्थानीक इतिहास’ असेही म्हटले जाते श्री.अरुण टिकेकरही या प्रयोगास मान्यता देतात.

स्थानिक इतिहासाचे लेखन एका अर्थाने भूतकाळामध्ये रमून जाण्याचा छंद आहे. आपल्या गावाच्या किंवा शहराच्या गतकाळाबद्दल तसेच तेथील आपल्या ऋणानुबंधाबद्दल आपुलकी, प्रसंगी अभिमान वाटणे ही सहजभावना होय. आपल्या गावाबद्दलच्या काही स्मृती आनंददायक तर काही क्लेशदायक असू शकतात. पण घटना घडून बरीच वर्षे उलटल्यामुळे आनंददायक व क्लेशदायक अशा दोन्ही स्मृतींबद्दल कातरता येत असते. ही स्मृतिकातरता प्रभावी शैलीत पकडण्यावर ‘स्थानीय इतिहास’ काराचे यश अवलंबून असते.

बऱ्याचदा स्थानिक इतिहासाबाबत अशी धारणा दिसून येते की, स्थानिक इतिहास हा नेहमीच अतिशयोक्तीपूर्ण सांगितला जातो, अथवा कथन केला जातो. या दृष्टीकोणामुळे स्थानिक इतिहासाचे एका अर्थाने नुकसानच केले जाते आणि जर ही वास्तवता असेल तर स्थानिक इतिहासाची भूमिका महत्वपूर्ण आहे. प्रचलित इतिहासामध्ये समाजाच्या स्मृतींचा परिपाक असतो आणि नंतरचा इतिहास प्रकार हा हेतूपूर्वक रुढ केलेला असतो. त्यामागे काही राजकीय आणि सामाजिक उद्देश अभिप्रेत असतात. त्याचे उदाहरण म्हणजे एखाद्या धार्मिक स्थळाचा अस्तित्वात नसलेला धार्मिक इतिहास प्रचलित करणे. असे प्रयत्न नेहमीच चालू असल्याचे दिसते.

**स्थानिक इतिहास - संकल्पना**

स्थानिक इतिहासामध्ये त्या त्या ठिकाणाचे 'स्थानमहात्म्य' आणि त्यासाठीच्या उपयुक्त संशोधन अभ्यास आणि स्थान अभ्यासाची व्याप्ती म्हणजे स्थानाचा सूक्ष्मपणे विचार करणे. परिणामी हा अभ्यास सूक्ष्मतेकडून समग्रतेकडे जाणारा आहे. भारतात विशेषत: महाराष्ट्राच्या इतिहास संशोधनामध्ये मागच्या ५० वर्षांमध्ये स्थानिक इतिहासाची संकल्पना विकसित होताना दिसते. या कालावधीची गणना 'संक्रमणाचा काळ' व 'व्यापक ऐतिहासिक चळवळींचा कालखंड' या नावाने ओळखला जातो. स्थान व कार्य यांचा महत्वपूर्ण संक्रमणाचा कालावधीही महत्वाचा आहे.

स्थानिक इतिहासाच्या क्षेत्रामध्ये व संशोधनामध्ये भारतात युरोपप्रमाणे विशेषत: फ्रान्स व इटली या देशांप्रमाणे सूक्ष्म अभ्यासपध्दती विकसित झालेली नाही. असे असले तरी महाराष्ट्रामध्ये विविध विद्यापीठांमध्ये जे संशोधन चालू आहे, त्यातील विभाग, प्रदेश व तालुका, गाव या पातळ्यांवर संशोधन करुन आपली मांडणी सादर करीत आहे. त्यांच्या अभ्यासामध्ये व्यापक सामाजिक, आर्थिक, राजकीय संरचनांचा अभ्यास सामाविष्ट झालेला दिसतो. तरीही त्यांचा दृष्टीकोण अजूनही युरोपिय इतिहासलेखनाएवढा परिपक्व झालेला दिसत नाही.

स्थानिकता ही तूलनात्मक संकल्पना आहे. साधारणपणे तिची व्यापकतेबरोबर तुलना केली जाते. प्रत्येक स्थानिक घटकाची स्वत:ची एक स्थानिकता म्हणून एक वेगळी ओळखही असते. राष्ट्रीयतेचा विचार करत असताना प्रभाग किंवा एखादा लहानसा भाग हा ‘स्थानिक’ म्हणून गणला जातो. त्यामध्ये लहानसे खेडे किंवा जिल्हा या घटकांचा समावेश असतो. स्थानिक इतिहासलेखनात प्रथमत: स्थाननिश्चिती करणे आवश्यक आहे. त्यासाठी काही प्रशासकीय निकषही लावले जातात. उदा. प्रशासकीय, सांस्कृतिक, राजकीय आणि पर्यावरण इत्यादी.

आधुनिक काळात लहानसे खेडेदेखील प्रशासकीयदृष्ट्या एक केंद्र बनले आहे. मोठया प्रशासकीय घटकांचे ते लहानसे प्रतिरुप असते. गावाच्या अथवा खेड्याच्या सीमा ऐतिहासिक व प्रशासकीय असतात. गावाच्या सीमा अधोरेखित केलेल्या असतात. गावाची एक सांस्कृतिक अर्थाची सीमा ही असते. मात्र स्थाननिश्चितीसाठी प्रशासकीय निकषही लावणे आवश्यक आहे.

स्थानिक इतिहासाची मांडणी करत असताना साधनांचा वापर करताना सर्जनशिलता आणि परिणामकारकता महत्वाची आहे. साधनांमध्ये ‘मौखिक परंपरा’ हा घटक अत्यंत महत्वाचा आहे. मौखिक परंपरा ही क्लिष्ट परंपरा असून ती आख्यायिका आणि इतर प्रचलित माध्यमांमधून व्यक्त होत असते. मौखिक परंपरा उपयुक्त परंपरा असून इतिहास संशोधनासाठी संशोधकांनी तिचा स्विकार तिच्या काही मर्यादांसह केला आहे.

**स्थानिक इतिहास हा संपूर्ण इतिहास**

इतिहास म्हणजे मानवी अस्तित्वाचे ऐतिहासिक, विकासात्मक, सर्वांगीण आकलनात्मक कथन होय. स्थानिक इतिहास मांडणी ही संपूर्ण इतिहासाच्या मांडणीकडे घेऊन जाणारी आहे. ‘संपूर्ण इतिहासाच्या’ व्याख्या करण्याच्या अनेक पध्दती असू शकतात. ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी अनेक प्रक्रियांची मदत घ्यावी लागते. स्थानिक इतिहासामध्ये बदल या घटकास महत्व आहे. तो आपली स्वत:ची संशोधन

प्रक्रिया निर्माण करतो. या प्रक्रियेमुळे स्थानिक इतिहासाची संशोधनपध्दती आणि तिचा प्रचलित इतिहासाबरोबर असणारा संबंध व फरक याबाबतीत काही प्रश्न निर्माण केले जातात.

स्थानिक इतिहासाचा अभ्यास म्हणजे स्थानिकतेचे वैश्विक आणि राष्ट्रीयतेसंदर्भात आकलन करणे होय. आज वैश्विक ही विस्तृत संकल्पना बनली आहे. त्यामध्ये स्थानिक व वैश्विक संबंध अधिक जवळ येत आहेत. परिणामी स्थानिकता किंवा स्थानिक म्हणजे काय हे आकलन होण्यासाठी स्थानिकतेचे व वैश्विकता यांच्यातील संबंध महत्वाचे ठरतात. म्हणजे स्थानिक इतिहास हा स्थानिक इतिहास नाही तर स्थानिकता जेव्हा राष्ट्रीयता आणि वैश्विकतेबरोबर जोडली जाते तेव्हा तिचा अर्थ स्पष्ट होतो. त्यावेळी स्थानिक ज्ञान प्रेरणात्मक व प्रतिकात्मक बनते.

स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा एक भाग आहे. तो कोणत्याही इतिहास संशोधनाची दिशा बदलवत नसून गुणात्मक पध्दतीने व सूक्ष्म पध्दतीने स्थानिय घटकांचा शोध घेत असतो. स्थानिक संशोधनामध्ये गुणात्मक व तांत्रिकतेच्या कसोटीवर प्रत्येक विषय घासून घेतला जातो. त्याचप्रमाणे शास्त्रोक्त पध्दतीने संशोधन करण्याचे काम स्थानिक इतिहास करत असून हे संशोधन म्हणजे एका अर्थाने ज्ञानाचे व लोकशाहीकरणच होय असे म्हणता येते. स्थानिक इतिहास समाजाचे देखील लोकशाहीकरण करतो. कारण त्यात वापरलेल्या विविध पध्दतींच्याआधारे लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असतो. मात्र त्यासाठी संशोधकास तांत्रिक संशोधनपध्दती अवगत असणे आवश्यक आहे.

तथापि प्रस्तुत प्रबंधाचा विषय अहमदनगर जिल्ह्याचा स्थानिक इतिहास अभ्यासणे हा नसून या जिल्ह्यातील परिवर्तनाचा अभ्यास करणे हा आहे. त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनाच्या संकल्पनेशी प्रामाणिक राहून, परिवर्तनाचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न सदर प्रबंधात करावयाचा आहे.

१८१८ ते १९४७ या १२९ वर्षातील महत्वाच्या घटना व परिवर्तनाचा इतिहास प्रस्तुत प्रबंधातून नोंदविलेला आहे. सर्वच घटना-घडामोडींची शिरगणती न करता ज्या घटनांमुळे परिवर्तनास वेग प्राप्त झाला अथवा परिवर्तन घडले त्या महत्वपूर्ण घटनांचीच नोंद सदर प्रबंधात घेतलेली आहे.

**विषय निवड**

अहमदनगर जिल्ह्याची स्थापना २८ मे इ.स.१४९४ मध्ये अहमद निजामशहा याने केली. स्थापनेनंतर अनेकविध सत्ताधीशांच्या अधिपत्याखाली अहमदनगर जिल्ह्यातील जनता राहिली. तथापि या सत्ताधाऱ्यांची भौतिक संपदा जवळपासून सारखीच असल्यामुळे नगरकरांना सत्ताबदलामुळे विशेष असे कोणतेही परिवर्तन किमान भौतिक बाबतीत तरी जाणवले नाही. इंग्रजांच्या आगमनामुळे मात्र नवे तंत्रज्ञान, नवे कायदेकानुन, नवा दृष्टीकोन, मुख्य म्हणजे सामाजिक सुधारणा आल्या. त्याचबरोबर अनेकविध भौतिक सुधारणा आल्या. इंग्रजांचे आगमन हे आधुनिक युगाचे आगमन ठरले. १८१८ हा आधुनिक युगाचा आरंभ मानला जातो.

१८१८ मध्ये इंग्रजांचे एकछत्री साम्राज्य स्थापन झाले. कायद्याचे व तंत्रज्ञानाचे युग आले. याचा परिणाम अहमदनगरसारख्या दुष्काळी जिल्ह्यावरही झाला. राजकीयदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्याही अहमदनगर जिल्ह्यात अनेक परिवर्तने झाली. इंग्रजांनी आणलेला शिक्षण व्यवस्थेमुळे आपल्याच समाजाचा, समाजिक नीतिनियमांचा पुनर्विचार करणारी पिढी निर्माण झाली. त्यामुळे सामाजिक परिवर्तनास गती मिळाली, तर रेल्वेमुळे सुलभ झालेल्या दळणवळणाने, विजेच्या शोधामुळे, व्यापार व पर्यायाने आर्थिक क्षेत्रात परिवर्तन झाले. या सर्व परिवर्तनाचा अभ्यास करणे हा या प्रबंधाचा प्रमुख उद्देश आहे.

**संशोधन विषयाशी संबधित साहित्याचा आढावा**

अहमदनगरच्या इतिहासाविषयी यापूर्वी अनेक संशोधकांनी संशोधन व लेखन केलेले दिसते. या पूर्व संशोधनाचा येथे उल्लेख करणे आवश्यक ठरते. हे संशोधन पुढीलप्रमाणे :

१. अमोल बुचुडे यांनी 'अहमदनगरची निजामशाही' या ग्रंथाचे लेखन केलेले आहे. यांनी अहमदनगरची निजामशाहीकालीन समाजव्यवस्थेचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये येथील व्यापार, समाजव्यवस्था, जलव्यवस्थापन, स्थापत्य यांचा सखोल अभ्यास केला आहे.

२. संतोष यादव यांनी 'अहमदनगरचे पेशवेकालीन दप्तर' हा ग्रंथ लिहिला आहे. यांनी पेशवेकालीन अहमदनगर शहराच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय घडामोडींचा आढावा घेतला आहे. त्यासाठी त्यांनी पुणे येथील पेशवे दप्तरातील मोडी कागदपत्रांचा अभ्यास केला आहे.

३. राणी केदार यांनी 'अहमदनगर जिल्ह्यातील भिल्लांचा सामाजिक, आर्थिक अभ्यास (२० वे शतक)' या विषयावर लेखन केलेले आहे. यांनी विसाव्या शतकातील अहमदनगर जिल्ह्यातील भिल्लांनी राजकीय, सामाजिक जीवन ढवळून टाकले. ब्रिटीशांना अहमदनगर जिल्हा हस्तगत केल्याचा आनंद मिळू दिला नाही. ब्रिटीशांच्या कायद्याच्या राज्याला संघटीत विरोध केला. भिल्लांना उध्वस्त करण्यासाठी ब्रिटीशांना भेदनीतिचा वापर करावा लागला. तसेच विविध प्रशासकीय धोरणे आखावी लागली. याचा अभ्यास केला आहे.

४. मनिषा जाधव यांनी 'अहमदनगरमधील न्यायसिंधू व ज्ञानोदय वृत्तपत्रांचा चिकित्सक अभ्यास' या विषयावर लेखन केले आहे. यांनी 'अहमदनगरमधील ज्ञानोदय व न्यायसिंधू या वृत्तपत्रातील बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास' करुन त्याचा अहमदनगरच्या समाजजीवनावरील प्रभाव अभ्यासला आहे.

५. होळकर भरत यांनी ‘अहमदनगर जिल्ह्यातील कृषी व्यवस्थेवर परिणाम करणारे घटक’ या विषयावर लेखन केले आहे. यांनी अहमदनगर जिल्ह्यातील  पर्जन्य छायेच्या प्रदेशाचा कृषीवर होणारा परिणाम अभ्यासला आहे. अहमदनगर जिल्हा विस्ताराने महाराष्ट्रात सर्वात मोठा असून येथील दरडोई उत्पन्न कमी असण्याच्या कारणांची मिमांसा केली आहे.

६. अर्चना टाक यांनी ‘अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचा इतिहास’ या विषयावर लेखन केलेले आहे. यांनी अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या विविध शैक्षणिक संस्था, त्यांनी राबवलेले उपक्रम, या संस्थेतील सुशिक्षित वर्गाचे देशाच्या विकासातील योगदान याचा अभ्यास केला आहे.

७. मीना साळी यांनी ‘अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास’ या विषयाचा अभ्यास केला आहे. यांनी अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्यप्राप्तीसाठी केलेले प्रयत्न, स्त्रियांनी बजावलेली स्वातंत्र्य लढ्यातील कामगिरी यांचा सखोल अभ्यास केला आहे.

८. चोथे अशोक यांनी ‘अहमदनगर जिल्ह्यातील मिशनरींचे शैक्षणिक कार्य’ यावर लेखन केले आहे. यांनी वडाळा, शेवगाव, राहुरी इत्यादी दुष्काळी तालुक्यात अमेरिकन मराठी मिशनच्या पाद्रींनी शैक्षणिक क्षेत्रात केलेली भरीव कामगिरी अभ्यासली आहे.

९. खिल्लारी सुनिल यांनी ‘अहमदनगर जिल्हा परिषदेचा इतिहास’ लिहिला आहे. यांनी जिल्हा लोकल बोर्डाकडून अहमदनगर जिल्हापरिषदेचा प्रवास अभ्यासला असून जिल्हापरिषदेची कार्यकारिणी, विविध खाते, त्यांचे उपक्रम याचा सखोल अभ्यास केला आहे.

१०. नीता जगताप यांनी ‘अहमदनगर जिल्ह्यातील सहकार चळवळीचा इतिहास’ यावर संशोधन केले. यांनी सहकाराची पार्श्वभूमी, सहकाराची संकल्पना, सहकाराचे प्रणेते, सहकार क्षेत्रातील विविध कारखाण्यांतील प्रशासन, मजूरांचे प्रश्न, उत्पादनक्षमता, सहकारी तत्वज्ञानामुळे दुष्काळी अहमदनगरचा झालेला कायापालट अभ्यासला आहे.

११. बी.डी. कुलकर्णी यांनी 'ईस्ट इंडिया कंपनीकालीन अहमदनगरची न्यायदान व्यवस्था' या विषयावर संशोधन केले आहे. यांनी ईस्ट इंडिया कंपनीने प्रशासनाची सूत्रे हाती घेतल्यानंतर जी न्यायदान व्यवस्था राबवली तिचा अभ्यास केला. तसेच समान कायदा या तत्वापूर्वी भारतातील धर्मग्रंथांवर आधारित जो असमान, विषम कायदा होता त्याचा सखोल अभ्यास केला आहे.

या सर्व संशोधकांनी अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा अभ्यास केलेला नाही. प्रस्तुत प्रबंधात अहमदनगर शहराच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक परिवर्तनाचा अभ्यास करणे हा मुख्य उद्देश आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

सदर प्रबंधात परिवर्तनाचा अभ्यास करणे हे मुख्य उद्दीष्ट आहे. त्याकरिता ग्रंथ, नियतकालिके, स्मरणिक, पंचशताब्दी विशेषांक, अहमदनगर नगरपालिकेतील ठराव, पेशवे दप्तरातील कागदपत्र, मुंबई अभिलेखगारातील कागदपत्र इ. प्राथमिक साधने अभ्यासली आहेत. खेरीज नगरकरांच्या मुलाखती, आठवणी, मिशनरींचे रेकॉर्ड इ. साधनांचा उपयोग केला आहे. त्याआधारे संशोधन करुन तथ्ये मांडली आहेत.

कुठल्याही संशोधनाचा मुख्य हेतू नवे ज्ञान प्रकाशात आणणे हा असतो. या ज्ञानाला वास्तवाचा व पुराव्याचा भक्कम आधार असावा लागतो. तथापि केवळ दिशाहीन ज्ञानशोधन आततायीपणाचे ठरु शकते. त्यामुळे काही निश्चित उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवणे हे संशोधन करतानाआवश्यक ठरते. सदर संधोधनासाठी पुढील उद्दिष्ट्ये नजरे समोर ठेवली आहेत.

१. नगरशहराच्या १८१८ ते १९४७ या काळातील राजकीय परिवर्तनाचा अभ्यास करणे.

२.अहमदनगरमधील सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करुन या परिवर्तनाचा परिणाम नोंदविणे.

३.अहमदनगरच्या आर्थिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

४.अहमदनगरच्या शैक्षणिक परिवर्तनाचा अभ्यास करणे.

५. अहमदनगरमधील दुष्काळ व टंचाईच्या ब्रिटीशकालीन उपाय योजनांमुळे आलेले परिवर्तन अभ्यासणे

६. अहमदनगरमधील मध्यम वर्गाच्या उदयाची प्रक्रिया अभ्यासणे

७. अहमदनगरमधील भौतिक सुधारणांमुळे आलेले परिवर्तन अभ्यासणे.

**संशोधनाची गृहीतके**

प्रस्तुत संशोधन करताना जी माहिती उपलब्ध झाली तिची शहानिशा करुन,तिची यथायोग्य जुळवाजुळव करुन अहमदनगरमधील परिवर्तनासंबंधी काही एक आडाखे बांधता येतात. माहिती व घटनांचा कार्यकारणभावाने व तरतम भावाने अभ्यास केल्यास काही गृहीतके मांडता येतात. संशोधकाच्या अंगी आपण करीत असलेल्या संशोधनाचे व त्यातून हाती येवू शकणाऱ्या निष्कर्षाचे विश्लेषण करण्याची क्षमता असते. या क्षमतेच्या आधारे तो निश्चितपणे गृहीतके मांडू शकतो. तो जे नवे ज्ञान शोधून काढणार आहे त्याची शक्यता त्याला मांडता येते. त्यातून निर्माण झालेली गृहीतके नजरेसमोर ठेवून संशोधन केल्यास संशोधन निश्चित निष्कर्षाप्रत पोचण्याची प्रक्रिया सुलभ होते. त्यामुळे 'गृहीतके ' हा संशोधनातील महत्वाचा घटक मानला जातो. प्रस्तुत प्रबंध लेखनाबाबत पुढील गृहीतके मांडता येतात.

१. इंग्रजांच्या आगमनामुळे अहमदनगर जिल्ह्यात अनेक परिवर्तने झाली आहेत.

२. इंग्रजांनी आणलेल्या नव्या शैक्षणिक धोरणांमुळे अहमदनगरमध्ये शिक्षणविषयक जागृती झाली.

३. इंग्रजांच्या एकछत्री अंमलामुळे कायद्याचे राज्य आळयाची भावना निर्माण झाली.

४. इंग्रजानी आणलेल्या नव्या राज्यव्यवस्थेमुळे, व्यापारविषयक धोरणांमुळे अर्थविषयक परिवर्तन झालेले दिसते.

५. १८१८ ते १९४७ या काळात अहमदनगरमध्ये सामाजिक परिवर्तन घडून आले.

६. दुष्काळ, प्लेग, साथीचे आजार या संकटांमुळे अहमदनगर जिल्ह्याची अपरिमित हानी झाली. तथापि ब्रिटीश राजवटीच्या काळात निर्माण झालेल्या देशप्रेमाच्या भावनेमुळे नगरकरांनी या संकटांवर मात केली.

**विषयाचे महत्व**

१८१८ ते १९४७ हा काळ भारतीयांच्या दृष्टीने जसा गुलामागिरीचा होता तसाच तो अनेक परिवर्तनांचादेखील काळ होता. वेगवेगळ्या पातळ्यांवर स्थित्यंतरे घडत होतो. अहमदनगर जिल्ह्यातही याकाळात राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, परिवर्तने घडली. मिशनरी, इंग्रजी अधिकारी व स्थानिक रहिवासी यांचा या स्थित्यंतरात सहभाग होता. अहमदनगरच्या तुरुंगात अनेक राष्ट्रीय नेते कैदी म्हणुन राहिले. इंग्रजी अंमलात अनेक सुधारणा, वाद, विवाद, बदल अहमदनगरमध्ये घडले. त्यातून अहमदनगरमध्ये परिवर्तन घडले हे परिवर्तन जसे भौतिक तसेच वैचारिकही होते. या परिवर्तनाचा अभ्यास केल्यास अहमदनगरच्या वर्तनामानातील घटना घडामोडींचा अन्वयार्थ लावणे सुलभ होईल. स्थानिक कार्यकर्ते, नेते यांचे योगदान नोंदविले जाईल, हे या विषयाचे महत्व आहे.

**संशोधन पध्दती**

संशोधनात संशोधन सामुग्री व प्राथमिक साधने यांना महत्वाचे स्थान आहे. तितकेच महत्व संशोधन पध्दतीलाही आहे. योग्य पध्दतीची निवड करणे हे संशोधनास उपकारक ठरते. इतिहास संशोधनाच्या प्रचलित बहुतांश सर्वच पध्दती या संशोधनास उपयुक्त सिध्द झालेल्या आहेत. "स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास" या प्रबंधासाठी साधनशोध (Heuristics) पध्दतीचा उपयोग केलेला आहे. प्रस्तुत प्रबंधलेखनासाठी पेशवे दप्तर-पुणे, मुबंई अभिलेखागार, मिशनरी रेकॉर्ड व अहमदनगर नगरपालिकेतील रेकॉर्ड, अहमदनगर महाविद्यालय, दिपा निसाळ वाचनालय येथील वर्तमानपत्रे शब्बीर शेख यांच्या खाजगी संग्रहालयातील पुस्तके, राजेंद्र देशपांडे व इतर जेष्ठ नगरकरांशी केलेली चर्चा महत्वाची ठरली.

**स्थलकाल मर्यादा**

प्रस्तुत प्रबंधाचा अभ्यास 'स्वतंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा अभ्यास असा आहे. त्यामुळे अहमदनगर जिल्हा (शहर व ग्रामीण) हीच या प्रबंधाची स्थलमर्यादा आहे. अहमदनगर जिल्ह्याच्या आसपासची गावे वा सिमेलगतच्या भागात घडलेल्या ठळक घटना / घडामोडींचा समावेश या प्रबंधात केलेला आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय राजकारणात घडणाऱ्या अत्यंत महत्वपूर्ण घटनाही स्थलमर्यादेमुळे या प्रबंधात तपशिलवार चर्चिल्या नाहीत.

सन १८१८ ते १९४७ पर्यंतच्या घटना घडामोडी या प्रबंधाचा गाभा आहे. स्वतंत्र्योत्तर काळात अगदी १९४८-१९४९ या काळातील घटना महत्वपूर्ण असल्या तरी त्यांचा परामर्श या प्रबंधात घेतलेला नाही. अहमदनगरमधील अनेक संस्था, व्यक्ती यांचा उदय १९४७ ते १९५० या काळातील असल्याने त्याची नोंद या प्रबंधातून घेतलेली नाही. ही कालमर्यादा पाळणे प्रबंधाच्या शिर्षकानुसार बंधनकारक मानली आहे.

**संशोधन विषयाच्या प्रकरणांचे नियोजन**

अहमदनगरच्या परिवर्तनाचा अभ्यास या दुर्लक्षित विषयाचा अभ्यास या प्रबंधातून मी मांडला आहे. त्यासाठी एकूण सहा प्रकरणामध्ये प्रबंधलेखनाची विभागणी केली आहे. प्रबंधलेखनाचा आराखडा पुढीलप्रमाणे -

**प्रकरण पाहिले** -

**प्रस्तावना व संशोधन पध्दती**

या प्रकरणात विषयनिवडीमागील भूमिका, या विषयाची व्याप्ती व मर्यादा या विषयावर पूर्वसूरींनी केलेले संशोधन यावर चर्चा केली आहे. गृहीतके, संशोधनामागील उद्देश व या विषयाचे महत्व विशद केले आहे. साधनग्रंथांची उपलब्धता, माहितीचे विश्लेषण याबाबतची भूमिका या प्रकरणात मांडली आहे. अहमदनगरमधील परिवर्तनाचा अभ्यास करताना कोणकोणत्या क्षेत्रातील परिवर्तनाचा अभ्यास करावयाचा आहे व का करावयाचा आहे या संशोधकाच्या भूमिकेवर या प्रकरणातून प्रकाश टाकला

आहे. हे प्रकरण संशोधनाविषयीची रुपरेषा मांडणारे असून या प्रकरणात पुढील प्रकरणाविषयीची माहिती व आराखडा मांडली आहे.

**प्रकरण दुसरे-**

१८१८ ते १९४७ या काळात अहमदनगरमधील राजकीय परिवर्तनाची नोंद या प्रकरणात घेतली आहे. मुळात १८१८ ते १८५७ काळात नगरमध्ये राजकीय दृष्टीने स्थितीशीलताच दिसते. १८५७ च्या उठावासारख्या मोठया राजकीय घटनेत नगर शांत दिसते. १९२० नंतर मात्र राजकीय जागृतीला सुरुवात झालेली दिसते. १९३० मध्ये सत्याग्रह, बहिष्कार अशा माध्यमातून राजकीय जागृतीला झालेला प्रारंभ, बॉम्ब निर्मिती, सेनापती बापट, टिळक इ. राष्ट्रीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाने झालेले परिवर्तन, नगर मधील राजकीय चळवळींमध्ये सहभागी असणारे नेते व कार्यकर्ते, नगरमधील सामान्य माणसाचे राजकीय चळवळींमधील योगदान या सर्वांचा आढावा या प्रकरणात घ्यावयाचा आहे. मुळात राष्ट्रीय राजकारणात घडणाऱ्या घटनांची दखल घेत, प्रतिक्रियारुप राजकारण ते प्रत्यक्ष राजकीय चळवळींमध्ये सहभाग या परिवर्तनाचा लेखाजोखा या प्रकरणातून मांडावयाचा आहे.

**प्रकरण तिसरे -**

अहमदनगर शहरातील आर्थिक परिवर्तनाचा इतिहास या प्रकरणात अहमदनगरमध्ये असणारे उद्योग, व्यवसाय, पारंपारिक काम करणारे कारागीर यांच्यामार्फत होणारी उलाढाल नोंदविली आहे. अहमदनगरच्या बाजारपेठेत होणारे व्यवहार विचारात घेतले आहे. अहमदनगर जिल्ह्याच्या बाहेरुन स्थलांतरीत होऊन आलेले व्यापारी, कारागीर यांचे परिवर्तनातील योगदान अभ्यासले आहे. दुष्काळामुळे होणारी वाताहत, दुष्काळ व साथीच्या रोगावर इंग्रजांनी केलेल्या उपाय योजनांमुळे झालेले आर्थिक परिवर्तन यांचा विचार या प्रकरणात करावयाचा आहे. अहमदनगरमध्ये सावकारी व्यवसाय होता. या सावकारी व्यवसायामुळे सामान्य माणसांच्या आर्थिक श्रमांवर होणारा परिणाम अभ्यासायचा आहे. रेल्वेच्या व विजेच्या आगमनामुळे इंग्रजांनी

केलेल्या कायद्यांमुळे अहमदनगरच्या आर्थिक जीवनात झालेले परिवर्तन या प्रकरणात अभ्यासायचे आहे.

**प्रकरण चौथे**

'अहमदनगर शहरातील सामाजिक परिवर्तनाचा इतिहास' हे चौथे प्रकरण आहे. अहमदनगर शहरात जातीव्यवस्था पारंपरिक विचारामुळे होती. मात्र इंग्रजांनी दिलेल्या शिक्षणामुळे, प्रबोधनामुळे जातीव्यवस्थेचे जाचक नियम काही प्रमाणात शिथिल कसे होत गेले. मंदिर प्रवेश, सार्वजनिक हळदी कुंकू व शूद्रवस्तीत सत्यनारायण पूजा इ. कार्यक्रमांमुळे झालेले सामाजिक परिवर्तन या प्रकरणात अभ्यासायचे आहे. दळणवळण सुधारल्यामुळे वाढलेला प्रवास व नातेसंबंधाचा परगावातील गोतावळा कसा वाढत गेला, एकत्र कुटुंब पध्दती जाऊन विघटीत कुटुंब व्यवस्था कशी सुरु झाली, इंग्रजांनी नोकरी पध्दती सुरु केल्यामुळे व शेतीखेरीज इतर व्दितीयक व्यवसाय सुरु झाल्यामुळे मध्यमवर्गाची निर्मिती कशी झाली याचा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे. धर्मांतरीत ख्रिस्ती मंडळींची सामाजिक अवस्था यांच्या विचार या प्रकरणात केला आहे. याखेरीज स्त्री-शिक्षणामुळे स्त्रियांच्या सामाजिक स्थानात परिवर्तन झाले किंवा नाही याचा विचार या प्रकरणात केलेला आहे.

**प्रकरण पाचवे**

'अहमदनगर शहरातील शैक्षणिक परिवर्तनाचा इतिहास' हे पाचवे प्रकरण आहे. अहमदनगरमध्ये जे शिक्षण १८१८ पूर्वी दिले जात होते ते पारंपरिक पंतोजी पध्दतीचे शिक्षण होते. मात्र १८१८ नंतर शिक्षण व्यवस्थेत झालेले आमुलाग्र परिवर्तन, पाठ्यपुस्तकीय शिक्षणाला मिळालेली व्यवसाय शिक्षणाची जोड इत्यादींमुळे झालेले शैक्षणिक परिवर्तन या प्रकरणाचा अभ्यास विषय आहे. याखेरीज मिशनऱ्यांनी केलेला शिक्षणप्रसार, स्त्री-शिक्षणाचे प्रयत्न, दलित वर्गाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठीचे प्रयत्न, सरकारी शाळांना सुरुवात इत्यादीमुळे अहमदनगरच्या शैक्षणिक जीवनात झालेले परिवर्तन या प्रकरणाव्दारे अभ्यासायचे आहे अहमदनगरच्या शैक्षणिक वर्तुळात

शिक्षणविषयक परिवर्तनाचे कोणते परिणाम झाले याचाही विचार या प्रकरणात करावयाचा आहे.

**प्रकरण सहावे**

या प्रकरणामध्ये 'स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास' या शोध प्रबंधाच्या अभ्यासअंती हाती आलेले निष्कर्ष नोंदविले आहेत.

# प्रकरण-दुसरे

# अहमदनगर शहरातील राजकीय परिवर्तन

## प्रस्तावना

भारतीय राष्ट्रवादाचा उदय आणि त्यातून निर्माण झालेला भारताचा स्वातंत्र्यलढा हा केवळ ब्रिटीशांविरुध्दचा नव्हता. साम्राज्यवादी प्रवृत्तींविरुध्दचा तो एक व्यापक संघर्ष होता. आर्थिक व सांस्कृतिक शोषणाच्या साम्राज्यवादी धोरणांविरुध्द भारतीय जनता उभी राहिली. या कालखंडात जे राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व वैचारिक बदल कळत-नकळत घडत गेले. त्यातून आजच्या भारताची उभारणी झाली. या स्वातंत्र्यसंग्रामातून केवळ राजकीय मूल्यांचा उदय झाला असे नव्हे, तर नव्या आर्थिक, सामाजिक, वैचारिक व शास्त्रीय मूल्यांचा परीपोष होत गेला.

महाराष्ट्रात ब्रिटीशांनी साम्राज्यवादी भूमिकेतून जे निर्णय घेतले त्यातून राष्ट्रवादी भावना लोकांच्या मनात निर्माण झाली. अहमदनगर शहरातदेखील ही राष्ट्रवादी चळवळ उभी राहीली. यातून राजकीय मूल्यांसोबत सामाजिक समता, स्त्री स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य, औद्यागिकीकरण, राजकीय समता, राजकीय स्वातंत्र्याच्या विविध प्रेरणा व हे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी महाराष्ट्रात झालेले विविध स्तरांवरील प्रयत्न अहमदनगर शहरातही कसे होऊ लागले याचा विचार या प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

## जरी पटक्याऐवजी युनियन जॅक फडकला १८०३

दुसऱ्या बाजीरावस पेशवाईच्या गादीवर येण्याची फारच लालसा होती ती प्राप्त झाल्यानंतर ती टिकविण्याच्या बाबतीत दौलतराव शिंद्यांनी बाजीरावास मदत केली. तिचे बक्षीस म्हणून रावबीजीनी शिद्यांना अहमदनगर प्रांत बहाल केला. त्यामुळे १७९७ ते १८०३ या काळामध्ये अहमदनगर शिंद्यांचे ताब्यात होते. तथापि “शिंदे हे मराठी राज्याचेच घटक असल्याने शिंदेशाही ही मराठी शाहीच आहे असे मानण्यात हरकत नाही.”[1] असे इंग्रजांना वाटू लागले. जेत्याच्या तोऱ्यात वावरु लागले. परंतु शिंद्यांच्या

कारकिर्दीत अहमदनगरच्या किल्ल्याची फक्त "राजबंदीचा" तुरुंग एवढीच ओळख होती.

अहमदनगर ज्यावेळी शिंद्यांच्या अधिपत्याखाली होते त्यावेळेस इंग्रजांनी मराठेशाहीस चोहोबाजूनी सुरुंग पेरुन ठेवलेले होते. जनरल वेलस्ली हिंदुस्थानात आल्यावर त्याचे लक्ष अर्थातच मराठ्यांच्या राज्यावर खिळले. बाजीरावाने वसईचा तह केला त्याचे पालन शिंदे करीत नाहीत. ही सबब काढून वेलस्लीने शिंद्यांच्या अंमलाखालील अहमदनगरावर स्वारी केली. वेलस्ली ता. ८ ऑगस्ट १८०३ या दिवशी वाळकी मार्गे तळ हालवून अहमदनगरास आला. अहमदनगर शहरात पाऊल टाकताच नगरवासीयांना उद्देशून त्यांने एक जाहीरनामा काढला की, "ब्रिटीशांशी जो शांततामय सहाकार्य करील त्यास उपद्रव होणार नाही. जे मराठेशाहीमधील अधिकारी त्यांचे आज्ञापालन करतील त्यांचा मान राखला जाईल. कोणीही आपले घरदार सोडून पळून जाऊ नये. शांततेने राहावे. जो घबराट निर्माण करुन पळापळ करील अगर इंग्रजाचे आज्ञेचे पालन करणार नाही तो इंग्रजांचा शत्रू मानण्यात येईल."[2] यामुळे अहमदनगची जनता गप्प बसली. पण शिंद्यांची अरब सेना जय्यत तयारीत होती, त्याचप्रमाणे त्यांचे पायदळ ही बरेच होते. वेलस्लीने अहमदनगर शहरावर तीन बाजूंनी मारा केला. शहराच्या गावकोसाच्या भिंती उंच होत्या व त्यास असलेल्या बुरुजावरुन अरब मारा करीत होते. पण इंग्रजांच्या संघटित माऱ्यामुळे अरबांचा टिकाव न लागून ते घरामधून दडले व तेथून त्यांनी इंग्रजांवर मारा करण्यास सुरुवात केली. “ब्रिटीश सेना अहमदनगर शहरात घुसली व थोड्याशा चकमकीनंतर अहमदनगर शहर त्यांच्या हाती आले.”[3] वेलस्ली अहमदनगरच्या राजकारणाशी जुळवून घेत आपली भेदनीति वापरत होता. अहमदनगरकर आपापल्या वैयक्तिक जबाबदाऱ्यांमध्ये इतके गुंतले होते की, परकीय सत्ता आपल्या शहराचा ताबा घेत आहेत. आपण यापुढे गुलामगिरीत दिवस कंठू शकतो याची किंचीतही जाणीव झाली नाही.

“वेलस्लीने भिंगारचा रघुराव बाबा देशमुख यास चार हजार रुपयांची लाच देऊन किल्याची माऱ्याच्या दृष्टिने योग्य अशी जागा त्याच्याकडून शोधून घेतली, व या जागेवरुन वेलस्लीने आपल्या तोफा रोखल्या. वेलस्लीच्या तोफखान्याच्या अचूक माऱ्यामुळे किल्यामध्ये असलेला शिंद्यांचा किल्लेदार मल्हारराव कुलकर्णी श्रीगोंदेकर हा पांढरे निशाण दाखवून शरण गेला.”[4] शिंद्यांच्या पदरी असलेले युरोपियन अधिकारी अगोदरच इंग्रजांना मिळाले होते. बाजीरावाने तर अगोदरच इंग्रजांशी तह केला होता. त्याच्या चिथावणीवरुन इंग्रजांनी हा किल्ला शिंद्यांकडून घेण्याचे ठरविले होते, व इंग्रजांनी त्यावेळी पाय जे रोवले ते कायमचेच ! या दिवसापासून “वेलस्लीने आपला स्वत:चा पहिला कलेक्टर म्हणून इ. स. १८१८ मध्ये पॉटिंजर याची अहमदनगरास नेमणूक केली. त्यामुळे अहमदनगरची कलेक्टरी सर्वात जुनी म्हणुन मान्यता पावली.”[5] सत्तेवर येताच पॉटिंजरने जाहीरनाम्यातून स्पष्ट केले की, “४ मे १८१८ च्या जाहिरनाम्यानुसार हेन्री पॉटीजवर कृष्णराव त्रिंबक देशपांडे तालुका / तर्फे मानूर याने इंग्रजांच्या ११ फेब्रुवारीच्या जाहिरनाम्यानुसार बाजीराव दुसऱ्याच्या लष्करातून आपल्या पथकासह त्याची साथ सोडून आपल्या गावी परतला तेव्हा हेन्री पॉटीजरने त्या अभय दिले. बाजीरावाचा पराभव होताच कंपनी सरकारने १० मे १८१८ रोजी जाहीरनामा प्रसुत केला की १६ त्याचे (बाजीरावाचे) सरदार व सैनिक लढाईतून पळून आपल्या घरी येऊ लागले व काही येत आहेत. त्यातील कित्येकांनी कंपनी सरकारने अभय द्यावे म्हणजे आम्ही आमच्या घरी शांत राहू असे बोलणे इंग्रज सरकारशी केले आहे. तेव्हा त्यांनी एका महिन्याच्या आत आपआपल्या घरी पोहचून शांत रहावे. सैनिक व सरदारांनी एकत्रित जमू नये व मुलखात फिरु नये. जो कोणी मुलखात फिरेल शे-पन्नास एकत्रित करुन फिरेल किंवा कंपनी सरकारच्या विरोधात बंड करेल त्याचे पारपत्य होऊन त्यास प्राणास मुकावे लागेल.

२ मे १८१८ च्या जाहीरनाम्यानुसार बाजीरावाच्या लष्करातून फुटून किती घोडेस्वार व पायदळ तुमच्या महालातील गांवोगावी आले याची चौकशी त्यांना न कळता करुन त्यांची नांव निशीवार यादी त्वरीत अहमदनगरास पाठविणे व महालातील नद्यावरील नांववावर पटेकरींवर टोकऱ्यांवर आपला अंमल कडक करुन बंदोबस्त चांगला राखणे. (संदर्भ-अप्रकाशित, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, केळकर संग्रह) मुलकी व्यवस्था इंग्रजांच्या हातात घेतली व बाजीराव पेशव्यांचे 'अज्ञानपालनकर्ते' म्हणून इंग्रज अहमदनगरात मिरवू लागले. मराठी राज्यास असा हा मिळमिळीत सौभाग्य तिलक लावून अहमदनगर खरोखरीच या वेळेपासूनच इंग्रंजाचे अधिपत्याखाली गेले. लाचखाऊ देशमुखांनी जी माऱ्याची जागा वेलस्ली दाखविली तेथे 'बडी खुषी होऊन वेलस्लीने खाना खाल्ला' ते स्मारक किल्ल्याचे पूर्वेस आजही आहे.

पेशवाईच्या शेवटी मराठेशाही सावरण्याचा प्रयत्न करणाऱ्या, त्या त्रिंबकजी डेंगळेनी जे डाव टाकले ते इंग्रजांनी उलटविले. त्याच्या या गुणांचे बाजीरावाच्या कारकीर्दीत चीज झाले नाही, हा त्याचा दुर्दैवविलास असेच म्हटले पाहिजे. "मालकाची आज्ञा म्हणून त्रिंबकजी इंग्रजांचे स्वाधीन झाला व त्यास ठाण्याचे तुरुंगात ठेवण्यात आले."[6] तुरुंगात असताना मराठेशाही नामशेष होण्याचा असह्य विचार त्यास भंडावू लागला व तेथून त्यांने युक्तीने सुटका करुन घेऊन अहमदनगर प्रांताचे पश्चिमेस अकोला, संगमनेर, नाशिक भागात कौशल्यपूर्ण संघटन केले. या चातुर्यामुळे शत्रूने देखील तोंडात बोटे घातली, तथापि चोहोबाजूनी पराभवाचा वणवा पेटल्यावर हे एकाकी प्रयत्न कोठपर्यंत पोहचणार ? त्यातच "१७ जून १८१८ च्या जाहीरनाम्याव्दारे कंपनीने जाहीर केले की, दुसऱ्या बाजीरावाने त्रिंबकजी डेंगळ्यास पकडून देणाऱ्यास दोन लाखाचे व त्याची माहिती व ठाव ठिकाण सांगणाऱ्यास १० हजार रुपये बक्षीस देण्याचे जाहीर केले आहे, ते आता रद्द समजून त्रिंबकजी डेंगळ्यास पकडून देणाऱ्यास अथवा ठिकाणा सांगणाऱ्यास कंपनीतर्फे योग्य ते बक्षीस दिले जाईल. (एलफिनस्टनच्या सहीचा

जाहिरनामा आहे.) (संदर्भ-अप्रकाशित भारत, इतिहास संशोधन मंडळ, पुणे, केळकर संग्रह) अत्यंत परिश्रमाने इंग्रजांनी त्यास पकडले व चुनारच्या किल्ल्यात बंदीवान म्हणून ठेवले. तेथे तो बंदीवासातच मरण पावला.

जनरल वेलस्लीने अहमदनगरचा किल्ला ताब्यात घेतल्याबरोबर प्रथम किल्यातील जुन्या इमारती जमीनदोस्त केल्या. अहमदनगरचा ताबा घेतल्यावर वेलस्ली उत्तरेकडे वळला व कॅप्टन ग्रॅहम या सेनानीची अहमदनगरवर योजना झाली. याच सुमारास मालवा दादा व सय्यद सुलतान अली या दोघांनी इंग्रजांना त्रास देण्यास सुरुवात केली. मालवा दादांनी श्रीगोंदे सर केले व ग्रॅहमचा पराभव केला, पण वेलस्लीपुढे या दोघांचा टिकाव लागला नाही. वेलस्लीने उत्तरेकडे गोदावरीचे पार जाऊन आता शिंदे, होळकरांचा पिच्छा पुरविला. वसईच्या युध्दात शिंदे नामोहरम झाले व होळकरांचा अहमदनगर जिल्ह्यातील शेवगाव भाग इंग्रजांनी घशात घातला. बाजीराव तर अगोदरच इंग्रजांना शरण गेला होता. याप्रमाणे मराठेशाहीतील तीन प्रबळ प्रस्थे म्हणजे पेशवे, शिंदे, होळकर यांना इंग्रजांनी खिशात घातले. त्यामुळे अहमदनगर जिल्हा इंग्रजांच्या स्वाधीन झाला.

१८०३ साली इंग्रजांचे पाय अहमदनगरास लागल्यावर दुष्काळीचीही आपत्ति अहमदनगरला आली. त्यामुळे परिस्थिती जास्तच बिकट झाली. त्यातच इंग्रजांविरुध्द भिल्लांनी बंड पुकारले, पेशवा बाजीरावने याने भिल्लांचा बंदोबस्त करण्याचे काम खानदेशचे सुभेदार बाळाजी लक्ष्मण यांचेकडे सोपवले. त्याने भिल्लांना कोपरगावी आमिष दाखवून आणवले व विहीरीत बुडवून मारले इंग्रजांनी शेवगाव तालुक्यातील घेवरी चांदगाव येथेही भिल्लांचे पारिपत्य केले. त्यामुळे भिल्लांचे बंड शमले. इ.स. १८१७ मध्ये पुण्याचे तहाप्रमाणे बाजीराव याने अहमदनगरची मालकी इंग्रजांकडे संपूर्णपणे दिली. मराठ्यांचा खडकीच्या लढाईत पराभव झाल्यानंतर बाजीराव पुण्यास पळाला तो अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे व कोपरगाव या मार्गे अखेर इ.स. १८१८

मध्ये बाजीराव इंग्रजास शरण गेला. तेव्हापासून अहमदनगर व अहमदनगरचा किल्ला कायमचा इंग्रजांचा झाला.

### अ. ब्रिटीश सत्तेला विरोध व सुप्तावस्थेतील राष्ट्रवाद १८१८-१८८५

१८१८ सालापासून महाराष्ट्रात ब्रिटीश अंमल सुरु झाला. या परकीय सत्तेच्या अंमलाचा दुष्परिणाम सर्वप्रथम कोळी, भिल्ल, रामोशी, इत्यादी -आदीवासी जमातींना भोगावा लागला. या आदीवासी जमातींनी उठाव केले. हे उठाव सशस्त्र होते. यातील सर्वात मोठा उठाव १८५७ चा होता. या उठावांची सुरुवात कोळ्यांच्या उठावाने झाली.

### १. १८२१ चा दंगा

इ.स. १८२१ मध्ये अहमदनगरचे तुरुंगातील कैद्यांनी धुमाकुळ आरंभिला. कैद्यांनी शिपायांची हत्यारे हिसकावून घेऊन त्यांना चोप दिला. त्यातील काही कैदी पळून गेले व जे कैदी किल्ल्यात राहिले त्यांनी आपले राज्य घोषित केले. त्यामुळे इंग्रजांना कैद्यांचे पारिपत्य करण्यासाठी सैन्य बोलवावे लागले. इंग्रज सैनिक आत शिरले व कैद्यांवर गोळीबार केला त्यात एकोणतीस कैदी मैले व एक जखमी झाला. त्यामुळे हे कैद्यांचे बंड मोडले.

### २. कोळ्यांचे बंड १८२८ - १८४७

"अहमदनगरच्या पश्चिम भागातील कोळ्यांनी सतत वीस वर्षे इंग्रजांना स्वाथ्य मिळू दिले नाही. सह्याद्रीच्या डोंगराचा आश्रय घेऊन या कोळ्यांनी इंग्रजांशी सामना दिला. यामध्ये रामजी नाईक, रतनगडचा किल्लेदार गोविंदराव हे होते तथापि १८३० मध्ये मॅकिन्टॉश या सेनानीने कोळ्यांतच फूट पाडून या बंडाचा मोड करुन ८० कोळ्यांस अहमदनगरास साखळदंडाने बांधून आणले. यांचा पुढारी "रामा किरवा यास अहमदनगरात फाशी दिली. पण १८४५ ते १८४७ चे दरम्याने राघोजी भांगरे याने परत उचल खाल्ली व तो सावकारांची नाके कापू लागला."[7] त्याचाही इंग्रजांनी मोड केला. कोळ्यांचे या बंडात भिल्ल लोकही सामील झाले होते.

### ३. १८५७ ची निष्क्रियता भिल्लांनी पुसली

इ.स. १८१८ मध्ये मराठी राज्य नष्ट पावल्यानंतर, इंग्रजांचे एकंदर बंदोबस्ताचे राज्य व्यवस्थेमुळे देशात शांततामय वातावरण निर्माण झाले. इंग्रजांच्या प्रशासकीय बदलांमुळे सर्वांचे डोळे दिपून जाऊन मराठ्यांचे क्षात्रतेज मावळतीस लागले. “पूर्वी मराठी राज्याचे गुणवर्णन करणारे इंग्रजांचे भाट बनले. प्रत्यक्ष स्वर्गातून राज्य करण्यास हे देवदूतच आले आहेत, असा समज होऊन भारतातील आम जनता त्यांच्या भजनी लागली.”[४] इ.स. १८५७ च्या पहिल्या या स्वातंत्र्य युध्दात मात्र या देवदूतांची दानववृत्ति प्रथमच अनुभवास आली. तथापि १८५७ च्या या स्वातंत्र्य युध्दांत एकंदर अहमदनगर जिल्ह्यातील जनता चुपचाप होती. हा निष्क्रियतेचा डाग अहमदनगर जिल्ह्यातील भिल्ल जमातीने पुसून काढला. या भिल्लांचा पुढारी भागोजी नाईक हा होता. त्याने सात हजार भिल्लांचे संघटन करुन स्वतंत्र दल उभारले. इंग्रजांनी भिल्लांच्या बंडाचा मोड करण्यासाठी कोळी लोकांना हाताशी धरुन त्यांचे दल उभारले व काट्याने काटा काढण्याची नीति अवलंबली. इंग्रजांचा ले. हेन्री यांने भागोजीचे नाशार्थ दंड थोपटले. पण तो गतप्राण झाला. सेनापती पडल्यावर त्याची धुरा उचलण्याची तयारी ठेवण्याचे इंग्रजांचे युध्दनैपुण्याचे यावेळी कौतुक करावयास पाहिजे. इ.स. १८५८ मध्ये पाथजी नाईक याने राहुरी नजीक परत बंडांचे निशाण फडकविले. त्याचा जनरल माँटगोमरी याने मोड केला. तथापि फिरुन त्याने अकोल्यानजिक समशेरपूर येथे आणखी उचल खाल्ली. यावेळी मात्र न्यूटनने भेदनीतीचा अवलंब केला. भिल्ल व कोळी यांचे पिढीजात हाडवैर होते, हे त्याने ओळखून कोळयांना आमिषे दाखवून न्यूटन त्यास जवळ केले. कोळयांना त्याने लष्करी कवाईत व नेमबाजी शिकवली. याच वेळी भागोजीने निजाम हद्दीमध्ये धुमाकूळ मांडला. पण शेवटी भागोजी पडला व भिल्लांचा या स्वातंत्र्य संग्रामातील अध्यायाचा शेवट झाला. “सन १८७३ साली भागुजी कोळी याने सावकारशाहीविरुध्द बंड उभारले. नगर प्रांतात त्याने आपली कर्मभूमि बनविली होती. त्याचा पाठलाग करणे

इंग्रजांना फारच कठीण होऊन बसले. त्याला पकडून देण्यास एक हजार रुपयाचे बक्षीस लावले."[9] महत्प्रयासाने कर्नल डॅनियल याने त्यास सन १८७६ मध्ये पकडले. सावकारशाहीचे विरुध्द पारनेर, श्रीगोंदे, कर्जत व अहमदनगर येथील मराठे मंडळीतही असंतोष भडकला व सावकार बावीस ठिकाणी हल्ले झाले. त्यामुळे सैन्याची मदत घ्यावी लागली व हा असंतोष दबला. कोळी व भिल्ल यांनी ब्रिटीशांना सळो कि पळो करुन सोडले. ब्रिटीशांनी हे स्थानिक उठाव दडपून टाकले. त्यामुळे त्यांच्या कायद्याच्या राज्याला होणारा विरोध मावळला. "आपण ब्रिटीशांचा प्रतिकार करु शकत नाही. असा न्यूनगंड निर्माण झाला. आदिवासींनी ब्रिटीशांच्या विरोधात दिलेले लढे अपयशी झाले, तरी १८१८ ते १८८२ पर्यंत या आदिवासींनी ब्रिटीशांना चैन पडू दिले नाही."[10] ब्रिटीशांची आर्थिक व लष्करी शक्ती क्षीण करण्याचे काम या लढ्यांनी केले. हे अस्तित्वासाठी लढलेले अपयशी लढे स्वातंत्र्याची प्रेरणा देणारे ठरले.

## ब. राष्ट्रवादाचा उदय व विस्तार

सन १८१८-१८८३ पर्यंत वेगवेगळ्या पध्दतीने ब्रिटीशांना लढा देण्याचे काम असंघटितपणे सुरु होते. आतापर्यंत आपल्या अस्तित्वासाठी एकतर्फी दिलेली ती झुंज होती. १८८५ साली राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. भारतात ब्रिटीश राजवटीविरुध्द असंतोष निर्माण झाला. हा असंतोष दोन विरुध्द तत्वज्ञानाने भारलेला होता. त्यातील एकाला मवाळ तत्वज्ञान तर दुसऱ्याला जहाल तत्वज्ञान म्हणतात. इ. स. १८८५ पासून अहमदनगरच्या राजकीय जीवनात सूक्ष्म हालचाली व्हायला सुरुवात झाली. १८५७ नंतरचा कालखंड म्हणजे भारतातील वैचारिक प्रक्रियेचा कालखंड मानला जातो. ब्रिटीशांविरुध्द सशस्त्र संघर्षाची कल्पना त्याज्य ठरून संविधानिक पध्दतीने विरोध करणे ही कल्पना मूळ धरु लागली. त्यातूनच पुढे राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. १८८५ साली स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेची सुत्रे दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता इ. नेमस्त मंडळींच्या हाती होती. कायद्याच्या चौकटीत राहून तसेच ब्रिटीशांच्या न्यायबुध्दीवर श्रध्दा

ठेवून केंद्रिय कायदेमंडळातील भारतीयांचे प्रतिनिधित्व वाढवावे या विचारसरणीचे नेमस्त मंडळ होते.

१९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात राष्ट्रीय सभेत तरुण नेतृत्व उदयास आले. देशाला विद्वता व वक्तृत्व यापेक्षा प्रत्यक्ष कृतीची आवश्यकता आहे. असे सांगणारा लाल, बाल, पाल, हा जहालवादी नेतृत्वाचा गट उदयास आला. या जहालवाद्यांनी भारतीय जनतेत लढाऊ राष्ट्रवाद निर्माण करण्याचे ऐतिहासिक कार्य केले.

जहाल व मवाळ या दोन्ही विचारसरणींचा पगडा अहमदनगरच्या जनतेवर होता. अहमदनगर दुष्काळग्रस्त, विविध व्याधींनी त्रस्त झालेले असे एक मोठे खेडे होते. येथील भौगोलिक व सामाजिक परिस्थितीचा राजकीय जीवनावरील ठसा ठळकपणे दिसतो. महाराष्ट्रातील महत्वाच्या शहरांमध्ये होणारे उठाव अगदी हळूवारपणे अहमदनगरमध्ये दाखल झाले येथील लोकांच्या जीवनात राष्ट्रवादाचा उदय व्हायला कोल्हापुरच्या छत्रपती शिवाजी महाराजांचे बलिदान ही महत्वाची घटना कारणीभूत होती.

**१. छत्रपती चौथे शिवाजी महाराजांचे बलिदान १८८३**

महाराष्ट्रातील लोकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या वंशजांबद्दल प्रेमाची भावना होती. ब्रिटीशांनी केलेल्या अत्याचारात छत्रपती चौथे शिवाजी महाराज यांचा मृत्यू झाला. ही घटना महाराष्ट्रात ब्रिटीश सत्तेबद्दल असंतोष निर्माण करणारी ठरली. हा मृत्यू अहमदनगरमध्ये झाल्यामुळे या असंतोषातून राष्ट्रवादाची निर्मिती व्हायला मदत झाली.

“कोल्हापूरचे तरुण शिवाजी महाराजांना दत्तक आईच्या कारस्थानांनी वेडे ठरवून अनेक ठिकाणी प्रवास करुन शेवटी अहमदनगर किल्ल्यात १८८१ मध्ये बंदीस्त ठेवण्यात आले. या बंदीवासात त्यांचा अंगरक्षक ग्रीन याने छळ केला.”[11] २५ डिसेंबर १८८३ रोजी शिवाजी महाराजांचा अंगरक्षकाच्या लत्ताप्रहारामुळे मृत्यू झाला. हे प्रकरण महाराष्ट्रात फार गाजले. टिळकांनी व आगरकरांनी आपापल्या वर्तमानपत्रातून

सरकारवर टिकेची झोड उठवली त्याबद्दल या द्वईना डोंगरीवर १०१ दिवसांचा तुरुंगवास भोगावा लागला.

"महाराजांचा अंत अहमदनगर शहरात झाला. येथेच त्यांना अग्नीसंस्कार देण्यात आला. सिटी स्कूलचा एक शिपाई परशुराम उमाजी भोसले याने महाराजांचा अंत्यसंस्कार मानाने पार पाडला."[12] त्याच्या दहनभूमिवर एक छोटी समाधी रेसिडेन्सिअल हायस्कूलसमोर उभारण्यात आली. ही घटना अहमदनगरकरांच्या अंत:करणावर कोरली गेली. सरकारच्या निर्दयपणाची जाणीव येथील सुशिक्षित वर्गाला होऊ लागली. याच दरम्यान लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव सुरु केले होते. त्यातून स्थानिक नेत्यांना आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले. या उत्सवातून महाराष्ट्रातील लोकांच्या राष्ट्रीय भावना जागृत झाल्या तशा अहमदनगरकरांच्याही झाल्या होत्या.

## २. शिक्षकांवर देशद्रोहाचा आरोप व बडतर्फी १८९७

धर्मप्रेम व देशप्रेम तरुणांच्या अंतकरणामध्ये रुजविण्यासाठी लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव १८९३ साली व शिवजयंती उत्सव १८९५ सालापासून सुरु केली. त्या उत्सवाचे तरंग महाराष्ट्रात ठिकठिकाणी उठले. त्याप्रमाणे अहमदनगरलाही उठले. १८९६ पासून शिवजयंती उत्सवाची प्रथा अहमदनगरच्या काही मंडळींनी सुरु केली. १८९७ च्या मे महिन्यात शिवजयंती उत्सव अधिक थाटात विश्रामबाग पटांगणात साजरा झाला. त्यासाठी अहमदनगर सोसायटी शाळेमधील शिवराम एकनाथ भारदे, गणेश कृष्ण दाभोळकर, धोंडो आत्माराम धसे व रंगनाथ गजानन निसळ यांची भाषणे झाली. त्यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष माधव हरी मोढक यांनी सरकारी रिपोर्टाप्रमाणे खालील भाषण सारांश रुपाने दिले. "शिवछत्रपतींच्या चरित्रचिंतनाने आपणास भूतकालीन वैभव प्राप्त होईलच आपल्या राष्ट्राचा स्वातंत्र्यकाल अगदी नजिक आला आहे. आपले स्वातंत्र्य परक्याकडे थोड्या काळापुरते

गहान पडलेले आहे. हे परके लुटारुंनी भारतातून संपत्ती वाहून नेल्याने आपले काहीच नुकसान झाले नाही. आता आपण १८५७ प्रमाणे उठाव करुन गोऱ्यांना इंग्लंडच्या वाटेने पळण्यास भाग पाडू."[13] हे मोढकांचे जळजळीत भाषण स्थानिक वृत्तपत्रातून प्रसिध्द झाले. त्यातील बातमी सरकारी खात्याकडे पोहोचली कमिशनर व वरिष्ठ शिक्षणाधिकारी यांनी चौकशी करुन हे भाषण देशद्रोहाला उत्तेजन देणारे असून सरकारबद्दल अप्रिती निर्माण करणारे आहे. असा निर्वाळा दिला.

या भाषणाचा शाळेच्या भवितव्यावर परिणाम होऊ लागला. त्यामुळे सोसायटीच्या शाळेच्या नियामक मंडळाने आपली चूक कबूल करुन मुख्याध्यापक मोढक, भारदे, दाभोळकर, धसे, निसळ यांना शाळेतून बडतर्फ केले. "सोसायटी शाळेच्या कोणत्याही शिक्षकाने राजकारणावर व सार्वजनिक सभेत भाषण करु नये व कोणत्याही वृत्तपत्रकाशी संबंध ठेवू नये अशी सरकारकडून सक्त ताकीद देण्यात आली."[14] पुढे मुंबईच्या गर्व्हरनरांनी एक खास पत्रक काढून, वरील शिक्षकांना बडतर्फे केल्याशिवाय शाळेचे सरकारी अनुदान मंजूर करु नये असे फर्माविले. राजदेवतेचा कोप शांत करण्याकरिता व तिची कृपादृष्टी राखण्याकरिता सोसायटीला या हुशार शिक्षकांना मुकावे लागले. सोसायटी शाळेच्या अस्तित्वावर हे महान संकट होते. शिवजयंती उत्सवाच्या निमित्ताने अहमदनगरकरांमध्ये राष्ट्रप्रेमाची उमललेली ज्योत सरकारने अशा प्रकारे विझवून टाकली.

### ३. बंगाल फाळणीने अहमदनगरची राष्ट्रीयता चेतवली १९०५

"सन १९०५ साली लॉर्ड कर्झन याने लोकविरोधाला न जुमानता बंगालची फाळणी करण्याचे ठरविले. त्यामुळे फाळणीविरुध्द चळवळीचा खरा आरंभ ७ ऑगस्ट १९०५ रोजी सुरु झाला."[15] या दिवशी कलकत्ता शहरात लोकांनी हरताळ पाळला. यावेळी राजे महाराजे, जमीनदार, व्यापारी, मारवाडी वगैरे राजकीय चळवळीत न पडणारे लोकही या चळवळीत सामील झाले. फाळणीच्या योगाने बंगालात राष्ट्रीय

भावनेची एक नवी ज्योत प्रज्वलीत झाली. चौकर वकील व बाळासाहेब देशपांडे यांना ही स्वदेशी आणि बहिष्काराची योजना मान्य झाली. बाबासाहेब देशपांडे यांनी विनायक दामोदर सावरकर यांना व्याख्यानाकरिता आमंत्रण दिले. सावरकर यांचे अहमदनगरातील प्रचंड जनसमुहापुढे व्याख्यान झाले. स्वातंत्र्यवीर सावरकर आपल्या भाषणात म्हणाले, "भारतभूमीची पारतंत्र्याची हाक फक्त बंगाली लोकांना ऐकू येते, आणि महाराष्ट्राला ऐकू येत नाही असे नाही. सह्याद्रीच्या पठारावरील तुम्हीं आम्हीं सिंहाचे बच्चे आहोत. म्हणूनच आपण कोणतीही राजकीय चळवळ यशस्वी करुन दाखवू असा आपला आत्मविश्वास आहे. आपल्या सर्वात सामर्थ्य आहे. स्वदेशाच्या सामर्थ्य वाढीकरिता स्वदेशी आणि परकीयाचे हातपाय लुळेपांगळे करण्याकरिता बहिष्कार या गोष्टी तुम्ही प्रथम आचरणात आणल्या पाहिजे."[16] या व्याख्यानाचे पडसाद नगरजिल्ह्यात उमटू नयेत म्हणून सरकारी अडथळा सुरु झाला. "सुरु होणाऱ्या चळवळीस "प्रतिबंध म्हणून प्रथम सरकारी नोकरापासून सुरुवात झाली. चळवळीत पडण्याची सरकारी नोकराची छाती नव्हतीच तरीपण त्यांना बंधने आली. विद्यार्थ्यांनी या चळवळीत पडू नये म्हणून सर्क्युलरे काढण्यात आली."[17] या घटनेपासून नगरमध्ये राष्ट्रवादाची भावना प्रबळ होत गेलेली दिसते. भारतीय राष्ट्रीयत्वाच्या घटनांवरील प्रतिक्रिया अहमदनगरमध्ये उमटलेली दिसते.

### ४. 'वंदे मातरम्' ने अहमदनगर दुमदुमले १९०५

'स्वेदशी' व 'बहिष्कार' बरोबरच 'वंदे मातरम्' या शब्दाला देखील महत्व येऊ लागले. ते गीत ब्रिटिश सरकारला क्रांतिकारक वाटू लागले. "देशभक्तीची स्फूर्ति देणारे हे पद्य सरकारला शिवीसारखे वाटू लागल्यामुळे तो गुन्हा ठरु लागला. त्यांना या शब्दाची भिती वाटू लागली. पण याचा लोकांच्या मनावर इतका परिणाम झाला की, साऱ्या अहमदनगर जिल्ह्यात प्रत्येकाच्या तोंडी 'नमस्कार' किंवा 'रामराम' याच्याऐवजी 'वंदे मातरम्' या शब्दानेच एकमेकास अभिवादन होऊ लागले."[18] अहमदनगरातील राष्ट्रीय

वृत्तीचे पुढारी बाळासाहेब देशपांडे, चौकर, पंडित यांनी या शब्दास प्रोत्साहन दिल्यामुळे कागदपत्रावर 'श्री'च्या ठिकाणी 'वंदे मातरम्' हा शब्द अधिष्ठित झाला. विद्यार्थी वर्ग या शब्दाने भारुन गेला. अहमदनगरशहरातील भैय्या म्हणजे बाळासाहेब देशपांडे याचा पठ्ठा. त्याचे दुकान काटेगल्लीच्या समोर होते. हा भैय्या म्हणजे बंडखोरवृत्तीचा मूर्तिमंत नमुना होता. हा गृहस्थ स्वदेश प्रेमाने इतका भारुन गेला की, 'वंदे मातरम्' असे लहान मुलांनी त्याच्या दुकानी जाऊन म्हटले की त्याला अर्धा पेढा मिळायचा. 'वंदे मातरम' या शब्दाने अहमदनगर शहरात आणि जिल्ह्यात इतका काही कहर करुन सोडला होता की, थोरांच्या तोंडी 'वंदे मातरम्' लहानाच्या तोंडी 'वंदे मातरम्' कागदावर 'वंदे मातरम्' दारावर 'वंदे मातरम्' भिंतीवर 'वंदे मातरम्' जिकडे तिकडे पहावे तिकडे 'वंदे मातरम्' हा शब्द भारतीय राष्ट्रीय धर्मवाक्याप्रमाणे बनून गेला होता.

### ५. बहिष्कारास व्यापाऱ्यांनी धार चढवली १९०६

"१९०६ साली कलकत्ता येथे भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात 'स्वदेशी' आणि 'बहिष्कार' यांचा ठराव पास होऊन शिक्कामोर्तब झाल्यामुळे 'वंदे मातरम्' प्रमाणेच ही बहिष्काराची चळवळ देशव्यापी झाली होती. अहमदनगरमध्ये यावेळी देखील दोन पक्ष होते."[19] बाळासाहेब देशपांडे, चौकर, फिरोदिया वैगरेचा राष्ट्रीय पक्ष आणि रावबहादुर चितळे यांचा नेमस्त पक्ष. "स्वदेशाच्या रुपाने स्वदेशी मालास उत्तेजन दिल्यासारखे होत असे आणि बहिष्काराच्या रुपाने परदेशी कापड व इतर माल याचा होणारा व्यापार हटविला जात होता. म्हणजे एकाबाजूने उत्तेजन दिले जाते तर दुसऱ्या बाजूने बंधन घातले जात होते."[20] खरे पाहिले असता ही गोष्ट उभयतांना म्हणजे जहालाप्रमाणे मवाळांना ही मान्य झाली होती. पण स्वदेशी म्हटले की बहिष्कार आलाच आणि बहिष्कार म्हटल की सरकार आपणावर डोळे वटारील प्रसंगी लेखणीचा एखादा फटकाराही देईल ही भीती मवाळांना असल्यामुळे ते कधी कधी या चळवळीची थट्टाही करीत असा प्रकार त्याकाळी चालू होता.

त्यातच आणखी मद्यपान निषेधाच्या चळवळीची ही भर पडली. या चळवळीत सर्व जातीचे लोक सामील झाले. पुणे, बेळगाव, ठाणे या जिल्ह्यात तर या चळवळीने कहर उडवून दिला. जस जसा चळवळीस जोर चढू लागला तस तसे पोलिस अधिकारी व अबकारी अधिकारी ही चळवळ दडपून टाकण्याकरिता कंबर कसू लागले. त्यांनी आपले दडपशाहीचे हत्यार उपसले व लोकांवर खोटे खटले भरण्यास सुरुवात केली. स्वयंसेवकांस पकडावे आणि 'यापुढे ही चळवळ मी करणार नाही' असा कबुलजबाब लिहुन घेऊन सोडून द्यावे असा क्रम त्यांनी सुरु केला. अशी ही सरकारची दडपशाहीची मोहीम मोठ्या प्रमाणात सुरु झाली होती.

**६. बॉम्ब आणि भूमिगत ही सेनापती बापटांची देण १९०८**

"इंग्रज जाऊन राजसत्ता लोकांच्या हातात आल्याशिवाय भारताचे कल्याण होणार नाही म्हणून त्याकरिता स्वतंत्र सैनिक बनून क्षणाचाही विलंब न करता प्राणपणाने भारतीय तरुणाने तयारीस लागले पाहिजे असे विचार सेनापती बापटांसारख्या काही तरुणांच्या मनात स्फूरु लागले."[21] या विचाराने शिक्षण घेत असतानाच सेनापती बापट यांना घेरले. एडिंबरो येथे असताना एका रशियन कुमारकेशी यांची ओळख झाली. नंतर ते पॅरिसला गेले आणि तेथे बाँब तयार करण्याची विद्या त्यांनी हस्तगत केली. ही विद्या हस्तगत होताच तिचा प्रचार भारतात करण्याची योजना ठरवून बाँब तयार करण्याच्या कृतिसह ते मार्च १९०८ मध्ये हिंदुस्थानात आले. याच सुमारास अहमदनगर जिल्ह्यात चालू असलेल्या चळवळीस अधिक तीव्र स्वरुप यावे, विद्यार्थ्यांच्या मनावर राष्ट्र आणि राष्ट्रीयता याबद्दल अभिमान उत्पन्न व्हावा, पारतंत्र्याची चीड येऊन स्वातंत्र्य आणि स्वराज्य प्राप्तीची सिध्दता व्हावी. हा दृष्टिकोन पुढे ठेवून अहमदनगरातील पुढारी देशपांडे, चौकर यांनी अहमदनगरात राष्ट्रीय शिक्षण परिषद भरविण्याचे ठरविले.

इतक्यात धरपकडीची मोहिम जोरात सुरु झाली. हे समजताच हा क्रांतिकारक वीर सरकाराच्या हातावर तुरी देऊन भूमिगत झाला. बापट, बाँब आणि भूमिगत हे

समीकरण इतके जुळले होते की एका बापटास पकडावयाचे म्हणजे दहा पोलिस खलास व्हायचे. “बंगाली क्रांतिकारकाचे वारे अहमदनगरात शिरताच बळवंत कस्तुरे, बाजीराव पाठक, मोरेश्वर देशमुख आणि रहातेकर यांच्या गुप्त बैठका सुरु झाल्या.”[22] दररोज या आखाड्यात शे-सव्वाशे तरुण विद्यार्थी जमू लागले. वरील मंडळीची गुप्त बैठक दरारोज गुजर गल्लीतील पुणतांबेकरांच्या माडीवर भरत असे. बाजीराव पाठक हा पारनेरकडील भागात राहात असल्यामुळे तिकडे जाऊन सेनापती बापटाची गुप्तपणे भेट घ्यावी असे या मंडळाचे घाटत असतानाच एके रात्री नंबर १ च्या शाळेतील लाकडी सामानाची मोडतोड झाली. ही बातमी बाहेर पडताच त्या शाळेचे विद्यार्थी म्हणून संशयावरुन पाठक आणि रहातेकर या विद्यार्थ्यास पकडण्यात आले. पण त्यांचे गुरुजी गुंडमास्तर यांनी या विद्यार्थ्यांबद्दल प्रशंसा केल्यामुळे आणि त्याच्या विरुध्द काही पुरावा न सापडल्यामुळे दुसऱ्या दिवशी त्यांना सोडून देण्यात आले. सेनापती बापटाचे अहमदनगर जिल्ह्यातील भूमिगत वास्तव्य, वंदेमातरम भय्याची हद्दपारी आणि ‘देशाचे दुर्दैव’ या मथळ्याखाली लोकमान्य टिळकांनी लिहिलेल्या केसरीतील अग्रलेखामुळे त्यांना झालेली १००० रुपये दंड व ६ वर्षाची शिक्षा या गोष्टींचा लोकांच्या मनावर इतका जबरदस्त परिणाम झाला की पुढच्यास ठेच मागचा शहाणा या म्हणीप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय चळवळी हळूहळू कमी होता होता थंड पडल्या. तिच्यात बराच काळापर्यंत उष्णता निर्माण झाली नाही.

**७. प्रांतिक परिषदेवरील अहमदनगरचे प्रभुत्व १९०६**

सन १९०६ साली नाशिक येथे अहमदनगरचे लोकनायक बाळासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली ‘प्रांतिक परिषद’ भरविण्यात आली. देशपांडे यांनी आपल्या भाषणात काँग्रसचे ध्येय आणि ध्येयपूर्तीसाठी स्वदेशीचा पुरस्कार का करावयास पाहिजे याचे फार सुंदर विवेचन केले, आणि त्याबरोबरच “काँग्रेसही सनदशीरतेच्या व शांततेच्या दीप प्रकाशाने आपणास स्वातंत्र्याचा मार्ग दाखवीत असली तरी त्या अंधुक

प्रकाशापेक्षा आपण प्रचंड चळवळीची मशाल पाजळली पाहिजे."[23] अशा आवेशपूर्ण शब्दांत त्यांनी सर्वांना संदेश दिला. या भाषणाचा अनुकूल परिणाम होऊन तरुणांची दृष्टी एका नवीन ध्येयाकडे झुकू लागली.

स्वदेशीचा पुरस्कार आणि परेदशी मालावर बहिष्कार या चळवळीच्या प्रचाराकरिता ठिकठिकाणी सभा होऊ लागल्या. 'बाँबगोळ्याचा खरा अर्थ' हा लेख प्रसिध्द करुन केसरीने त्या कृत्याचा पाठपुरावा करताच सरकारने केसरीवर खटला भरला व दावर नावाच्या न्यायाधिशाने लोकमान्य टिळकांना सहा वर्षाची कठोर शिक्षा दिली. या शिक्षेमुळे महाराष्ट्रात विशेषत: पुणे, अहमदनगर व नाशिक या जिल्ह्यात जास्तच खळबळ उडाली. नगर जिल्ह्यातील सेनापती बापट वामनराव जोशी व कस्तुरे हे पुढे सरसावले.

**८. अहमदनगरच्या वामन जोशींना 'नाशिक कोर्टात' शिक्षा १९०९**

"अहमदनगर शहरात गुजर गल्लीतील बोळीत असणाऱ्या पुणतांबेकरांच्या माडीवर बाँम्ब तयार करण्याचे कार्य गुप्तपणे सुरु होते. पिक्रीक ॲसिड कसे तयार करावे, बाँबची प्रतिक्रिया कशी करावी हे ज्ञान क्रांतिकारक तरुण मिळवू लागले."[24] क्रांतीच्या वेदीवर हातात बाँब घेऊन आत्मबलीदान करण्यास तरुण उभे राहिले. "युरोपियनाने एका हिंदी गृहस्थास लाथा मारुन ठार केले."[25] असा दुष्ट आणि निर्दयपणाचा अपराध त्याच्या हातून घडला असताही केवळ गोरे म्हणून त्या अपराधाबद्दल कोणत्याही प्रकारची कडक शिक्षा न देता काही दंड करुन कलेक्टरसाहेबांनी त्यास सोडून दिले. परंतु त्यात जॅक्सन साहेबांनी त्याच न्यायासनावर बसून बाबाराव सावरकर यास जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा दिली. या पक्षपाती वर्तनाचा आघात तरुणांच्या मनावर झाला. ताबडतोब गुप्त सभा झाल्या. ठिकठिकाणी क्रांतिकारक गुप्त संदेश गेले. "क्रांतिकारकाचा डोळा जॅक्सन साहेबावर सतत असल्यामुळे नाटकाचा प्रयोग पाहण्याकरिता ते नाटकगृहात आले असता त्यांना

पिस्तुलाच्या सहाय्याने ठार करण्यात आले."[26] ता. २१ डिसेंबर १९०९ हा भीषण प्रकार घडून आला. हे कृत्य अनंत कान्हेरे याने केले.

"नाशिक येथे जॅक्सनचा खून झाला पण त्याचा भडका मात्र नगर आणि पुणे जिल्ह्यात उडाला. या होमकुंडात अपराध्याबरोबर निरापराधी आणि संशयित अशा दोघांनाही चटका बसला गेला. त्यांनी या चटक्याची कधीच पर्वा केली नाही. बंगाल कर्झनशाहीने खळवळून जागा झाला."[27] मग महाराष्ट्राला झोप कशी येईल. १८१८ पासून ते १८६१ पर्यंत ब्रिटिश राजवटीशी दोन हात करणारा अहमदनगर जिल्हा तोही मृतवत कसा पडून राहील ? अहमदनगर जिल्ह्यातही क्रांतीचे वारे जोरात वाहू लागले. या चळवळीने भांबावून गेलेल्या अधिकाऱ्यांच्या कानात नाशिकच्या पिस्तुलचा वार शिरताच त्यांच्यात जणू सैतानाचा संचार होऊन त्यांना चोहोकडे क्रांतिकारक दिसू लागले. पण सरकारी अधिकाऱ्याचे लक्ष सशस्त्र क्रांतिकारकाने आपणाकडे वेधून घेतल्यामुळे त्यांना अहमदनगर, भिंगार, संगमनेर आणि अकोला या भागावर आपले सारे लक्ष केंद्रिभूत करावे लागले होते.

१९०८ साल म्हणजे भारतात बॉंबचे बीजारोपणाचे साल असे म्हटल्यास वावगे होणार नाही. वामन जोशी यांना झालेली हद्दपारीची शिक्षा तरुण कार्यकर्त्यांसाठी अत्यंत स्फूर्तीदायक ठरली.

## ९. होमरुलचे निमित्त जहाल मवाळ समेट १९१४

महाराष्ट्राप्रमाणे स्वराज्याच्या चतु:सूत्रीची चाल बरीच पुढे गेली असली तरी क्रांतिकारकाची चळवळ अहमदनगर जिल्ह्यातील बहुतेक थंडावली होती. अशावेळी सेनापती बापट यांच्या मार्गदर्शनाची जरुरी अहमदनगर जिल्ह्यास प्रभावी ठरली असती. पण त्यांनी कोणत्याही गोष्टीकडे तूर्त लक्ष न घालता आपला आत्मशुध्दीचा कार्यक्रम सुरु केला. महाराष्ट्राला केसरीच्या गर्जनेने मार्गदर्शन करणाऱ्या लोकमान्य टिळकांच्या भेटीवर बंदी घातली, त्यामुळे "महाराष्ट्राला पुढील कार्यक्रम कोणता आखावा याबद्दल

अहमदनगरच्या पुढाऱ्यांना पंचाईत पडली."[28] ता. १४ जुलै रोजी पुण्यास प्रांतिक परिषद भरली त्या सभेत बॅरिस्टर बॅप्टीस्टा यांनी 'होमरुल' हे आपले ध्येय ठरवून त्याची मागणी करावी, कारण होमरुल आणि संघराज्यातर्गत स्वराज्य यात वस्तुत: फारसा फरक नाही, असे त्यानी प्रतिपादन केले. होमरुल हा सुटसुटीत शब्द असल्यामुळे बेझंटबाईच्या मनात हा विचार येताच त्यांनी आघाडी मारुन होमरुल लीग काढली. अहमदनगरातील राष्ट्रीय पक्षांच्या पुढाऱ्यांना हा नवीन पक्ष पसंत पडला. चौकर, देशपांडे, सप्तर्षी, फिरोदिया यांनी या पक्षांस पुढाऱ्यास पाठिंबा दिला व अहमदनगर येथे होमरुलची शाखा काढण्याचे ठरले. "लोकमान्य टिळकांनीही बाईंच्या या नव्या कल्पनेला पाठिंबा दिला. आणि मवाळ जहालाबद्दल त्यांनी असे सुचविले की मवाळ जहाल हा भेद आता आपण विसरलो पाहिजे, त्यांनी आपसात समेट करुन घेतला पाहिजे. वास्तविक सर्वत्र आपापल्यापरीने नॅशनलिस्ट म्हणजे देशाभिमानी आहोत. मवाळ म्हटला की तो गवळ्याच्या दुधाप्रमाणे बेचव आणि जहाल म्हटला की, तो हातात कोलीत घेऊन नाचणारा असे नाही. पुण्याच्या परिषदेत पहिला ठराव चालू महायुध्दाबद्दल मांडून इंग्रजाना जय होणे आम्हाला श्रेयस्कर आहे."[29] असे त्यांनी प्रतिपादन केले. ही विचारसणी सर्वांना पटून अहमदनगर येथे होमरुल लीगची स्थापना झाली. आणि चौकर, देशपांडे, रा.ब.चितळे, पटवर्धन, माणिकचंद मुथा, चंदनमल जसराज फिरोदिया, शेट प्रेमसुख कावरे, नानासाहेब सप्तर्षी, या सर्व जहाल मवाळ किंवा नेमस्त प्रागतिक यांचा समेट झाला आणि यापुढील सर्व राष्ट्रीय कार्ये मवाळ जहालांच्या एकाविचाराने होऊ लागली.

"ता. ३१ मे १९१६ रोजी अहमदनगर येथे 'नगरजिल्हा परिषद' भरली. अध्यक्षस्थान ठरल्याप्रमाणे तात्यासाहेब केळकर त्यांनी स्वीकारले होते. स्वागताध्यक्ष रा.ब.चितळे होते. तात्यासाहेब केळकर यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीयसभा आणि होमरुल लीग यांची ध्येये जवळजवळ एकच असून राष्ट्रीय सभेचा जो उद्देश आहे, तोच साधण्याकरिता होमरुल लीगची स्थापना होत आहे असे सांगितले."[30] याच सभेत

अहमदनगरच्या पुढाऱ्यांनी होमरुल लीग स्थापनेचा कार्यक्रम घेतला, आणि सभासद नोंदणीचे काम मोठ्या धुमधडाक्याने सुरु झाले. अहमदनगरात यावेळी सर्वांची एकी झाली होती. जहाल मवाळ एकत्र आले होते. त्यांच्यात एक प्रकारचा उत्साह आला होता. ३१ मे १९९६ रोजी सकाळी लोकमान्य टिळक, तात्यासाहेब केळकर व इतर मंडळी अहमदनगर स्टेशनवर येऊन उतरली. स्टेशनपासून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. 'अहमदनगर जिल्हा परिषद' बागडे थिएटरमध्ये भरविण्यात आली होती. परिषदेस अहमदनगरमधील आणि जिल्ह्यातील सर्व पक्षाचे लोक हजर होते. "लोकमान्य टिळकही परिषदेस उपस्थित होते. नगरातील सर्व व्यापारी मंडळींनी पुढाकार घेतल्यामुळे सरस्वती आणि लक्ष्मी यांचा अपूर्व संगम झाला आहे की काय असे वाटत होते."[31] लोकमान्य टिळकांचे व्याख्यान कापड बाजाराच्या मागील पटांगणात (सध्या तेथे इमारत कंपनीच्या इमारती व पोस्ट ऑफिस आहे) होणार असल्यामुळे व्यापारी मंडळीनी तेथे मुद्दाम भव्य असा मंडप उभारला होता. पहिले व्याख्यान ता. ३१ मे १९१६ रोजी झाले. अध्यक्षस्थानी अहमदनगरचे वयोवृध्द पुढारी चौकर वकील होते. लोकमान्य टिळकांनी होमरुल या विषयावरच मुख्यत: भाषण केले. लोकमान्य टिळकांची जी दोन व्याख्याने झाली त्याकरिता टिळकांनी आपले रिपोर्टर ठेवले नव्हते. ती टिपून घेण्याकरिता सरकारी लघुलेखक हजर होते. सरकारी लघुलेखकाने व्याख्यानाचा जो रिपोर्ट सरकारकडे पाठविला तो राज्यद्रोहात्मक आहे असे समजून ता.२२ मे १६ ला बेळगाव व अहमदनगर येथे झालेल्या भाषणाबद्दल पिनल कोड कलम १२८ अ खाली लोकमान्य टिळकांवर खटला भरला गेला. परंतु हायकोर्टाने टिळकांची जामीनकी रद्द करुन त्यांना दोषमुक्त ठरवून सोडून दिले.

### १०. अहमदनगरची प्रांतिक परिषद १९१८

"होमरुल लीगचे प्रमुख सभासद हरिभाऊ पटवर्धन, चितळे, चौकर, भाऊसाहेब फिरोदिया, माणकचंद मुथा, नारायणदास बार्शिकर, संगमनेरचे देशपांडे वगैरे

अहमदनगर जिल्ह्यातील प्रमुख मंडळी असल्यामुळे लीगचे कार्य व्यवस्थित चालू झाले."[32] यापुढील एक पाऊल म्हणजे अहमदनगरच्या पुढाऱ्यांनी १९१८ साली 'प्रांतिक परिषद' भरविण्याची जबाबदारी आपणावर घेतली व बॅरिस्टर बॅप्टिस्टा यांना अध्यक्ष करावे असे ठरविले. अध्यक्षाची संमती घेण्याकरिता चितळे हे स्वत: गेले होते. नंतर पुढाऱ्यांनी एक सभा घेऊन रा.ब.चितळे यांची स्वागताध्यक्ष म्हणून निवड केली. तसेच हरिभाऊ पटवर्धन, भाऊसाहेब फिरोदिया, शेट चंदनमल जसराज, माणकचंद मुथा, शेट प्रेमसुख कावरे यांना चिटणीस म्हणून निवडण्यात आले. नगराबाहेरील अनाथ विद्यार्थी गृहाच्या जवळ भव्य मंडप देण्यात आला होता. बॅ.बॅप्टिस्टा म्हणाले "महाराष्ट्रीय बंधूनो काळ बदलतो तशी ध्येये देखील बदलतात. स्वराज्याची भूक सर्वांनाच लागली असल्यामुळे लखनौच्या राष्ट्रीय सभेने हिंदु, मुसलमान, जहाल, मवाळ यांना एकत्र आणले आहे. अँग्लोइंडियन लोकांनी लक्षात ठेवावे की तुम्ही स्थानिक रहिवासी आहात, तुमचा हितसंबंध या देशाशी निगडीत आहे. हाडाचे तुम्ही हिंदीच आहात, तुमचा धर्म ख्रिस्ती असला तरी तुमची भाषा हिंदुस्थानातील प्रादेशिक आहे. त्यांची हितसंरक्षण करण्याची जबाबदारी स्वराज्य मिळाल्यावर जशी राखली जाईल, तशीच अँग्लोइंडियनचीही घेतली जाईल". स्वराज्याचा ठराव आता खुद्द अखिल भारतीय राष्ट्रीय सभेने पास केला आहे. आता खुद्द भारतमंत्री हिंदुस्थानात येणार आहे आणि त्यांनी देखभाल स्वराज्यासाठी सनदशीर चळवळ करण्याचे म्हणणे ऐकून घेण्याचे कबूल केले आहे."[33] या परिषदेमध्ये नगरच्या व्यापारी मंडळीने बहुसंख्येने पुढाकार घेतला होता. विशेषत: शेट मूलचंद दौलतराम, भाऊसाहेब फिरोदिया शेट चंदनमल जसराज व माणिकचंद मुथा हे व्यापारी वर्गाचे पुढारी असल्यामुळे त्यांनी आणि इतर नागरिक मंडळीनी ही परिषद अपूर्व उत्साहाने यशस्वी करुन दाखवली.

## क. गांधी युग १९२० – १९४७

"लोकमान्य टिळकांच्या मृत्यूने एक युगाचा अंत झाला. व महात्मा गांधींच्या उदयाने दुसऱ्या नव्या युगाची सुरुवात झाली."[34] असे दुर्गादासानी सार्थक मत मांडले. या मताचा मागोवा घेतल्यास भारतीय राष्ट्रीय लढ्याची धुरा सांभाळून सर्वांना समर्थपणे नेतृत्व देणारे नेता महात्मा गांधीच होते हे लक्षात येते. त्यामुळे हा काळ 'गांधीयुग' म्हणुन ओळखला जातो. त्यापूर्वी गोखले व फिरोजशहा मेहता हे मवाळ नेते व काही वर्षानंतर लोकमान्य टिळक हे जहाल नेते मृत्यू पावले. घटनात्मक मवाळांची चळवळ व क्रांतिकारी जहालांची चळवळ दोन्हीही संपूर्ण यशापर्यंत पोहोचवू शकल्या नाहीत. कारण सरकारने कठोर दडपशाही करुन त्यांना दडपून टाकले. अदम्य साहस, इच्छाशक्तीने लढा देऊन हे राष्ट्रीय आंदोलन सर्व थरांत पोहोचवून त्यास देशव्यापी जन आंदोलन बनविण्याची गरज होती. काळाची पावले ओळखून कणखर नेतृत्व देण्यासाठी आकर्षक व भुरळ घालणारे लढ्याचे नवीन तंत्र व तत्वज्ञान घेऊन भारतीय रंगमंचावर महात्मा गांधीजींचा प्रवेश झाला. त्यांच्या असहकार, सत्याग्रह, बहिष्कार, अहिंसा, सत्यप्रेम व धर्मनिष्ठ वृत्तीने लढा देण्याच्या भूमिकेतून लोकांना कोट्यावधींच्या संख्येत या लढ्यात उतरविले. आधुनिक भारताच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात व उभारणीच्या इतिहासात जे कृतिशील चिंतन होऊन गेले त्यात महात्मा गांधीजींचा क्रम प्रथम मानला पाहिजे. म्हणूनच म्हटले जाते की, 'दे दी तुने आजादी बिना खड्ग, बिना ढाल। साबरमती के संत तू ने कर दिया कमाल॥'

### १. असहकार आंदोलनात महाराष्ट्राचा सहभाग

महात्मा गाधींच्या राजकारणातील प्रवेशाने सर्व सामान्यांच्या ह्दयाचा ठाव घेतला. त्यांनी असहकार चळवळीच्या रुपाने स्वदेशीला उचलून धरले होते. हातमाग, सूतकताई व कापड तयार करण्यावर भर देऊन मद्यपान, जातिभेद इत्यादीचा निषेध केला. "ऐकीकडे विधायक उभारणी व स्वदेशीचा पुरस्कार तर दुसरीकडे नकारात्मक

कृती म्हणजे असहकार व बहिष्कार या भूमिकेला बळकटी देणे"[35] १० मार्च १९२० ला असहकार चळवळीचा जाहीरनामा महात्मा गांधींनी प्रसिध्द केला. त्यानुसार आपल्या मागण्या अहिंसेच्या मार्गाने मान्य करुन घ्याव्यात. सरकारने दिलेल्या सन्मान, पदव्या, अधिकार यांचा त्याग करावा, राष्ट्रीय शिक्षण उभे करावे असे ठरले.

देशभर महात्मा गांधींनी असहकार आंदोलनातून चैतन्य निर्माण केले. सरकारी शिक्षणसंस्था, न्यायालये, कायदेमंडळ इत्यादीवर लोकांनी बहिष्कार टाकला. असहकार चळवळीमुळे राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहोचली. राष्ट्रसभा हे एक कृतिशील व्यासपीठ बनले. सरकारबद्दलची भिती नष्ट झाली.

अहमदनगरच्या जनतेनेही राष्ट्रवादाचे हे नवे रुप स्वीकारले. असहकाराचा पुढील टप्पा मिठाचा सत्याग्रह हा होता.

## २. मिठाच्या सत्याग्रहाला पिकेटिंगची जोड १९३०

"३१ डिसेंबर १९२९ रोजी 'संपूर्ण स्वातंत्र्य' ची घोषणा करण्यात आली. महात्मा गांधींनी ब्रिटीशराजवटीतील अन्यायी कायदे मागे घेण्याची विनंती केली. तसे न केल्यास हे कायदे नम्रपणे अहिंसक मार्गाने आम्ही भंग करणार अशी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली."[36] त्याची सुरुवात गुजरातमधील दांडी येथे मीठ तयार करुन झाली. दांडी येथे प्रतिकात्मक स्वरुपात महात्मा गांधीनी मिठाचा कायदा मोडला याला 'मिठाचा सत्याग्रह' म्हणतात. "दांडीयात्रेचा अद्‌भुत परिणाम सर्व देशभर होताच अहमदनगर जिल्ह्यातील सत्याग्रहीवीरही पुढे सरसावले. या मोहिमकरिता विलेपार्ले येथे महाराष्ट्र सत्याग्रह छावणी उभारण्यात आली होती. या "छावणीकडे निरनिराळ्या जिल्ह्यातून तरुण सत्याग्रही सैनिकांची पथके धाडण्यात येऊ लागली, त्याप्रमाणे अहमदनगर जिल्ह्यातील सत्याग्रही तरुण मिठाचा सत्याग्रह करण्याकरिता उत्साहाने व मोठ्या धडाडीने आपणास ही सुवर्णसंधी मिळावी म्हणून कायदेभंगास उत्सुक झाले."[37] तरुणात जागृती होऊन त्यांची बहुसंख्येने या मोहिमेत भाग घ्यावा. हा महात्मा गांधीजींचा

निर्वाणीचा सल्ला सर्वांना निवेदन केला जावा म्हणून दादासाहेब चौधरी, पु.ह.पटवर्धन, रामभाऊ हिरे यांच्या नेतृत्वाखाली गावोगाव पायी रवाना झाल्या. जिल्ह्यातील मोठ्या गावापासून खेड्यापर्यंत आणि सुशिक्षितापासून अशिक्षितापर्यंत हे निवेदन व्हावे म्हणून तिसगावकर, देवचक्के, मुळे व दत्तोपंत निसळ यांनी जिल्हाभर हिंडून अत्यंत प्रभावी असे प्रचारकार्य केले.

"चळवळीच्या काळात कार्यकर्त्यांस राष्ट्रीय कार्य करणे सुलभ झाले असेल तर त्याचे श्रेय प्रभात फेऱ्यास द्यावे लागेल. चळवळीचा जोर वाढू लागल्याने मोठ्या प्रमाणात प्रभात फेऱ्या निघू लागल्या. प्रभात फेरीत गाण्यात येणारी उद्‌बोधक आणि प्रभावी गीते ऐकताच कित्येकांना स्फूर्ति आली. त्यामुळे वीरांची वाण अहमदनगर जिल्ह्यास केव्हाच भासली नाही."[38] प्रभात फेऱ्यांच्या कार्यक्रमाने सारा अहमदनगर जिल्हा व्यापून टाकला होताच होता. खुद्द अहमदनगर शहरात प्रभातफेऱ्यांची संख्या ३० वर गेली होती. या प्रभात फेऱ्यांत मुले, प्रौढ आणि स्त्रिया यांनीही भाग घेतला होता. प्रभात फेरीचा उपक्रम प्रथम राष्ट्रीय पाठशाळेने सुरु केला आणि त्याचे अनुकरण नंतर प्रत्येक मोहल्ल्याने केले. सकाळ संध्याकाळ फेऱ्या निघत होत्या. नालेगाव भागातील डॉ.पाखले, डॉ.तारु, विष्णुपंत भंडरी व भागुजी ही सत्याग्रही मंडळी पुढे येताच सारा नालेगाव जागा झाला, आणि आतापर्यंत तालमीतील अनेक धंद्यात निमग्न असणारा जुनाबाजार आहेर यांनी जागा केला. काँग्रेसचे कट्टर भक्त आणि उदारमतवादी शेट नारायणदासजी बार्शीकर यांनी आपल्या जमा आणि खर्चाच्या वहीत गर्क झालेल्या व्यापाऱ्यांना स्वदेश प्रेमाची दिशा दिली. दरारोज हजारो रुपयांची उलाढाल करणाऱ्या डाळ मंडईतील व्यापाऱ्यांना आत्मारामबुवा यांनी आणि बागडपट्टी या विभागातील विणकरी, साळी, कोष्टी यांना नाना सुद्रिक, गुंड आणि नारायण चन्नाप्पा यांनी सत्याग्रहाचा सन्मार्ग दाखविला. या सर्व कार्यकर्त्यांनी आपापल्या मोहल्ल्यात प्रभात फेऱ्या काढून जागृति केली आणि चळवळीस जोम आणला. मिठाची चळवळ ही

मिठाच्या कायदेभंगापूरतीच मर्यादित राहिली नाही तर तिने दारु विरोधनास जन्म दिला. अहमदनगर जिल्ह्यात दारु पिकेटिंग सुरु झाले. मिठाच्या सत्याग्रहास गेलेल्या सैनिकांपैकी काहींना कारागृहवास भोगावा लागला. सत्याग्रहींनी सत्य आणि शांतीचा मार्ग सोडला नाही. "मिठाच्या कायदेभंगाने भिंगारच्या कार्यकर्त्यांची ही भीती केव्हाच भंग पावली होती. एका जाहीर सभेत मीठ तयार करुन त्याची विक्री होताच त्याच मिठाला जागून तेथील महिलांनी हट्ट धरला की, दारु विरोधनच्या मोहिमेत प्रथम आम्हाला स्थान द्या. त्याप्रमाणे भिंगार येथील स्त्री कार्यकर्त्या गंगुबाई गाडगीळ, विठाबाई बोंदर्डे, सुलोचनाबाई वगैरे महिलांना प्रथम स्थान देण्यात आले. ताबडतोब दुसरे दिवशी वरील स्त्रियांच्या नेतृत्वाखाली सुमारे २००० स्त्रियांचा मोर्चा दारुगुत्यावर गेला."[39] स्त्रियांनी हट्ट धरला की, गुत्तेवाल्यांनी दारुगुत्यास कायमचे कुलूप लावून तो बंद केला आहे असे जाहीर करावे. स्त्रियांनी दारु गुत्यास गराडा घालून 'भारत माता की जय', 'महात्मा गांधी की जय' या जयघोषने दारुगुत्यांचा भाग गर्जुन सोडला. शेवटी स्त्रियांनी गुत्यास आग लावली, नगरहून हत्यारबंद पोलिस पार्टी येऊन थडकली. गुत्तेवालाही लज्जीत झाला, आणि त्याने दारु गुत्त्यास कुलूप ठोकले. स्त्री सत्याग्रहींचा विजय झाला. पुढे गुत्तेवाल्याने आपला शब्द पाळला नाही. पोलीस नियंत्रणाखाली त्यांनी आपला गुत्ता सुरु केला. गुत्ता सुरु झाला, असे समजताच स्त्रियांनी पिकेटिंग सुरु केले. "शांततेच्य मार्गाने स्त्रियांनी सतत दोन महिने विरोधन केले. त्यांनतर एक एक पुरुष सत्याग्रही पिकेटिंग करु लागताच सरकारी तंत्रात बदल होऊन पिकेटिंग करणाऱ्या सत्याग्रहीस पकडून खटले भरण्यात आले."[40] भिंगारप्रमाणेच कमी अधिक प्रमाणात जिल्हाभर पिकेटिंगचे कार्य चालू होते. अहमदनगर जिल्ह्यातील दारु पिकेटिंग करुन सत्याग्रहींची एक तुकडी येरवडा तुरुंगात शिक्षा भोगत होती. "तुरुंगातून बाहेर पडताच मुक्त झालेल्या सत्याग्रहींनी आनंदातिशयाने खऱ्या मर्दाप्रमाणे 'महात्मा गांधी की जय, 'भारत माता की जय', 'वंदे मातरम्' असा जयघोष केला."[41] या तुकडीत नगरचे कार्यकर्ते डॉ.तारु,

डॉ.पाखले, नरखेडकर वगैरे बरेच सत्याग्रही होते. नरखेडकर जसा आला तसाच हॉस्पिटलमध्ये दाखल झाला. शेवटी या सत्याग्रही वीराचा तेथेच अंत झाला. नगर जिल्ह्यातील हा पहिला हुतात्मा होय. शांतीसंग्रामातील हा पहिला बळी होता.

**३. अहमदनगर जिल्ह्यातील जंगल सत्याग्रह १९३०**

जंगल सत्याग्रहाच्या अभिनव मोहिमेने अहमदनगर जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रातच काय पण अखिल भारतात गाजले गेले. "अकोला, संगमनेरकडील भाग म्हणजे जंगलसंपत्तीचे माहेरघर. मध गोळा करणे, गवत व सरपण विकणे, याशिवाय येथे दुसरा धंदा नाही. पण जंगलचे कायदे फार कडक असल्यामुळे या नैसर्गिक संपत्तीवर देखरेख करणारे जंगली अधिकारी कायद्याच्या कात्रीत पकडून या आदिवासी लोकांवर नाना प्रकारे जुलूम करीत असत."[42] जंगल सत्याग्रहाची मोहीम समजताच अहमदनगर राष्ट्रीय पाठशाळा, पुणे, मुंबई, नाशिक, खानदेश वगैरे भागातून तरुण सत्याग्रही जमा झाले. चैत्र शुध्द १५ ला महाराष्ट्र जंगल सत्याग्रह समितीची स्थापना होऊन तिचे उद्‌घाटन सदाशिव खंडो अळतेकर यांच्या शुभ हस्ते झाले. कोळी, भिल्ल, ठाकर, वारली या लोकांनी प्रथम सरकारी अधिकाऱ्यांविरुध्द बहिष्कार पुकारला व त्यांची कोणतीही कामे करावयाची नाहीत असे ठरविले. जंगल सत्याग्रहाचे पहिले पाऊल म्हणजे वनचराई देण्याचे बंद करणे व जंगलात बेशक गुरे चारावयास सोडणे. जेव्हा सत्याग्रहास दिवसेंदिवस उग्र स्वरुप येत चालले आहे असे अधिकारी वर्गास दिसताच पोलिसांची कुमक मदत येऊ लागली. पोलिसांची धावपळ सुरु झाली. त्यांना विशेष दक्षता घेणे भाग पडले. "सरदेसाई यांना अटक होताच अहमदनगरचे भाई सथ्था पुढे सरसावले. सथ्था यांना अटक झाली आणि त्यांच्याबरोबर अनेक लोकांना पकडण्यात आले. दिनांक २१ जुलै १९३० या दिवशी अकोले आणि संगमनेर भागात सुमारे २०-२५ ठिकाणी सत्याग्रह करण्यात येऊन त्यात सुमारे शेकडो लोकांनी भाग घेतला."[43] सत्य आणि शांती यांचे अधिष्ठान आदिवासी जनतेने राखून संयमपूर्वक कोणताही अनुचित प्रकार घडून दिला

नाही. म्हणून काही सत्याग्रही वीरांना या मोहिमेत पकडणे सुलभ झाले. महात्मा गांधींच्या राजकीय तंत्र व विचारात सत्याग्रह हे सर्वात महत्वाचे तत्व होते. यात सत्याचा आग्रह व नैतिकतेचा विचार असतो. त्यामुळे शत्रूचे ह्दय परिवर्तन होते. 'सत्याग्रह मानवाचा जन्मसिध्द हक्क आहे' असे महात्मा गांधींचे मत होते. "नगर जिल्ह्यातील आदीवासींना जंगल संपत्तीचा मोफत उपभोग घेता यावा यासाठी महाराष्ट्रातील पुणे मुंबई, नाशिक, खानदेश इत्यादी भागातील सत्याग्रही नगरच्या मदतीला धावून आले. त्यांनी जंगलकायदा मोडला."[44] अशा प्रकारे महाराष्ट्रातील तरुणांना अहिंसावादी सत्याग्रहाचे प्रशिक्षण मिळाले होते.

## ४. कायदेभंग करुन प्रमुख नेते येरवडा जेलमध्ये १९३२

भारतीय स्वातंत्र्याकरिता दांडी सत्याग्रहाच्या स्फूर्तीने अहमदनगर जिल्ह्यात जी लोकजागृतीची ज्योत प्रज्वलित झाली, ती सरकारी दडपशाहीच्या फुंकराने लुप्त न होता, दिवसेंदिवस आपल्या उज्वलतेने अनेक मार्गाने प्रगट होत होती. "ता ५ मार्च १९३१ रोजी गांधी आयर्विन समेट होऊन कायदेभंगाचे क्रांति कार्य स्थगित करण्यात आले. महात्मा गांधी आयर्विन करारातील अटी योग्यरितीने पाळीत असता सरकारने जादा कायदे मंजूर करुन दडपशाहीस सुरुवात केली."[45] पंडित जवाहरलाल नेहरु, अब्दुल गफारखान यांना अटक करुन नंतर ता. ४ जानेवारी १९३२ रोजी महात्मा गांधीजींनाही अटक करण्यात आली. "महात्मा गांधीजींना अटक झाल्याची बातमी अहमदनगर येथे येताच शहरभर कडकडीत हरताळ पाळण्यात आला. रस्तोरस्ती व गल्लोगल्ली स्वयंप्रेरणेने मिरवणूकी निघाल्या सायंकाळी रा.ब.चितळे यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभा झाली. जिल्हा काँग्रेसचे चिटणीस व्दय काकासाहेब चिंचोरकर व काकासाहेब गरुड यांची कळकळीची भाषणे झाली."[46] नगर येथील कार्यकर्त्यांचा उत्साह दुणावला. सर्व नगर जिल्हाभर वरील देशभक्तांच्या अटकेबद्दल निषेधदर्शक सभा झाल्या. अधिकाऱ्यांना हेच पाहिजे होते. वटहुकुमाच्या आधाराने त्यांनी ताबडतोब दडपशाही सुरु केली. काकासाहेब

चिंचोरकर, काकासाहेब गरुड, रावसाहेब पटवर्धन, भाई सथ्था, नानासाहेब देवचके, राहुरीचे श्रीकृष्ण सातभाई, पुणतांब्याचे ताटके पाटील, भिंगारचे श्रीकृष्ण कुकडे, संगमनेरचे बापूसाहेब पारेगावकर व भुलेश्वरदलाचे पाचलेगावकर महाराज यांना अटक करुन येरवड्यास रवाना करण्यात आले. त्याच प्रमाणे जिल्ह्यातील सर्व काँग्रेस कमिटीच्या हिंद सेवादले व नगर आणि संगमनेर येथील भुलेश्वरदले या वटहुकुमाने बेकायदेशीर ठरविण्यात आली.

प्रमुख कार्यकर्त्यांना अटक करुन जरी कारागृहात डांबून ठेवले होते तरी त्याच्या तालमीत तयार झालेले सत्याग्रही वीर काही शांत नव्हते. त्यांनी गुप्त बैठकी घेतल्या आणि नियोजित कार्यास सुरवात केली. “दिनांक ४ पासून सायंफेऱ्या सुरु झाल्या, त्या नियमितपणे दर मंगळवारी व शुक्रवारी निघू लागल्या. तसेच नियोजित ठिकाण दर मंगळवारी व शुक्रवारी पोलिसांच्या अडथाळ्याची पर्वा न करता कसलातरी जाहीरपणे कायदेभंग करण्यात यावा. नगर शहरातील सायंफेरी तर अखेरपर्यंत नियमितपणे व अत्यंत शिस्तीत निघत असे.”[47] पोलिसांच्या अडथळ्यास न जुमानता इतक्या नियमितपणे सायंफेरी काढणारे अखिल हिंदुस्थानात अहमदनगर शहर हे एकच ठिकाण होते. असे महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमेटिने आपल्या पत्रकात नमूद केले.

वटहुकुमाचा वरंवटा फिरु लागला. ता. ७ जानेवारीस राष्ट्रीय पाठशाळेच्या छात्रालयाची जागा इमारत व शेती ही ठिकाणे जप्त करण्यात आली व त्याबरोबरच छात्रालय क्रीडांगणावर उभारलेला राष्ट्रीय ध्वज काढून टाकण्यात आला. त्यांनी त्या ठिकाणी आपल्या राजनिष्ठेचे प्रदर्शन दाखविण्याकरिता युनियन जॅक उभारले. अधिकाऱ्यांच्या या कुटील कृतिमुळे भारताच्या प्रभावी स्वातंत्र्यावर भवितव्यावर अलोट विश्वास असणाऱ्या शहरातील नागरिकात प्रचंड खळबळ उडाली, त्याच्यांत सागराच्या भरतीसारखा उत्साह उसाळला. ता. ८ जानेवारी रोजी अहमदनगर स्टेशनवरुन किल्ल्याकडे जाणारा जो रस्ता आहे, “तो छात्रालयावरुन जात असल्यामुळे तो रस्ता

कोणत्याही राजकीय मिरवणुकीसाठी १४४ कलमाने बंद करण्यात आला. छात्रालयाचा रस्ता रणभूमि समजून त्या ठिकाणचे १४४ कलम सर करण्याकरिता लढा द्यावयाचा असा नागरिक पुढाऱ्यांनी निर्णय घेतला आणि पहिली तुकडी दादासाहेब चौधरी, पंडित शिखरे, मोहनीराज देशमुख, काशीनाथपंत शेटे व तुकडीचे सेनानी खुशालशेट बार्शीकर यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आली. या पहिल्या कायदेभंगाची मोहिम पहाण्याकरिता हजारो लोक जमा झाले. छात्रालय रस्त्याच्या आसपास अलोट गर्दी झालेली पाहताच अधिकारी वर्गात धावपळ सुरु झाली."[48] लाठीबंद पोलिसांच्या तुकड्या पुढे सरसावल्या. महात्मा गांधीजीच्या जयघोषात सत्याग्रहींची तुकडी रस्ता सत्याग्रहाकरिता निघाली. बंदीहुकूम मोडताच त्यांना पकडण्यात येऊन नोटिसभंगाबद्दल १२ महिन्याची शिक्षा ठोठावण्यात आली. सत्याग्रहाला पुरुष निधड्या छातीने पुढे सरसावत होतेच, पण झाशीच्या राणीप्रमाणे स्त्रियाही बेडरवृत्तीने या रणांगणावर उभ्या ठाकण्यास कचरत नाही, हे शांतीची आणि प्रेमळपणाची प्रत्यक्षमूर्ती तीच अशा मामी कडूसकर या आपल्या तुकडीसह रस्तासत्याग्रहास सज्ज असलेल्या पाहाताच अधिकाऱ्यांना आश्चर्याचा धक्काच बसला.

दिनांक ११ जानेवारी ३२ पासून काँग्रेसपत्रिका काढण्यास सुरुवात केली गेली. या काँग्रेसपत्रिकेमार्फत होणाऱ्या घडामोडीचा व नियोजित कार्यक्रमाचा संदेश देण्यात येत असे. त्याबरोबरच इतरत्र चाललेल्या सरकारी अत्याचाराचेही दिग्दर्शन करण्यात येत असे. या काँग्रेस पत्रिकेवर ही अधिकाऱ्यांची वक्रदृष्टी वळाली. संशयाने पत्रिका काढणाऱ्या घराची झडत्या घेण्यात येऊ लागल्या. पण ज्या सायक्लोस्टाइलवर पत्रिका काढल्या जात होत्या, त्या मशीनचा तपास अनेक घरांच्या झडती घेऊनही ते पोलिसांना हस्तगत झाले नाही. आयुर्वेदची झडती घेण्यात आली. "मोहन मुद्रा मंदिराची दोनवेळा झडती घेतली गेली. पत्रिका काढणे त्या वाटणे, जागोजागी चिकटविणे, हातोहात इतर ठिकाणी पाठविणे याबद्दल १३ स्वयंसेवकांना शिक्षा झाल्या,"[49] पण काँग्रेस पत्रिका

निघण्यात खंड पडला नाही. ज्या सायक्लोस्टाईवर काँग्रेस पत्रिका निघत होत्या ते मशीन शेवटपर्यंत हस्तगत करुन घेता आले नाही.

आत्तापर्यंत गुप्तरीतीने काँग्रेसपत्रिका काढून त्यांचा प्रचार करण्यात येत होता. २० वे सर्वाधिकारी के.ज.क्षीरसागर, गंगाधरराव अ. देशपांडे, जनार्दन हरी पटवर्धन यांनी अधिकाऱ्यांच्या पायमल्ली केली. त्या कायदेभंगाबद्दल या सर्वांना पकडून शिक्षा देण्यात आली. याप्रमाणे प्रेसअॅक्टचा भंग केल्याबद्दल सुमारे ३३ जणांस शिक्षा देण्यात आल्या.

कुमारी काशीबाई हिरवे ही केवळ १३-१४ वर्षाची बालिका ती बिजलीप्रमाणे सत्याग्रहास पुढे सरसावली आणि हातात राष्ट्रीय ध्वज घेऊन तिने कायदेभंग केला. हजारो स्त्री पुरुषाच्या जमावाने तिची वाहवा केली. पण अधिकाऱ्यांचा कौतुक करण्याचा प्रकार काही आगळा होता. त्यांनी तिला ताबडतोब अटक केली.

यापुढील सत्याग्रह एकट्या पुरुष तुकडीचा किंवा स्त्रीयांचा न होता एकाच वेळी ता ४ एप्रिल ३२ रोजी रावसाहेब पटवर्धन, शांताबाई हिरे यांच्या नेतृत्वाखाली एक पुरुष सत्याग्रहाची तुकडी व एक स्त्रीसत्याग्रहाची तुकडी, अशा दोन तुकड्या रस्ता सत्याग्रहाकरिता पुढे सरसावल्या. रावसाहेब पटवर्धन यांना १८ महिने शिक्षा आणि २०० रुपये दंड आणि शांताबाई हिरे यांना ९ महिन्याची शिक्षा व १०० रुपये दंड अशा शिक्षा देण्यात आल्या.

रस्ता सत्याग्रहानंतर परदेशी कापडावर विरोधन करण्यास सुरुवात झाली. प्रत्यक्ष दुाकनावर विरोधन करण्याचा प्रसंग येऊ नये म्हणून शहरातील सर्व व्यापाऱ्यांनी कार्यकर्त्यांच्या विचाराने आपल्याजवळचे परदेशी कापड सीलबंद करुन ठेवले. त्यामुळे विशेष विरोधनाचा प्रश्न निर्माण झाला नाही. “दिनकर रायते सर्वाधिकारी २१ वे यांनी हट्टाग्रहाने प्रामाणिकपणाचा आव आणून लोकमताला तुच्छ मानून विलायती कापड विक्री सुरु ठेवली अशा देशद्रोही व्यापाऱ्यासमोर विरोधन केले त्याबद्दल त्यांना व सभारंजक यांना पकडून ६ महिने कैदेची शिक्षा देण्यात आली. यानंतर वस्त्र - विरोधनाची

मोहीम जोरात सुरु झाली."[50] अहमदनगर शहरात असलेल्या सुमारे १० हजार साळी कोष्टी जमातीने आपल्या समाजातील पुढाऱ्याची एक कमेटी स्थापुन संपूर्ण दारुबंदी केली. अहमदनगर जिल्ह्याप्रमाणेच भिंगार, संगमनेर, कोपरगाव, राहुरी, खर्डा, बेलापूर येथील पुढाऱ्यांच्या शब्दास मान देऊन व्यापारी वर्गानी आपल्याजवळ असलेले विलायती कापड सीलबंद करुन ठेवले.

अहमदनगर जिल्हा काँग्रेस जप्त करण्यात आली होती. तरी तिच्या आदेशानुसार हुतात्मा भगतसिंग दिन पाळण्यात आला. त्या दिवशी पाळण्यात येणाऱ्या हरतालामध्ये व्यापारी लोकांनी भाग घेऊ नये अशी अधिकारी वर्गांनी दक्षता घेतली होती. हुकुमाचा भंग केला म्हणून शहरातील प्रमुख व्यापारी शेठ गोविंददास सर्वोत्तमदास नेवासकर यांच्यासह इतर ६ व्यापाऱ्यांस अटक करण्यात आली व त्याच्या वह्याही जप्त करण्यात आल्या.

## ५. सिध्दान्त अस्पृश्योध्दार व मंदिर प्रवेश चळवळ १९३२

१९१८ मध्ये राजकीयदृष्ट्या अस्पृश्यता निवारणास विशेष चालना मिळाली. पुढे आखिल भारतीय राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात खादीप्रचार आणि अस्पृश्यता निवारणास विशेष चालना देऊन अस्पृश्यता हा हिंदुधर्मावर कलंक असून तो नाहीसा झालाच पाहिजे. या धोरणाचा पुरस्कार जाहीर रितीने होऊ लागला. तसेच सामाजिक विषमता नष्ट व्हावी, सर्वांनी हातात हात घालून स्वराज्याकरिता झगडावे. अस्पृश्यता मानणे हा गुन्हा आहे. असे जोराने प्रतिपादण्यात येऊ लागले. त्याकरिता महात्मा गांधीजीनी हरिजन हे वृत्तपत्र सुरु केले. "अस्पृश्यता निवारणाची मोहीम नगरजिल्ह्यात सुरु झाली. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता न पाळण्याचे दृष्य दिसू लागले. विद्यामंदिर, सरकारदरबार, सार्वजनिक सभा, बाजार यातील अस्पृश्यता यापूर्वीच नष्ट झाली होती. आता राष्ट्रीय उत्सव स्पृश्यास्पृश्य हे दोन्ही समाज एकदिलाने पार पाडू लागले. सार्वजनिक ठिकाणची अस्पृश्यता जनतेच्या मत परिवर्तनाने हळूहळू कमी होऊ

लागली.”[51] परंतु सार्वजनिक असणाऱ्या मंदिरात अस्पृश्यांना मंदीर प्रवेश मिळाल्याशिवाय या कार्याची परिपूर्तता होऊ शकत नाही, असा विचार प्रवाह जनतेत सुरु होऊन प्रत्यक्ष मंदीर प्रवेश करण्याचे धाडस १९३२ साली अहमदनगर येथे झाले.

सन १९३२ च्या जानेवारी ४ तारखेस महात्मा गांधीजीना अटक करुन येरवडा जेलमध्ये ठेवण्यात आले. तेथे त्यांनी सरकारी दडपशाहीच्या निषेधार्थ एकवीस दिवसांचे प्राणांतिक उपोषण केले. “त्या दिवशी ही पवित्र पर्वणी समजून सार्वजनिक सभा, भजन, कीर्तन, प्रवचन वगैरे कार्यक्रम ठेवण्यात आले होते. परंतू विशेष चिरस्मरणीय गोष्ट म्हणजे अहमदनगर येथील डांगेगल्ली (माणिक चौक) या भर ब्राम्हणवस्तीत असलेले बाबूराव तांबोळी यांच्या खाजगी मालकीचे भव्य दत्तमंदीर अस्पृश्यांना खुले करण्यात आले. भाऊसाहेब फिरोदिया यांच्या अध्यक्षतेखाली बागडे थिएटरमध्ये सर्वजमातीच्या लोकांची सभा घेण्यात आली. अस्पृश्यांसह सर्व थरातील लोकांनी थिएटर पुर्ण भरुन गेले होते.”[52] मंदीर प्रवेश आणि अस्पृश्यता निवारण यावर झालेल्या भाषणानंतर आपल्या दत्तमंदीरात अस्पृश्यांना प्रवेश आणि अस्पृश्यता निवारण यावर झालेल्या भाषणानंतर आपल्या दत्तमंदिरात अस्पृश्यांना प्रवेश करण्यास परवानगी देणारे बाबूराव तांबोळी यांच्या उदार अंत:करणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. नंतर अध्यक्षांकडून मंदीर खुले झाल्याबद्दल घोषणा करण्यात आल्यावर

महात्मा गांधीजींच्या जयजयकारात सभा विसर्जन झाली. “अस्पृश्यांना मंदीर प्रवेश दिल्याचा मान महाराष्ट्रातूनच काय पण अखिल भारतात प्रथम अहमदनगर जिल्ह्यांनी मिळविला ही मोठी अभिमानाची गोष्ट होय.”[53] अस्पृश्यता निवारण आणि मंदीर प्रवेश याचा अखंड प्रचार चालु असता. या कार्यात विशेष चालना मिळावी आणि महाराष्ट्रातील प्रसिध्द मंदिरे हरिजनास खुली व्हावीत या दृष्टिने पूज्य सहजानंद स्वामीजी यांनी आपला मोर्चा अहमदनगर जिल्ह्याच्या सरहद्दीवरुन वाहणाऱ्या पवित्र गोदामाईच्या कुशीत बसलेल्या पैठणकडे वळविला.

पूज्य सानेगुरुजींचा दौरा एप्रिल ता.१२ रोजी अहमदनगर जिल्ह्यात सुरु झाला. जिल्ह्यातील बहुतेक कार्यकर्ते त्यांच्याबरोबर दौऱ्यात सामील झाले होते. ते आपल्या भाषणात म्हणाले, "स्वराज्य आले तरी जोपर्यंत स्पृश्यास्पृश्य भावना व जातीभेद नष्ट होत नाही. तोपर्यंत स्वराज्याचे सुराज्य होणार नाही, आणि स्वातंत्र्याचे अमृत भारतीय जनतेस चाखता येणार नाही."[54] नगरहून त्याजबरोबर सेनापती बापट, पूज्य सहजानंद स्वामीजी, मामी कडूसकर, जानकीबाई आपटे, रावसाहेब पटवर्धन, बेलापूरच्या कामगार युनियनचे रामभाऊ डिके वगैरे मंडळी गेली होती.

सामाजिक अस्पृश्यता जवळ जवळ नष्ट झाली होती. पण काही बाबतीत अगदी उलटा अनुभव येत होता. तो म्हणजे अस्पृश्यातील पाळली जाणारी अस्पृश्यता. महार मांगांना कमी दर्जाच समजतात व त्यांच्या हातचे पाणीही पीत नव्हते. अहमदनगर जिल्ह्यातील अस्पृश्यता निवारण कार्याची पाहणी करण्याकरिता 'महाराष्ट्र प्रांतिक हरिजन सेवक संघाचे' चिटणीस तपासे व हरिजन उपजातीचे संशोधन करणारे वामनराव भट्ट हे अहमदनगर जिल्ह्यात आले असता त्यांनी अहमदनगर, नारायण डोह, मिरजगाव, खर्डे या गावी प्रचार कार्य केले. अहमदनगर येथील जानकीबाई आपटे यांनी चालविलेले कार्य आणि बालिकाश्रम पाहून तपासे यांनी समाधान व्यक्त केले.

### ६. सत्याग्रहींना ताळयावर आणण्यासाठी सरकारची दडपशाही १९३२

अहमदनगर जिल्हा काँग्रेस परिषदेचे जादा अधिवेशन दुर्गाबाई जोग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ८ ऑगस्ट १९३२ रोजी कोपरगाव येथे भरविण्यात आले. "या अधिवेशनास भाई सथ्था हे पॅरोलचा हुकूम मोडून हजर राहिले होते. जिल्हाभर सरकारने वटहुकुमाखाली सुरु केलेल्या दडपशाहीबद्दल तीव्र शब्दात निषेध व्यक्त करण्यात आला. परिषद यशस्वीपणे पार पाडली पण ताबडतोब दुर्गाबाई जोग, रसाळ यांच्यासह भालेराव, जोगळेकर भाई सथ्था यांना अटक करुन शिक्षा देण्यात आल्या."[55] सत्याग्रहाने जेरीस आलेल्या अधिकाऱ्याने या लढ्यात एक नवीनच उपक्रमाचा अवलंब

केला होता. तो म्हणजे चाप्टर केसेस अहमदनगर येथील महिला वस्तु भांडाराच्या चालिका शकुंतला चिटणीस यांनी जाहीर रीतीने कायदेभंग करुन छात्रालय प्रवेश केला. छात्रालय प्रवेश करताना त्याच्या कडेवर तीन महिन्याचा छकुला हसत होता. कायदेभंग करताच अटक करण्यात आली. "खटला होऊन तीन महिन्यांची शिक्षा देण्यात आली. १९३३ सालची मंगल प्रभात गुढ्या उभारुन साजरी होत असता काहींनी राष्ट्रीय ध्वज उभारुन आपली राष्ट्रभक्ति व्यक्त केली. नूतनवर्षाच्या पदार्पणाबरोबरच अहमदनगर राष्ट्रीय पाठशाळेचे अध्यापक बाळकृष्ण लक्ष्मण साठे हे आपण होऊन पोलिसांच्या स्वाधीन झाले. यापूर्वी त्यांना नगरमध्ये येऊ नये अशी नोटीस देण्यता आली होती.

जिल्हाभर होत असलेल्या कायदेभंगात गावगावच्या पाटलास कोणत्याप्रकारची दक्षता घ्यावी आणि कायदेभंगापासून लोकांना कसे परावृत्त करावे याचा कानमंत्र देण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांनी मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर फ्रेडरिक सँडक्स याच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व पाटलांना एकत्र आणून त्याचा 'पाटील दरबार' भरविण्यात आला असता या दरबारचा फोलपणा सिध्द करणारे पत्रक रावसाहेब पटवर्धन यांनी प्रसिध्द केले."[56] ज्या दिवशी दरबारची जाहीर सभा होण्याचे ठरविण्यात आले होते. त्याच दिवशी रावसाहेब पटवर्धन याचे जाहिर व्याख्यान करण्याचे ठरविण्यात आले होते. रावसाहेब पटवर्धन यांच्यावर खटला भरुन २ वर्षे सक्त मजुरी आणि ५००० रुपये दंडाची शिक्षा देण्यात आली. खटल्याचा निकाल ऐकण्यास पाटील दरबारपेक्षा जास्त नागरीक जमले. "अहमदनगर जिल्ह्यात प्रचंड लोक जागृति करुन कायदेभंगाच्या चळवळीस प्रवृत्त केले अशा कार्यकर्त्यांनी नुसती व्याख्यानबाजी न करता व सरकार विरोधाची परवा न करिता प्रत्यक्ष चळवळीत भाग घेतला आणि कारागृहवास आणि दंड भोगला. याबद्दल त्यांची वकिलीची सनद रद्द का करु नये अशी नोटीस त्याच्यावर बजावण्यात आली."[57] पण केशवराव गरुड यांनी आर्यलंडमधील सुप्रसिध्द पुढारी मिस्टर कार्सन यांच्या दाखल्याची तोफ डागून त्या नोटीसीच्या चक्काचूर करुन टाकला

आणि वकिलीची सनद रद्द करता येत नाही असे दाखविले. यानंतर सरकारने दुसरे आस्त्र याच्यांवर फेकले ते म्हणजे जहागिरी, वतन जप्त करणे हे होय. रावसाहेब पटवर्धन यांच्याकडे आव्हाणे बुद्रुकची जहागिरी होती. ती जप्त करण्यात आली. भिंगार येथील उत्साही कार्येकर्ते मोहनीराज देशमुख व त्यांची स्वातंत्र्यप्रेमी मातोश्री श्रीमती राधाबाई देशमुख याच्या देशमुखी वतनाच्या इनामी जप्त करण्यात आल्या. सर्वांनी ताबडतोब येरवडा जेलमध्ये रवाना करण्यात आले. "कायदे पंडित रा.ब.चितळे यांनी चालविले सेशन कोर्टात योग्य निकाल देऊन सर्वांना निर्दोषी म्हणून सोडून दिले. राबवसाहेब पटवर्धन हे तुरुंगवासात असतानाही त्यांना जिल्हा काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. ते सुटून येताच त्यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या धुमधडाक्याने काँग्रेस कार्याची सुरुवात झाली. त्यावेळी सत्याग्रहाची मोहीम तहकूब ठेवण्यात आली आणि काँग्रेस कमेट्या कायदेशीर झाल्यामुळे जिल्ह्यात त्या स्थापण्याकरिता रावसाहेब पटवर्धन, काकासाहेब चिंचोरकर, भाई सथ्था व विनायकराव ताटके यांनी दौरा काढला. सरकारी दडपशाहीची दहशत लोकांच्या मनातून गेली नसल्यामुळे काँग्रेस कमेट्या स्थापन करण्याच्या बाबतीत कार्यकर्त्यांना अनेक अडचणी आल्या."[58] पाटील दरबारात पाटलांना राजनिष्ठेचा कानमंत्र दिला गेला असल्यामुळे कित्येक ठिकाणी उतरण्यास जागा मिळाल्या नाहीत. सभेस लोक जमत नसत. वाहन मिळण्यास पंचाईत पडे अशा बिकट आणि प्रतिकूल परिस्थितीत देखील या कार्यकर्त्यांनी काँग्रेस स्थापन केल्या आणि काँग्रेसबद्दल जनतेतील निष्ठा आणि विश्वास जागृत ठेवला.

### ७. काँग्रेसचा सुवर्णमहोत्सव अहमदनगरमध्ये साजरा १९३५

१९३५ साली काँग्रेसला ५० वर्ष पुर्ण होत असल्यामुळे काँग्रेसचा सुवर्ण महोत्सव साजरा करावा असे ठरविण्यात आले. "२८ डिसेंबर १९३५ ही तारीख निश्चित करण्यात आली. जिल्हा काँग्रेस कमेटीचे केंद्रस्थान अहमदनगर शहर असल्यामुळे या ठिकाणी हा सुवर्ण महोत्सव साजरा झाला. १९३२ सालच्या चळवळीच्या अनुमानाने कायदेशीर

चळवळ काय करु शकते हे जनतेला कळून चुकले होते."[59] शारिरिक हानी बरोबरच मालमत्तेच्या दृष्टिने सुरक्षितता राहिली नसल्यामुळे श्रीमंत आणि सुशिक्षित अशा वर्गानेच यात भाग घ्यावा असा सामान्य लोकांचा बुध्दिभेद केल्यामुळे ते जरा या चळवळीपासून दूर राहू लागले. राष्ट्रातील सामान्य जनतेचा प्रबळ संघशक्ति शिवाय पूर्ण स्वातंत्र्याचे ध्येय गाठता येणार नाही. ही दृष्टी सुवर्ण महोत्सवानंतर अहमदनगर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांना आल्यामुळे त्यांनी ग्रामसंघटनेचे कार्य हाती घेतले. आणि त्याकरिता जिल्हा भर सभा व काँग्रेस सभासद नोंदणीची मोहिम सुरु केली. काँग्रेस कार्याचे मार्गदर्शन सुलभ व्हावे याकरिता अहमदनगर जिल्ह्यातील काँग्रेस अधिकृत मुखपत्र म्हणून १ मे ३६ रोजी संघशक्तीचा जन्म झाला. संघशक्तीच्या व्दारे सर्व जिल्हाभर काँग्रेसचा संदेश पोहचू लागल्यामुळे बहुजनसमाज परत जागृत झाला. तिने जनतेच्या तक्रारीला वाचा फोडली. 'खेड्याकडे परत चला' या महात्मा गांधीजीच्या आदेशानुसार नगर जिल्ह्यातील खेड्यात परिषदा घेऊन शेतकरी व कामकरी संघटना करणे त्यांच्या तक्रारीला वाचा फोडून त्याचा पाठींबा मिळविणे या कार्यक्रमाला सुरुवात झाली. पूज्य सहजानंद स्वामीजी, रावसाहेब पटवर्धन, पूज्य रामकृष्ण महाराज, केशवराव जेधे, गाडगीळ, गंगाधरराव देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली शेतकरी परिषदा भरविण्यात आल्या."[60] अहमदनगर जिल्ह्याने १९३० ते १९३२ अखेर जे शांतियज्ञाचे कार्य केले त्याची सांगता करण्याकरिता पंडित जवाहरलाल नेहरु यांचे ता. २४ मे १९३६ रोजी आगमन झाले. सत्कार प्रसंगी त्यांनी आपल्या छोट्या भाषणात अहमदनगर जिल्ह्याने केलेल्या कार्याबद्दल गौरवपूर्ण उल्लेख केला. पंडितजीनी केलेल्या गौरवामूळे कार्यकर्त्यांना आनंद इतका दुणावला की फैजपूर येथे भरणाऱ्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनास अहमदनगर जिल्ह्यातून लालजी पेंडसे आणि भुस्कुटे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्याची दिंडी पायमार्गाने नेण्यात आली होती. या अधिवेशनातील उल्लेखनीय गोष्ट म्हणजे अत्यंत स्वार्थत्यागी असामान्य कर्तव्यदक्ष आणि असीम तत्वनिष्ठ अशा

सद्गुणित अच्युतराव पटवर्धन याच्या सेवेचा हा गौरव म्हणजे जिल्ह्याचा गौरव होता. “अच्युतराव पटवर्धन याच्या शब्दाबरोबर कार्यास सिध्द राहणाऱ्या अहमदनगर जिल्ह्यातील नागरिकांचा हा गौरव होता. संगमनेरला महात्मा गांधीजींचे आगमन झाले. त्यांनी संगमनेरकरांना ३००० हजाराची मागणी केली. संगमनेरकरांनी महात्माजींची मागणी पूर्ण केली.”[61] निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे अध्यक्ष पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांचा तुफानी दौरा तारीख २० जानेवारी १९३७ अहमदनगर जिल्ह्यात सुरु झाला सरदारजीचे पहिले व्याख्यान नगर शहरातील दाणे डबऱ्यात झाले.

## ८. १९३७ च्या निवडणुकीसाठी काँग्रेस नेत्यांचे नगरचे दौरे

१९३५ कायद्याने प्रांतिक कार्यकारी मंडळात द्विदल पध्दती आणली. या कायद्याने प्रांतांना स्वायतत्ता देण्यात आली. १९३७ मध्ये नव्या राज्यव्यवस्थेसाठी उत्तरप्रदेश, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, मद्रास व मुंबई या सहा प्रांतात निवडणूका होणार होत्या. त्यासाठी अहमदनगर जिल्हा सज्ज झाला होता.

पटवर्धन, चिंचोरकर, सहजानंद स्वामी, ल.मा.पाटील, देशमुख, फिरोदिया, गिरमे यांच्यासह सरदारसाहेबांचा दौरा श्रीगोंदे, काष्टी, कर्जत, मिरजगाव या गावी झाला. पंडित जवाहरलाल नेहरु दि. १५ ऑगस्ट ३७ रोजी नगरला आले. “नगर जिल्ह्याने केलेली काँग्रेसची सेवा भारत मातेने रुजू करुन घेतली आहे. नागरिक सुपुत्र सुपात्र आहेत. त्यांचा त्याग आणि कर्तृत्वशक्ति याच्या फलश्रुतीची आता सुवर्णसंधी आली आहे. हा इंग्रज सरकारचा डाव आहे.”[62] तो तुम्ही जिंकाल असा मला आत्मविश्वास आहे. निवडणुकीचा दिवस उगवला. आजचा दिवस म्हणजे काँग्रेसच्या भवितव्याचा दिवस होता.

## ९. सत्याग्रही काँग्रेस सत्ताग्रही बनली १९३८

१९३७ च्या निवडणुकीत देशाच्या प्रांताप्रांतातील विधिमंडळासाठी एकंदर १५८५ उमेदवार निवडून आले. त्यापैकी ७११ काँग्रेसचे होते. मते देण्याचा हक्क साडेतीन कोटी लोकांना होता. जनता जनार्दनाने आपली मते काँग्रेसच्याच उमेदवारास देऊन त्यांना यशाचे श्रीफळ दिले. "कायद्याप्रमाणे दिलेली राज्यसत्ता राष्ट्रसभेच्या हाती येऊन ती आठ प्रांताच्या सिंहासनावर अधिष्ठित झाली. ता. १७ जुलै १९३८ पासून भारतातील आठ प्रातांत काँग्रसचे राज्य सुरु झाले आणि सत्याग्रही काँग्रेस सत्ताग्रही बनली."[63] नगर जिल्ह्यात सरकारी कचेरीवर तिरंगी झेंडा फडकू लागला. ज्या गांधीटोपीवर पोलिसांच्या लाठ्या पडत होत्या, तेच पोलिस आता वचकून गांधी टोपी धारकांना सलाम करु लागले. कालचे कैदी आज मंत्री झाले. "पोलिस अधिकाऱ्यांची ज्यांना सत्याग्रही कैदी म्हणून अपमानास्पद वागणूक दिली तेच पोलिस अधिकारी खाली मान करुन त्याच्या व्यवस्थेकरिता हात जोडून धावू लागले. कारागृहात ज्यांचा छळ करण्यात आला. ते राजकीय गुन्हेगार आज मोठ्या डौलाने राजगृहात मिरवू लागले."[64] जप्त केलेल्या पाठशाळेची जप्ती उठवली गेली. तसेच राष्ट्रीय वाङ्:मयावरील जप्तीपण उठवली गेली. ज्या वंदेमातरम् गीतासाठी पूर्वी फटके बसत तेच 'वंदे मातरम्' गीत राष्ट्रीय मंत्र समजून त्याला राष्ट्रीय गीताचा मान मिळाला ज्या संस्थेवर पूर्वी बेकायदेशीरपणाचा शिक्का बसला होता. तीच संस्था आता कायदेशीरपणाची मंगलमूर्ति बनली. एकंदरीत पारतंत्र्याचा उन्हाळा संपून आठ प्रांतात स्वातंत्र्य सुखाची शीतल बरसात सुरु झाली आहे.

## १०. नवीन जिल्हा लोकल बोर्डाची सभा १९३८

नवीन जिल्हा लोकल बोर्डाची सभा भरुन आमदार के.बी.देशमुख यांची अध्यक्षस्थानी निवड झाली. बोर्डात सर्व जमातीचे लोक निवडून आले होते. आमदार देशमुख आपल्या भाषणात म्हणाले, 'मला मिळालेला मान हा एक व्यक्तीचा नसून

काँग्रेससारख्या संस्थेचा आहे. काँग्रस ही संस्था भारतातील बहुजन समाजाची असून तिला ठराविक कार्यक्रम आहे.' राष्ट्रीयसभा हिंदीजनाच्या पूर्ण स्वातंत्र्याकरिता झगडत होती. त्याचप्रमाणे संस्थानिक जनता संस्थानची सर्वभौमसत्ता प्रजेच्या हातात असावी, याकरिता संस्थानिक प्रजाजन झगडत होते. "ब्रिटिश सरकारने आपल्या राज्याला बळकटी यावी म्हणून भारतात धार्मिक सत्तेला सर्वतोपरी सहाय्य देऊन, वादळे निर्माण केली तसेच रावसाहेब, रावबहादूर आणि खानबहादूर असे जातीय आधार स्तंभही उभे केले होते. पण सर्वात मोठा आधार म्हणजे संस्थानिकासारख्या लोखंडी खांबाचा. ब्रिटिश प्रजाजनाप्रमाणे संस्थानी प्रजेला उमगल्यामुळे त्यांनी संस्थानची सत्ता प्रजेच्या हातात असावी अशी मागणी करणे स्वाभाविक होते."[65] सदरार वल्लभभाई यांच्याकडून या मागणीचा पुरस्कार होताच लढयाला रंग चढला. संस्थांनी जुलूम जबरदस्ती सुरु झाली. ता. १ डिसेंबर ३८ च्या हरिजनमध्ये महात्मा गांधीजीच्या संदेशाप्रमाणे वर्किंग कमेटीमध्ये चर्चा होऊन 'संस्थान प्रजादिन' पाळावा असे जाहीर करण्यात आले.

## ११. 'संस्थान प्रजादिन' व 'हैद्राबाद स्ट्रेट' काँग्रेसची भूमिका १९३८

अहमदनगर जिल्ह्याच्या पूर्व आणि सरहद्दीस हैदराबाद संस्थानची सरहद्द लागून असल्यामुळे तेथील प्रजाजनांनी स्ट्रेट काँग्रेसची स्थापना करुन आपली मागणी पूर्ण करण्याकरिता चळवळ सुरु केली होती. "हैदराबादी संस्थानी प्रजेत शेकडा ८५ टक्के हिंदु लोक असले, तरी हैद्राबाद स्ट्रेट काँग्रेसची भूमिका राष्ट्रीय असल्यामुळे हिंदू प्रमाणेच मुसलमानांसही नागरिकत्वाचे हक्क असावे अशी तिची मागणी होती. अहमदनगर जिल्ह्याचे कर्मवीर सेनापती बापट पूर्वी दोन वेळा हैद्राबाद परिस्थिती पाहण्याकरिता गेले होते."[66] त्यावेळी त्यांना संस्थानी हद्दीजवळ अटक करुन परत अहमदनगरकडे आणून सोडून देण्यात आले. त्यांनतर ते ता. १ डिसेंबर ३८ रोजी राम निसळ स्वयंसेवक तुकडीसह सत्याग्रह करण्याकरता हैद्राबादकडे जात असता गुलबर्गा येथे सर्वांना अटक करण्यात आली. सेनापती बापट व राम निसळ यांना प्रत्येकी २

वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा देऊन त्यांच्या बरोबरीच्या सत्याग्रही वीरास ६/६ महिन्याची शिक्षा देण्यात आली. “या झालेल्या अटकेबद्दल अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमेटीने त्या सर्वांचे अभिनंदन करुन लढा पुढे चालु रहावा म्हणून त्यासाठी फंड गोळा करण्याचे ठरविले. संस्थानी प्रजेची लढत सुरु होताच हैद्राबादमध्ये ‘वंदे मातरम्’ गीतास बंदी घालण्यात आली. शंकरराव देव यांनी हैद्राबाद दिन पाळण्याबद्दल पत्रक काढले. काकासाहेब चिंचोरकर यांच्या अध्यक्षतेखाली ‘हैद्राबाद स्टेट’ काँग्रेस दिन पाळण्यात आला.”[67] अहमदनगर जिल्ह्यातही सर्वत्र दिन पाळला जाऊन हैद्राबाद संस्थानिकांचा निषेध करण्यात आला.

## १२. दुसरे महायुध्द काँग्रेसची युध्दविरोधी भूमिका नोव्हेंबर १९३९

“१९३९ साली दुसरे जागतिक महायुध्द सुरु झाले. युध्दविरोधी ठराव पास करण्याकरिता वर्धा येथे वर्किंग कमेटीची बैठक घेण्यात आली.”[68] अहमदनगर जिल्ह्यातील काँग्रेस संघटना सज्ज ठेवण्यास आणि युध्द विरोध जाहीर करण्याकरिता उत्तमचंद बोगावत यांच्या अध्यक्षतेखाली सर्व कार्यकर्त्यांची सभा भरुन युध्दविरोधी ठराव पास करण्यात आला. ह्यानंतर काँग्रेस वर्किंग कमेटीच्या आदेशानुसार तारीख १ नोव्हेंबर ३९ रोजी अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमेटीची सभा होऊन काँग्रसचे मंत्री भाऊसाहेब फिरोदिया, के.बी.देशमुख, ल.मा.पाटील व रामभाऊ गिरमे यांनी आपल्या मंत्रीपदाचे राजीनामे सादर केले. राजीनामे का दिले याची साद्यंत माहिती बहुजन समजाला व्हावी आणि काँग्रेसच्या एकसुत्रीपणाची जाणीव बहुजन समाजाप्रमाणे अनियंत्रित पक्षांना व्हावी.”[69] म्हणून उत्तमचंद बोगावत, गरुड, सहजानंद भारती, ह. भी. भापकर, रावसाहेब पटवर्धन आणि भारदे यांची युध्दविरोधी कमेटी नेमून जिल्हाभर प्रचार करुन आगामी शांतीसंग्रामासाठी सिध्द राहण्याचा संदेश देण्यात आला. त्यानंतर प्रांताध्यक्ष उत्तमचंद बोगावत यांनी सज्जता समिती स्थापन केली. या समितीने जिल्हाभर दौरे काढून प्रत्येक ठिकाणी तीन तीन सभासदांचे युध्द विरोधी मंडळे स्थापन केली, व

प्रस्तुत युध्दास जनतेकडून सरकारास एक पैसा किंवा एक मनुष्य मिळू, नये असा आदेश देऊन युध्दविरोधी वातावरण निर्माण केले. काँग्रेस मंत्री मंडळाने आपले अधिकारपदाचे राजीनामे देताच १९३५ च्या घटना कायद्याप्रमाणे म्हणजे ९१ कलमाप्रमाणे सर्व अधिकार व कारभार प्रांतिक गव्हर्नरने आपल्या हाती घेतला."[70] काँग्रेसने मंत्रीपदाची वस्त्रे झुगारुन देताच काँग्रेस विरोधी पत्रक प्रसिध्द करुन सरकापूढे आपल्या राजनिष्ठेचे प्रदर्शन मांडले.

## १३. मंत्रिमंडळांना राजीनाम्याचे आदेश १९३९

"सतत २७ महिने काम केल्यानंतर वर्धा वर्किंग कमिटीने काँग्रेस मंत्रिमंडळांना राजिनामे देण्याचा आदेश देणारा ठराव मंजूर केला."[71] त्याप्रमाणे ऑक्टोबर अखेर मंत्री आपल्या जागेचे राजीनामे देतील, असा वर्किंग कमिटीने एक १००० शब्दाचा ठराव पास केला असून त्यात काँग्रेसने सरकारकडून ज्या घोषणेची मागणी केली होती त्याला व्हाईसराय मार्फत देण्यात आलेले उत्तर असमाधानकारक होते. म्हणून "काँग्रेस पक्षाने आपल्या पक्षाचे राजीनामे दिले. सर्व लोकांनी या बिकट प्रसंगी एकत्र यावे असे आवाहन केले होते. अहमदनगर शहरातील काँग्रेस कमिटीच्या विद्यामाने मंत्रीपद त्याग दिनानिमित्त गांधी मैदानात केशवराव गरुड यांचे अध्यक्षेतेखाली जाहीर सभा भरली होती."[72] आमदार फिरोदिया यांनी मंत्रीमंडळाचे मंत्री पद स्वीकारल्यापासून मंत्री पद त्यागापर्यंत केलेल्या कार्याचा थोडक्यात उल्लेख करुन मंत्री मंडळास पाठिंबा दिला. आमदार फिरोदिया यांनी विद्यार्थ्यांना आपले कर्तव्य म्हणून युध्दविरोधी भूमिकेस पाठिंबा देण्याचा संदेश दिला.

## १४. 'जिल्हा सज्जता समिती' स्थापन

काँग्रेसच्या आज्ञेप्रमाणे 'अहमदनगर जिल्हा सज्जता समिती' स्थापन झाली. त्या समितीतर्फे जिल्ह्यात काही कार्यकर्त्यांनी काँग्रेसचा प्रचार करण्याची जबाबदारी आपणहून घेतली. आतापर्यंत जिल्ह्यातील प्रमुख ठिकाणी दौरे काढून काँग्रेस महात्मा गांधी, खादी, बहिष्कार व आहिंसाव्रत यावर या कार्यकर्त्यांची प्रवचने झाली यानंतर

सेनापती बापट, भाई भुस्कुटे वगैरेनी जिल्ह्यात दौरा काढून पुरोगामी विचार जनतेपुढे मांडले परंतु काँग्रेसने दिलेल्या राजीनाम्यामुळे जनता थोडी निराश झाली होती. जिल्ह्यातील काँग्रेस श्रेष्ठी प्रचार करतांना वरील चतु:सुत्रीचा उपयोग अंमलात आणीत होते, तर सेनापती बापट वगैरे पुढारी पुरोगामी विचार जनतेपुढे मांडीत होते.

### १५. 'स्वातंत्र्य दिन साजरा' होऊ लागला

२६ जानेवारी १९३० या दिवशी लाहोर काँग्रेसचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या स्वातंत्र्यदिनाची प्रतिज्ञा नावारुपास आणली तेव्हापासून २६ जानेवारी हा दिवस अहमदनगरमध्ये स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा केला जाऊ लागला. अहमदनगर शहर काँग्रेस कमिटी या दिवशी राष्ट्रीयध्वज वंदन करुन शहरात खादी विक्री करत असे. शहर काँग्रेस कमिटीच्या कचेरीत सूत कातण्याचा कार्यक्रम होत असे. हरिजन वस्ती जानकीबाई आपटे, नानासाहेब देवचक्के हरिजनांना स्वातंत्र्यदिनाचे महत्व पटवून देत असत. डॉ. कीर्ती यांच्या अध्यक्षेतखाली विद्यार्थ्यांशी जाहीर सभा होऊन गांधी मैदानातून प्रचंड मिरवणूक निघून शहरातील बहुतेक भागातून हिंडून परत गांधी मैदानात येत असे.

### क. १९२० ते १९४० काँग्रेसच्या वाटचालीचा आढावा

"१९२० ते १९४० या २० वर्षाच्या काळात अखिल महाराष्ट्रात काँग्रेस चळवळीच्या बाबतीत अहमदनगरजिल्ह्याची कीर्ती फार मोठी व जुनी होती. लोकमान्य टिळकांना ज्या भाषणाकरीता ६ वर्षे कारावास भोगावा लागला व त्यांची 'स्वातंत्र्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे' ही घोषणा प्रत्यक्ष ऐकण्याचा मान नगरकरांना मिळाला होता."[73] १९३० च्या जंगल सत्याग्रहाच्या चळवळीचे नेतृत्व अहमदनगर जिल्ह्याकडेच होते. जिल्ह्याची काँग्रेसच्या लढ्यात पहिल्या रांगेत असण्याची परंपरा टिकून होती. कुरबुरीचे, नाराजीचे अनेक प्रसंग सनदशीर चळवळी दरम्यान आले होते. देशहिताच्या आड येणारे हे प्रसंग कार्यकर्त्यांनी नजरेआड केले. काँग्रेसने 'राष्ट्रीय सप्ताह' सुरु केला

तेव्हा हजारो नव्या जुन्या कार्यकर्त्यांनी काँग्रेस कमिटीच्या कचेरीत प्रतिज्ञा पत्रकांचा वर्षाव केला. १९३२ च्या चळवळीत कित्येक पुढाऱ्यांना प्रारंभीच स्थानबध्द होण्याचा मान मिळाला होता. तरुण कार्यकर्त्यांनी १९३२ ची चळवळ चांगलीच गाजवली होती. सरकारने कार्यकर्त्यांची मालमत्ता जप्त केली, रावसाहेब पटवर्धनांना २ वर्षे कारावास व पाच हजार रुपये झालेला दंड सरकारला रद्द करावा लागला."[74] सरकारचे हे अस्त्र प्रभावी होते. ही गोष्ट मान्य करावी लागते.

"कायदेभंगाच्या आंदोलनाने देशातील इंग्रजी साम्राज्यसत्तेपुढे एक जबरदस्त आव्हान तयार केले होते. सविनय कायदेभंगाची चळवळ हे व्यापक जन आंदोलन होते. या चळवळीत समाजातील विविध घटक सामील झाले. ही चळवळ दीर्घ काळ चालली. ब्रिटीशांचे जुलमी कायदे मोडून देशातील ब्रिटीश राजवटीचे अधिष्ठान नष्ट करावे ही कायदेभंगाच्या चळवळीमागची भूमिका होती."[75] या चळवळीतून अहमदनगर शहरात अस्पृश्योधार चळवळ, दारुच्या गुत्यांला आगी लावणे, प्रभातफेरी, सायंफेरी काढून जनतेला राष्ट्रीय कार्यात सहभागी करुन घेणे, व्यापारी, विणकर, शिक्षक, विद्यार्थी इत्यादी सर्व समाजघटकांना स्वातंत्र्याचे महत्व पटवून देणे, कायदेभंगाच्या चळवळीचे महत्व जनतेस सांगणे, कायदेभंग चळवळीत महात्मा गांधीजींना अटक झाल्याच्यानिमित्त शहरभर कडकडीत हरताळ पाळणे, २६ जानेवारीस राष्ट्रध्वज उभारुन स्वातंत्र्यदिन साजरा करणे इत्यादी घटना या काळात घडत होत्या. नगर शहरातील या अहिंसावादी चळवळीचा धाक सरकारच्या मनावर निर्माण झाला होता.

### ड. दुसरे जागतिक महायुध्द ते स्वातंत्र्याची पहाट १९३९-१९४७

दुसरे जागतिक महायुध्द १९३९ साली सुरु झाले. "या युध्दाने दोन महत्वाचे बदल घडून आणले. एक म्हणजे नाझी जर्मनीने १९४२ साली सोव्हियत रशियावर आक्रमण करुन रशियाचा बराचसा भू-भाग पादाक्रांत केला. याच साली जपानने अमेरिकेच्या पर्लहर्बर वर तसेच ब्रम्हदेशापर्यंत मुसंडी मारली. त्यामुळे महायुध्द भारताच्या

सरहद्दीपाशी आले. यावेळी भारतात मात्र राष्ट्रीय सभेचा ब्रिटीशांच्या युध्दप्रयत्नांशी असहकार चालू होता."[76] अमेरिका व चीन या मित्र राष्ट्रांनी भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीबाबत तडजोड करुन युध्द प्रयत्नांना भारतीयांचे सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न करण्याची इंग्लंडला विनंती केली.

दुसऱ्या महायुध्दाची भिषणता वाढत असताना 'ब्रिटीशांनी भारत सोडून जावे' असा ठराव गांधीजींनी राष्ट्रीय सभेत मंजूर केला. हा ठराव म्हणजे गांधीजींचा 'चले जाव' चा प्रसिध्द नारा होता. 'चले जाव' या नाऱ्यामुळे भारतीयांच्या नसानसात राष्ट्रप्रेम संचारु लागले. या काळातील अहमदनगरची राजकीय स्थिती खालीलप्रमाणे होती.

**१. राजनिष्ठ कार्यकर्त्यांची युध्दसमितीची स्थापना**

एकीकडे कॉंग्रेसचे निष्ठावान कार्यकर्त्ये जनतेला आवाहन करुन ब्रिटिशसत्ता उलथून टाकण्यासाठी प्रयत्न करीत होते. तर दुसरीकडे "आपली पद, प्रतिष्ठा टिकविण्यासाठी राजनिष्ठ कार्यकर्त्यांनी 'युध्द समिती'ची स्थापना करुन सरकार प्रती आपली निष्ठा व्यक्त केली. एवढेच नाही तर आपली मुले व काही रक्कम दुसऱ्या महायुध्दासाठी खर्ची करण्याची तयारी दर्शविली."[77] अहमदनगर म्युनिसिपल कौन्सिल हॉलमध्ये युध्द समितीची स्थापना करण्याकरता, कलेक्टर स्ट्रीट फिल्ड यांच्या अध्येक्षतेखाली जाहीरसभा भरली होती. रा.ब.चितळे, रा.ब,नवले, खा.ब.इराणी, सरदार थोरात, आ.पोटे, कर्नल चितळे, कॅ.यासीन साहेब, डॉ.सप्तर्षि जपें, सरदार जोशी, बाबासाहेब मिरीकर, व्यास, श्रीधरपंत तांबोळी, ईस्माईलसाहेब, आ.रोहम, बाबुराव धनेश्‌वर, भाऊसाहेब धनेश्वर, बाबुराव मुळे, कानवडे , गायकैवारी, बापुसाहेब सराफ, हिवरगांवकर, डॉ.नेरुरकर, चिपळूणकर, गोरे, भाऊराव जाधव, भागवत पाटील, श्रीहरजी केरुजी पाटील, बेहरे, करवंदे, याशिवाय कोर्टकचेरीतील सर्व अधिकारी हजर होते.

## २. नागरिक संरक्षक दल १९४०

युध्द हिंदुस्थानच्या दाराशी आले. प्रत्येक शहरातून बॉम्बहल्ले, जाळपोळ, लुटालूट होऊ लागल्यास काय करावे ? व या सर्वांचा प्रतिकार कसा करावा ? हे शिकविण्या करिता 'नागरिक संरक्षक दल' स्थापन झाले. सदर दल कोणत्याही जातीचे धर्मांचे अगर राजकीय पक्षाचे नव्हते. बॉम्ब हल्ला झाल्यास प्रत्येक व्यक्तीने आपल्या घरी खालील वस्तू ठेवाव्यात. टॉर्च, वर्दी देण्यासाठी थाळी, लाठी, हरिकेन कंदील, दोन चार बादल्या, प्रथमोपचार साहित्य, कुऱ्हाड, फावडे, वाळुच्या थैल्या, पाण्याने भरलेले पिंप, लांब दोर इत्यादी वस्तू घरी असल्या की, आग लागली अगर कोणी जखमी झाले तर तत्काळ इलाज करणे सोपे होईल."[78] प्रत्येक घरातून निदान एकाट्या व्यक्तीने तरी प्रथमोपचाराचे व स्फोटक पदार्थापासून बचाव करण्याचे तांत्रिक ज्ञान संपादन केले पाहिजे.  हा दलाचा हेतू होता. या दलाची दलाची मुख्य कचेरी आनंदी बाजारात होती. तीचे अ.वि.केतकर चिटणीस होते. डी.जी. गटणेहे कमांडर, रा.ब.नवले, पटेल, नगरवाला आणि मि. सरोश के.इराणी, यांना प्ल्याटून कमांडर नेमले होते.

"दररोज रात्री सुमारे चाळीस लाठीमार स्वयंसेवक गस्त घालत. संशयास्पद इसमावर चांगली टेहळणी ठेवली जाई. शहरात हिंडणाऱ्या विशेषत: मध्यरात्री नंतर लष्करी लोकांकडून नागरिकास काही त्रास होणार नाही. अशी ह्या गस्तवाल्याकडून व्यवस्था केली जात असे."[79] नगरपालिकेच्या कौन्सिल हॉल मध्ये नगराध्यक्ष भाऊराव जाधव ह्यांचे अध्यक्षते खाली नागरिकांची जाहीर सभा होऊन हवाई हल्ल्यापासून संरक्षण करणे, आगी विझविणे, चर खणणे, निराश्रित लोकांना राहण्यास जागा व अन्न पुरविणे, पाणी पुरवठ्याच्या जागेस धोका झाला तर विहीर खणणे, जखमी लोकांची व्यवस्था करणे इ. ह्या योजनेतील मुख्य वैशिष्ट्ये होती. त्या करिता नगरपालिकेने ५० हजार रुपये खर्च करण्याचे ठरविले होते. संरक्षक दलाच्या स्त्रीशाखेतर्फे मे महिन्याच्या सुट्टीत शिबीर देखील घेतले होते.

### ३. संपादकाने नोंदविलेला अनोखा सत्याग्रह १९४०

"आजपर्यंत प्रत्यक्षसंग्राम सुरु झाला नव्हता. हिंदी जनतेच्या आकांक्षा काँग्रेसच पूर्ण करु शकेल असा सर्वांना आत्मविश्वास होता. म्हणूनच हिंदी जनतेचा कौल घेऊन महात्मा गांधीजींनी रणसंग्राम सुरु केला."[80] हा संग्राम नैतिक सामर्थ्यावर सत्य, शांती, अहिंसा, यांचे आयुध्द हाती घेवून चालवला जाणार होती. त्याप्रमाणे महात्माजींनी संग्राम चालविण्यासाठी युध्दभूमिवर सैनिक पाठविण्यास सुरुवात केली. त्याबद्दल कसल्याही प्रकारचे मत प्रदर्शनाचे मजकूर प्रसिध्द करण्यापूर्वी दिल्ली सेन्सार बोर्डाकडे कळवून त्यास सामान्यता घ्यावी अशा प्रकारची जिल्हा प्रेस ॲडव्हायजरी यांनी तारीख १९ ऑक्टोबर १९४० रोजी समक्ष सूचना दिली. "गेली दहा वर्षे काँग्रेसच्या पवित्र राजकीय वातावरणात संदेश या वृत्तपत्राचे दिवस गेले असल्यामुळे काँग्रेसने चालू केलेल्या सत्याग्रहाबाबत संदेशच्या संपादकाने सेन्सार बोर्ड, दिल्ली यांचा परवाना घेऊन संपादकाचे मत प्रसिध्द करणे म्हणजे स्वत:च्याच नव्हे तर जिल्ह्यातील राजकारणाशी निगडीत असलेल्या जनतेच्या व कार्यकर्त्यांच्या स्वाभिमानास तिलांजली दिल्यासारखे होणार होते."[81] म्हणून सद्य परिस्थितीबद्दल स्वतंत्र रीतीने राजकीय मत प्रतिपादनास जिल्हा प्रेस ॲडव्हायजरी कडून निर्बंधयुक्त सूचना परत घेई पर्यंत संपादकीय दोन्ही स्तंभ कोरे ठेवून संदेशचे संपादक द.र.निसाळ यांनी आपला निषेध नोंदविला. दुदैवाने अशा लहानमोठ्या अगळ्या वेगळ्या वैयक्तिक सत्याग्रहाची दखल घेण्यास इतिहास विसरला.

### ४. काँग्रेसने इतर पक्षांची दखल घेतली नाही

"अहमदनगर नगरपालिकेच्या जनरल बोर्डाच्या सभेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांना मान पत्र देण्याचा ठराव डांगळे यांनी मांडला. जो १७ विरुध्द १९ मतांनी नापास झाला. डॉ.बाबासाहेब आंबडेकरांनी चालविलेल्या अस्पृश्योध्दाराच्या चळवळीची दखल अहमदनगरच्या नेत्यानी घेतली नाही."[82] अहमदनगर जिल्ह्यात कम्युनिस्टांनी शेतकरी वर्ग स्वत:कडे ओढण्याकरता कारवाई चालवली आहे. "महात्मा गांधी व पं.

जवाहरलाल नेहरु हेच आपल्या देशातील शेतकरी-कामकरी जनतेचे खरे पुढारी आहेत व काँग्रेसच्या झेंड्याखाली संघटित होऊन आपले कार्य करणे हेच शेतकरी कामकऱ्यांचे खरे कर्तव्य आहे."[83] असा सावध राहण्याचा इशारा काँग्रेस पक्षाने दिला होता. काँग्रेस पक्षाने कष्टकऱ्यांच्या, दलितांच्या चळवळीला सोबत घेतले नाही असे म्हणता येऊ शकते.

## ५.अहमदगर शहर रचना समिती १९३९

"रचना समिती २० मार्च १९४१ ला स्थापन झाली. तिचे कार्य आनंदी बाजारात गुजर गल्लीत ऋषी यांचे वाड्यात सुरु झाली होती. या समितीमार्फत गटागटाने मुले, स्त्रिया-पुरुषांना सूत कातणे पिंजणे वगैरेची माहिती देण्यात येते असे."[84] येथे एक पिंजण्याचे यंत्र होते. त्या यंत्रावर तयार केले पेळू शहरात व जिल्ह्यात पुरविले जात. या समितीमार्फत खादी विणण्याकरता एक हातमाग चालू केला होता. खाजगी कांतणाऱ्याचे व समितीचे सूत नगर येथेच विणण्याची सोय केली होती. या समितीमार्फत चोवीस तास चरखा व तकल्या चालू ठेवून चोवीस गुंड्या सूत एका दिवसात तयार झाले व ते समितीला अर्पण करण्यात आले. या कामात मुलेमुली व स्त्रिपुरुषादी ८० जणांनी भाग घेतला."[85] समितीच्या प्रेरणेने गावात अनाथ विद्यार्थीगृह, हरिजन सेवाधाम, हेल्थ क्लब, दिवळीबाई बार्शीकर शाळा इ. ठिकाणी सूत कातणे वगैरे कार्यक्रम झाले. १९४० च्या ऑक्टोबर महिन्यात गांधी जयंती निमित्त एक छोटेसे प्रदर्शन जैन धर्मशाळेत उघडण्यात आले होते. "नवलमलजी फिरोदिया व पुनमचंदजी भंडारी यांच्या उत्तेजनामुळे कोपरगांव, राहता, वडाळा, बेलापूर वगैरे ठिकाणी रचना समितीची स्थापना झाली."[86] मार्च महिन्यात मात्र अहमदनगरला समितीची स्थापना होऊन बहुतेक सर्व महाराष्ट्रातील पिंजणकांतण कार्यर्त्यांचा एक बौध्दिक व प्रचार वर्ग निघाला तेव्हा येथील मंडळींच्या सल्ल्याने सुमारे आठ जण समितीमार्फत अहमदनगर जिल्ह्याचे प्रतिनिधी म्हणून त्या

वर्गास जवळजवळ एक महिना हजर होते. प्रत्येक गावातून नष्ट होत चाललेले उद्योगधंदे पुन्हा वाढीस लागण्याकरिता रचनात्मक उपाय सुचविले होते.

**समितीने सुचविलेले उपाय**

"वस्त्र स्वावलंबन - देवकापसाची घरोघर लागवड करुन तो निवडक वेचून सळी फळीने रेचून नवतुनाईने पेळू बनवून सूत सकस कातून वस्त्र बनवून घेणे हे पहिल्या प्रतीचे वस्त्र स्वावलंबन आहे."[87] पेळू विकत घेऊन ते सूत विणून घेणे हे दुसरे स्वावलंबन असून त्यात समाधान व शांतता नसते. फक्त खादी विकत घेवून वापरणे हे तर तिसऱ्या प्रतीचे स्वावलंबन व नकली खादी घेणे हे तर सर्वात कमी प्रतीचे स्वावलंबन आहे.

"संपूर्ण स्वावलंबन खेड्यातून होऊ लागले. शेतकरी खेडून स्वत: जमिनीत राबून अन्न निर्माण करतो, त्यास वस्त्र स्वावलंबनाची जोड मिळवून देणे आज जरुरीचे आहे."[88] प्रत्येक खेड्यातून ही परंपरा होती ती मोडकळीस आलेली व नाहीशी झालेली पुन्हा सुधारुन स्थिर करणे व करवणे ही रचनासमितीची कामे होती.

उदाहरणार्थ

"आजच्या परिस्थितीत गिरणीकापडा ऐवजी हातसुताची खादी, धान्य हातचक्कीवर दळणे, घासलेटाऐवजी घाण्याचे तेल वापरणे, साखरेऐवजी गूळ, काडीपेटी ऐवजी चकमक वापरणे या सारखी अनेक कामे परिस्थितीने आपोआप होऊ लागली पाहिजेत."[89] असे समितीचे म्हणणे होते.

**६. अहमदनगर जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रह १९४१**

महात्मा गांधीनी सरकारच्या विरोधात सत्याग्रहाचा विचार ठरविला. कायदेभंगाचे अस्त्र उपसले. १७ ऑक्टोबर १९४० पासून शांततामय अहिंसात्मक सत्याग्रह सुरु केला. त्यासाठी त्यांचे शिष्य विनोबा भावे यांची निवड केली. त्यांनी युध्दात 'सामील होऊ नका' असा विचार गावोगावी मांडायला सुरुवात केली.

“सत्याग्रहाची दुंदुभी निनादू लागताच अहमदनगर जिल्हा ही सज्ज झाला. आघाडीच्या यादीत पहिली पाच जणांची नावे मंजूर होऊन सत्याग्रह करण्याचे ठरले होते. हे सत्याग्रही वीर म्हणजे आमदार, खासदार होते. मुंबई प्रांताच्या मंत्रीमंडळातील स्थानिक स्वराज्याचे मंत्री आमदार ल.मा.पाटील यांनी प्रथम निशाण हातात धरले होते. त्यांनी पहिला सत्याग्रह केला.”[90] पाठोपाठ आमदार गिरमे, खासदार स्वामी सहजानंद यांनी सत्याग्रह केला होता. या पाचपैकी एक आमदार भाऊसाहेब फिरोदिया यांचा सत्याग्रह म्हणजे अखिल अहमदनगर जिल्ह्याचा पूर्ण प्रातिनिधिक सत्याग्रह होता. सत्याग्रहाची चळवळ सुरु झाल्याबरोबर काँग्रेसनिष्ठ सेवकांना भारतसंरक्षक कायद्याखाली अटक करुन त्याना शिक्षा देण्याचे सत्र सुरु झाले. त्या बाबतीत ही अहमदनगर जिल्ह्यानेच आघाडी मारलेली होती. त्यांचे पाठोपाठ दे.भ.वसंतराव तुळपुळे, भाई राम निसळ, कॉ.ढोले, महादू कोल्हाटी, सावंत, मोरे, वसंत कुलकर्णी प्रभुति होते. तसेच अच्युतराव पटवर्धन भिंगारचे पप्पुशेट, कुकडे, मोहनशेट वगैरे काँगेसचे प्रचारक होते. “काँग्रेसच्या झेंड्याखाली किसान कामगारांच्या एक जुटीचे कार्य करण्याचे खऱ्या विधायक आणि संघटनात्मक कार्याच्या चळवळीच्या प्रचाराचे कार्य यांनी सुरु करताच त्याना अटक झाली. अशा तऱ्हेच्या काँग्रेसनिष्ठ सेवकांच्या महाराष्ट्रातील बंदीजनांची यादी केली तर त्यात अहमदनगरचे बंदीजन जास्त आहेत. २५ तरी अशी नावे आहेतच की, त्यांची विस्मृती कोणालाच होणार नाही.”[91]

“पहिल्या तुकडीतील आमदार, खासदारांचा सत्याग्रह होऊन ते कारावासांत गेल्या नंतर त्यांच्या पाठोपाठ दुसऱ्या तुकडीतील स्त्री सत्याग्रही वीरांगनानी अनुयायिकत्व पत्करले यावेळच्या सत्याग्रहाच्या चळवळीमध्ये अहमदनगर जिल्ह्याच्या स्त्रियांनी तर आपल्या पूर्वीच्या किर्तीत भर टाकून अहमदनगर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले होते. यात शंका नाही.”[92] “अखिल भारतात मुसलमान स्त्री सत्याग्रही व ख्रिश्चन स्त्री सत्याग्रही अनुक्रमे फातिमाबेन तय्यबजी व राठोड यांनी अखिल महाराष्ट्रातील

अहमदनगर जिल्ह्याला पहिल्या स्त्री सत्याग्रही होण्याचा मान मिळवून दिला होता."[93] आचार्य कृपलानी व जमनादास यांच्या गांधी मैदानातील सभेत विघ्नसंतोषींनी अडथळे आणले व त्यांना जखमी केले. तरी गांधीवादी नेत्यानी अहिंसेचे पुर्ण पालन करुन सभा यशस्वी केली होती."[94] जिल्हा बोर्डातील बहुतेक कॉंग्रेसनिष्ठ सेवकांनी आपल्या जागांचे राजीनामे देऊन सत्याग्रह म्हणजे निव्वळ तुरुंगवासाचीच शिक्षा घेणे नव्हे, तर इतर दृष्टीने विधायक कार्यक्रम आचरणात आणून सत्याग्रह शिकवण्याचे धडे गिरविण्यास सुरुवात केली. सत्याग्रह करुन तुरुंगात गेलेल्यांची वर्गवारी खालील प्रमाणे आहे. "त्यापैकी ८५ सत्याग्रही सुटून आले होते. १३ स्त्रिया १ मुसलमान महिला, व एक ख्रिश्चन महिला, ३ मुसलमान, १ हरिजन, ३ विधिमंडळ सदस्य,१ म्युनिसिपल सदस्य, ९ लोकलबोर्ड सदस्य,४ पूर्ण सत्याग्रही, त्याप्रमाणे तालुकावार सत्याग्रही खालीलप्रमाणे तालुकावार सत्याग्रही खालीलप्रमाणें होते. कोपरगाव १८, अहमदनगर शहर १८, अहमदनगर तालुका २३, संगमनेर ५, पाथर्डी २५, नेवासे १४, राहुरी १० जामखेड ३,श्रीगोंदे ९, शेवगांव २ अकोले व २ पारनेर २ असे होते."[95] भारत संरक्षण कायद्याखाली युध्द विरोधी आक्षेपार्ह भाषणावरुन व युध्दाशी के वाटल्यावरुन रावसाहेब पटवर्धन, अच्युतराव पटवर्धन, मुरलीधर लोणारा, रा.शं.देवचक्के, अच्युतराव रसाळ, पप्पुशेट, कुकडे, भागवत, भाई ढोले, भाई वसंत तुळपुळे, राम निसळ वगैरे २५ प्रमुख कार्यकर्त्यांना शिक्षा झाल्या. आपल्या जिल्ह्याचे प्राण रावसाहेब पटवर्धन यांची शिक्षा संपतांच येरवड्यातून मुक्तता झाली परंतू येरवड्याच्या दारातच त्यांना सरकारने अटक करुन नाशिकच्या तुरुंगांत पुन्हा स्थानबध्द करुन ठेवले या कार्यकर्त्यांना झालेल्या दंडाची एकूण रक्कम ५६०० रुपये होती."[96]

अहमदनगर जिल्ह्यांतील सत्याग्रहामुळे नगर जिल्ह्यात कॉंग्रेसचा प्रचार झाला. गांधीजीच्या आदेशानुसर शे.७५ टक्के सत्याग्रह खेड्यात झाले होते. बहुतेक सत्याग्रह सर्व तालुक्यात झाले होते. मागील १९३०-३२ च्या स्वातंत्र्यसंग्रामात महाराष्ट्रात

अहमदनगर जिल्हा आघाडीलाच होता आणि सध्याच्या वैयक्तिक सत्याग्रह लढ्यातही आघाडीवरच होता. हे अहमदनगर जिल्ह्याला भूषणावह आहे

**७. विद्यार्थ्यांचे चळवळीतील योगदान १९४२**

अहमदनगर जिल्हा कॉंग्रेसनिष्ठ युवक परिषदेच्या स्थायी समितीव्दारे १५ फेब्रुवारी १९४२ 'चीन दिन' पाळण्यात आला. "त्यानिमित्त गांधी मैदानातून प्रचंड सायकल फेरी निघाली. "रावसाहेब पटवर्धन ह्याचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली होती."[97] त्यांनी भाषणात आपण आपल्या स्वातंत्र्याकरीता झगडा करणे हेच चीनला सहानुभूती दाखविल्यासारखे आहे असे सांगितले होते"[98] अहमदनगर येथील विद्यार्थींनी 'आशिया छोडो दिन' पाळला. त्या निमित्त विद्यार्थ्यांची सायकल फेरी व गावातून जंगी मिरवणूक निघाली होती. विद्यार्थ्यांनी शाळेवर हरताळ पाळला होता."[99] अहमदनगर सोयायटी हायस्कूलच्या टॉवरवरील राष्ट्रीय झेंडा अज्ञात व्यक्तीने जाळला. त्याबद्दल विद्यार्थ्यात खळबळ उडून त्यांनी हायस्कूल बंद पाडले. तेथे पुन्हा झेंडा फडकवून सत्याग्रह केला.

**८. अहमदनगरमधील मिरवणूकीवर निर्बंध १९४२**

"अहमदनगर पोलिस सब इन्स्पेक्टरने शहर कॉंग्रेस समितीचे अध्यक्ष आमदार भाऊसाहेब फिरोदिया याना पत्र पाठवून यापुढे मिरवणूक काढावयाची असल्यास परवानगी काढावी लागेल."[100] असा बॉम्बे डिस्ट्रिक्ट पोलीस ॲक्ट ४८१ नियमान्वये निर्बंध घातला होता. "गेली कित्येकवर्षे मिरवणुकीस परवानगी घेण्याची कधीच जरुरी लागली नाही."[101] नगरच्या सत्याग्रहींची सरकारने प्रचंड दहशत घेतली होती. याचे हे उदाहरण होते.

**९. कामगारांचा मे दिन यशस्वी**

अहमदनगर जिल्ह्यात १९३५ सालापासून एक नवीन प्रथा प्रस्थापित होऊन ती संघटनेच्या दृष्टीने चांगल्या प्रकारे वाढीस लागली होती. "नव्या आंतरराष्ट्रीय

चळवळीचा परिणाम हिंद राष्ट्रीय चळवळीवर होऊन समाजसत्तावादासारख्या अगदी नवीन तत्वाचा पुरस्कार हिंदुस्थानमध्ये होऊ लगला."[102] त्यांचे पडसाद १९३५ सालापासून अहमदनगरमध्ये घुमु लागले. मे दिन, रशियनराज्यक्रांती दिन, तसेच लेनिन, कार्लमार्क्स यांच्या स्मरण सभा भरु लागल्या.

दररोज अन्नसामूग्रीचे त्याचप्रमाणे घासलेट, कपडे व इतर जीवनोपयोगी वस्तूंचे भाव भरमसाठ वाढत होते. "व्यापाऱ्यांच्या नफेबाजीला आळा घालण्याचे प्रयत्न निष्फळ ठरत होते. महागाईचा हा प्रश्न सोडविण्यासाठी अखिल भारतीय किसान सभेने पुढाकार घेतला. गरीब कामगार व शेतकऱ्यांसाठी मालाचे भाव जनतेच्या प्रतिनिधी कमिटीच्या सल्लामसलतीने ठरविण्यात यावेत, नफेबाजीचा शोध करण्याकरिता खास अधिकरी नेमावेत, गुन्हेगारांना कडक शासन करावे,"[103] मामलेदाराच्या परवानगीशिवाय मालाची निर्यात होऊ नये. नफेबाजी बंद न झाल्यास सरकारने सर्व माल ताब्यात घ्यावा व विक्रीची स्वतंत्र व्यवस्था करावी. या मागण्या सरकारकडून मान्य करुन घेण्यासाठी प्रत्येक गावात व तालुक्यांत शेतकऱ्यानी व कामगारानी सभा भरवाव्यात व मोर्चे काढावेत. असे "किसानपत्रक काँग्रेसने काढून शेतकऱ्यांच्या व्यथा सरकार पर्यंत पोचवल्या. वरील पत्रकाबरोबरच २६ जुलै हा दिन 'नफाबाजी विरोधी दिन' म्हणून पाळण्यात यावा अशीही सूचना अध्यक्षांनी केली होती."[104] अशाच प्रकारचा एक जाहीरनामा ग्रामोद्योगवाद्यासाठी काढला होता.

शरीरास लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तू शक्यतो हाताने बनविलेल्या असल्या पाहिजेत. जेथे जो कच्चा माल तयार होत असेल, "तेथे त्याचा पक्का माल तयार करण्याची व्यवस्था होईल व शक्यतो तेथेच तो खपविला जाईल. तेथे तो खपणे शक्य नसेल तर राष्ट्रीय वित्त मंडळया तो विकत घेऊन त्याचे ताबडतोब पैसे देतील."[105] असे केल्याने मधील दलालांची आवश्यकता नाहीशी होऊन केवळ दलालीवर पोसले जाणारे श्रीमंत लोक कमी होऊन भांडवलशाहीला आळा बसेल. "समाजात समानता नांदेल.

यांत्रिक कारखाने राहतील, पण त्यांच्या व ग्रामाद्योग्यांच्या उत्पत्ती करण्यात मर्यादा बांधली जाऊन ग्रामोद्योगास संरक्षण दिले जाईल."[106] यांत्रिक कारखाने राष्ट्रीय मालकीचे राहून ते देशास पोषक व संरक्षक स्वरुपाचे असतील. या जाहीरनाम्यातून लघुलद्योग व कारखानदार यात समन्वय साधण्याचा प्रयत्न नेत्यांनी केला.

## १०. शेतकरी गट परिषद १९४५

### महायुध्दकाळात शेतकऱ्याची कठीण परिस्थिती सुधारण्याचे उपाय -

"अहमदगर जिल्ह्यात अवर्षणामुळे पिके करपून गेली आहेत. शेतकऱ्यांची अशी दारुण परिस्थिती असताना सरकारी नोकराना त्यांच्या हवालदील परिस्थितीचा मागमूसही नव्हता. सरकारची वाटप पध्दत सरकारच्या दृष्टीने चांगली असली"[107] तरी जे धान्याची वाटप करीत आहेत तो नोकर वर्ग शेतकऱ्यांना छळल्याशिवाय धान्यच देत नसे. शेतकऱ्यांची दौलत म्हणजे बैल परंतू बैलालाही भरपूर चारा यापुढे मिळू शकत नव्हता.

वरील सर्व अडचणींचा विचार केला म्हणजे सरकारने शेतकऱ्यासाठी तातडीने उपाय योजना अमलांत आणल्या पाहिजेत प्रथम सरकारने दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना दुष्काळी कामे पुरविली पाहिजेत. "धान्य भरपूर मिळेल अशी व्यवस्था करुन प्रत्येक रेशन दुकानात भरपूर धान्य ठेवले पाहिजे. समाशॉपमध्ये एक एक महिन्याचे जादा धान्य ठेवणे सरकारचे आद्य कर्तव्य आहे."[108] आतापर्यंत जिल्हाधिकारी व त्यांच्या हाताखालचा नोकर वर्ग जिल्ह्यातून शेतकऱ्यांचा दुवा घेण्याऐवजी त्यांचे रक्तशोषणच करीत आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष केले. तर कलेक्टर यांच्या बंगल्यावर मोर्चे आणून कलेक्टर यांना खालील गोष्टी करण्यास भाग पाडण्याचे ठरवले. "दुष्काळ जाहीर करुन दुष्काळी कामे काढणे, लेव्हीची सूट देणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, रेशन वाढवून शेतकऱ्यांना पोटभर धान्य पुरविणे आणि सरकारी फंडाची गुंडगिरी बंद करणे."[109] या तक्रारी सरकारने तातडीने दुर केल्या तर त्रस्त

शेतकरी सुखी होईल नाहीपेक्षा सरकारी राज्ययंत्र खिळखिळे होईल असा इशारा गटपरिषदेने दिला.

## ११. अहमदनगरमधील ‘चले जाव’ चळवळ आणि वैयक्तिक सत्याग्रहाचे धडे १९४२

“मुंबई येथे ज्या गवालिया टँकवर १८८५ साली भारतीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन भरले होते, त्याच ठिकाणी. १९४२ साली ता. ८ ऑगस्टला अखिल भारतीय राष्ट्रीय सभेचे इतिहास प्रसिध्द अधिवेशन भरविण्यात आले होते.”[110] ब्रिटीशांनी आपली सत्ता सोडून हिंदुस्थानातून निघून जावे म्हणून ‘चले जाव’ ही प्रभावी घोषणा दिली. दुसऱ्या महायुध्दात लोकशाहीचा विजय होण्यासाठी हिंदुस्थानने आपले संरक्षण समर्थपणाने करावे म्हणून ‘चले जाव’चा ठराव पंडित जवाहरलाल नेहरुनी मांडला. महात्मा गांधींनी 'करेंगे या मरेंगे' हा स्वातंत्र्य प्राप्तीचा महामंत्र दिला. भारतीय स्वातंत्र्यासाठी निर्णायक लढ्याचे रणशिंग फुंकून आपापल्या समरभूमीकडे स्वातंत्र्यवीर अधिवेशनाला शिबीरातून बाहेर पदार्पण करणार तोच “ता. ९ ऑगस्ट रोजी पहाटेस सरकारी असुरांनी काँग्रेसच्या नेत्यांना अकस्मितपणे पकडले. व अहमदनगरच्या किल्ल्यात बंदिस्त ठेवले.”[111] पंडित जवाहरलाल नेहरु, मौलाना अबुल कलाम आझाद, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित गोविंद वल्लभ पंत, आचार्य जे. बी. कृपलानी, आचार्य नरेंद्र देव, डॉ. सय्यद महमूद, शंकरराव देव, असफ अली, डॉ. पट्टाभी सीतारामय्या, डॉ. प्रफुलचंद्र घोष, हरेकृष्ण मेहताब असे काँग्रेसचे बारा पुढारी होते. या काळात पंडित जवाहरलाल नेहरुंनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' हा महत्वपूर्ण ग्रंथ लिहून अहमदनगरच्या लौकिकात मानाचा तुरा खोवला. सन १९४५ ला मुंबई सरकारच्या हुकूमानुसार अहमदनगरच्या तुरुंगातील बंदीछावणी संपवून राजबंद्यांना त्यांच्या-त्यांच्या प्रांतातील तुरुंगात रवाना करण्याचा आदेश दिला. ही बातमी नगरकरांपासून गुप्त राखण्यात आली. १० ऑगस्ट १९४२ रोजी सुरु झालेली ही राजबंदी छावणी २० एप्रिल १९४५

रोजी बंद करण्यात आली. या जवळपास दोन हजार दिवसांच्या काळात राजबंद्यांनी केलेल्या चर्चा म्हणजे एक 'ज्ञानसत्र' होते असे डॉ. हरीकृष्ण मेहताब यांनी १९९४ च्या लोकमतच्या अहमदनगर पंचशताब्दी विशेषांकाला मुलाखत देताना सांगितले होते.

येरवड्याच्या तुरुंगाचे दुय्यम अधिकारी बाळकराम मेहता यांनी या राजबंदींच्या दैनंदिन सवयी, आवडी, आजार, लकबी, स्वभाव या विषयी आठवणी लिहून ठेवल्या. त्या श्री. मा. भावे यांनी महाराष्ट्र टाईम्सच्या २००२ च्या वार्षिक पुरवणीत मांडल्या.

अहमदनगरच्या किल्ल्यावर जरी इंग्रजाचा कडक पहारा ठेवण्यात आला होता, तरी आत राजबंद्यांच्या दिमतीस दिलेले व कुली म्हणून काम करणारे बहुतेक महाराष्ट्रीय लोक होते. त्यांच्या मार्फत किल्ल्यातील कानोसा घेण्यात येत होता. अहमदनगरमधील राजकीय बंदिजनाचा आदर्श ठेवून येथेही वैयक्तिक सत्याग्रहांना उधाण आले. "ल. मा. पाटील, स्वामी सहजानंद भारती आणि रावसाहेब पटवर्धन यांनी कोपरगांव संगमनेर, आकाले, राहुरी, पाथर्डी, कर्जत, निघोज, राहुरी, बेलापूर, पुणतांबे, भिंगार, जामखेड, मढपिंपरी, नेवासे अशा अनेक ठिकाणी सभा घेऊन युध्द विरोध का करावा लागत आहे हे जनतेला समजावून सांगितले."[112] युध्द विरोधी घोषणा होऊ लागल्या. पकडापकडी सुरु झाली. जिल्हा कॉंग्रेसचे रुपांतर सत्याग्रह कमेटीत करण्यात आले. "प्रांतिक सत्याग्रह मंडळाचे अधिकारी दे.भ. शंकरराव देव यांच्या पत्रकानुसार सत्याग्रहीवीरांच्या सह्या सत्याग्रह प्रतिज्ञा पत्रिकेवर होऊ लागल्या. सत्याग्रह शिक्षण शिबीर घेण्याचे ठरवून. वैयक्तिक सत्याग्रहाचे शिक्षण देण्याकरिता कमेटीच्या नेतृत्वाखाली भिंगार येथे शिबीर घेण्याचे ठरविण्यात येताच भिंगारचे पुढारी व कार्यकर्ते श्रीकृष्ण काकडे, पप्पुशेट, बापुराव हरके, मोहनराव देव यांना पकडून कारागृहात डांबून ठेवण्यात आले."[113]

भिंगारच्या कार्यकर्त्यांना जनतेपासून वेगळे केले. "चले जावच्या घोषणेने दिल्लीच्या राजप्रासादात बसून भारतच्या राज्यकारभाराची सूत्रे हलविणाऱ्या

व्हॉइसरायाची खुर्ची हादरली."[114] अधिकाऱ्यांची धावपळ सुरु होऊन वर्किंग कमेटीच्या सर्व सभासदांना पकडून अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आले. ही बातमी सर्व अहमदनगर जिल्ह्यात विद्युतवेगाने पसरताच जिल्हाभर हरताळ पाळण्यात आला. "भिंगार येथील पुढाऱ्यांना स्थानबध्द करताच पुढे वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरु झाली. जाहीर सभेत चलेजावची घोषणा करुन सत्याग्रही तुरुंगात जाऊ लागले."[115] महात्मा गांधीजीची अनुज्ञा घेऊन "रखमाजी बोंदर्डे व सौ. विठाबाई बोंदर्डे या पतिपत्नीने सत्याग्रह केला तसेच श्रीकृष्ण कुकडे व सौ. पद्मावतीबाई कुकडे या पतिपत्नीने सत्याग्रह केला."[116] "जंगी मिरवणूक निघाली सभा झाली चले जावची घोषणा करताच सत्याग्रही पतिपत्नीना अटक होऊन शिक्षा देण्यात आली. राधाबाई देशमुख, शेवंताबाई नागपुरे आणि सुलोचनाबाई बडदे या तीन स्त्रियांनी हातात तिरंगी झेंडे घेऊन सत्याग्रह केला. या सत्याग्रही मिरवणूकीत बहुसंख्य स्त्रियांनी भाग घेतला होता. स्त्री पुरुषांच्या जमावासह मोर्चा फौजदार कचेरीवर नेण्यात आला. गगनभेदी अशा चले जाव घोषणा होऊ लागल्या. "कचेरीतील पोलिस व अधिकारी भांबावून गेले. त्यांनी लाठी हल्ला करण्याचा धाक घातला. पण स्त्रियांनी माघार घेतली नाही. भिंगारच्या तीन रणरागिणींना अटक करण्यात आली व ६/६ महिन्याची शिक्षा ठोठावण्यात आली. भिंगारचा वैयक्तिक सत्याग्रह निष्ठापूर्वक चालू असताना चले जावच्या जाहीर घोषणेकरिता व वैयक्तिक सत्याग्रह करण्यासाठी केशवराव गरुड यानी सभा घेतली. सभेत सरकारचा निषेध करुन 'चले जाव' घोषणा केली."[117] त्या सभेला किल्ल्यात कुली म्हणून काम करणारे कारले, पावसे, शिंदे, आणि अंधुरे सभेला उपस्थित दिसल्यामुळे गुप्त पोलिसांकडून त्याच्यावर पाळत ठेवण्यात आली. हे दोघे संरक्षणखात्यातील नोकर होते. या कुलीनी आपली कामगिरी चोखपणे बजावली. "तशीच कळयंत्री टेलीफोनची पण कामगिरी उत्तम प्रकारे बजावून किल्ल्यातील संदेश बाहेर आणि बाहेरच्या घडामोडी आत अगदी बेमालूमपणे सुपूर्त केल्या होत्या. नेत्यांनी सत्याग्रही शिक्षण शिबीरे काढून सत्याग्रहाचे तंत्र आणि मंत्र

यांची दिशा आरंभी अहमदनगर जिल्ह्यात देऊन टाकली असल्यामुळे 'चले जाव'चा वणवा दिवसेंदिवस भडकू लागला."[118] नगरच्या सत्याग्रही समितीतील पदाधिकारी गावोगाव प्रचार करुन नागरिकांना व ग्रामस्थांना लढ्यास प्रवृत्त करु लागले.

**१२. देशभक्तीची ज्योत लष्करी छावणीत पेटवली १९४३**

"अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमेटीच्या सदस्यांनी जोगळेकरांच्या बंगल्यावर अच्युतरावांसह बैठक घेतली. त्यात अहमदनगर जिल्ह्यात लोकसत्ताक राज्याचा झेंडा फडकविला गेला पाहिजे असे ठरविण्यात आले."[119] तसेच अहमदनगर जवळ ज्या लष्करी छावण्या आहेत व त्यात "ज्या मराठा आणि शीख रिजिमेंट्स आहेत त्यांच्यात स्वातंत्र्याची ज्योत पेटवून स्वराज्याचा मार्ग दाखविला पाहिजे"[120] असेही ठरविण्यात आले.

"ब्रिटीश राजवटी विरुध्द जेवढ्या म्हणून मोहिमा लढावयास पाहिजे तेवढ्या गोष्टी अहमदनगर जिल्ह्यात सुरु झाल्या होत्या. काही कार्यकर्ते 'चले जाव' च्या घोषणा गर्जवीत होते तर काही प्रचार कार्यात गढून गेले होते."[121] काही सावोनाईटच्या निर्मितीत गुंतले होते तर काही बुलेटिन्स काढून ती भिंगार कँप मधील सैनिकांच्या हातात पडतील अशा योजनेत रमून गेले होते. "वैयक्तिक सत्याग्रह अखंडपणे कोपरगाव, पुणतांबे, संगमनेर, खर्डा, राहुरी, नेवासे, वांबोरी वगैरे ठिकाणी डिक्टेक्टर नेमून चालू होते."[122] अहमदनगर जिल्ह्याने साम्राज्यवादी सरकार विरुध्द एकसारखा डोंब उसळून दिला होता. चालू असलेल्या कार्याची आणि पुढील योजनेची माहिती बुलेटिन्सच्याव्दारे जिल्हाभर पोहोचविण्यात येत होती.

गुप्तपणे ही बुलेटिन्स भिगार कँप मध्ये जाऊ लागली. "यावेळी कँप भागातील लष्कारी छावणीत ब्रिटीशांविरुध्द व्देष भावाना व देशाबद्दल राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचा कार्यकर्त्यांचा मनोदय होता. सरकारने जत्रा, यात्रांना बंदी घातली होती."[123] तरी भिंगारच्या काही प्रतिष्ठित व्यक्तींचा जामीन घेऊन यात्रा भरविण्याची सरकारने

परवानगी दिली. ही यात्रा लष्करी हद्दीत भरत असल्यामुळे यात्रेची मजा पहाण्याकरिता प्रतिवर्षी मराठा व शीख पलटणीतील पुष्कळ सैनिक येत असत. त्याप्रमाणे याही यात्रेस ते बहुसंख्येने आले होते. या संधीचा फायदा घेऊन काँग्रेस कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय सेवादलाच्या सैनिकांर्फत हजारो बुलेटिन्स काढून ती वाटण्यात आली आणि 'चले जाव' च्या घोषणेचा मतितार्थ व 'स्वातंत्र्याकरिता आव्हान' असा संदेश सैनिकाना देण्यात आला. सैनिकामध्ये राष्ट्रीय जागृतीचे सुरुंग पेरुन ठेवले."[124] बुलेटिन्स काढणाऱ्यांना व ती वाटाऱ्यांना पकडण्याची मोहीम सरकारने जोरोन सुरु केली. अहमदनगर जिल्ह्यातील बहुतेक सत्याग्रही चलेजावच्या घोषणेमुळे कारागृहात अडकून पडले होते. "काहींना सरकारने स्थानबध्दतेत डांबून ठेवले होते आणि मोकळे होते ते फक्त भूमिगत. त्यांनी अहमदनगर जिल्ह्यात नुसता हा:हाकार माजवून दिला होता."[125] टाईम बाँब सारखा सन्मित्र त्यांचा सहकारी होता त्यामुळे सरकारी रेकार्ड जाळणे, आगी लावणे, तारा तोडणे हे कार्य अव्याहतपणे चालू झाले होते.

## १३. सरोज टॉकीज बाँबस्फोट १९४२

दि.२५ डिसेंबर १९४२ च्या रात्री अकरा वाजण्याची वेळ, युरोपीयन अधिकारी आणि सैनिक 'चॅकलेट सोल्जर' नावाचा चित्रपट पाहण्यात तल्लीन झाले होते. इतक्यात बाँबचा भयंकर स्फोट झाला. "त्यात अनेक सैनिक जखमी झाले. बाँब प्रकरणात बाळासाहेब सप्तर्षि, डॉ. घाटे, हबीबखान ड्रायव्हर, राधाकिसन खोमणे, घनाश्याम उध्दव वऱ्हाडे, आण्णा कामाठी आणि आहेरे व गवळी या सात आरोपींना पकडून अटकेत ठेवण्यात आले. चार्जशीट भरुन खटला भरण्यात आला."[126] ता. २६ ऑगस्ट १९४३ ला खटला सुरु झाला. "सरोष टॉकीज बाँब खटल्याचा आवाज साऱ्या महाराष्ट्रात गेला. सरकार कडील बाजू लंगडी पडली. पुरावा निष्फळ ठरला आणि न्यायाधिशांनी ता. २० सप्टें. १९९४३ ला निकाल देऊन सर्व आरोपींना निर्दोष म्हणून मुक्त केले."[127] या प्रकरणात सरकारी अधिकाऱ्यांनी आपली झालेली नाचक्की भरुन

काढण्याकरिता २६ सप्टेंबर १९४३ रोजी सर्व आरोपीना पकडून बेमुदत स्थानबध्द करुन ठेवले. या प्रकरणाने जनता मात्र उत्साहीत झाली.

अहमदनगरमध्ये १९३० पासून स्वातंत्र्य मिळेपर्यत अनेक वीर व वीरांगणांनी आपले योगदान दिले. त्याचा आढावा थोडक्यात घेतला आहे."[128]

## १९३० च्या अहमदनगरमधील सत्याग्रही वीरांगणा

अनुसयाबाई कोल्हाटी, कुसुमावती कान्हेरे, देऊबाई जाधव, दुर्गाबाई जोग, भिकूबाई, मंजुळाबाई गजाराम कोल्हाटी, मनुबाई कऱ्हेकर, सोनुबाई सिरसाट.

## १९३२ च्या अहमदनगरमधील सत्याग्रही व लढ्यातील वीरांगणा

यमुनाबाई कडुसकर, हंसाबाई चांदेकर, शांताबाई हिरे, राधाबाई देशमुख, शातांबाई कुलकर्णी, काशीबाई हिरवे, दुर्गाबाई जोग, मामासाहेग कडूसकर, राधाबाई पाखले, राधाबाई देशमुख, शांताबाई हिरे, शांताबाई कुलकर्णी, शकुंतलाबाई चिटणीस, सुलोचना काशिनाथ बेडदे.

## १९४२ च्या चलेजाव लढ्यातील अहमदनगरमधील सत्याग्रही वीरागंणा

"जाईबाई राठोड, राधाबाई बाळकृष्ण देशमुख, मामीसाहेब कडूसकर, शेवंताबाई नागपुरे, सुगंधाबाई बाजीराव औटी, सुलोचनाबाई बडदे, विठ्ठाबाई बोंदर्डे, सुलोचनाबाई काशिनाथ बडदे"[129]

## अहमदनगरमधील विविध सत्याग्रहांचे प्रकार

"वटहुकुमभंग, नोटीस भंग, रस्ता सत्याग्रह, विलायती वस्त्र विरोधन, पेशावर दिन, काँग्रेस पत्रिका डकविणे, म.गांधी दिन, मीठ तयार करणे, राष्ट्रीय ध्वजारोहण, मोतीलाल दिन, काँग्रेस पत्रिका विक्री, सिगारेटस विरोधन, दारु विरोधन, करवंदी प्रचार, प्रेस ॲक्ट भंग, काँग्रेस पत्रिका प्रचार, दांडी दिन, विलायती औषधे विरोधन, अक्षिप्त वाङ्:मय वाचन, काँग्रेस पत्रिका प्रसिलिकरण, पोस्ट ऑफिस विरोधन, इंपिरियल बँक विरोधन, भगतसिंग दिन, झेंडावंदन, हरताळ पाळणे, पं.साखर बहिष्कार दिन, पेट्रोल

बहिष्कार दिन, रॉकेल बहिष्कार, परदेशी वस्तुकर बहिष्कार, बांगड्या बहिष्कार दिन, ताडी बहिष्कार, जालीयनावाला दिन, स्टेशनरी बहिष्कार दिन, दिल्ली अधिवेशन प्रयाण, दिल्ली काँग्रेस दिन, पाटील दरबार प्रचार, सोलापूर माईक लॉ दिन, छात्रालय झेंडावंदन, बहिष्कार घोषणा, युध्द विरोधी घोषणा, चले जाव घोषणा, जंगल सत्याग्रह, बुलेटिन्स वाटणे, भाषणबंदी हुकुम भंग, सत्याग्रह जागृति, प्रभातफेरी, बेकायदा मिरवणूक."[130]

## १४. पुनर्घटना परिषद व लोकशाही कारभाराचा प्रत्यय

स्वातंत्र्याचा काळ जसजसा जवळ येऊ लागला, "तसतशा जातीय दंग्याच्या ज्वाला उसळू लागल्या. घटना समितीचे नियोजन सरदार वल्लभभाई यांनी ९ डिसेंबर १९४६ रोजी दुपारी बरोबर आकराच्या ठोक्यास घटना समितीला आरंभ केला. तिकडे राज्यघटना घडविणाऱ्या समितीचा संकल्प जाहीर होताच अहमदनगर जिल्ह्यातील पुढाऱ्यांनी पुनर्घटना परिषद घेण्याचे ठरविले."[131] काँग्रेस सरकारच्या पुनर्घटना खात्याचे मंत्री  ल. मा. पाटील हे होते. "त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यातील सर्वांगिण योजनावर लोकमत अजमाविण्याकरिता हा अभिनव उपक्रम अंमलात आणून लोकशाहीच्या कारभाराचा प्रत्यय द्यावा. हा महान उद्देश सफल करण्याचा  मान प्रथम अहमदनगर जिल्ह्यास मिळाला होता."[132] नामदार पाटील आपल्या भाषणात म्हणाले, "जनतेच्या सर्वांगीण विकासासाठी मुंबई सरकार या पाच वर्षात ९६ कोटी रुपये खर्च करणार आहेत. त्यात पिण्याच्या पाण्याची सोय, पाटबंधरे, शेतीसुधारणा, मागासलेल्या वर्गाचा प्रश्न, शिक्षण, आरोग्य, सहकारी सोसायट्या, वगैरे पंचवीस विषयावर चर्चा झाली."[133] अहमदनगर जिल्हा दुष्काळी असल्यामुळे पिण्याचे पाणी व पाटबंधारे यास अग्रस्थान देण्यात यावे असे सर्वांनी मत व्यक्त केले. ग्रामोध्दार मंडळामार्फत आपल्या सूचना सरकारास कराव्या. "मागणी करताना ती पध्दतशीर करण्यात यावी म्हणजे केलेल्या मागणीचा योग्य विचार केला जातो. जनतेचा फायदा होतो या भाषणाने जनता प्रभावित झाली होती.

### अखेर युनियन जॅक ऐवजी तिरंगा फडकला

अहमदनगर जिल्हा कॉंग्रेस कमेटीच्या माहिती पत्रकाप्रमाणे सर्व शहर शृंगारण्यात आले होते. "स्वातंत्र्योत्सुक नागरिकांनी आपापल्या गल्लीतील रस्त्यावर झिरमाळा, पताका, कमानी, सडासंमार्जन, रांगोळ्या, यांनी सजावटीची परमावधी केली होती.

"झेंडावंदनासाठी प्रमुख ठिकाणी मोहल्यामोहल्यातून झेंडावंदनाची सोय केली होती. नागरिकांचा उत्साह दांडगा असल्यामुळे दिवाळीची शोभा नगर शहरामध्ये प्रगट झाली होती. गुरुवार ता १४ ऑगस्ट १९४७ रोजी ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे रात्री १० वाजता मशालीची मिरवणूक गांधी मैदानातून काढणे. रात्री १२ वाजता कॉंग्रेस कचेरीवर झेंडा रोवण्यावा समारंभ, शुक्रवारी, ता १५ ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजता गांधी मैदानातून सायकल फेरी, दुपारी १२ वाजता शहरात ठिकठिकाणी भंडारा, सायंकाळी ५ वाजता गांधी मैदानातून मिरवणूक रात्री ९ वाजता हायस्कूल परांगणात पोवाडे व राष्ट्रीय गाणी त्यानंतर जाहीर सभा या प्रकारचा कार्यक्रम सर्व कार्यकर्त्यांचा व नागरिकांच्या विचाराने ठरविण्यात आला होता.

"तारीख १५ ऑगस्ट १९४७ हा अति भाग्याचा सुदीन उगवला. त्याच सुमूहुर्तावर किल्ल्याचे फत्तेबुरुजावर आमचा तिरंगी राष्ट्रध्वज आचार्य नरेंद्रदेव यांचे शुभ हस्ते परत डौलाने फडकू लागला. किल्याच्या बुरुजावर रावसाहेब पटवर्धन, काकासाहेब गरुड, भाईसथ्था, बापूसाहेब भापकर, राजाराम कुलथे, मिश्रीलाल भंडारी इ. असंख्य नेते हजर होते. अहमदनगरमधील हजारो नागरीक व कार्यकर्ते सकाळीच मंगल वाद्य वाजवित, रणशिंगे, तुताऱ्या, बॅण्ड, ढोलकी अशी शेकडो प्रकारची वाद्य वाजवित व क्रांतीगीते म्हणत अहमदनगरच्या किल्याकडे मिरणुकीने निघाले होते."[134]

समाजवादी नेते आचार्य नरेंद्र देव यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. राष्ट्रध्वज फडकावल्याचे पाहून सर्वांच्या डोळ्याचे पारणे फिटले. भारताचे स्वातंत्र्य अमर असो अशा सर्व नगरवासियांनी घोषणा दिल्या.

**सारांश**

१८५७ चे स्वातंत्र्य युध्दापासून तो दुसऱ्या स्वातंत्र्य लढ्याच्या पूर्व तयारीच्या कालापर्यंत 'अहमदनगर' देशकाल परिस्थितीनुसार थंडच होते. पण या कालामध्ये जनतेमध्ये हळूहळू सर्वांगीण जागृति उत्पन्न होत चालली होती व या मध्यंतरीचे काळात थंड पडलेला गोळा जरासा सचेतन होऊ लागला. भारतामध्ये सर्वसाधारणपणे ज्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक चळवळी जन्मास येत त्यामध्ये अहमदनगरध्ये पुष्कळच महत्त्वाचा कार्यभाग साधला. अहमदनगरचे कार्य पध्दतीत 'झगझगाट' दिसत नसला तरी लोपककार्याविषयींची आत्मीयता, पध्दतशीरपणा, राष्ट्रकार्य विषयक तळमळ हे सद्‌गुण निश्चितपणे पाहाण्यास मिळतात. त्यामुळे सरकारपक्षीय, प्रागतिक, पारतंत्र्य विमोचक, अश सर्वाचे एकावर एक अशा विधायक कार्यामुळे अहमदनगरचे कीर्तीत भर पडली. विशेषत: बिटीशांचे मगरमिठीतून आपला देश सोडवून तो स्वतंत्र करण्यासाठी कॉंग्रेसने जे कार्य केले ते उल्लेखनीय होय.

## संदर्भ सूची


[1] पारखे ग.ह., आमचा नगर जिल्हा, प्रथम आवृत्ती, पुणे, नविन किताब खाना, १९३१, पु.क्र.३९

[2] पेशवे दप्तर, जाहीरनामा, ऐतिहासिक लेखसंग्रह,१४/६५७७

[3] Wellington's Despatches, III, 446

[4] पारखे ग.ह., आमचा नगर जिल्हा, प्रथम आवृत्ती, पुणे, नविन किताबखाना, १९३१, पु. ४०

[5] ग्रंथ प्रकाशन समिती, अहमदनगर ब्यरो म्युनिसिपालिटी शतसंवत्सरिक स्मारकग्रंथ, अहमदनगर, १९५०,पु.क्र.४७

[6] गॅझेटीअर ऑफ इंडिया महाराष्ट्र स्टेट अहमदनगर जिल्हा,पृ.क्र.४१०

[7] उपरोक्त पृ.४१७

[8] उपरोक्त पृ.४१८

[9] उपरोक्त पृ.४१९

[10] उपरोक्त पृ.४२०

[11] त्रैमासिक, इतिहास संशोधन प्रदिप, अहमदनगर जिल्हा, ऐतिहासिक वस्तू संग्रहालय, वर्ष-८, अंक- १८ -१९-२०,१९८५

[12] निसाळ द.रं., संदेश, गुरुवार ता.६ नोव्हेंबर सन १९४१ , स्थळ-अहमदनगर,पान १३

[13] पाठक ना.वि.(गुरुजी) ९ऑगस्ट क्रांती पर्व, सुवर्ण वर्षे, स्मरणीका, अहमदनगर, १९५५ पृ.क्र. ३५

[14] उपरोक्त पृ. ३६

[15] उपरोक्त पृ. ३७

[16] पाठक ना. वि., भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर,१९९३ पृ.३५

[17] उपरोक्त पृ. ३६

[18] उपरोक्त पृ. ३६

[19] उपरोक्त पृ. ३६

[20] उपरोक्त पृ. ३७

[21] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटवर्धन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ.१५

[22] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटवर्धन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ.१५

[23] उपरोक्त पृ.१५

[24] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.२२

[25] पाठक ना.वि. (गुरुजी), भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर, १९९३, पृ. ४०

[26] उपरोक्त पृ.४१

[27] पाठक ना. वि., भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर, १९९३ पृ. ४५

[28] उपरोक्त पृ.४५

[29] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पु.५

[30] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटवर्धन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ.१५

[31] उपरोक्त पृ.१६

[32] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, १४ ऑगस्ट, १९४७, पृ.५

[33] उपरोक्त पृ.१७

[34] ऋषी पी.डी. १०० वर्षांतील नगरचे बदलते समाज जीवन, १९०१ ते २०१४, प्रथम

आवृत्ती अहमदनगर २०१६, पृ.५५

[35] उपरोक्त, पृ.५५

[36] उपरोक्त, पृ.५६

[37] निसाळ द.र., संदेश, अहमदनगर, १४ ऑगस्ट, १९४७, पृ.५

[38] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटर्वधन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ.१६

[39] निसाळ द.र., संदेश, अहमदनगर, १४ ऑगस्ट, १९४७, पु.६

[40] उपरोक्त पृ. ६

[41] पाठक ना.वि. (गुरुजी), भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर, १९९३ पृ. ६४

[42] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ. ६८

निसाळ.द.र.,संदेश,अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पृ.६

[43] उपरोक्त पृ.६

[44] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटर्वधन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ. १७

[45] निसाळ.द.र., संदेश, अहमदनगर, १४ ऑगस्ट, १९४७, पृ.६

[46] उपरोक्त पृ.६

[47] उपरोक्त पृ. ७

[48] उपरोक्त पृ. ८

[49] उपरोक्त पृ. ९

[50] उपरोक्त पृ. १०

[51] पाठक ना.वि. (गुरुजी), भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर, १९९३ पृ. ७७

52 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, १४ ऑगस्ट, १९४७, पृ. ८

53 पाचलग, भारतीय, राऊसाहेब पटर्वधन, प्रथम आवृत्ती २००३, पृ. २०

54 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, १४ ऑगस्ट, १९४७, पृ. ८

55 उपरोक्त पृ.८

56 ऋषी पी.डी. १०० वर्षांतील नगरचे बदलते समाज जीवन, १९०१ ते २०१४, प्रथम आवृत्ती अहमदनगर २०१६,पृ.९१

57 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, १४ ऑगस्ट, १९४७, पृ.८

58 उपरोक्त पृ. ८

59 पाठक ना.वि. (गुरुजी), भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर,१९९३ पृ. ८५

60 निसाळ.द.र.,संदेश, अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पृ.८

61 पाठक ना. वि.,भारदे बाळासाहेब,जोशी सुरेश,अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर,१९९३ पृ. ८६

62 उपरोक्त पृ.८६

63 निसाळ.द.रं.,संदेश,अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पृ.८

64 पाठक ना. वि., भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम,प्रथम आवृत्ती अहमदनगर, १९९३ पृ. ८७

65 निसाळ.द.रं., संदेश,अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पृ.९

66 उपरोक्त पृ.९

67 उपरोक्त पृ.१०

68 भंडारी मिश्रीलाल हिरालाल, स्वातंत्र्य लढा व भिंगार, प्रथम आवृत्ती, भिंगार, १९६०, पृ.२८

69 उपरोक्त पृ.८

[70] उपरोक्त पृ.९

[71] केळकर श्रीपाद, छोडो भारत, १९४२ काही महत्त्वाच्या घटना व कार्यक्रम,प्रथम आवृत्ती मुंबई, १९६०, पु.२८

[72] उपरोक्त पृ.२९

[73] उपरोक्त पृ.३०

[74] उपरोक्त पृ.३१

[75] पाठक ना. वि.,भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम,प्रथम आवृत्ती अहमदनगर,१९९३ पृ. ९०

[76] उपरोक्त पृ.९१

[77] निसाळ.द.रं.,संदेश,अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पृ.९

[78] निसाळ.द.रं.,संदेश,अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पृ.९

[79] उपरोक्त पृ.९

[80] पाठक ना. वि.,भारदे बाळासाहेब,जोशी सुरेश,अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर,१९९३ पृ. ९६

[81] उपरोक्त पृ.९६

[82] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटवर्धन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ.२२

[83] पाठक ना. वि., भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम,प्रथम आवृत्ती अहमदनगर,१९९३ पृ. ९९

[84] निसाळ.द.र.,संदेश,अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पृ.९

[85] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटर्वधन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ.२२

[86] निसाळ.द.र., संदेश,अहमदनगर,१४ ऑगस्ट,१९४७,पृ.९

[87] उपरोक्त पृ.९

[88] उपरोक्त पृ.९

[89] पाठक ना. वि., भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर, १९९३ पृ. ९९

[90] उपरोक्त पृ. १०४

[91] उपरोक्त पृ.१०५

[92] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर गुरुवार ता. २९ ऑक्टोंबर सन १९३९, ,पृ. ६

[93] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर ९ नोव्हेंबर सन १९३९, ,पृ. ३

[94] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर,७ डिंसे. सन १९३९, पृ. ३

[95] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर,२५ जाने. सन १९४०, पृ. ४

[96] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर,२ फेब्रु. सन १९४०, पृ. ९

[97] उपरोक्त पृ. ३

[98] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर,११ एप्रिल. सन १९४०, पृ. ३

[99] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर,११ जुलै. सन १९४०, पृ. ३

[100] राजेंद्र दर्डा, दैनिक लोकमत, नगर पंचशताब्दी विशेषंक, अहमदनगर, १५ ऑगस्ट १९९५ पृ.१०

[101] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर,८ ऑग. सन १९४०, पृ. ३

[102] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर,१२ मार्च. सन १९४२, पृ. ७

[103] निसाळ द.रं., संदेश,अहमदनगर,२ एप्रिल. सन १९४२, पृ.९

[104] अहमदनगर शहर म्युनिसिपालिटीच्या जनरल बोर्डाच्या ता. ३०-४-४२ च्या ठराव

[105] संदेश गुरुवार माहे १८ जून सन १९४२ पान ५

[106] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २७सप्टें. सन १९४०, पृ. ३

[107] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २४ ऑक्टों. सन १९४०, पृ. ३

[108] उपरोक्त पृ.३

[109] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, १३ डिसें. सन १९४५, पृ. ३

[110] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, ९ ऑक्टों. सन १९४०, पृ. ३

[111] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, ८ ऑक्टो. सन १९४२, पृ. ५

[112] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर,५ फेब्रु. सन १९४२, पृ. ५

[113] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, ६ नोव्हें. सन १९४१, पृ. १३

[114] उपरोक्त पृ. १

[115] ऋषी पी.डी. १०० वर्षांतील नगरचे बदलते समाज जीवन, १९०१ ते २०१४, प्रथम आवृत्ती अहमदनगर २०१६, पृ.३५

[116] उपरोक्त पृ. १३

[117] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २७ फेब्रु. सन १९४१, पृ. ७

[118] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २७ फेब्रु. सन १९४१, पृ. ७

[119] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.२७

[120] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २७ नोव्हें. सन १९४१, पृ. ७

[121] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटवर्धन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ.२९

[122] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २७ नोव्हें. सन १९४१, पृ. ७

[123] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, १६ नोव्हें. सन १९४२, पृ. ३

[124] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, १९ फेब्रु. सन १९४१, पृ. ३

[125] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, १८ ऑक्टो. सन १९४५, पृ. ६

[126] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २ ऑक्टो. सन १९४२, पृ. ४

[127] भंडारी मिश्रीलाल हिरालाल, स्वातंत्र्य लढा व भिंगार, प्रथम आवृत्ती, भिंगार, १९६०, पृ.२८

[128] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर,२३ एप्रिल, सन १९४५, पृ.३

[129] देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटर्वधन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती मुंबई, २००५, पृ.२४

[130] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर,४ जून, सन १९४२, पृ. ५

[131] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २३ ऑग. सन १९४५, पृ. ४,५

[132] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, ६ डिसें. सन १९४५, पृ. ३

[133] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, २० डिसें. सन १९४५, पृ. ३

[134] केळकर श्रीपाद, छोडो भारत, १९४२ काही महत्त्वाच्या घटना व कार्यक्रम, प्रथम आवृत्ती मुंबई, १९६०, पु.१५

## प्रकरण - तिसरे

# अहमदनगर शहरातील आर्थिक परिवर्तन

**प्रस्तावना**

इंग्लंड मधून आलेले ब्रिटिश राज्यकर्ते हे व्यापारी राज्यकर्ते होते. त्यापूर्वी महाराष्ट्रात जे स्वराज्य नांदले, जे मराठ्यांचे साम्राज्य स्थापन झाले, त्यांची आर्थिक धोरणे फारशी विचारपूर्वक बनविली गेलेली नव्हती. प्रगत व आधुनिक अर्थशास्त्रापेक्षा मराठ्यांचा भर पांरपरिक ज्ञानावर होता. सारा आकारणी, वसुली व त्याच बरोबर सरकारी खर्च ह्या क्षेत्राचे मराठे हे इंग्रजाइतके जाणकार व हिशेबी त्यामुळे नव्हते. मराठ्यांच्या भोंगळ अर्थनीतीचा राजकारणावरही प्रतिकूल परिणाम झाला.

इंग्रजांचे आर्थिक धोरण व प्रशासन हे रयतेच्या शोषणावर आधारलेले होते. त्यांनी आर्थिक बदल घडवून आणले, नवी धोरणे आखली, नवे आधुनिक अर्थशास्त्र, व्यापार व तंत्रज्ञान हे सर्व त्यांनी आणले, पण त्या मागचा हिशेबीपणा, स्वार्थ व मुख्य म्हणजे त्यांची शोषणाची प्रवृत्ती काही लपून राहत नाही. प्रस्तुत प्रकरणात आपण इंग्रजी अमदानातील आर्थिक धोरणाचा यांचा विचार करणार आहोत.

**निजामशाही काळातील संक्षिप्त आर्थिक धोरण**

अहमदशहाच्या राज्यात राजधानी म्हणून अहमदनगर शहाराचे जितके महत्व होते. तितकेच व्यापाराच्या दृष्टीनेही होते. १५, १६ व्या, शतकात अहमदनगर प्रमुख व्यापारी शहर होते. अहमदनगरचा परदेशाशी बराच व्यापार चाले. मुंबईपासून ३० मैलावर असलेले अरबी समुद्रावरील चौल नावाचे बंदर परदेशाशी दळणवळण ठेवणारे मुख्य बंदर होते. "अहमदनगरहून जुन्नर मार्गे चौलला व तेथून परदेशात गहू, ज्वारी, बाजरी, कापड व ढाक्याची मलमल इ. माल निर्यात होत असे. तर तांबे, खजूर, मसाला, अरबी घोडे याची आयात होत असे."[1] व्यापाराच्या महत्वामुळे अनेक परदेशी मुसलमान

येथे स्थायिक होऊ लागले. निजामशाहीच्या उतरत्या काळात व्यापारासही घरघर लागली. “नगर ऐवजी सुरत हे मुख्य व्यापारी शहर बनले. मुघल काळात व्यापार बराच नष्ट झाला. येथील गुजराथी लोकाच्या स्वाधीन झाला असावा. निजामशाही काळात गुजराथशी बरेच दळणवळण होते. याच काळात ते येथे आले असावेत. मारवाडी समाज त्यानंतर येथे आला.”[2] निजामशाही काळातच नगरच्या बाजारपेठेवर, गुजराती मारवाडी यांनी आपली मोहर उठवायला सुरुवात केली होती.

**ब्रिटीश आमदनीतील महाराष्ट्राचे आर्थिक धोरण, आर्थिक प्रशासन व आर्थिक जीवन**

इंग्रजांचा अंमल महाराष्ट्रात सुरु झाला, तेव्हा अर्थव्यवस्था शेतीप्रधान होती. लोकसंख्येचा बहुतांश भाग खेड्यात राहत असे. मराठेशाही गावे ही स्वयंपूर्ण होती, स्वतंत्र्य होती व इतर गावांपासून - शहरांपासून तुटलेली होती. पशुपालनाचा व्यवसाय एक पूरक व्यवसाय म्हणून महाराष्ट्रात चालत असे.

बलुतेदारी पध्दतीमुळे गावात आर्थिक क्षेत्रात स्पर्धा नव्हती. समाजाची उतरंडवजा रचना असल्यामुळे इथे प्रत्येकाचे स्थान व काम ठरलेले होते. जमिनीची मालकी वैयक्तिक व सामुदायिक स्वरुपाची होती. सरकारचा हस्तक्षेप फारसा जाणवत नसे. जमिनदारी पध्दत नव्हती, शेती पारंपारिक पध्दतीने जुनाट अवजारांनी कसली जात होती. खेडी स्वयंपूर्ण होती. ती बंदिस्त होती. खेड्यांचा शहराशी अभावाने संपर्क येत असे.

**भारतीय उद्योगांचा ऱ्हास**

हस्तोद्योग बंद पडल्याने शहरातील लोक ग्रामीण भागात आले. रेल्वे सुरु झाल्यामुळे दळणवळण वाढले. लोकांचे राहणीमान बदलले. त्यांना हव्या असणाऱ्या वस्तूंची निर्मिती सुरु झाली. त्यामुळे नवीन पिढीसाठी नवीन उद्योग निर्मिले गेले.

**महाराष्ट्रातील आर्थिक बदल**

महाराष्ट्र ब्रिटीश अंमलाखाली आल्यानंतर सारा वसुली व जमिनीची मालकी यामध्ये महत्वाचे बदल झाले. मुंबई इलाख्यात रयतवारी पध्दती लागू करण्यात आली

त्यामुळे हाल झाले. रोकड स्वरुपात सारा भरावा लागत असल्यामुळे सावकाराचे पाय धरण्याशिवाय शेतकऱ्यांना पर्याय नव्हता. मुंबई इलाख्यातील शेतकरी मोठ्या संख्येने कर्जबाजारी होऊ लागले. त्यांच्या असहाय्यतेचा फायदा सावकार घेत. शेतकऱ्यांचे शोषण करण्यासाठी त्यांनी अनेक युक्त्या शोधुन काढल्या. परिणामी अनेक शेतकऱ्यांच्या जमीनी सावकारांनी बळकविल्या. जमिन आता खरेदी व विक्रीयोग्य अशी मिळकत बनली. जमीन गहाण ठेवणे, तिची विक्री करणे या प्रकारांना आता सुरुवात झाली. संयुक्त कुटूंब पध्दतीचा ऱ्हास झाला. शेतजमिनीचे लहान लहान तुकडे बनले. त्यातून उत्पन्न काढणे पूर्वीसारखे किफायतशिर राहिले नाही. त्यामुळे खेड्यांची स्वायत्तता नष्ट झाली.

मुंबई इलाख्यात शहरीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला. हस्तव्यवसाय, हस्तोद्योग, हस्तकौशल्य हे सर्व नामशेष झाले. शेतीवर आधारीत असणारे व्यवसाय बंद पडले. शहरीकरण व नागरीकरण यामुळे अनेक नवीन शहरे अस्तित्वात आली. १८५३ पासून रेल्वे सुरु झाली. त्यामुळे काही नवी शहरे उदयाला आली. शिक्षणासाठी लोक दुसऱ्या शहरात जाऊ लागले. जोडशहरे किंवा एका गावाशेजारी दुसरे गाव वसविण्याची टूम निघाली.

**सावकारी पध्दतीचे उच्चाटन**

ब्रिटीशांचे महाराष्ट्रात आगमन होऊन त्यांनी महाराष्ट्राचा ताबा घेतला. त्यावेळेस त्यांनी येथील अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला. प्रथम सावकारांच्या जुलुमातून जनतेची सोडवणूक करण्यासाठी कायद्याचा वापर केला. सावकाराच्या जबर व्याजातून लोकांची सुटका व्हावी, म्हणून मुंबईतील तरुणांनी गरीब लोकांना कर्जे देण्यासाठी 'म्युच्युअल युनियन फंड' उभारला होता. नेटिव्ह गृहस्थांनी परस्पर ऐक्य संग्रह म्हणजे म्युच्युअल युनियन फंड स्थापन केला होता. "आता पैक्यावाचून कुळाचे अडणार नाही. जमीन गहाण ठेवावी लागणार नाही. व्याजही हलके पडणार होते. रा.बाळकृष्ण त्रिंबक आणि सीताराम नारायण यांच्याप्रमाणे गावोगाव असे प्रयत्न होऊ लागले."[3] सावकाराच्या

जाचातून सुटका करावी वाटणे म्हणजे दारिद्रयाचा अभ्यास करणाऱ्या पिढीचा उदय होऊ लागला असे म्हणावे लागते.

"इंग्रजी खालसा मुलखात एकच रुपयाचा शिक्का व खुर्दा चालावा ही सरकारची इच्छा होती. सराफ-सावकारांना यात बुडवणूक वाटे. परंतु सुरळीत व्यवहार केल्यास त्यासही नफा होते. जरीपटका, बेलापुरी हे रुपयाचे वजन दुसऱ्या इतकेच सापडत असे. बाजारात दुकानदारांचा व गिऱ्हाईकांचा सरळ व्यवहार होऊ लागला. मध्यस्थाची गरज कमी झाली. पेशवाईत दरोडे पडत. बंडवाले लोकांना राखेचे तोबरे देऊन मारीत. इ. अरिष्टे कंपनी सरकारने दूर केली. कायद्याचे राज्य आल्यामुळे काठीस सोने लावून वाटेल तेथे जावे. अशी शाश्वती सरकार देऊ लागले."[4] 'सरकारने कायद्याचे राज्य' निर्माण करुन आपला दरारा निर्माण केला होता.

अशी अनेक गावे आहेत की ज्यात एकही साक्षर नव्हता. रोखे किंवा पावत्या यात कुलकर्ण्यांने काय लिहिले ते त्यांना समजत नसे. सरकारी कामगार जनतेवर जुलूम करीत. सरकारमध्ये अर्जी केली तरी मतलबी कुलकर्णी त्यावर जो शेरा लिहील त्यावरच निकाल अवलंबून असे. ५-१० वेळा अर्ज करुनही काम होत नसे. म्हणून सरकारने लहान गावातही शाळा सुरु कराव्यात.म्हणजे सावकारांचे जनतेवर असणारे प्राबल्य कमी झाले असते."[5] सुशिक्षित समाज सावकारांच्या तावडीतून सुटला पाहिजे असा प्रयत्न सुरु झाला.

"मुंबई इलाख्यातील व्यापारी तयार केलेल्या जिनसाचे व शेतीकामातील सुधारणूकीविषयी उत्तेजन देऊन शेतकऱ्यानी सरकारच्या इच्छाप्रमाणे शेती केली पाहिजे यास उत्तेजन देण्याकरिता नागरिकांना बक्षीस दिले जाईल असा जाहीरनामा सरकार छापू लागले. जनतेने सावकाराच्या जाचातून मुक्त होण्यासाठी सरकार प्रयत्न करु लागले."[6] जनजागृतीसह सावकारांवर बंधने लादण्यास सरकारने सुरुवात केली.

वनदार व खोत प्रजेकडून वेठबिगार घेत असत. तसेच कुळाचे देणे जबरदस्तीने वाढवित. एक खंडीऐवजी दोन खंडीचा वसूल घेत असत. कुळास पोट बांधून काम

करावे लागे. अहोरात्र खपूनही अन्न मिळतच नसे. पेज व आंबीलही पुरती मिळत नसे. "खोत हे वसूलदार व सावकार असल्यामुळे अष्टाधिकारी असत. वर्षानुवर्षे कष्ट करुनही कर्ज फिटत नसे. धान्यरुपाने कर्ज घेतले तर सवाईने व्याज घेतले जाई. हा क्लेशास्पद अनर्थ दूर करण्यासाठी इंग्रज सरकारने कायदा करायला हवा."[7] लोकांच्या अज्ञानाचा खोताने गैरफायदा घेतला आहे.अधिकारी लोभाविष्ट होऊन लाच घेतात. हा जुलूमही थांबायला हवा, असे सांगून सावकाराचे महत्व कमी करण्यासाठी खुद्द सरकारने लक्ष घालावे असे लोक म्हणू लागले.

सावकारी जुलमाने खेड्यातील कुणब्यांची दशा फार वाईट होते असे. कर्जावर नियंत्रण घातले, तरच या दु:खाचा थोडासा परिहार होईल. जवळ शिवराई नाही, मुलेबाळे नागवी हिंडताहेत, असे चित्र सार्वत्रिक होते. "इन्साफ व कायदा यांचे निमित्त सांगून सावकार सगळेच लुटून नेत असत. शेतकरी अन्नालाही मोताद होत असे. सरकारने निदान घर व शेत जप्त करण्यावर बंदी करावी."[8] क्रूर सावकारांनी गावेच्यागावे उजाड केली होती. कूळ म्हणजे सावकाराचा गुलाम झाल्याने त्याची बायकोही त्याच्यावर नाराज असे. ही सगळी मानहानी निमूटपणे सोसावी लागे. देवावर हवाला ठेवावा लागे. सावकाराची वर्तणूक कायद्याविरुध्द असे, म्हणून कर्जरोख्यावर दोन साक्षीदारांच्या सह्या असण्याची सक्ती केली पाहिजे. म्हणजे दगाबाजी होणार नाही. रोख्यात खाडाखोड करणाऱ्या सावकारास शिक्षा झाली पाहिजे. कर्जाने अनीती वाढते. काही सावकार तर कर्जापोटी कुळाच्या बायकांनाही कामाला ठेवतात. रुपये देऊन त्यांना सोडवणे भाग पडते. हे जनतेच्या लक्षात येऊ लागले. कर्जबाजारी शेतकऱ्यांनी कर्जातून मुक्त व्हावे यासाठी ज्ञानोदयातूनही उपदेश केला जाऊ लागला.

"व्याजाचा दर कायद्याने निश्चित करणे जरुरीचे आहे. कर्जापायी लोक फकीर होत आहेत. एखाद्या रोगाप्रमाणे वंशपरंपरा कर्जरुपी व्याधी त्यांच्या मानगुटांवर बसलेली होती. त्यांची घरे तरी जप्त करु नयेत, लेकराबाळांना देशोधडीस लावू नये. शेत व बैलजोडीही सुरक्षित राहिल असा कायदा हवा आहे. प्रत्येकाचे श्रमाचे फळ आजतरी

सावकाराच्या घशात जात आहे."[9] मग पोटात काट्याकुट्या घालण्यावाचून दुसरा उपायच नाही. सावकार लोक नीतीचे किंवा माणुसकीचे बंधन मानीत नसत. कायदा केला, तर ऋणमुक्त होण्याचा सुलभ उपाय सापडेल. सावकारी जाचातून गरीब शेतकऱ्याला मुक्त करण्यासाठी वरील उपाय जरुरीचे होते.

"गरिबांकडून भागरुप भांडवल गोळा करुन दिवाळे काढणाऱ्या कंपन्यापासून लोकांची बुडवणूक होणार नाही. सावकारांच्या जबर व्याजातून कुळाची सुटका होईल. व्याज तुंबले की, सावकार नवनवीन रोखे करतात. त्यातून मूळ रक्कम कपात होत नाही. सावकाराच्या फासात गरीबांचा गळा घोटला जातो. इंग्रज सरकार या दोघांना शिव्याशाप देतात. यातून नीती बिघडते. ऋणजन्य अनर्थ वाढल्यामुळेच रयत कुभांडे व बंड यांत निमग्न झाली. प्रजेची खराबी थांबविण्यासाठी तिच्या पाठीवरचे हे ओझे उतरविले पाहिजे. अज्ञानी लोक दासपणात राहातात. म्हणून ज्ञान व खरा धर्म यांचा प्रसार व्हावा."[10] खाण्यावाचून मरणारांना जगविण्यासाठी हा कायदा आवश्यक ठरतो. सावकाराच्या व्याजातून जनतेची सुटका करण्यासाठी बँकेसारखी एखादी संस्था असावी, अशी गरज १८५८ साली निर्माण झाली होती.

"कर्जविषयक कायदा केला, तर उत्पन्न बुडले. म्हणून सरकार कायदाच करणार नाही. कदाचित कर्नल जेकब याने सिंधमध्ये केलेला कायदा रद्द होईल. मि. लिजेटने कौन्सिलास अशी विनंती केली की, 'नादार ऋणकोसाठी कायदा करावा.' कर्जाच्या खटल्यांना दोनशे रुपयांची मर्यादा घातली तर लहान कर्जे कोणी देणार नाहीत. ऋणको लोकांची अडवणूक होईल. पण कसेही झाले तरी शेती व घरदार कर्जापेटी जप्त होऊ नये, असा कायदा झालाच पाहिजे."[11] गरीब रयतेच्या कल्याणाची सरकार तजबीज करीत आहे.

"खानदेशातले देशमुख व देशपांडे सरकारविरुध्द शेतकऱ्यांना चिथावीत होते. रेव्हिन्यूच्या मोजणीमुळे त्यांचे नुकसान होईल, या भीतीपोटी ते शेतकऱ्यांना सांगतात की, खुंटीच्या दगडाकरिता तुम्हाला फार खर्च येईल. भोळ्या लोकांना बनवून ते

स्वार्थाकरिता बंड करीत होते."[12] वतनदारी पध्दत सरकारने नष्ट केल्यामुळे हवालदिल झालेले वतनदार जनतेला सरकारविरुध्द भडकवून आपले स्थान बळकट करत होते.

"खेड्यातील लोकांची इंग्रजी राज्यावर फार आवड होती. त्यांची खात्री झाली की पूर्वीच्या राजवटीपेक्षा इंग्रजी अंमलात लुटारु व परचक्र यांपासून जास्त संरक्षण मिळते. बंडाबद्दल ते अगदी अज्ञानी होते. इंग्रजी इन्साफावर त्यांचा पूर्ण विश्वास असून लुच्चा कामदारांमुळे आपणावर अन्याय होतो. असे ते समजतात. मारवाडी-सावकारांच्या जुलमामुळे ते फार खित्र होते. शेकडा २५ किंवा ५० टक्के व्याजाच्या योगाने त्यांच्या डोक्यावर कर्जाचे पर्वत तयार होतात. शेतीतील अल्प प्राप्तीमुळे कर्ज लवकर फिटतही नाही. सावकार त्यांची जिनगी व शेतमळे हिसकावून घेतात. कर्जबाजारी होण्याची चालच या देशात पडून गेली आहे. त्यांची गरज पाहून चढ्या व्याजाने सावकार पैसा देतो व शेवटी जप्ती आणतो. मग यांच्याजवळ कवडीसुध्दा उरत नाही. सावकाराला शिव्या देऊन ही भयंकर दशा संपणार नाही."[13] शेतकऱ्यांना कायद्याच्या राज्याचे फायदे लक्षात येऊ लागले होते. सावकारापेक्षा सरकार त्यांना जवळचे वाटू लागले.

"अव्वल इंग्रजी काळात सावकारीच्या व्यवसायात नगरचे तांबोळी, निसळ वगैरे कुटुंबे रुजलेली होती. बदलत्या काळात सावकारीचा धंदा या कुटुंबानी सोडून दिला. या कुटुंबांचे वंशज नौकरी, धंद्यात कार्यरत असून मध्यम वर्गाचे जीवन जगत होते. पण त्यांच्या नावापुढे चिकटलेली 'सावकार' ही उपाधि आजही कायम आहे."[14] सावकार म्हणून मिरवणे त्यांना प्रतिष्ठेचे वाटत असे.

"कापड बाजारातील गुगळे पार्टी मोठी समजली जाई त्यांच्या दुकानात एकेकाळी अत्तराचे दिवे जळत. घोड्यांच्या शानदार बग्गीतून गुगळे मंडळी लोकांचे अभिवादन स्वीकारत रस्त्यातून जात. पुढे गुगळे कंपनीने मुंबईत सिनेमा निर्मितीत भांडवल घातले व ते बुडले."[15] सावकारकीच्या व्यवसायातून मिळणारे उत्पन्न भरपूर असे. त्यामुळे मिळालेला नफा इतर उद्योगांमध्ये गुंतवला जाई.

"त्या काळात अहमदनगरला 'रितकरण मोतीलाल' ही व्यापारी पेढी कार्यरत होती. गांधी बंधूतील चोथमल यांनी त्या पेढीवर नोकरी धरली तर चुलत भाऊ राजमलजी कापडाची गाठोडी घेऊन कापड विक्री करू लागले."[16] ही अहमदनगरमधील पहिली पेढी समजण्यास हरकत नाही.

आडत-भुसार धान्य, किराणा, कापड अशा व्यवसायात पुढे आलेल्या मारवाडी कुटुंबांनी सावकारीचा धंदा मोठ्या प्रमाणात सुरु केला. त्यातील "लालूजी काबरे हे सरकारला कर्ज देणारे नगरशेठ होते. त्याकाळात पेढीमालक व्यापारी वर्ग सार्वजनिक कार्यापासून चार हात दूर राही."[17] कितीही पैसा मिळाला तरी कमी खर्चाचे साधे व शांत जीवनमान या वर्गाला आवडे. व्यवसायवृद्धीतून होणारा धनसंचय अल्पकाळात त्यांना मालदार बनवीत असे. त्यांचा हा आवाका स्थानिक मराठा जनतेला अचंबित करीत असे. अशा प्रकारे सावकार व सरकार यांच्यामध्ये गरीब जनता भरडली जात असताना सुशिक्षित तरुण मात्र सरकारच्या धोरणांना पाठिंबा देताना दिसतो.

**सरकारचे करविषयक नविन धोरण**

सावकारकीचे उच्चाटन करुन सरकारने आपले करविषयक नवे धोरण आखले व ते यशस्वीपणे राबवले. धान्य पुरेसे येऊनसुध्दा शेतकरी बेजारच राहातो. कापणीच्या वेळीच सरकारी पट्टीची मागणी येते. "सरकार धान्यरुपाने कर घेणार नाही म्हणून ते धान्य मारवाड्यास कमी भावात द्यावे लागते, किंवा कर्ज घ्यावे लागते. कर्जाचे व्याज कायम डोक्यावर बसते. इंग्रज सरकारने धान्यरुपाने कर घेऊन त्याचा साठा करावा."[18] एखादे वर्षी दुष्काळ पडून धान्याचे दर वाढू लागले तर तेच धान्य खुल्या बाजारात विकून किंमतीवर नियंत्रण राखावे. यात सरकार व रयत दोघांचे कल्याण आहे. शेतकऱ्यांना पारंपारिक पध्दतीने धान्यरुपाने कर भरण्याची सवय झाली होती. सरकारला रोख पैशाच्या स्वरुपात भरावा लागणारा कर अद्यापी अंगवळणी पडला नव्हता.

"प्रत्येक दुकानदाराने तीन महिन्यांनी सरकारास कर दिला पाहिजे असा ठराव झाला. १५०० व्यापाऱ्यांनी त्याविरुध्द अर्जी दिलेली आहे. वसूल तहकूब करुन कायदा

रद्द करण्याची विनंती केली. नेटिवांप्रमाणेच युरोपियनांसही हा कायदा अन्यायी व जुलमासारखा दिसतो."[19] सरकारने करपध्दती निश्चित केल्यामुळे व्यापाऱ्यांनी बंडखोरी केली. पण सरकारने करपध्दत समजण्यासाठी जनतेला वेळ दिलेला दिसतो.

"इंग्रज सरकारने कापसाच्या निर्यातीवरील जकात रद्द केली होती. जेणेकरुन कापसाचे पीक या देशात अधिक होऊ शकेल. कापूस साफ करण्याचे यंत्रही इंग्लंडहून आणले जाईल. ही सर्व तरतुद भारतातून मुबलक कच्चा माल उपलब्ध व्हावा अशी सरकारची योजना होती."[20] इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीसाठी लागणारा कच्चा माल पुरवणारी भारत ही हक्काची बाजारपेठ होती.

"बांधकाम व्यवसायात प्रगती होण्यासाठी सरकाने 'इकॉनॉमिक्स इन्स्टीट्यूशन' ही मंडळ स्थापन केले. सर अर्स्किन पेरी यांनी मुख्य सहभाग घेतला होता. टाकसाळ, गोदी, आगबोट, रेल्वे, सुती कापड, यांची यंत्रे विलायतेत होतात. तसे या देशातही झाले पाहिजे."[21] भारतातील आधुनिक यंत्रयुगास सुरुवात झाली. येथून भरपूर कच्चा माल उपलब्ध व्हावा हा सरकारचा हेतू सफल होऊ लागला.

"सुरत येथे सरकारने जुनी मापे वापरण्यास बंदी केली. परंतु लोकांनी गडबड केली म्हणून त्यांना जुनी मापे वापरण्यास पुन्हा परवानगी द्यावी लागली."[22] औद्योगीकरण सुरु झाले तरी लोक पारंपारिकता सोडायला तयार नसत.

"इंग्रजी 'खुर्दा' आणि 'शिवराई खुर्दा' यांचा भाव सारखाच होता. शिवराई नाणे पारखून घ्यावे लागे. वजन तोलून पहावे लागे. त्यावरील दोन रेघांच्या योगाने त्यास 'दुदांडी' नाणे म्हणत. चिरा व भेगा पडल्या. तर हे नाणे अगदी निरुपयोगी होते असे. त्यामुळे शिवराई कोणीही पारखूनच घेत. इंग्रजी नाणे सुबक होते."[23] त्यावरच्या आकृती व हरणे सुबक होती. सराफ लोक त्यात लबाडी करु शकत नसत. समुद्रशिक्का म्हणजे कवड्यांची तर गरजच राहिली नाही. रुपयांचा खुर्दा 'पै'मध्ये घेतला जाऊ लागला. ब्रिटीशांनी करयोजना राबवली त्याच बरोबर भारतीय नाणी जी ओबड-धोबड होती ती रद्दबातल ठरवली. लोकांनी देखील त्याची सुबकता मान्य केली.

**स्थलांतरण**

अहमदनगरमध्ये हातमात्र, धान्यबाजार, भांडी बनवणे इत्यादी पारंपरिक व्यवसाय होते. या व्यवसायात राजस्थान, गुजरातच्या दुष्काळग्रस्त भागातून अनेक कुटुंबे येऊन स्थिरावली. मुळची व्यापारी प्रवृत्तीची ही मंडळी कापड बाजारात मध्यवस्तीत राहून व्यवसाय करु लागली. त्यांच्या व्यापारी कौशल्यामुळे अहमदनगरच्या बाजाराची भरभराट व्हायला सुरुवात झाली. "अहमदनगरच्या मध्यवस्तीतील अरुंद जुना कापड बाजार, गंज बाजार, गुजराथी गल्ली व गुजरगल्ली या भागात गुजर समाजाची घरे व मंदिरे होती. तो भाग अहमदनगरच्या आद्य व्यापारी वर्गातील एक आहे. अहमदनगरच्या बाजारपेठेत व्यवसाय करणारा हा समाज अहमदनगरच्या हातमाग सणगांच्या (साडी) गुजरीकडे (दलाली) वळला."[24] कारण तो अहमदनगरचा पारंपारिक व्यवसाय होता. येथील आपले स्थान बळकट करण्यासाठी स्थानिक व्यवसायांचा आधार घेणे त्यांना भाग होते.

"राजस्थानच्या 'मारवाड' नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागात पाली जिल्हा आहे. तेथील 'गुंदेशा' गावाहून दीडशे वर्षापूर्वी चरितार्थासाठी अहमदनगर जिल्ह्यात स्थलांतरित झालेल्या ओसवाल जैन कुटुंबीयांनी 'गुंदेशा' हे आडनाव धारण केले होते. परंतु स्थानिक लोक 'गुंदेचा' असा उच्चार करू लागल्याने तेच आडनाव पुढे रुढ झाले."[25] या कुटुंबातील काही लोक व्यापार उदिमासाठी दुष्काळी ग्रामीण भागात स्थायिक झाले तर काही कुटुंबे इतर मारवाडी समाज बांधवांबरोबर नगर शहरात ख्रिस्त गल्ली व नवीपेठ या मध्यवस्तीत राहू लागले. व्यापार-धंद्यात जम बसू लागल्यावर त्यांनी शहरातील उपलब्ध जुनी घरे, वाडे, बखळ व जागा विकत घेऊन तेथे नवी घरे अथवा दुकाने बांधली. ही प्रक्रिया दीर्घकाळ चालू आहे.

राजस्थानातील मारवाड भागातून पेशवाईच्या उत्तर काळात स्थलांतरित होऊ लागलेल्या मारवाडी समाजात 'हिंदू माहेश्वरी' व 'जैन ओसवाल' कुटुंबाचा समावेश होता.त्यातील "मुथा हे जैन ओसवाल कुटुंब होते. 'मुथा' या शब्दाची उत्पत्ती 'मेहता'

नावापासून झाली. मेहता म्हणजे लिखाण काम करणारे लोक."[26] त्यांच्यातही तीन प्रकार, पहिले 'झुंबर मुथा' हे कोषाध्यक्ष. दुसरे 'भंडारी मुथा' हे भांडारपाल म्हणजे 'गोडावून किपर', तिसरे 'धुपिया मुथा' हे जमाखर्च लिहिणारे अशी विभागणी केली असे.

'गांधी' कुटुंब मुळचे राजस्थानातील पश्चिम रेल्वेच्या फालना जंक्शन जवळील 'सांडीया' हे त्यांचे मुळचे गाव होते. मारवाडच्या मुलखाला दुष्काळ तर पाचवीलाच पुजलेला होता. वैश्य समाजात असलेल्या व्यापारी वृत्तीची बीजे अंकुरली तरी ती वाढण्यास व फोफावण्यास फारशी संधी नव्हती. मारवाडी समाज ती संधी मिळवण्यासाठी राजस्थानातून बाहेर पडू लागला."[27] हिंदुस्थानच्या विविध प्रांतात तो स्थलांतरित होऊन विखरत गेला.

मूळ सोनगिरी किल्ल्यावर सैन्यात लढवय्या असलेल्या रजपूत क्षत्रिय कुटुंबाची पुढे मोगल शासकांकडून होणाऱ्या जुलमाने ससेहोलपट झाली. "वारंवार तेथे पडणाऱ्या दुष्काळाची वर्णने आजही समाजात उत्सवप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या लोकगीतातून ऐकायला मिळतात. त्यांचेही संकलन प्रा.रतनलाल यांनी शालेय जीवनातच करून ठेवले होते."[28] 'छपन्या काळ पाहू मत आईजे' (असा विपन्नकाळ पुन्हा कधीही परत येऊ नये) अशी ती वर्णने आहेत.

पुढे मोगली अत्याचाराला कंटाळून जालोरची ही क्षत्रिय कुटुंबे जोधपूर संस्थानात महाराजांच्या आश्रयाला गेली. तेथे काम मागू लागली. त्यावेळी "महाराजांना घोड्यासाठी चामड्याचे जीन(खोगीर) बनवून घ्यायचे होते. ते उत्तम बनविणाऱ्याला पाच गावांचा इनाम जाहिर झाला. ते उत्तम प्रकारे बनवून दिल्याबद्दल सोनग्रांच्या पूर्वजांना हे इनाम मिळाले."[29] नंतरच्या पिढ्यात चामड्याचे जोडे व कलाकुसरीच्या वस्तू बनविण्याचा व्यवसाय सुरु झाला. त्याचबरोबर त्यांना चर्मकार समाजातील 'मोची' जातीचे लेबलही कायमचे लागले.

राजस्थानात सन १७१७ साली मोठा दुष्काळ पडला. तेव्हा मोची समाज राजस्थानातून पुढे भारतभर विखरत गेला. हातावरचे पोट (कारागिर) असलेल्या या

समाजाला भीषण दुष्काळाचे वारंवार चटके बसत गेले. त्याकाळात एक गाव सोडून दुसऱ्या भागात जावे लागे. "अठराव्या शतकाच्या सुरुवातीला राजस्थानात भयंकर मोठा दुष्काळ पडला. गावेच्या गावे त्यात परागंदा झाली. लोक जवळच्या प्रांतात कुटुंब-कबिले घेऊन जाऊ लागले. लोकांना झाड-पाला खाण्याची वेळ आली."[30] लोक नेसत्या वस्त्रानिशी माळवामार्गे राजस्थानाबाहेर पडले. काही पायी निघालेले कबिले महाराष्ट्राच्या दिशेने मजल-दरमजल करीत राहिले. या कुटुंबात काही मोची समाजातील कुटुंबे वऱ्हाड-खानदेशात गेली. अहमदनगरला गंज बाजारात काही कुटुंबे राहू लागली.

**अहमदनगर प्रातांतील दुष्काळाचे स्वरुप**

पाचशे वर्षाच्या काळात अहमदनगरमध्ये एकूण बारा मोठे दुष्काळ पडले. अहमदनगरची ओळख दुष्काळग्रस्त जिल्हा अशीच आजही आहे. दुष्काळामुळे येथील समाजजीवन अत्यंत काटक आणि सहनशील बनलेले आहे. ज्ञानोदयातील नोंदींवरुन दुष्काळाला मूळ देवाचा कोप व ब्रिटीशांचे आगमन हे समजले जात असे. दुष्काळीची ह्दयद्रावक वर्णने पुढे दिली आहेत.

अहमदनगर येथे सन १८४५ साली पाऊस कमी झाला. लोक गावे सोडीत होती. ज्वारीचा भाव रुपयास ३ पायलीवर गेला. पशूही खाणार नाहीत असे धान्य गोरगरीब जादा किंमत देऊन खात होते. उधारी बुडत होती. माणसांच्या पापामुळेच पाऊस कमी होत आहे. "जतीच्या योगाने पाऊस पडत नाही .अशी या लोकांची समजूत असे. पुढारी मिळाला असता तर त्यांनी सगळ्या जतींना ठार मारले असते. मारवाड्याच्या घरात भरपूर धान्य आहे, अशी समजूत झाल्याने ते व्यापाऱ्यांना कोंडून ठेवत होते. बाजार लुटण्याच्या आवया उठू लागल्या. एकदा पाऊस झाला तर लोकांना वाटले की, जती मेला. देवाविषयी यांचे विचार अगदी अयोग्य होते. मूर्खपणा,दुर्व्यसन आणि खोटेपणा यांचे ते दास झाले होते."[31] "सन १८५३ साली नगरात पाऊस कमी झाल्यामुळे सरकारने साऱ्यामध्ये ७१०० रुपये सुट दिली होती."[32] सरकारने दुष्काळी जिल्ह्याचा अभ्यास करुन त्याचे उग्ररुप पाहून शेतसाऱ्यात सूट दिली होती.

"१८६२ साली नगर जिल्ह्यात पाऊस फार कमी झाला. रुपयास ११ शेरच गहू मिळत असे. श्रीमंत लोक धान्याचा साठा करतात. पण वास मारणारे धान्य मिळते. गरिबांना दीडवाढीने धान्य घेऊन कर्ज वाढविण्याची वेळ आली आहे. खराब धान्याने पोटात आग पडून पटकी होऊ लागली. पावसाची खात्री नसल्यामुळे धान्य कोणत्याही भावाने मिळाले, तरी घ्यावे लागते. नागपंचमीच्या जत्रेत मिठाई खपली नाही. भटजी लोकांनी अनुष्ठाने व स्वाहाकारयज्ञ सुरु केली होते."[33] पटकी थांबली, पण दुष्काळी परिस्थिती कायम होती. धान्याचा भाव ७ शेरांवर गेला. व्यापारी धान्याचे दर वाढवीत होते. पलटणीच्या लोकांनी गाड्या अडवून स्वस्तात धान्य देवविले. व्यापाऱ्यांच्याकडे धान्याचा बेसुमार संग्रह असे. पण ते विक्री करत नसत. कारण अद्याप त्यांना हवी तितकी महागाई झालेली नसायची. ते दुर्गंधीचे धान्य महाग भावात देत असत. ते खाण्याने रोगराई वाढे. मोगलाईतून धान्य आणण्यास परवानगी मिळवली पाहिजे असे लोक म्हणत. खरपड व दुष्काळ असला शाब्दिक भेद न करता दुष्काळ दूर करण्याचे उपाय सरकारने करायला पाहिजे होते. "६०-६५ वर्षांपूर्वी मोठा दुष्काळ पडला होता, तेव्हा लोकांनी माणसांची प्रेतेही खाल्ली होती. कित्येक खेडयांत आज लोक बैलांचे मांस खात होते. ब्राम्हण मात्र काळेश्वर व अमृतेश्वर यांस अभिषेक करण्यात मग्न होते."[34] एकाने पाण्याखाली बराच काळ बसण्याचे दिव्य केले. पण पाऊस आलाच नाही. "नगरच्या सभेत डायलीसाहेब, मोरोबा कानोबा, रा.केरो लक्ष्मण, खंडेराव बाळाजी, रे.बालटैन,यांनी २८०० रुपयांची मदत गोळा केली होती. त्यातून अन्नसत्र सुरु केले."[35] भिंगारात पालखीच्या जत्रेस कमी यात्रेकरु आले होते. बाजार भरगच्च भरला पण दुष्काळाने लोक त्रासलेले होते. ते काय मिठाई खाणार अर्थात काहीजण उसनी रक्कम घेऊन चैन करत. दारुचा कलगीतुराही फारसा नव्हता. दुष्काळीने लोक हवालदिल झाले होते. अन्नाला महाग झालेली जनता मौजमजेसाठी पैसा खर्च करु ईच्छित नव्हती.

"अहमदनगरच्या लोकल बोर्डाचे मेंबर जोग यांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी मृत्यूपूर्वी दहा हजार रुपये सरकारच्या स्वाधीन केले."[36] इलाखाभर सरकार दुष्काळ कामे झपाट्याने चालवत असे. दुष्काळपीडीत कामांवर ३५ लाखापेक्षा अधिक माणसे सरकारने जगवली होती. तरीही लोकांचे हाल व वनवास कमी होत नसे.

"मिशनरी लोकांनी दुष्काळाची हकीकत ख्रिस्ती देशातील लोकांस कळविली. त्यांस यांचा कळवळा येऊन त्यांनी वर्गणी जमवून इकडे पाठविली. त्यातून लोकांच्या अन्न वस्त्राची सोय केली. आठ आण्यास लुगडे व चार आण्यास चवाळे मिशनखात्याकडून मिळे."[37] "अर्धनग्न हजारो लोकांना मदत करताना जातीचा व धर्माचा भेद राखला जात नाही. या खात्याकडून गरजवंतास मदत मिळे."[38] काही दानशूर लोक आर्थिक मदत करत. सरकार या काळात विविध सरकारी कामे सुरु करुन लोकांना जगवत होते. मिशनरी मात्र दुष्काळग्रस्तांच्या अन्नवस्त्र, निवाऱ्याची गरज भागवत असे.

**अहमदनगर प्रातांतील दुष्काळी कामे**

अहमदनगर प्रातांत दुष्काळी कामे अनेक ठिकाणी उघडली होती. त्यापैकी शहराजवळ दोन होती. मार्च अखेरपर्यंत सारे रान उदास झाले होते, पाण्याचे ओहोळ आटले होते, पाखरू औषधालाही दृष्टीस पडत नसे. शिमग्याच्या सणाचा आनंद गडप झाला होता. सरकारने काढलेली कामे निदान जीव धरण्यापुरती तरी होती. पहिले काम म्हणजे शहराच्या पूर्वेस भिंगारनदी उगमाजवळ अडवून तलाव करण्याचे काम सुरू होते. या कामावर नऊ, दहा हजार लोकांच्या राहण्याची सोय तंट्या व बांबुच्या लहान लहान झोपड्या रांगेत उभारुन केली होती. त्यांच्या सोयीसाठी जवळच बाजार होता. सकाळी सात ते संध्याकाळी सहा पर्यंत काम करावे लागे. मधल्या सुट्टीत घास कुटक्याची व्यवस्था होती. लोकांना रात्रभर कँपात रहावे लागे.

"कँपाच्याजवळ कंगालखाना उभारला होता. त्यात ११४८ बालके होती. प्रत्येकास सोडतीन औसांची भाकर, थोडे वरण, चहा, चमचाभर एखादी भाजी कधी कधी मिळत होती. मुले दिवसभर कोंडवाड्यात व रात्री आई बापाकडे रहात होती.

संध्याकाळी आपल्या आयांचा कळप रानातून येताना पाहून उभयपक्षी मेंढ्या व कोकरे यांचा जसा एकच आवाज होतो तसा गोंधळ, गोंगाट या आयालेकरांचा पाहून डोळ्याच्या पापण्या ओल्या होत."[39] याच कंगालखाण्यात अशक्त, रोडकी, म्हातारी कोतारी १९४ माणसे होती. त्यांना मुलांच्या दुप्पट अन्न मिळत होते. दवाखान्याची सोय - डॉ. बसलिंगाप्पा हे ख्रिस्ती डॉक्टर २३३ रुग्णांची सुश्रुशा करीत होते.

"वारुळवाडीचे दुष्काळी काम महत्वपूर्ण होते. तेथे पाच हजार माणसे खडी फोडण्याचे काम करत होते. राहण्याची व्यवस्था कापूरवाडी कँपात केली होती. खडी फोडण्याचे काम मेहनतीचे होते. एका पुरुषाने दिवसातून १२, एका स्त्रिने सहा, तर एका मुलाने तीन टोपल्या खडी फोडली पाहिजे. सहा दिवसांचे वेतन पुरुषाला साडेतेरा आणे, एका स्त्रिला सव्वा दहा आणे, एका मुलाला सव्वा आठ आणे मिळत असे. पहारीने दगड फोडणाऱ्यास तीन आणे व दगड वाहणाऱ्यास दोन आणे रोज मिळत होता. येथे कंगालखाना होता पण दवाखाना नव्हता."[40] कडक उन्हे होती पण दुपारच्या विसाव्यासाठी उन्हाळसावली नव्हती. वेतनही महागाईच्या तुलनेत अत्यल्प होते. सर्वात महत्वाचे म्हणजे कोंडवाड्यातील मुलांना करमणुकीसाठी जनावरांप्रमाणे ओरडायास लावत. त्या ऐवजी काहीतरी शिक्षण दिले तर दुधात साखर पडेल.

अहमदनगर प्रातांत दुष्काळ कामावरील मजुरांकडून विहिरी खणण्याच्या कामाकरिता २२००० रुपये सरकारने मंजुर केले. पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याच्या सुधारणेसाठी ५००० रु. मंजूर केले होते.

**इलाख्यातील दुष्काळासाठी मंजुर झालेल्या रकमा**

"अहमदनगर जिल्ह्यातील रिलीफ कामांना जोडलेल्या स्वयंपाकाकरिता ५०००० रु. सोलापूरसाठी, २०००० रु. बेळगावसाठी, १०००० रु. अहमदनगर जिल्ह्यातील निराश्रित लोकांना डोल देण्याकरिता ३५००० रु. विजापूर जिल्ह्यात डोल देण्याकरिता ५०० रु. सरकारी मदत मिळाली होती."[41] अहमदनगर जिल्ह्यात नविन रिलीफकामे सुरु

करण्यासाठी ज्या ज्या जमिनी घ्यावयाच्या आहेत त्यासाठी तीन विशेष मामलेदार, पंधरा सर्कल इन्स्पेक्टर्स, कारकून, शिपायांना सरकारने मंजुरी दिली.

दुष्काळाने अत्यंत उग्र स्वरुप धारण केले होते. पूर्वी प्लेग व आता कॉलराच्या साथीने लोक अन्न पाणी, दवादारु अभावी मरुन पडत होती. सरकारने मिशनऱ्यांनी आपापल्या पध्दतीने गरीब, श्रीमंत, उच्चनीच हा भेदभाव न ठेवता रिलीफ कँप व दुष्काळी कामे जिल्हाभर सुरु केली होती. "अमेरिकेचे 'ख्रिश्चन हेरल्ड' पत्राचे मालक व लेखक डॉ. लुई क्लॉप्स अहमदनगरला दुष्काळाचे स्वरूप समजून घेण्यासाठी आले होते."[42] आपल्या लेखणीव्दारे त्यांनी दोन दिवसात पाच लाख रुपयांची मदत हिंदुस्थानला केली होती. मिशनऱ्यांनी ज्या विविध शाळांच्या ठिकाणी जिल्हाभरातील दुष्काळी मुलांची सोय केली होती ती ठिकाणे पाहून मिशनऱ्यांच्या दुष्काळी कामांची मनापासून स्तुती केली.

**मिशनऱ्यांनी केलेली दुष्काळी कामे**

राहुरी, वडाळा, कोळगाव, भिंगार, जेऊर, डोंगरगण इ. दुष्काळी खेड्यातून मुले नगरला आणली होती. जुन्या बाजारात निराश्रित उच्च कुलाच्या बायांसाठी एक सदन उघडले होते. डॉ.ह्यूम यांनी आपल्या जुन्या कापड बाजारातील मुलींच्या शाळेतील विद्यार्थीनींना मोफत धान्य वाटप सुरु केले होते. साळी लोकांकरिता लुगडी विणण्याचे रिलीफ काम सुरु केले होते. शेकडो साळी समाजाच्या स्त्री पुरुषांच्या वतीने शाहुराव मोडक यांनी अमेरिकेतील ख्रिस्ती लोकांचे आभार मानले. डॉ.लुई क्लॉप्स यांनी साळी लोकांनी त्यांचा सत्कार करु नये म्हणून साळींच्या रिलीफ कामाला शभंर रुपये बक्षिस दिले होते.

वर्ष संपले तरी दुष्काळाविषयी समाधानकारक वर्तमान नव्हते. तीन वर्षे प्लेगने या शहाराची अनेक रितींनी मोडतोड केली होती. प्लेगचे स्वरुप बरेचसे सौम्य होते. उंदीर फारसे मरताना दिसत नसत. पण शहरात भिकाऱ्यांचा जो सुळसुळाट झाला होता त्यातील अनेक भिकारी मरताना दिसत होते. खानेसुमारीत मरणाऱ्यांमध्ये प्लेगने मरणारे

रहिवासी व मरणारे भिकारी वेगवेगळे दाखवावेत अशी शहरवासी यांची अपेक्षा होती. १९०० हे साल नगरवासीयांना अत्यंत दुर्देवी ठरले. हजारो लोकांची अन्नान्न दशा झाली, अन्नसाठी घरेदारे सोडावी लागली, कामासाठी सैरावैरा हिंडावे लागले, ठिकठिकाणी अशक्त, आजारी, केविलवाणी, अर्धनग्न माणसे दिसू लागल्याने शहरास अवकळा आली होती.

"सरकारने दुष्काळी कामे सुरु केली होती. परंतु तेथे नेमलेले अधिकारी चांगल्या अब्रूची व परोपकारी नसल्याने दुष्काळात लोक तेरावा महिना भोगत होते. पिण्याच्या पाण्याअभावी लोक चहुकडे फार दिलगीर होती. सरकारने अर्टिशन विहिरी खनण्याचा विचार सुरु केला होता."[43] सुरेगाव येथिल दुष्काळ कामावरील सरकारी अधिकाऱ्यांनी खोटी हजेरी बुके तयार करुन खोटी नावे दडपून सरासरी ९७० रु. स्वाहा केले. प्रत्येकाच्या वाट्यास २०, ४०, ८० रु. अशा प्रमाणात रकमा आल्या. अहमदनगरच्या सेशन कोर्टाने मुख्य आरोपीस १० वर्षे कैद व तीन हजार रुपये दंड केला. या निकालावरुन लोकांस जागृत व सावध राहण्याचा दाखला मिळाला.

"नगर, नेवासे, शेवगाव ह्या तालुक्यात डिस्ट्रिक्ट फॅमीन रिलीफ कमिटीने ज्यांची वीस एकरापेक्षा कमी जमीन आहे, अशा गरीब शेतकऱ्यांना एक दिवसापुरते बैल व बीयाणे फुकट देण्याची व्यवस्था केली होती."[44] "अहमदनगरच्या डिस्ट्रिक्ट फॉर्मन रिलीफ कमिटीकडून जिल्ह्यातील ५२ गावात सुमारे २७०० एकर जमिनीची लागवड करण्यासाठी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यास बियाणे, बैल व रोख अशी मदत केली होती." या कमिटीने २७०० जनावरांचे दुष्काळाच्या काळात संगोपन करुन ती त्यांच्या मालकांना परत दिली. कमिटीजवळ ७०००रु. शिल्लक होते."[45] अहमदनगर जिल्ह्यातील दुष्काळामुळे चारापाण्याअभावी मरणाऱ्या २०० गुरांना स्वखर्चाने पोसण्याची व दुष्काळ संपल्यावर परत मालकास देण्याची मोहिम येथिल प्रसिध्द गृहस्थ आप्पाजी गणेश दांडेकर यांनी घेतली होती.

"दुष्काळ पीडितांना मदत करण्यासाठी सरकार काळजी घेत होते पण अनेक दातेही तयार होत असत. समाजसेवा करणे हे व्रत समजले जात असे."[46] अहमदनगरला दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी "अहमदनगर आणा दुष्काळ फंड" ही योजना सुरु झाली होती. पुणे येथील स्वयंसेवकांनी घरोघर फिरुन नगरच्या दुष्काळ फंडासाठी १५०० रु. जमविले होते. तर मुंबईने १५३२१ रु., दिल्ली येथिल पीपल्स ट्रस्ट बोर्डाने २५००० रु. दिले."[47] स्वयंसेवक स्वेच्छेने फिरुन फंड गोळा करत. तो गरजूंपर्यंत पोचवून मानवतेचे दर्शन घडवत होते. प्रत्येकाने आपला खारीचा वाटा उचलला होता.

अहमदनगरास दुष्काळाने हाहाकार उडाला होता. ख्रिस्ती बांधवांनी दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी 'ज्ञानोदय फंड' नावाचा स्वतंत्र फंड उभारला होता. कपडे, धान्य, पैसे स्विकारुन ते डिस्ट्रिक्ट फॅमिन रिलीफ कमिटीच्या हवाली करुन पाठविणाऱ्यास पावती पाठवून त्याचे नाव ज्ञानोदयात प्रसिध्द करण्याची हमी या बांधवांनी दिली होती.

१९१३ साली जनावरांच्या रक्षणासाठी अनाथ प्राणीरक्षक संस्था जैन समाजाच्या मंडळींनी स्थापन केली होती. त्याव्दारे जिल्ह्यातील सर्व जनावरांच्या पालन पोषणाची जबाबदारी या संस्थेने उचलली होती.

डिस्ट्रिक्ट फॅमिन रिलीफ कमिटीचे अध्यक्ष काकासाहेब मिरीकर होते. एन.व्ही. काथवटे उपाध्यक्ष तर जी.के. चितळे चेअरमन होते. सर्व जातीधर्मांचे माणसे या कमिटीचे सभासद होते.

जवळपास दहा वर्षे नगरास दुष्काळाने ग्रासले होते. १९११, १९१२ साली जिल्ह्यात मिळून सात इंच पाऊस झाला. "सरकारी रिपोर्टप्रमाणे एक लाख गुरे मृत्यूमुखी पडली, खेडी ओस पडली, माणसे अन्न मिळेल तिकडे घरेदारे सोडून निघून गेली. जे जाऊ शकत नाहीत त्यांची अन्नान्न दशा झाली होती. रस्तोरस्ती प्रेते पडलेली दिसत होती. लहान मुले आयांना खायला मागतील म्हणून दिवसभर अफूच्या गुंगीत ठेवत होत्या. साऱ्या दुनियेची थंडी नगरवर येऊन पडली होती. म्हाताऱ्यांच्या अंगावर केवळ लंगोट असे, त्यातच

हिवतापाने कहर केला होता. प्राणीरक्षणासाठी पांजरपोळवर वारेमाप खर्च होत असल्याने इंदुप्रकाश व केसरीतून टीका झाली."[48] माणसे अन्नावाचून तडफडत मरत असताना जनावरे वाचवण्याची धडपड अत्यंत केविलवाणी दिसत होती.

अहमदनगर येथिल 'आणाफंड' - नारायणराव मिरीकर, राजहंस हेडमास्तर, डावरे व रे. टिळक यांच्या सहींची हस्तपत्रके शहरभर वाटण्यात येऊन एक आणा दुष्काळग्रस्तांसाठी द्यावा अशी घोषणा करण्यात आली. फंड जमविण्याचे काम व्यवस्थित होण्यासाठी शहराचे बारा वॉर्डांवर बारा मेंबरांची नेमणूक केली. त्यांनी तेथे सकाळीच फंड गोळा करण्यास उत्साहाने सुरुवात केली. या स्वयंसेवकात रे.टिळक, चंदावरकर, मुनसी अहमद, राजहंस हेडमास्तर, रंगनाथ पंत ठाकूर, कनकमल दलीचंद असे व्यापारी ऋषी, आपटे, देशपांडे हे शिक्षक या सर्वांच्या हाताखाली सुमारे १५० विद्यार्थ्यांची सेना त्यांत हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती विद्यार्थ्यी सेना होती. एका दिवसात पाचशे रु. रक्कम जमा झाली होती."[49] नगरच्या रहिवाश्यांनी आपले कर्तव्य ओळखून यथाशक्ती मदत केली. आणाफंडाची रक्कम जिल्हा दुष्काळ फंडाच्या चिटणीसाकडे सुपूर्द केली. हे मानवतावादी कार्य करुन नगरकरांनी एकजुटीचे दर्शन घडवले होते.

"आर्य, हो श्री आज्ञेप्रमाणे श्रीसत्यांवाव्रत, पुजन, पुराण, चंडीहोम ही प्रत्येकी सहस्त्राप्रमाणे करण्याचे ठरले असून ब्राम्हणभोज फार मोठे होणार होते. ही कामे कोल्हापुरात सुरु करुन गावोगाव होणार होती. हे केल्यापासून प्लेग व दुष्काळाचा नाश होऊन सर्वांचे कल्याण होईल अशा आशयाची जाहिरात 'ज्ञानप्रकाश' या वर्तमानपत्रात आली होती. "१९१३ साली नगर जिल्हा दुष्काळाच्या झळांनी होरपळत असताना अहमदनगर येथे गोरगरिबांना मध्यान्ह काल म्हणजे प्रलयकाल झाला असता येथल्या एका गणपतीला घाम आल्याचे निमित्त करुन सहस्त्र ब्राम्हण भोजनाचा समारंभ करण्यात आला होता."[50] एका विशिष्ट जातीच्या भिक्षुकांची चंगळ आणि लोकांच्या द्रव्याचा अपव्यय होत असे.

"नगर जिल्ह्यात फड्या निवडुंग कडबीबरोबर देण्याची चाल होती. १९१२ च्या दुष्काळात या निवडुंगाच्या चाऱ्यामुळे अनेक जनावरे वाचली. त्या चाऱ्यावर ३४००० हून जास्त जनावरे पोसली जात. त्यांचे आरोग्यही उत्तम रहात असे."[51] अनेक लोक निवडुंगाची बोंडे खाऊन दुष्काळात तग धरुन होती.

१९२१ साली अहमदनगर जिल्हा पुन्हा एकदा दुष्काळाच्या तावडीत सापडला. दुष्काळाचे स्वरुप दिवसेंदिवस उग्रेतर होत चालले होते. खेड्यापाड्यातील लोक आपली घरेदारे सोडून जीव वाचविण्यासाठी मुंबईसारख्या ठिकाणी जाऊ लागली. "चारा टंचाईमुळे कैक जनावरे दररोज कसाईखान्यात जात. आंधळे, पांगळे, अशक्त, म्हातारे दारोदार भिक्षा मागत."[52] सरकारने अन्नछत्रे उघडली. ज्या लोकांना 'भिक्षेपेक्षा मरण बरे' असे वाटते त्या लोकांकरिता 'अहमदनगर दुष्काळ निवारण साह्यकारी मंडळाने' स्वयंसेवक नेमून त्यांस मदत पोहचविण्याची योजना होती.

अहमदनगर मधील दुष्काळ निवारणाची कार्य सरकार आणि मिशनरी यांनी हातात हात घालवून केल. सरकारने पुढाऱ्यांच्या सहकार्याने मोठी रक्कम उभी केली. दुष्काळी परिस्थिती दुर झाल्यावर शिल्लक रकमेचा विनियोग योग्य पध्दतीने होण्यासाठी व दुष्काळात दिलेल्या कर्जाची वसूली करण्यासाठी 'जिल्हा दुष्काळ निवारण समिती' नेमण्यात आली. दुष्काळाच्या वेळी जिल्ह्यातील प्रमुख नागरिकांची कलेक्टरच्या अध्यक्षतेखाली सभा होऊन समिती स्थापन झाली. त्यामार्फत दुष्काळ निवारणाचे कार्य सुरु राहिले.

**नगरी लोकजीवन**

दिल्ली गेटमधून आत शिरल्यावर दोन्ही बाजूला देशमुखाचे पन्नास दगड माती विटांनी बांधलेले वाडे असत. त्याची वारंवार दुरुस्ती करावी लागे. त्यामुळे वाड्याच्या मालकाचा सुतार गंवडी कारागिराशी पिढ्यानपिढ्या संबंध चालू राहत असे.

तटबंदीच्या आतील गल्ल्याची नावे ही त्याभागात ज्या घराण्याची अनेक कुंटुबे राहत त्याच्या अथवा एखादया प्रसिध्द कुटुंबावरुन दिलेली असत. "तटबंदीतील खरे नगर

गल्ल्यां-बोळातच नांदत होते. गल्ल्याचे चहरे मोहरे, स्वच्छता, शांतता, अथवा कलह हे तेथे राहणाऱ्या कुंटुबाच्या आचार-विचारांचे प्रतिबंब असे."[53]

"शहरांतील अनेक प्रतिष्ठीत घराण्याच्या शेत जमिनी शहराबाहेर असत. अनेक कुंटुबे घरी बैल, बारदाणा घेऊन शेती करत."[54]

परंतु शिक्षणाची संधी घेत सरकारी, खाजगी नोकऱ्या अथवा वकीलीसारख्या व्यवसायात अनेक जण जाऊ लागल्याने पुढील पिढयात जमिनीचे होत असलेले विभाजन विचारात घेता शेतीतून बाहेर पडून मध्यमवर्गीय जीवनाचा स्वीकार अनेकांनी केला.

अहमदनगरला पूर्वीपासून सार्वजनिक समारंभातील व लग्नमुंजीसारख्या खासगी समारंभातील जेवणावळीतील स्वयंपाकांची कंत्राटे खासगी आचाऱ्यांकडे सोपविण्याची प्रथा चालत आली होती. आचारी व त्याच्या हाताखालचे सहाय्यक तसेच पाणाडी, वाढपी व भांडी घासणाऱ्या मोलकरणी अशी जेवणावळीची व्यवस्था विभागलेली असे. "आचाऱ्याची अन्न करणावळ शेर,पायली,मण अशा वजनाच्या हिशोबात असे. त्यात बुंदीचे लाडू, शिरा, जिलबी, वाग्यांची अथवा बटाट्याची भाजी, कोशिंबीर, भात,मठ्ठा (ताक), कढी, लोणची, पापड, कुर्डया असे साधारण बेत असत. ग्रामीण भागातील वऱ्हाड असले तर लापशी, तेलच्या, गुळवणी असा सर्वसाधारण बेत असे."[55] पूर्वी मारवाडी पद्धतीच्या मिठाया हलवाई तयार करून देत. १९६० नंतर काही राजस्थानहून आलेले आचारी (महाराज) आचारी व्यवसायात आले.दुष्काळग्रस्त नगर शहारांत एकीकडे पंचपक्वानांच्या पंगती उठत तर दुसरीकडे सामान्य जनता अन्नवाचून मरत होती. हे विदारक चित्र वि.द.घाटे यांनी सांगितले.

"या काळात घरोघर तांब्या-पितळयाची भांडी वापरली जात. स्टेनलेस स्टीलमध्ये लोखंड असल्याने त्याचा पुढे अनेक वर्षे ग्राहकांनी स्वीकार केला नाही."[56] अर्थात स्टेनलेस स्टीलचा भाव तेव्हा पितळाच्या दुप्पट व तांब्याच्या तिप्पट होता. पण त्याला कल्हई करावी लागत नाही, हे ग्राहकांना पटत नसे. आज भावाची स्थिती त्या वेळच्या

उलट झाली असून आता तांब्या-पितळयाची भांडी वापरातून पार बाहेर गेली होते. १९५४ मध्ये स्टेनलेस स्टीलचा भाव ५ रुपये रत्तल (पौंड अथवा अर्धा किलोला) होता. त्यावेळी मोठे ताट ७ रुपयाला, वाटी १ रुपयाला, फुलपात्रे २ रुपयात व लोटी ८ रुपयाला मिळे.

"१९३० च्या सुमारास रामचंद्रखुंटावर बांधलेली एक खिडकी व एक दार असणारी कमी उंचीची घरे असत ही घरे शेणामातीने सारविण्याची असत."[57] त्याकाळात या घरांना १० ते १२ रु. घर भाडे असे.दगडी घरे बांधण्यासाठी घरातील स्त्रियांचे दागिने मोडावे लागत. नातलगाकडून कर्ज घ्यावे लागे.

**रेल्वेने व्यापाराला गती**

१८५३ मध्ये भारतात रेल्वे सुरु झाली. १६ एप्रिल १८५३ पासून मुंबई-ठाणे लोहमार्गावर आगगाडी धावू लागली. आशिया खंडातील ही पहिली रेल्वे होती. लोहमार्गांचे जाळे हळूहळू भारतभर पसरत गेले. १९०५ सालापर्यंत सुमारे ३५० कोटी रुपये खर्च करुन २८ हजार मैल लोहमार्ग बांधण्यात आला. रेल्वेचा, दळणवळण व संपर्काच्या आधुनिक साधनांचा उपयोग भारतीय व्यापार उद्योगांपेक्षा ब्रिटीशांच्या व्यापार उद्योगांना अधिक झाला. कारण ब्रिटीश माल भारताच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचू लागला. शासकीय संरक्षणाचा लाभ उठवत स्थानिक उद्योगधंद्यांना स्पर्धेत गारद करु लागला. यंत्रनिर्मित मालाशी हस्तोद्योग स्पर्धा करु शकला नाही. या दृष्टीने 'दुसऱ्याच्या पत्नीला सजवणे' असे रेल्वे विस्ताराबाबतचे लोकमान्य टिळकांचे उद्‌गार महत्वाचे वाटतात. बदलत्या परिस्थितीत गावाची बंदिस्तता संपून त्यांची स्वयंपूर्णता ढासळू लागली. १८७८ साली नगरहून जाणारी दौंड-मनमाड रेल्वे सुरु झाल्यामुळे नगरच्या आर्थिक व सामाजिक जीवनात बदल घडवून येण्यास सुरुवात झाली.

"विलायतेत लोखंडी रस्ते तयार झाले. त्यावरुन चालणाऱ्या वाफेच्या गाडया अतिशय जलद जातात. व्यापाराची मोठी सोय झाली.घोडयाची गाडी त्याच्या एका बारांश हिस्सा चालते.रेल्वेने १५ पट रहदारी वाढली आहे.४०० खंडी माल व ४०० माणसे

एवढ्यांची एका वेळी सोय होते."[58] जनावरास विश्रांती लागते. "यंत्र सतत चालू शकते. म्हणून रुळवाट कायदेशीर आहे. ३५ लाखाचे भांडवल ब्रिटिश सरकारकडून या व्यवसायात घातलेले आहे."[59] कलकत्ता सरकार यासाठी सनद देणार. तळघाटापर्यंत रेल्वे जाईल. त्यास दोन वाफेची इजिने असतील.

"इंग्लंडमध्ये रेल्वेची वाढ होणार.सरकारने जकात कमी केल्याने मीठ निर्यात होऊ शकेल."[60] लोखंडी रस्ते पाहून लोकांना आश्चर्य वाटत असे. कोणतेही जनावर नसताना ही गाडी चालते कशी याविषयी चर्चा होत असे. लोक रेल्वेला "चाक्या म्हसोबा" म्हणत.

लोखंडी रस्ते : मिशनाने 'लोखंडी रस्ते' हे पुस्तक छापले. "बैलगाडीने माल आणण्यामध्ये खरच व विलंब फार असतो. लोखंडी रस्त्याने वाहतूक केल्यास विकाऊ माल सुरक्षितपणे व कमी वेळात शहरात येईल. कल्याणपासून माळशेज घाटाने रस्ता कसा होईल, याचा नकाशाही छापला होता. ज्या दिवशी लोखंडी रस्ता सुरु होईल, तो सुदिन"[61] असे मिशनऱ्यांना वाटत होते, कारण या देशातील गरीबी दुर करण्याचा एक उपाय म्हणून रेल्वेकडे ते पाहत असत.

"ठंकारीहून बडोदा आणि रतलामपर्यंत लोखंडी रस्ते झाले. जंबुसरचा कापूस वाहून नेण्यास याचा चांगला उपयोग झाला.व्यापाराची भरभराट झाली.[62] अशा प्रकारे रेल्वेने जीवन गतीमान केले. पण येथील जातीयता मात्र सुरुवातीच्या काळात नष्ट होऊ शकली नाही. हे पुढील विधानावरुन लक्षात येते. "वाफेच्या गाडीत भंगी लोकाना प्रवेश मिळणार नाही."[63] कल्याण ते बोरघाट लोखंडी रस्ता तयार होत होता. संपूर्ण देशात रेल्वेचे जाळे निर्माण झाले होते.

"बीड, औरंगाबाद, जालना येथे पूर्वी रेल्वेची सोय नसल्याने अहमदनगरलाच विविध ठिकाणांहून माल येत असे व येथून तो सर्वत्र जात असे. पुणे मुंबई, सोलापूर, नाशिक, मनमाड याबाजूस रस्ते झाल्याने वाहतून वाढली."[64] त्यामुळे व्यापारही वाढला. १८७८ साली दौंड-मनमाड ही अहमदनगरहून जाणारी रेल्वेलाईन सुरु झाल्याने

अहमदनगरचे औद्योगिक जीवन बदलून गेले. त्यामुळे ‘‘नगरच्या इतर व्यवसायांबारोबर धान्य व्यापार मोठ्या प्रमाणावर वाढला. पंजाबहून लाखो पोती धान्य अहमदनगरला रेल्वेने येत असत. त्यामुळे अहमदनगरच्या रेल्वे स्टेशनवरील धक्याला ‘पंजाब धक्का’ म्हणत.’’[65] रेल्वेमुळे अहमदनगरच्या धान्य व्यापाराला गती मिळाली होती. पुढे मालमोटारीव्दारे वाहतूक व्यवसाय जोरात सुरु झाल्याने नगरच्या या पारंपारिक व्यवसायाची पिछेहाट झाली.

**पारंपारिक व्यवसाय**

अहमदनगर ही ऐतिहासिक काळापासून व्यापारी पेठ होती. इ. स. २४७ या वर्षी पेरीप्लस नामक ग्रंथात गुजराथमधील भडोच व महाराष्ट्रातील अहमदनगर व पैठण या स्थळांचा उल्लेख आढळतो. अहमदनगरच्या निजामशाहीपूर्वी जुन्नर राजधानी होती. अहमदबादशहाने २८ मे १४९४ रोजी अहमदनगर शहराची स्थापना केल्यानंतर जुन्नर ऐवजी अहमदनगर हीच राजधानी झाली.

अहमदनगर शहराची प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर अहमदनगरच्या व्यापार धंद्याची भरभराट होत गेली. अहमदनगरच्या निजामशाही राज्यात परदेशाशी मालाची आयात निर्यात होत असे. अहमदनगर प्रांतातून निर्यात होणाऱ्या मालामध्ये गहू, बाजरी , कापड, डाक्क्याची मलमल प्रामुख्याने असत.

१६ व्या शतकातील मालाची वाहतूक बैलाच्या पाठीवर गोण्या चढवून लमाण किंवा चरण वंजारी या लोकांकडून होत असे. हे लमाणांचे तांडे आत्तापर्यंत रस्त्यांची किंवा आगगाडीची सोय होईपर्यंत चालू होते. पुढे सुरत हे परदेशी व्यापाराचे केंद्र झाल्यावर नगरच्या व्यापाराचे महत्व कमी झाले. व त्यामुळे गुजरातचा व्यापार वाढला. गुजराथी व्यापारी निजामशाही काळात अहमदनगरमध्ये स्थायिक झाली होती. मारवाडी समाज १५० वर्षापूर्वी अहमदनगरमध्ये आला.

या उभय व्यापाऱ्यांचा विशेषत: धान्याच्या अडतीचा धंदा असे. त्याच बरोबर कापडाचा धंदा जोरात चालत असे. गेल्या १०० वर्षापासून अहमदनगर पुढील धंद्याकरिता व व्यापाराकरिता प्रसिध्द होते. अहमदनगर भिंगारची सणंग लुगडी, धान्य, तांब्या पिताळेची भांडी, कपास, भुसार माल इत्यादी

**हातमाग व्यवसाय**

हा धंदा इ. स. १४९४ मध्ये भांगरे नावाच्या कोष्ट्याने प्रथम सुरु केला. त्यावेळच्या विणकर वर्गात साळी व पद्मसाळी विणकरांचा भरणा होता. पेशवाई मोगलांनी आरंभलेल्या दंगा-धोप्यामुळे या व्यवसायाची पिछेहाट झाली. साळी समाजही अहमदनगरमधून परागंदा झाला. त्यावेळी पेशव्यांचा सुभेदार गणेश विठ्ठलने २ वर्षापर्यंत विणकरांना बिनव्याजी कर्ज देऊन नगरमध्ये पुनर्वसन केले.

अहमदनगरमध्ये हातमागाच्या व्यवसायात पुढील कुटुंबे आपला लौकिक राखून होती. अहमदनगरच्या संस्कृती संगमाचा एक मोठा घटक असलेला पद्मशाली विणकर समाज पेशवाईच्या उत्तर काळापासून नगरला स्थलांतरित होऊ लागला. "१७८० ते १७९० दरम्यान तेलंगणातील दुष्काळ, दारिद्रय व निजामी राजवटीचा जाच यापासून सुटका करून घेण्यासाठी या विणकरांनी तेव्हा हातमाग कापड उत्पादनाबद्दल प्रसिद्ध असलेल्या सोलापूर व अहमदनगरचा रस्ता धरला. वन्नम कुटुंब तेलंगणातून त्याकाळात प्रथम मानवतला स्थलांतरीत झाले. तेथे सव्वाशे वर्षापूर्वी प्लेग –कॉलराची मोठी साथ पसरली."[66] त्यामुळे ते अहमदनगरला स्थलांतरीत झाली.

"अहमदनगरला चितळे रोडजवळील नारायणराव भागवत (कोष्टी) यांचे हातमाग चालत व त्यावर नगरी लुगड्यांचे वाण (नऊवारी) विणले जात. बाहेर गल्लीतही सूत रंगवण्यासाठी व वाळविण्यासाठी लांबलचक 'ताणे-बाणे' लावले जात. नगरच्या विणकर वस्त्यात अशाच प्रकारचे दृश्य १९७० च्या दशकापर्यंत सर्वत्र दिसत असे."[67] खादीचे कापड त्या काळात मुंबईहून व आंध्रातून येत असे. ते मिलच्या

कापडापेक्षा महाग असे. मात्र त्याचे ग्राहक मर्यादित प्रमाणात असत.पण नगरला मात्र खादीचे कापड आयात करण्याची वेळ कधीच आली नाही.

येवलेकर कुटुंब मुळचे येवला (नाशिक) येथील कुकर गल्लीतील रहिवासी. "सूतसाळी" या कुळासाठी समाजातील पोटजातींच्या या कुटुंबाचा पिढीजात व्यवसाय पैठणी विणण्याचा होता. तुकारामपंत (वडील) अहमदनगरला भगवंताकडे १९२० साली आले. "बागडपट्टी व तोफखाना भागातील स्वकुळसाळी कुटुंबाच्या आडनावाच्या सात-आठ गल्ल्या होत्या. तेथे सुमारे ५०० कुटुंबे रहात. त्यांच्या आठ पोटजाती होत्या. १९७० पर्यंत इतर पोटजातीत लग्न होत नसत. पाठक, बागडे, अष्टेकर ही समाजातील प्रतिष्ठीत कुटुंबे होती."[68] स्वातंत्र्यानंतर राष्ट्रध्वजाला मागणी वाढत राहिली. जाड व तलम खादींचे पांढरे कापड घरी हातरंगणीने केशरी व गर्द हिरव्या रंगत रंगविले जाई. "मधल्या २४ आऱ्यांच्या अशोक चक्राचा रबरी शिक्का गिरीश व किरण यांनी घरीच बनविला होता."[69] १९८० पासून अशोक चक्र स्क्रीन प्रिंटींग करून छापले जाते. आता महागल्याने झेंड्यासाठी रेशमी कापड वापरले जात नाही. राष्ट्रीय सणांच्या वेळी झेंडयाची मागणी वाढत असे

इ. स. १८५० मध्ये नगर व भिंगार मिळवून एकंदर हातमागांची संख्या १३२२ होती. १८६५ साली हा धंदा तितकासा समाधानकारक नव्हता. कारण नगर जिल्ह्यातील कापसाचे भाव चढले. कापसाचे सूत काढण्यास स्थानिक कापसाचे सूत काढून ते विनले जात असे. पण सन १८७५ च्या सुमारास अमेरिकन युध्दाच्या वेळी परदेशी सूत स्वस्थ मिळवू लागल्याने या धंद्यास परत तेजी आली. मुंबईस सुताच्या गिरण्या निघाल्या व मजुरीही स्वस्थ झाली. पण १८७७ च्या दुष्काळामुळे कापूस मिळेना. म्हणून विणकरांनी आपले धंदे सोडून दिले. व ते दुष्काळी कामावर मजूर बनले.

महात्मा गांधींच्या ग्रामोद्योग व हातमागावरील कापडास स्वदेशी चळवळीमुळे प्रोत्साहन मिळाले व हातमाग व्यवसायास ऊर्जा प्राप्त झाली. पण स्वातंत्र्यानंतर हा व्यवसाय पुन्हा मृत पावला.

अहमदनगरमध्ये कापड बाजारातील मोठ्या भांडवलदार व्यापाऱ्यानी मुंबईहून तयार माल आणायला सुरुवात केली. त्यामुळे येथील हातमागाचा पारंपारिक व्यवसाय लोप पावू लागला. हेच सर्व विणकर नगर मधील कापड दुकानांमध्ये कामगार म्हणून काम करु लागले. त्यातील काही टेलरिंग, पंतग बनविणे इ. व्यवसायात स्थिरावले.

**तांब्या पितळेचा धंदा**

"विणकामाच्या खालोखाल तांब्या पितळीची भांडी तयार करण्याबद्दल फार पूर्वीपासून अहमदनगरची प्रसिध्दी आहे. हा धंदा अहमदनगरच्या बहुतेक कासार, मुसलमान, तांबटकर या समाजाध्ये प्रसिध्द आहे."[70] कासार समाजातील अनेक तरुण स्वातंत्र्यलढ्यातील सैनिकांना हत्यारे पुरवित.

**कापूस व्यवसाय**

"नगरपालिकेने १८१३ साली 'स्टुअर्ट कॉटन मार्केट' स्थापन केले. त्यात अहमदनगर जिल्ह्याबरोबर बीड, परभणी, नांदेड भागातून हैद्राबादचा जो मोगलाईचा भाग गणला जात असे, तेथे रेल्वे बरीच वर्षे नसल्यामुळे सर्व कापसाची बोजे अहमदनगर मार्केटलाच येत असत."[71] सन १८५४ मध्ये जिल्ह्याच्या दोन्हीबाजूस मुंबई, पुणे, सोलापूर व मुंबई, नाशिक, मनमाड असे रेल्वे मार्ग तयार झाल्यामुळे बैलगाडीने होणाऱ्या वाहतुकी बंद पडल्या. सन १८७८ मध्ये दौंड-मनमाड ही अहमदनगर शहरातून जाणारी रेल्वे सुरु झाल्यामुळे रेल्वेची वाहतूक वाढली. त्यामुळे जास्त मालाची आवक जावक वाढल्याने किंमती उतरल्या तरीही अहमदनगर शहराचे महत्व व्यापारीदृष्टीने वाढवून नगरपालिकेचे व कॉटन मार्केटचे जकात उत्पन्न वाढले.

"कॉटन मार्केट स्थापन झाल्यानंतर सहा जिनिंग फॅक्टरी व प्रेस उभारले गेले. तेथून जिन झालेल्या कापसाचे गठ्ठे बांधून गिरण्यांकडे रवाना होऊ लागले." त्यातच नगर जिल्ह्यातील वांबोरी, शेवगाव, पाथर्डी इत्यादी ठिकाणी कपासीच्या क्षेत्रातच जिनिंग व प्रेसींग सुरु झाल्याने नगर शहरात कापसाची आयात कमी होऊ लागली. एकेकाळी अहमदनगरमध्ये शिखरावर असलेला कापसाचा धंदा मृतवत झाला.

**तबला मर्चंट**

"अहमदनगरच्या शेकडो मैफली बाळासाहेब धुमाळांच्या तबल्यावरील साथ संगतीने सजीव झाल्या."[72] 'तबला मर्चंट' च्या व्यवसायिक अंगाने त्यांनी संगीत व भजनी श्रेत्रातील अनेकांना उत्तम गुणवत्तेचे तबले, डग्गे व मृदुंग बनवून दिले. चर्मवाद्यांची दुरुस्ती व देखभालीची खात्रीशीर सेवा ते ग्राहकांना वर्षानुवर्ष देत आहेत.

**सुतार कुल परंपरा**

गेल्या शतकातील गजाराम, शंकर, बाळाजी-रघुनाथ अशी सुतार कुलपरंपरा चालत आलेली आहे. सुतारवाड्याच्या पुढील पटांगणात लाकडी नेट (झाडाच्या खोडाची ऐरण) पुरलेले असे. "तेथे सुतार कारागीर मंडळी पारंपरिक सणंगांणी (हत्यारांनी) लाकडे कापीत व त्यापासून शेतीचे लाकडी नांगर, औते, तिफणी, फरटे, दाताळी,लाकडी, दांडे, बैलगाड्या वगैरे तयार करून देत."[73] सुतार गुरुजी व त्याचे कुटुंब पूर्वापार चालत आलेल्या सुतारकीच्या व्यवसायात गढून गेलेले असे. बारा महिने काम चालू असे. कामाच्या बदल्यात शेतकऱ्यांकडून पायलीपासून सव्वामणापर्यंत ज्वारी, बाजरीचे धान्य बलुता म्हणून मिळे.

नगरचे पारंपारिक व्यवसाय बदलत गेले. कारण नगरने नवीन जीवनशैली अंगीकारली. हातमाग व्यवसाय, कापूस व्यवसाय, वाद्य बनवण्याचा व्यवसाय इत्यादी कालबाह्य ठरु लागले. त्यातच गुजराथचे सावकार नगरमध्ये कापड विणण्याचे कारखाने काढू लागले. त्यामुळे नगरास ही पाण्यावर किंवा वाफेवर चालणारी गिरणी निघाल्यामुळे नगरचा हातमाग व्यवसाय बंद झाला. आता नगरमध्ये अनेक नवीन व्यवसाय सुरु झाले.

**आधुनिक उद्योगांचे नवे पर्व**

ब्रिटीश कालखंडात पारंपारिक उद्योगांचा ऱ्हास झाला. त्याचबरोबर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिक उद्योगधंद्याचा विकासही होऊ लागला. भारतातील उद्योगक्षेत्रात परकीय भांडवलदारांनी किफायतशीर भांडवल गुंतवणूक केली. त्यामुळे भारतीय भांडवलदारीच्या विकासात अनेक अडचणी उद्‌भवल्या. या

अडचणींवर मात करुन भारतात स्वदेशी भांडवलदारीच्या विकासाचे पर्व सुरु झाले. त्यातून राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला, आधुनिकीकरणाला व जागृतीला हातभार लागला. नवी वर्ग रचना आकार घेऊ लागली. हे सारे स्थित्यंतर कसे घडून आले त्याची चर्चा प्रस्तुत घटकात केली आहे.

"विद्यार्थ्यांना बौद्धिक शिक्षणाबरोबरच औद्योगिक शिक्षण मिळावे या हेतूने हिंद सेवा मंडळाने १९१६ साली उद्योग मंदिराची स्थापना केली."[74] विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवून जबाबदार नागरिक बनविणे हे ध्येय प्रारंभीपासून आहे.

उद्योग मंदिर म्हणजे एक आदर्श सुतार कारखाना होय. या ठिकाणी अद्यावत सुतार कामाचे व लोहारकामाचे शिक्षण दिले जाई. कारखान्यात सर्व तऱ्हेचे लाकडी व लोखंडी फर्निचर उत्तम प्रकारे तयार होत असे. शिवाय इमारतीची कामे, फिटिंग, पेंटिंग वगैरे कामे केली जात.

'दि भारत आयर्न वर्क्स' स्टेशन रोड, अहमदनगर हा कारखाना १९३८ साली स्थापन झाला होता. हा जुना लोखंडी सामानाचा कारखाना खाजगी मालकीचा होता. येथे गॅलरीचे कठडे, गोल जिने, जाळ्या, मेन व्हिल कव्हर्स इ.माल तयार होत असे. 'भारत लोखंडी नांगर' प्रसिद्ध होता."[75] लोखंडी नांगरामुळे पारंपारिक शेती गतीमान झाली.

'नेवासकर विव्हिंग मिल्स' कॉटन मार्केट, स्टेशन रोड, अहमदनगर ची स्थापना १९४८ साली झाली होती. येथे "१८ पॉवर लूम्स व ५ हॅन्ड लूम्स होत्या. येथे ३५-४० कामगार काम करून उत्तम प्रकारची लुगडी व इतर कापड तयार करीत असत."[76] घरगुती व्यवसायाला कारखान्याचे स्वरुप प्राप्त झाले. सर्वसामान्यांना रोजगार उपलब्ध झाला.

'सारडा विव्हिंग अॅन्ड ऑईल मिल्स' सावेडी रोड, अहमदनगर येथे १९४१ साली स्थापन झाला होता. नगर जिल्ह्यातील एक ज्येष्ठ कारखाना म्हणून मान्यता पावलेला होता. येथे ४७ पॉवर लूम्स व १० हन्डलूम्स होत्या. येथे उत्तम प्रकारची लुगडे तयार होत असत."[77] हा कारखाना मोठ्या तत्वावर चालवला जात असे. कापड निर्मीती व विक्री

एकाच छत्राखाली होत असल्याने मोठा लौकिक या कारखान्याने नगर जिल्ह्यात मिळवला होता. लग्नकार्याचा बस्ता बांधण्यासाठी जिल्ह्याबाहेरील लोकांच्या राहण्याची व जेवणाची सोय सारडा मंडळी करत असत. या मिल मध्ये कामगारांनी संप केला होता. यावरुन त्याच्या स्वरुपाची कल्पना येते.

'पारेख विव्हिंग मिल्स', पॉवर हाऊसजवळ या उद्योगाची स्थापना १९४२ साली जी.बी. पारेख यांनी केली. येथे ३ पॉवर लूम्स होत्या. त्यात वाढ होऊन पुढे २० पर्यंत आकडा गेला.

"'नॉव्हेल्टी विव्हिंग मिल', स्टेशन रोड, अहमदनगर हा कारखाना के.व्ही. खिस्ती यांनी सुरु केला. येथे उत्तम प्रकारच्या साड्या व पातळे तयार होत असत."[78] नगरमधील खिस्ती कुटुंबे सावकार म्हणून प्रसिध्द होती. त्यांचाच हा कारखाना होता.

"विडी कारखाने मजुरांना रोजगार मिळण्याच्या दृष्टीने हा धंदा किफायतशीर असे. शहरात व जिल्ह्यात लहान मोठ्या प्रमाणावर हा धंदा सर्वत्र चालत असे. सिन्नरचे विडी कारखाने जास्त प्रसिद्ध होते."[79] 'ठाकूर सावदेकर आणि कंपनी' हा कारखाना तेलीखुंट, अहमदनगर येथे होता. महाराष्ट्रातील नामवंत मोठ्या विडी कारखान्यांपैकी हा एक असे. अहमदनगर शाखेत सुमारे २०० कामगार काम करीत. महिन्याला येथे अंदाजे दहा लाख विडी तयार होत असे. भिकुसा यमासा क्षत्रिय यांनी १९१२ साली लहान प्रमाणावर पहिला कारखाना सिन्नर येथे काढला. त्याचा व्याप नाशिक, संगमनेर, पुणे, नगर येथपर्यंत वाढला होता. एकट्या नगर जिल्ह्यात या कारखान्याच्या १९४७ पर्यंत ९ शाखा होत्या. हातमाग व्यवसायातील अनेक कारागीर विडी तयार करण्याकडे वळाले. बहुतांश पुरुष कापड तयार करत तर स्त्रिया विड्या बनवण्याचे काम करत असत. हा नगरमधील साळी लोकांचा प्रमुख व्यवसाय बनला होता.

"राजस्थानी समाजाला मुळात व्यापारी बुद्धीची देणगी लाभल्याने नगरचा मोची समाज चामड्याच्या कारागिरीतून दुकानदारीत स्थिर होत गेला. कारागीर मंडळी 'सेठ' बनत गेली. स्थानिक मराठी व मुस्लिम समाजातील चर्मकार चपला बनवून देणे व

'घटई' (दुरुस्ती) च्या कामात कार्यरत राहिले. पुढे अहंतेच्या मानसशास्त्रानुसार व्यवसायिक उतरंडीत मोची समाज त्यातल्या त्यात आपल्या समाजचे श्रेष्ठत्व सांगू लागला. त्यातूनच एक चपलांचा व्यापारी वर्ग निर्माण होत गेला."[80] वर्णव्यवस्थेतील चर्मकार वर्ग आर्थिकदृष्ट्या दुर्बल राहिला. पण राजस्थानी चर्मकार समाज मात्र त्या तुलनेत मोठा उद्योगपती बनला. आजही नगरच्या मुख्य बाजारात राजस्थानी चर्मकारांचे मोठे प्रस्थ आढळून येते.

१९०० पासून दुष्काळाने जर्जर झालेल्या शेती व्यवसायावर शंभर टक्के अवलंबुन न रहाता लोक इतर व्यवसायांकडेही वळले. मध्यमवर्गाच्या उदयामुळे विशेषत: इंग्रजांनी आणलेल्या नोकरी संस्कृतीमुळे मध्यमवर्गाची निर्मिती झाली. त्याचबरोबर काही द्वितीयक व्यवसाय सुरु झाले. हे मोठेच परिवर्तन म्हणावे लागेल. महत्वाची बाब म्हणजे शहरात बलुतेदारीचा प्रश्नच नसल्यामुळे केशकर्तनालय, पादत्राणे विक्री, कपडे शिवणे या परंपरागत व्यवसायांनाही व्यावसायिक मूल्य प्राप्त झाले. खाद्य पदार्थांची निर्मिती, हॉटेल व्यवसाय, वाहन व्यवसाय इ. नवे उद्योग सुरु होऊन परिवर्तन झाले.

"वरील उद्योगाशिवाय खादी भंडार, पेंटर आर्टस्, आंबडी, फौंटन पेन, तपकीर, सिगरेट, माचिस, स्वादिष्ट मसाले, टायपिस्ट, गॅसबत्ती, घड्याळ, ताग, लॉन्डरी, सिमेंट, फोटो फ्रेम, रंग, मेवामिठाई, केश कर्तनालय, चप्पल व बुट विक्री, घासलेट विक्रेते, गणपती कारखानदार, चहा, मोटार रिपेरिंग, तयार कापडाचे दुकान, साबन विक्रेते, समारंभासाठी बॅण्ड, हॉटेल व विश्रांती गृहे, शिंप्याची दुकाने, सोने-चांदीची दुकाने, हार्डवेअर मर्चंट, ऑटोमोबाईल्स मर्चंटस् ॲण्ड मोटार स्पेअर पार्टस् डिलर्स, मोटार गॅरेजेस, पॅसेंजर मोटार कंपन्या, बेकरी, बिस्कीट कारखाने, पेपरमिंट व बिस्कीटचे व्यापारी, सायकलची दुकाने इ. नवनवीन व्यवसाय नगर व परिसरात सुरु झाले."[81] लोकांचे राहणीमान बदलल्यामुळे नवीन गरजा भागविण्यासाठी शेतीसारखे पारंपारिक

व्यवसाय सोडून नवीन उद्योगांना चालना मिळाली. नगरमधील लोक आधुनिक जीवनपध्दती स्वीकारु लागले होते.

**सहकारी संस्थाची स्थापना** :-

भारतात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिक उद्योगधंदे सुरु झाले. त्यात कारखाना - उद्योगांचा समावेश होता. १८५० पासूनच्या दशकात भारतात यंत्रयुग सुरु झाले. रुई पिंजणे व गठ्ठे बांधणे, पिठाच्या गिरण्या, लाकूड कापणे, कागद-निर्मिती, साखर-निर्मिती असे उद्योग सुरु झाले. यासोबत सहकारी संस्था उदयास येऊ लागल्या.

१९०९ ते १९४६ या काळात सहकारी संस्थांची स्थापना झाली, ही महत्वपूर्ण घटना मानावी लागते. यात 'इमारत कंपनी' ही पहिली सहकारी वसाहत, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांचा समावेश आहे. सहकाराची संकल्पना यामुळे रुजायला सुरुवात झाली. त्याचबरोबर कमी व्याजदरात कर्जपुरवठ्याच्या योजना आल्या. त्यामुळे बाजारपेठेत चलनवलन सुरु झाले. मध्यमवर्ग खरेदीसाठी उद्युक्त होऊ लागला.

त्यांना लागणाऱ्या वस्तू बाजारात उपलब्ध करुन देणे याउलट बाजारात आणलेला माल लोकांना वापरण्यास प्रवृत्त करणे, हे नगरच्या व्यापाऱ्यापुढे एक महत्वाचे आव्हान होते. नगर शहरात जसे नवीन व्यवसाय उभे राहिले तसेच लोकांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी अनेक सहकारी संस्था स्थापन झाल्या. १८९० ते १९४६ पर्यंत सुमारे १६ सहकारी संस्था शहरात होत्या. त्याची यादी पुढे दिली आहे.

सध्याच्या शहरी जीवनात फ्लॅट पध्दतीचा सुकाळ आहे. परंतु नगरच्या नागरिकांनी शंभर वर्षापूर्वी एकत्रित येऊन भाग भांडवल गोळा करुन एक इमारत बांधली ही महाराष्ट्रातली पहिली सहकारी पध्दतीची इमारत होती. कापड बाजारातील कोहिनूर या कापड दुकानामागे जागा निजामशाहीतील नगरचा किल्लेदार कविजंग याच्या जहागिरीचा हा भाग होता. सन १८९० मध्ये त्यावेळचे नगरमधील प्रमुख नागरिक व व्यापारी राजमल गंभीरमल मुथा, बाबु नरहर सोहनी, धोंडो गोविंद तांबोळी, हरिदास

दामोदरदास पारखे, नारायण श्रीराम नगरकर, गोपाळदास हंबीरमल, हंबीरमल नवलमल, पाडुरंग सदाशिव शहाणे, दादाजी चिमनाजी कुकडे, सिताबाई घनश्यामदास इत्यादी दहा प्रमुख व्यक्तींनी भाग भांडवल गोळा करुन १८९० मध्ये वरील जागा खरेदी केली. १९३२ साली प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात झाली. त्याचा नकाशा एन.आर. पेन्टा या इंजिनिअरने तयार केला. त्यात ४८ खोल्या समोरासमोर २ इमारतीमध्ये बांधण्यात आल्या. “इमारत कंपनी नावाची नगरमधील पहिली सहकारी वसाहत वसली. मात्र २७फेब्रुवारी १९४६ रोजी नव्या कापड बाजाराला मोठी आग लागली. या प्रचंड आगीत इमारत कंपनीची अकरा व समोरची सहा सात दुकाने भस्मसात झाली."[82] यात येवलेकरांचे ‘येवलेकर वस्त्रभांडार’ होते. याची स्थापना १९२१ मध्ये तुकारामपंत येवलेकर यांनी केली होती. "इमारत कंपनीकडून हे दुकान दरमहा १२ रु. भाड्याने घेता येत होते. आगी नंतर कंपनीने भाडेकऱ्यांकडून १२ महिन्यांचे भाडे आगाऊ रक्कम घेऊन इमारतीची दुरूस्ती केली."[83] व नंतर वर्षभराने त्यांना दुकानाच्या जागा ताब्यात दिल्या. पुढे इमारत कंपनीतील हे दुकान येवलेकरांच्या मालकीचे झाले. "[84] सहकारी इमारत कंपनीशिवाय नगरमध्ये पुढील मध्यवर्ती सहकारी बँक होत्या.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक**

१९०९ भिंगार अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९१० अहमदनगर डिस्ट्रीक्ट अर्बन सेन्ट्रल को-ऑपरेटीव्ह क्रेडीट बँक लिमिटेड

१९११ म्युनिसिपल सर्व्हंटस को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९१९ अहमदनगर डिस्ट्रीक्ट को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९१९ अहमदनगर नामदेव को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९१९ अहमदनगर प्रायमरी टीचर्स को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९२० अहमदनगर सुवर्णकार क्रेडीट को-ऑपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड

१९२० अहमदनगर पोस्टल डिव्हिजन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९२४ अहमदनगर ज्युडीशियल एम्पलॉइज को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९२७ अहमदनगर डिस्ट्रीक्ट लोकल बोर्ड सर्व्हंट्स को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९४० आयुर्वेदाश्रम सॅलरी ऑनर्स को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९४३ अहमदनगर रेव्हेन्यू अॅन्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंटस गव्हर्नमेंट्स को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९४४ अहमदनगर कॅन्टोनमेंट बोर्ड एम्पलॉइज को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९४४ अहमदनगर जैन ओस्तवाल को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९४४ अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेकंडरी टीचर्स को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

१९४६ अहमदनगर पी.डब्ल्यू.डी एम्पलॉइज को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड

"या सर्व सहकारी पतपेढ्या होत्या. त्यांचा उद्देश नोकरदारांना व सभासदांना अडीअडचणींच्या वेळी कमी व्याजदराने कर्ज देणे. काटकसरीने राहून शिल्लक टाकण्यास उत्तेजन देणे."[85] यातील काही सहकारी बँक नगर शहरापुरत्या मर्यादीत होत्या. काही आपल्या सभासदांचा विमा उतरुन त्याची दरसाल हप्त्याची रक्कम बिगर व्याजाने भरत होत्या.

**ग्राहक भांडार**

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात साठेबाजी व काळाबाजार यांना उधाण आले. जीवनावश्यक वस्तू सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेल्या. या परिस्थितीवर मात करण्यासाठी ग्राहक भांडारांची स्थापना झाली. सहकाराचे तत्व वापरुन सामान्य माणसांच्या सोयीसाठी कमी दरात वस्तू उपलब्ध करुन देणे त्यामुळे शक्य झाले.

सहकारी पतपेढीप्रमाणे 'सहकारी ग्राहक भांडार' दुसऱ्या महायुध्द काळात निर्माण होऊ लागले. युध्दकाळात जीवनोपयोगी वस्तूचे भाव भडकले. काळाबाजार, साठेबाजी सुरु झाली. त्यामुळे लोकांना कमी भावामध्ये वस्तू उपलब्ध करुन देण्यासाठी सहकारी तत्वावर भांडार गृहाची निर्मिती झाली. त्याची यादी पुढील प्रमाणे.

१९३९ महिला को-ऑपरेटीव्ह भांडार लिमिटेड नगर

१९४३ अहमदनगर को-ऑपरेटीव्ह कन्झ्युमर्स स्टोअर्स

१९४४ अहमदनगर ख्रिश्चन को-ऑपरेटीव्ह स्टोअर्स लिमिटेड

१९४४ अहमदनगर तेलगु को-ऑपरेटीव्ह कन्झ्युमर्स स्टोअर्स लिमिटेड

१९४५ अहमदनगर पोस्टल टेलिग्राफ स्टाफ को-ऑपरेटीव्ह ग्रेन शॉप अन्ड जनरल स्टोअर्स लिमिटेड

१९४८ बालिकाश्रम सहकारी उद्योग मंडळ लिमिटेड

१९४८ साहित्ती रीफ्युजी को-ऑपरेटीव्ह कन्झ्युमर सोसायटी

'अहमदनगर जिल्हा प्रथामिक शिक्षक सहकारी सोसायटी'ची स्थापना १९१९ साली झाली. तीच्या मार्फत "सभासदांना काटकसरीची शिकवण, माफकदराने कर्ज, बचत करणे इ. शिकविले जाई."[86] तसेच पुस्तक दुकान, कापड दुकान, रेशिनिंग दुकान इ. या सोसायटीव्दारे चालविली जात. शिक्षकांना माफक दरात वस्तू मिळत.

"सहकारी सोसायट्यांची लाट आल्यावर १९१९ मध्ये 'नामदेव सहकारी सोसायटी स्थापन झाली. पोस्टातील सभासदांसाठी १९२० साली तर तेलगु समाजासाठी १९४४ साली सहकारी सोसायटी स्थापन झाली."[87] यामुळे कार्यप्रयोजनांकरीता कर्जाऊ रकमा कमी व्याजदरात मिळू लागल्या.

"नामदेव सहकारी सोसायटी १९१९ साली नामदेव शिंपी समाजात एकता निर्माण करुन व्यापार धंद्यास व लग्नकार्यास कमी दराने कर्जाऊ रक्कम उपलब्ध करुन देत असे."[88] अशीच सोसायटी पोस्टातील सभासदांसाठी १९२० साली स्थापन झाली. पुढे चालून १९४४ साली तेलगु समाजानेही आपली सहकारी सोसायटी स्थापन केली होती.

जानकीबाई आपटे यांनी १९४८ साली 'बालिकाश्रम सहकारी उद्योग मंदीर' ची स्थापना करुन त्याव्दारे "सभासदांना व ग्राहकांना त्याच्या घरगुती उपयोगाच्या सर्व प्रकारच्या जिनसा पुरविल्या जात."[89] या किराणा सोसायटीत किराणा दुकान, कंट्रोल कापड दुकान, रेशन धान्य दुकान, विनाकंट्रोल दुकान चालविले जात असे.

‘धान्य व भाजीपाला बियाणे विक्री’ हे दुकान १९२४ मध्ये विठ्ठलदासजी गांधी यांनी सुरु केले. परंपरागत पध्दतीने घरी तयार केलेले बियाणे वापरण्याची संस्कृती असताना हे दुकान नाविन्य ठरले. या दुकानामुळे वेगवेगळ्या भाजीपाल्याचे बियाणे उपलब्ध होऊ लागले.

तेव्हापासून आजतागायत अहमदनगर जिल्ह्यातील बियाणे व खत विक्रीसाठी हरितक्रांती व धवलक्रांती पर्यंतचा इतिहास तोंडपाठ सांगणारा ज्ञानकोश म्हणून बाळासाहेब ओळखले जात. "जिल्ह्याचे पर्यावरण, जैव विविधता, पीक पद्धती, शेतीतील नफा-तोटा, दुष्काळ व पानाडी, हवामानाचा अंदाज, बाजाराचा कल, हंगामातील पिकांचे भवितव्य अशा विषयांचा अचूक वेध घेत ते समोरच्या शेतकऱ्यांची पिकाच्या प्रगतीबद्दलही आस्थेने चौकशी करत."[90] सामान्य शेतकऱ्याविषयी आज कोठेही आस्था दिसत नाही. अशा काळात अनेकांना बाळासाहेबांचा तळमळीचे पण सौम्य भाषेतील परखड ज्ञान देणे मोठा आधार देऊन जाते असे.

**आयुर्वेद फार्मसी लि. जाईंट स्टॉक कंपनी १९१७-१९३५**

१९१७ मध्ये सुरु झालेला औषध निर्मितीचा कारखाना ‘आफाली’ या नावाने अहमदनगर जिल्ह्यात सुप्रसिध्द झाला. औषधनिर्मिती या कारखान्यामुळे मोठ्या प्रमाणात सुरु झाली. औषधनिर्मितीकडेही व्यवसाय म्हणून पाहण्याची दृष्टी यातून निर्माण झाली.

"गंगाधरशास्त्री गुणे यांनी नगरला १९१७ साली आयुर्वेद महाविद्यालय सुरु केले. डॉ.सप्तर्षी, डॉ. अ.वि.केतकर, व डॉ. आर.वाय.मुळे अशी विविध विषयांतील तज्ज्ञ, अध्यापक मंडळी स्वयंस्फूर्तीने एकत्र आली. त्याच्या विचारातून १९२० साली आयुर्वेद अभ्यासक्रमाला 'मिश्र वैद्यक' या विषयाची जोड मिळाली.[91] आयुर्वेद दवाखान्यात मोठ्या प्रमाणात औषधे बनवावी लागत. ही गरज लक्षता घेऊन आफाली ही औषध निर्माण करणारी कंपनी सुरु झाली. वैद्य गुणेंच्या काही विद्यार्थीनी मिळून १९४४ साली 'आयुर्वेद सेवासंघ' ही संस्था स्थापन केली.

"रोजगार निर्मिती केली, औद्योगिक संस्कृतीची सुरुवात केली, औषध निर्मितीचा व्याप वाढल्याबरोबर नविन तंत्रे व पध्दती वापरुन वितरण सुरु केले."[92] भारताच्या बहुतेक सर्व प्रांतात आफालीची औषधे मिळत. खोकल्यावरील 'कॉस्पो'ला मोठी मागणी असे सीमेवरील जवानासाठी अन्न पॅकिंग करुन पाठविणारी आफाली पहिली कंपनी होती.

"टाचणी हा क्षुल्लक पदार्थ दिसत असला तरी अलीकडे तो एक स्वतंत्र व्यापारच झाला होता."[93] टाचण्यांच्या कारखान्यात अनेक माणसे काम करीत असतात. एका माणसाने काम केले तर दसपट वेळ लागेल. यावरुन अंग मेहनतीपेक्षा यंत्रादिकाची हिकमत मोठी आहे, हे लक्षात येते.

"अहमदनगरचे जज्ज मि.उडकाक यांनी १८५६ साली अहमदनगरच्या तुरुंगात केकताड, केळीची रोपटे व ताग यापासून कागद तयार करण्याचा यशस्वी प्रयोग केला."[94] हा शोध अगदी नवा होता. तरटाच्या कागदापेक्षा हा कागद सफेद व गुळगुळीत असे.

**हिंदु बेकरी**

बेकरी उत्पादनांची आवश्यकता मध्यम वर्गाच्या निर्मितीमुळे भासू लागली. मोहन बेकरीच्या रुपाने हाही प्रश्न सुटला. बेकरी उत्पादनांच्या बाजारपेठेचाही नंतरच्या काळात अर्थविषयक परिवर्तनास हातभार लागला.

"अहमदनगर येथे हिंदु बेकरीची जरुरी होती त्याप्रमाणे येथे 'मोहन बेकरी' सुरु झाली. गिऱ्हाईकांना माल भरपूर स्वच्छ आणि ताजा मिळावा हा ह्या बेकरीचा मूळ उद्देश असे."[95] हॉटेल अगर इतर गिऱ्हाईक यांना घरपोच माल पाठविण्याची व्यवस्था मोहन बेकरीने केली. बेकरीत पाव, बिस्किटे, खारी बिस्किटे, नानकटाई वगैरे माल स्वच्छ मिळत असे. या पूर्वी सरोश थेटरजवळ सरकारी सैनिकांसाठी एकमेव बेकरी होती.

**वीज कंपनीची सुरुवात १९२२**

१९२२ मध्ये मुंबईच्या नरिमन अ‍ॅण्ड सन्स कंपनीने अहमदनगरमध्ये वीजकंपनी सुरु केली. वीजेच्या आगमनामुळे उद्योगविश्वात चैतन्य निर्माण झाले. मानवी कार्यक्षमतेवर अवलबून राहण्याऐवजी यांत्रिक गतीचा लाभ नगरच्या उद्योग-धंद्यांना मिळाला. वीजेमुळे उत्पादनात भरमसाठ वाढ झाली. नारायणराव पेंटांच्या मार्गदर्शनाखाली क्रूड ऑईलवर चालणारी विद्युत निर्मिती अहमदनगरच्या आर्थिक परिवर्तनातील मैलाचा दगड ठरली.

मुंबईच्या 'नरीमन अ‍ॅड सन्स' कंपनीने १९३२ मध्ये अहमदनगरला पॉवर हाऊस सुरु करुन शहरात वीजेचे जाळे तयार केले. उद्योगरत्न व अभियंता नारायण पेंटा यांनी संगमनेरला वीज कंपनी सुरु केली होती. नगरचे कामही तेच पाहत. क्रूड ऑईलवर चालणाऱ्या मशिनव्दारे वीजनिर्मिती केली जात असे. "वीज आल्यावर नगरच्या कामगार विश्वात चैतन्य निर्माण झाले. नगरांत कॉटन मिल्स, दाळ मिल्स असे वीजेवर चालणारे व्यवसाय सुरु झाले."[96] १९५० मध्ये नरीमन यांनी नारायणराव पेंटांना वीज कंपनी चालविण्याचे परवाना दिला. नंतरच्या काळात ही वीज कंपनी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) मध्ये परिवर्तित झाली.

"त्याकाळी कंपनीतील वातावरण परस्पर सहकार्य, कौटुंबिक जिव्हाळा, शिस्त, सौहार्दपूर्ण असे."[97] कंपनीतील सहकारी मॅनेजर आर.डी.मिस्त्र, असि.इंजि.फली कुटिन्हो, व पटेल, गांधी, म्हस्के, हे होते. १९३५ साली नगरची वस्ती अवधी २५००० होती. या वस्तीला वीज पुरवण्याचे काम नरीमन कंपनी करत असे.

**व्यापारी क्लबची स्थापना १९४८**

अहमदनगरमध्ये व्यापारी संस्कृती रुजल्यानंतर नगरचे व्यापारी खासदार मोतीलालजी फिरोदिया यांनी व्यापारी क्लबची स्थापना केली. व्यापारी क्लब ही व्यापाऱ्यांच्या मनोरंजनाची बाब असली तरी तिचाही अहमदनगरच्या आर्थिक परिवर्तनाशी संबंध आहेच. क्लबमधील नियमीत व नैमित्तिक भेटीगाठींमधून

व्यापाऱ्यांना सल्लामसलत, प्रत्यक्ष मदत, धोरणनिर्मिती व आत्मविश्वास यांचा लाभ होऊ लागला. त्यातून व्यापार वृध्दीस हातभार लागून परिवर्तनास गती प्राप्त झाली.

कापड बाजार व एकंदर शहरातील व्यापारी वर्गातील एकोप्याच्या वातावरणाला व्यापारी क्लबचा मोठा हातभार होता. खाजदार मोतीलालजी फिरोदिया यांनी १९४८ साली व्यापारी क्लब स्थापन केला. सुरुवातीस हा क्लब अर्बन बँक रोड वरील रेखींच्या माडीवर रात्री ९ ते १२ च्या दरम्यान चाले. १९६६ मध्ये क्लबने सध्याची कवीजंग हवेलीतील जागा कय्युमी यांच्याकडून खरेदी केली. ३५ वयवर्षे पूर्ण केलेल्या व्यापारी मंडळींना क्लबचे सभासदत्व मिळत असे.

**क्लबचे उपक्रम :-**

"मनोरंजनासाठी पत्ते खेळणे, सहभोजन, सहली, उंची, राहणीमानाची ओढ व सवयी असे उपक्रम चालत. कापड खरेदीसाठी मोठ्या शहरांच्या वाऱ्यामुळे क्लबमधील नवव्यापारी वर्गात आत्मविश्वास निर्माण केला होता."[98] १९६४ नगरची गुगळे कंपनी मुंबईच्या हिंदी चित्रपट निर्मितीत उतरली. 'जब प्यार मिले', (शशीकपूर, हेमा), 'विश्वास' (जितेंद्र अपर्णा सेन), परिवार (जितेंद्र, नंदा) त्यांनी हे तीन चित्रपट बनवले होते. चित्रपट निर्मिती व्यवसायात गुगळे कुटुंबाची फसवणूक झाली. तरीही व्यापारी क्लब मधून मिळालेला आत्मविश्वास थेट मुंबईच्या चित्रपट निर्मिती व्यवसायाला जाऊन भिडला ही बाब नोंद घेण्यासारखी आहे.

## दुसरे महायुध्द काळातील आर्थिक स्थिती १९३९

"महायुध्द काळात तुटवड्यामुळे हैरान झालेल्या लोकांना दिलासा देण्यासाठी सरकारने 'कंट्रोल म्हणजे नियंत्रण पध्दत' सरु केली."[99] होलसेल व रिटेल व्यापाऱ्यांवर अगदी खोबरेल तेलासारख्या वस्तूबाबत देखील 'कंट्रोल' बसविला गेला.

## दैनंदिन वस्तूंवर कंट्रोल १९३९

खोबऱ्याच्या तेलावर कंट्रोल बसविला. त्यानुसार होलसेल व्यापाऱ्यांनी ११ रु मन याप्रमाणे तेल रिटेल व्यापाऱ्यास द्यावे व रिटेल व्यापाऱ्याने १ रु. शेराप्रमाणे विक्री करावी असे कंट्रोल भाव ठरले होते. त्याच सोबत साखर, धान्य, दाळी, घासलेट, खडीसाखर इ. दैनंदिन वस्तूंवर युध्दकाळात सरकारने नियंत्रण घातले.

## अन्नाचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारचे प्रयत्न १९३९

महायुध्द काळ आणि इतरवेळी भेडसावणारा अन्न प्रश्न सोडविण्यासाठी सरकाने पुढाकार घेतला. सरकारी अन्न धोरण तयार झाले. ते सामान्य माणसांपर्यंत पोचविण्यासाठी गावोगाव सभा घेतल्या गेल्या. शेतकऱ्यांनी आपल्याजवळील धान्य सरकारला विकावे अशी योजना लोकांच्या गळी उतरविली गेली. सरकारने अन्नाचा प्रश्न सोडविण्यासाठी निश्चित धोरण स्विकारुन 'अन्न परिषद' भरविली. सरकारच्या धोरणाचे परिणाम खेडोपाडी सर्वत्र दिसू लागले होते.

## अन्न परिषदेची ठळक वैशिष्ट्ये

जिल्ह्यातून फक्त सरकारलाच धान्य विकावे, असे ठरल्यामुळे "तालुक्यातून पाटलांच्या सभा घेऊन त्यांना अन्नाच्या बाबतीत सरकारी धोरण समजावून दिले. सरकारी अधिकारी यांनी प्रत्येक गावी जाऊन धान्य खरेदी केले. व धान्याचे भाव ठरविले. सरकार शिवाय दुसऱ्या कुणालाही एकावेळी सहा पायली पेक्षा जास्त धान्य विकावयाचे नाही."[100] अशा तऱ्हेच्या सरकारी नोटीसा शेतकऱ्यापर्यंत पोहचविल्या. त्यामुळे सरकारलाच धान्य विकण्याचे बंधन शेतकऱ्यावर आले. जे अत्यंत जुलमी होते. कारण शहरात व्यापारी साठेबाजी करत होता. अन्नदाता मात्र सरकारच्या जुलमी योजनांखाली भरडला जात होता. त्याच्यावर बंधने घालून सरकार जणू काही व्यापाऱ्यांचाच फायदा करुन देत होते.

## जिल्हा धान्य कमिटीची स्थापना १९४२

सरकारच्या अन्नधोरणाची प्रतिक्रिया म्हणुन ‘जिल्हा धान्य कमिटी’ स्थापन झाली. या कमिटीने सरकारच्या अन्न धोरणात सुधारणा सुचविल्या. काही उपयुक्त सूचनाही मांडल्या गेल्या.

“राजाराम भाऊ गिरमे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा धान्य कमिटीची स्थापना झाली. या कमिटीची उद्दिष्ट्ये कमिटीमार्फत जिल्ह्यातील जनतेची गाऱ्हाणी सरकारच्या कानावर घालणे, धान्य परिस्थितीबाबतचे सरकारचे सध्याचे धोरण जिल्ह्याला कसे बंधनकारक आहे व त्यातून जनतेला वाचवण्यासाठी सरकारशी सलोख्याची भूमिका स्विकारावी की विरोधाची हे ठरविणे.”[101] सर्व सभासदांनी पुढील सूचना मांडली की, ६ रु. च्या आतील पट्टी भरणाऱ्यांकडून धान्य घेण्यात येऊ नये. शेतकऱ्यास प्रथम बी भरणा करण्यास मुभा पाहिजे. जेणेकरुन जनता व सरकार यांच्यात सलोख्याचे वातावरण निर्माण होईल.

## रिटेल मर्चंटचे हक्क काढून घेतले १९४३

महायुध्द काळात सरकारने २५० रिटेल व्यापाऱ्यांचे विक्रीचे हक्क काढून घेतले होते. यामागे अन्नधान्याच्या विक्रीवर कंट्रोल करण्याचा सरकारचा हेतू होता. महायुध्दाच्या भीषण परिणामाचा हा भाग होता.

“शहरामध्ये निरनिराळ्या कमिटीच्या मार्फत धान्य, तांदुळ, साखर वगैरे जिनसा विकण्याची सोय फक्त एकाच दुकानातून ६०००० वस्तीच्या नगरच्या जनतेची करण्यात आली होती.”[102] त्यामुळे २५० किरकोळ किराणा व भुसार व्यापारी व्यवहारात बेकार झाले होते. रिटेलर्सच्या मार्फत आजपर्यंत तांदुळ कुपनवर विकत होता. तोही काढुन घेण्यात आला. यामुळे २५० रिटेल व्यापारी बेकार झाले. महायुद्धाचा हा भयंकर परिणाम होता.

**काळ्या बाजारास तोंड फुटले १९४४**

अन्नधान्याबाबत महायुध्द काळात काळा बाजार झालाच. पण जनावरांच्या खाद्याबाबतही काळा बाजार झाला. पेंडीच्या तुटवड्यामुळे भाव प्रचंड भडकले. त्यातून काळा बाजार सुरु झाला. "सरकारने व्यापाऱ्यांना जनावारांसाठीच्या पेंडेचा भाव विकण्याचे परवाने दिले. या व्यापाऱ्यांनी पेंडेचे भाव ठरवून दिले व त्यानी इतर कोणत्याही संस्थेशी खरेदी विक्री करु नये असे नियंत्रण घातले."[103] त्यामुळे शेतकऱ्यांची कुचंबना झाली. काळ्या बाजारांस तोंड फुटले सरकारी पेंडेचा दर टनास १२ रुपये असताना काळया बाजाराचा भाव १४४ पर्यंत गेला त्यामुळे शेतकऱ्याकडे बरीच पेंड शिल्लक राहिली. माल असून तो न विकण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढावली.

**साखरेची दुजाभावाने विक्री १९४४**

साखर रेशनवर मिळू लागली. तुटवड्यामुळे साखर शिल्लक नाही असे दुकानदार सांगू लागले. मात्र ओळखीच्या गिऱ्हाईकांना साखर विकू लागले असा उल्लेख सापडतो.

"दुकानात साखऱ्या मागावयास गेले असता शिल्लक नाही चार दिवसांनी या आठ दिवसांनी या अशी सबबी सांगुन परत पाठविले जाई."[104] वरील सबबी ऐकुन दुकानातून परत जावे व अर्ध्या तासाने परत दुकानात जाऊन पहावे तो दुकानदार स्वत:च्या ओळखीचे अगर काही ठराविक गिऱ्हाइकांना साखर वाटतानाचे दृश्य दिसे. अशा प्रकारे साखरेचा काळा बाजार वाढला. त्यामुळे सर्वसामान्यांना साखरेसारखी आवश्यक गोष्ट मिळेनाशी झाली.

**युध्दकाळातील कर – १९४४**

युध्द काळात अनेक कर इंग्रजांनी सामान्य जनतेवर लावले. "अडीच लाख रुपये 'सोल्जर्स फंड' म्हणून वसुल केले गेले."[105] घरपट्टी, पाणीपट्टी, ड्रेनेज कर, थेटर कर, कुत्रेपट्टी असे कर वसुल केले जाऊ लागले.

घरपट्टी वसूली सोबत सोल्जर्स फंड नावाच्या एक फंडाची रक्कम सक्तीने वसूल केली जाऊ लागली होती. रेडक्रॉसारखा शिपायांच्या उपयोगी पडणारा फंड रु. १ लाखा ऐवजी अडीच लाख रु. जिल्ह्यातून वसूल झाला असताना सोल्जर्स फंड कशासाठी असे विचारण्याचे धाडस जनतेत नसायाचे.

**रेशनिंग**

अहमदनगरमध्ये महायुध्दामुळे रेशनिंगने धुमाकूळ घातला. खानावळी, हॉटेल, औषधांचे कारखाने, खाद्यपदार्थांची दुकाने या सर्वांनाच रेशनिंग आले.

अहमदनगर शहर व कॅन्टोन्मेंट हद्दीतील तमाम खानावळी, हॉटेल, रेस्टॉरंट, कॅफेज, बोर्डिंग व लॉजिंग हाऊसेस, अनाथालये, सोडावाटॅर फॅक्टरीज, केमिस्ट व ड्रगिस्ट, औषधे तयार करणारे कारखाने, बेकरीज, क्लब, दवाखाने व मेवा मिठाईची दुकाने वगैरेचा रेशनिंगमध्ये समावेश केलेल्या जिनसा किती प्रमाणात देण्यात याव्यात हे ठरविण्यासाठी छापील फॉर्म भरावे लागत होते. अशा जाहिराती वर्तमान पत्रात येत असत. "सरकारने अहमदनगर जिल्ह्यातील कापडाचा व सुताचा व्यापार करणाऱ्यांना बिनशिक्काचे कापड वापरण्यास बंदी घातली होती. त्याच्या विरुध्द कायदेशीर इलाज केला जाईल. अशी जाहीर नोटिस येत असत."[106] त्यामुळे बिनशिक्याच्या कापडाचा काळाबाजार वाढला.

"अहमदनगर शहर व कॅन्टॉनमेंट हद्दीतील रेशनिंग दुकानात तांदुळ, गहु, बार्ली, ज्वारी, बाजरी, साखर, घासलेट या वस्तू वयाच्या प्रमाणात मिळण्यास सुरुवात झाली. गहू घेणाऱ्यास १/४ बार्ली घ्यावीच लागत असे."[107] बार्ली हे नगरकरांचे अन्न

नसल्यामुळे केवळ सरकारी हुकूमामुळे ते घ्यावे लागत असे. एवढेच नव्हे तर नगरपालिकेचे अधिकारी आंधळ्याकडून ही अरेरावी करुन भांडी जप्त करुन कर वसुली करत."[108] बार्लीला नकार, सोल्जर फंडाला नकार, अतिरीक्त कर वसूलीस नकार देणे सामान्य जनतेच्या आवाक्या बाहेरचे होते. जनता निमूटपणे सरकारने घातलेल्या जीवनोपयोगी वस्तूंवरील नियंत्रणांचा स्वीकार करत होती.

**अहमदनगर शहरांतील केमिस्टांची दुकाने बंद ठेवली १९३९**

निरनिराळ्या जिनसांचे भाव ठरविले गेल्याने व्यापारी वर्गात खळबळ उडाली होती. अहमदनगर शहर आणि जिल्ह्यातील व्यापाऱ्यांनी आपल्या मालाचे भाव भरमसाठ वाढवू नयेत म्हणुन सरकारने आपले भाव जाहीर केले. शिवाय शहरात दवंडी दिली की, 'पैसे दिले त्याची पावती घेतल्याशिवाय माल देऊ घेऊ नये व भाव जास्त लावला असल्यास फौजदार कचेरीत कळवावे', असे जाहीर करण्यात आले. शिवाय कमीजास्त भावाबद्दल व्यापाऱ्यांची अधुन मधून तपासणी व जाब-जबाब घेतले जाऊ लागल्यामुळे निषेध म्हणुन केमिस्टांनी आपली दुकाने बंद ठेवली होती. दैनंदिन वस्तुंवर निर्बंध घातलेले जनतेने निमुटपणे सहन केले होते. केमिस्टांनी मात्र सरकारच्या जाचक कायद्यांना प्रतिक्रिया म्हणुन आपली दुकाने बंद ठेवली.

**धान्याचे भाव वाढल्याने बाजार बंद १९३९**

"अहमदनगर शहरात धान्याचे भाव वाढल्यामुळे मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद मि.पटेल व तबकल वस्ताद ह्यांच्या नेतृत्वाखाली नगरच्या मजूरांनी दाणेबाजार बंद ठेवला. शेठ हरीकिसन आसाराम यांच्या दुकानी व्यापारी व पुढारी यांच्यामध्ये विचार विनियम होऊन बाहेर जाणाऱ्या मालावर निर्बंध घालण्याकरिता तत्कालीन कलेक्टरकडे जाण्याचे ठरवले."[109] सुमारे १५०० ते २००० पोती बाजरी परजिल्ह्यात जात होती. या व्यापारी मंडळींनी हे बाहेर जाणारे धान्य प्रयत्नपूर्वक रोखले होते. त्यामुळे या धान्याचा लाभ नगरच्या जनतेला झाला होता.

## बाजारावर नियंत्रण

अहमदनगरच्या बाजारातून धान्य बाहेरच्या जिल्ह्यात अगर राज्यात पाठविण्यावर बंदी घालावी असे स्थानिकांना वाटे. यामागे जनतेला भविष्यकाळात अन्नापासून वंचित रहावे लागू नये यासाठी अहमदनगरच्या व्यापाऱ्यांनी कलेक्टरशी संवाद साधलेला होता.

युध्दपिपासु राष्ट्रांमध्ये कच्चा माल उत्पादन करण्याची शक्ती नष्ट झाली होती. "ती राष्ट्रे हिंदूस्थानसारख्या राष्ट्रावर अवलंबुन होती. अहमदनगर जिल्ह्यातून सुमारे १ लाख ज्वारीचे पोते गुजरातमध्ये रवाना झाले."[110] ही जावक सुरुच राहिली. याला पायबंद घातला नाही. तर पुढे जिल्ह्यातील जनतेस अन्नावाचून तडफडून मरण्याचा प्रसंग सरकारला पहावे लागेल. या गोष्टीला वेळीच पायबंद घालण्यासाठी नगरचे व्यापारी शिष्टमंडळ कलेक्टरकडे गेले होते.

## दुसऱ्या महायुध्दकाळातील आर्थिक घडामोडी १९३९-१९४५

जागतिक महायुध्द हेच बाजारभाव वाढीचे महत्वाचे कारण होते. परंतु लढाईचे प्रत्यक्ष परिणाम म्हणुन किंमती वाढतात असे नव्हे, कुठल्याही मालाचे मूल्य तो माल बनविण्याच्या श्रमावरुन ठरत असते. म्हणजे ज्या वस्तूंना श्रम जास्त पडत असत त्या वस्तुंचे मूल्य साहजिक अधिक असे हाच सुप्रसिध्द श्रममूल्य सिध्दांत होय. जर श्रमावरुन मूल्य ठरते तर मग मूल्यांत चढ उतार का ? याचे उत्तर असे की आज श्रमाची मोजदाद पैशात केली जाते. किंमतीतील फरक हा बाजारात खरेदीच्या उपयोगाकरिता येणाऱ्या चलनाची मागणी आणि पुरवठा आणि जो माल बाजर पेठेत विक्री करिता येत असतो. त्याची मागणी आणि पुरवठा यांवर अवलंबून असतो. वाढीचा मिमांसा अशी असते.

### १. सोन्याचे भाव वाढले

"महायुध्द सुरु झाल्याबरोबर पहिली गोष्ट जर कोणती झाली असेल तर ती म्हणजे सोन्याच्या भावात वाढ होय."[111] सोने १९३९ साली ३१ रु. ७४ पैसे होते ते १९४६ साली ८३ रु. ८७ पैसे इतके झाले. युध्द परिस्थितीत आतंराष्ट्रीय चलन म्हणून

फक्त सोन्याचा उपयोग होतो. या कारणाकरीता सोन्याला मागणी वाढते. सोन्याची किंमत चढू लगते. त्या बरोबर इतर मालाच्या किंमतीही वाढू लागतात. युध्द काळात बाजारात चलन वाढण्यास हे एक कारण आहे. परंतु यामुळे शेतकऱ्यांचा काहीच फायदा होत नव्हता.

## २. व्यापाऱ्यांना शिक्षा १९४३

महायुध्द, महागाई, काळा बाजार, साठेबाजी यामुळे गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. सरकारने याबाबत कठोर कायदा केला व त्याची गंभीरपणे अंमलबजावणीही केली. याचा उल्लेख 'संदेश' मध्ये आढळतो.

एका घाऊक व्यापाऱ्यास पुण्याचे अॅडिशनल डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि.रुबेन यांनी भारत संरक्षण कायद्याच्या ८१ (४) कलमाखाली नफेबाजी व भाव नियंत्रण कायद्याचा भंग केल्याच्या आरोपावरुन ३ म.स.म.व १००० रु.दंड अशी शिक्षा ता.२५ जानेवारी रोजी केली. सदर व्यापाऱ्याने पंजाबहून २५० गव्हाच्या गोण्या आणवल्या होत्या. सदर व्यापाऱ्याने त्या गोण्या नगरला नेण्याची परवानगी मिळविली होती. सदर व्यापाऱ्यावर असा आरोप होता की, त्याने त्या गोण्या परवाना न घेता पुण्यातच विकल्या. शिवाय एका ग्राहकास दोन मणापेक्षा अधिक गहू विकले. पावती सुध्दा दिली नाही. म्हणुन दंड करण्यात आला. व तो ताबडतोब भरावा लागला. महायुध्दामुळे शेतकऱ्यांच्या मालाच्या विक्रीवर गदा आली. तशी व्यापाऱ्यांच्या व्यापारावही आली. सरकारचे व्यापाऱ्यांवर अत्यंत बारकाईने लक्ष असे. कोणत्याही कारणासाठी सैनिकांना रसद कमी पडू नये यासाठी घेतलेली ही खबरदारी होती.

## ३. परकीय सत्तेमुळे अन्नान्नदशा १९४३

मुंबई प्रांतात अहमदनगर सोडून सर्व ठिकाणी धान्याची चणचण होती. अहमदनगरला त्यामानाने सुखाचे दिवस होते. “धान्य भरपूर नसले तरी पुरेल इतके होते. परंतु सरकारला हे पाहवले नाही.”[112] अहमदनगरच्या जनतेच्यादृष्टीने सरकारने विचार

केला नाही. नगरकरांच्या संमतीशिवाय २०००० पोती नगरहून हलविली गेली. त्यामुळे सरकारचा जाच वाढून जनतेत असंतोष निर्माण झाला होता. स्वत:च पिकवलेल्या धान्यावर शेतकऱ्यांचा अधिकार राहिला नाही.  जनतेच्या हक्काचे धान्य परदेशी जमु लागले.

## ४. सुती कापड विक्रीचा परवाना १९४५

सुती कापडाच्या व्यापाऱ्यांवरही नियंत्रण ठेवणे सरकारला आवश्यक वाटू लागले. त्यातून सुती कापड व्यापाऱ्यांना परवाने दिले व व्यापाराचे नियमन केले गेले.

"सरकारने सन १९४५ चा मुंबईचा सुती कापडाच्या व्यापाराचे नियमन करण्याबाबतचा हुकूम १ सप्टेंबर १९४५ पासून नगर जिल्ह्यास लागू केला. या हुकुमान्वये अहमदनगर जिल्ह्यातील कापडाच्या व्यापाऱ्यांना लवकरच लायसेन्स परवाने देण्यात आले."[113] ज्या कापड व्यापाऱ्यांकडे परवाना नाही अशा व्यापाऱ्यांवर कडक कारवाई होऊ लागली. अहमदनगरचा बाजार या सर्व नियंत्रणामुळे डबघाईस आला होता.

## ५. खडीसाखरेच्या प्रमाणात वाढ १९४६

"प्रत्येक पंधरवड्यास कुपनवर पावशेर खडीसाखर देण्यात येत असे. खडीसाखर पाहिजे असणाऱ्यांना तितकी साखर कमी दिली जात जाई."[114] तसेच शिवण्याचा दोऱ्याचा काळाबाजार वाढला. शिवण्याचा दोरा, पेंड इ.साध्या वाटणाऱ्या गोष्टीही लोकांना महायुध्दामुळे मिळेनाशा झाल्याचा उल्लेख येतो. "लढाई सुरु झाल्यापासून शिवण्याचा पांढरा दोरा नं. २८/२ बाजारात टेलर्स लोकांना फार महाग खरेदी करावा लागत होता. सरकारने या दोऱ्यावरचे परमिटचे कंट्रोल काढल्यामुळे बाजारात किती व कोठे दोरा येतो हे कळत नव्हते."[115] सरकारने सर्वच गरजेच्या वस्तूंवर नियंत्रण ठेवल्यामुळे जनता बेजार झाली होती.  व ज्या वस्तूंवर नियंत्रण नव्हते अशा वस्तू

बाजारातून गडप होत होत्या. आई जेवण देत नाही आणि बाप भीक मागू देत नाही अशी अवस्था झाली होती.

## ६. पेंड मिळविण्यासाठी मोर्चा

"पेंड खरेदी-विक्रीवर सरकारने नियंत्रण ठेवलेले असल्याने शेतकऱ्यांना वेळेवर पेंड मिळत नव्हती. त्यामुळे शेतकऱ्याची गैरसोय होई. परमिटसाठी अधिकारी पैसे घेऊनही दाद लागू देत नसत. म्हणून रावसाहेब पटवर्धन व केशवराव गरुड यांच्या नेतृत्वाखाली कलेक्टर कचेरीवर मार्चा गेल्याने शेतकऱ्यांना पेंड मिळाली."[116]

## ७. फेअर प्राईस ग्रेनशॉप कमिटी-१९४३

'फेअर प्राईस ग्रेनशॉप कमिटी'व्दारे अनेक दुकाने चालवून कित्येक दिवस नगरमधील कामगार, शेतकरी, गरीब व मध्यमवर्ग यांच्या अन्नाचा प्रश्न समाधानकारक सोडविला. सदर कमिटीने हँडबील वाटून जाहीर केले होते की, "६ सष्टेंबर १९४३ पासून प्रत्येक माणसी रोज पाऊनशेरा ऐवजी अर्धाशेर धान्य मिळेल. हे धान्य अपुरे होते कारण अहमदनगरचा कामगार व शेतकरी दिवसातून तीन वेळा जेवण घेत असे. नव्या मापात अर्धा शेरात तीन भाकरी कशाबशा होत असत. पण मजुरास दिवसाला किमान साडेचार भाकरी लगत."[117] त्यामुळे ग्रेनशॉप मधून अन्न कमी मिळत असले तरी ते निर्भेळ असे. तसेच वाजवी दरात व वेळेत लोकांना उपलब्ध होत असल्याने युध्द काळात या ग्रेनशॉपने नगरकरांना जीवंत ठेवण्याचे काम केले.

## फेअर प्राईस ग्रेनशॉप कमिटीचा अहवाल

सरकारने १,१५,००० रु. ची नगरच्या जनतेस मदत केली. कमिटीचे कार्य आणखी एक वर्ष सुरु राहिले. या कमिटीचे अध्यक्ष कलेक्टर होते. या कमिटीची दुकाने ४ जानेवारी १९४३ पासून सुरु झाली. या दुकानाहून १८००० पोती ज्वारी व २०,००० पोती बाजरीची विक्री झाली. "कमिटीने १०० रु. खाली ज्याचे उत्पन्न आहे त्यास सरकारी कंट्रोल दरापेक्षा स्वस्त भावाने माल विकला. त्यामुळे १,१५,००० रु ची मदत गरीब

जनतेस झाली. जिल्ह्यात इतरत्र धान्याचे भाव भरमसाठ वाढले तरी या योजनेमुळे नगरच्या जनतेला मागील वर्षीच्या भावातच धान्य मिळाले."[118] या कमिटीचे मानवतावादी कार्य पाहून "नगर सेंट्रल बँकेने १,१५,००० रु. बिनव्याजी कमिटीस वापरण्यास देऊन भांडवल उभारणीस मदत केली होती."[119] "या कमिटीच्या दुकानातून प्रत्येक माणसी सव्वा तीनशेर धान्य ज्वारी, बाजरी, तांदुळ, गहू, बार्ली दर आठवड्यास मिळत असे."[120] काही काळाने सकाळी फक्त पुरुषांकरीता व दुपारी फक्त स्त्रियांकरिता दुकानातून धान्य मिळू लागले.

"अहमदनगर क्लॉथ मर्चंट्स असोसिएशनच्या फेअर प्राईस क्लॉथ शॉपसमधून रेशन कार्ड धारण करणाऱ्यांना आपापल्या रेशनिंग दुकानातून कापड २ आणे प्रत्येकी किंमत देऊन मिळत असे."[121] "स्त्रियांकरिता ता. १ जून १९४६ पासून दर सोमवारी व शुक्रवारी दुपारी ३ ते ७ पर्यत फक्त स्त्रियांनाच कापड मिळत असे. पुरुषांना या काळात कापड मिळत नसे."[122] अशा रीतीने या उपक्रमाद्वारे जनतेची काळ्या बाजारापासून नगरच्या कार्यकर्त्यांनी सुटका केली होती.

## व्यापाऱ्यांनी उभारली बंगाल मदत फंड समिती १९४३

महायुध्दाच्या झळा सोसूनही अहमदनगरच्या व्यापाऱ्यांनी मानवतावादी कार्य करुन अहमदनगरचे नाव थेट बंगालमध्ये झळकावले. सप्टेंबर १९४३ मध्ये पुनमचंद भंडारी यांच्या अध्यक्षतेखाली बंगालमधील दुष्काळाला मदत करण्यासाठी अहमदनगरमध्ये 'बंगाल मदत खेड जिल्हा समिती' स्थापन झाली. या समितीने दादासाहेब पंडीत व नायडू यांच्या समवेत बंगालमध्ये अहमदनगर केंद्र उघडले ह्या समितीचे सदस्य कलकत्याला रवाना झाले.

"कलकत्ता येथे पोहोचल्यानंतर प्रत्यक्ष पाहणी करुन ज्या भागात मदतीची जास्त जरुरी आहे त्या गावाचा अभ्यास करुन बाजीचौक, सवंग, बालीसीता, तालडीया इ. ठिकाणी अहमदनगरतर्फे केंद्र उघडून मदत कार्यास सुरुवात केली."[123] बाजीचौकी या गावातील ३०० माणसे, तालीडीया गावातील १०० माणसे, नीधवा गावातील २००

माणसे अशी एकुण ६०० लोकांचे केंद्र त्या गावच्या मध्यावर उघडले. त्यावेळी नगरच्या कार्यकर्त्यांबरोबर तेथील मारवाडी रिलीफ सोसायटीचा कार्यकर्ता सतत मार्गदर्शनासाठी उपस्थित असे. वर निर्देश केलेल्या ६०० लोकांना खिचडी व कपडा देण्याची व्यवस्था नगर कमिटीने केली. औषधे देण्यसाठी व त्यांच्या आरोग्यासाठी मुद्दाम नगर केंद्राने एक वैद्य दरमाह ५० /- रु पगाराने नेमलेला होता.

अशा प्रकारे नगरकरांनी महाराष्ट्रापेक्षा एक पाऊल पुढे टाकला. ही व्यवस्था पुनमचंद यांनी उत्तम प्रकारे केली. ते केंद्र पुढे चार महिने चालू होते.

**अहमदनगरमधील संप आणि कामगार संघटना १९४२-१९४५**

भारतात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिक कामगार वर्ग उदयाला आला. कामगार विषयक कायद्यांच्या संरक्षणाअभावी कारखानदारांकडून कामगारांची पिळवणूक केली जात असे. अपुरी मजुरी, कामाचे जादा तास, कामाच्या ठिकाणी असुरक्षितता, अनारोग्यकारक वातावरण याबाबत कामगारांना संरक्षण नव्हते. परंतु कामगार चळवळ विकसित होऊ लागली.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे ब्रिटीश भांडवलदारांनी भारतात कामगारांच्या हक्कांचा पुरस्कार केला. त्यामागे त्यांचा स्वार्थी आर्थिक हेतू जरी असला तरी भारतीय मजुरांना आपल्या हक्काची जाणीव झाली. नगरमध्ये देखील कामगारांनी आपल्या वाजवी मागण्यासाठी कामगार संघटना स्थापून संपाचे हत्यार उपसले होते.

“सावेडी येथील सारडा विव्हींग मील मधील मजूरांनी महागाई भत्याची मागणी मान्य न झाल्याने त्यांनी कामगार संघटना स्थापना केली.”[124] कामबंद आंदोलन करुन आपल्या हक्कांची जाणीव मालकाला करुन दिली. यावेळी रावसाहेब पटवर्धन यांनी मध्यस्थी करुन हा संप मिटवला होता. कामगारांना त्यांनी न्याय मिळवून दिला होता.

“भेसळच्या कायदयान्वये बऱ्याच लोकांस दंड होऊ लागल्यामुळे येथील नगरच्या गवळ्यांनी एक सभा भरवून दूध रुपयास चार शेरच विकावे असे ठरविले होते.”[125] त्यासाठी १९४२ मध्ये गवळ्यांनी आपली संघटना स्थापन केली.

महायुध्दकाळात महागाई वाढल्यामुळे निर्भेळ दूध विकणे त्यांना परवडत नव्हते. त्यावर सरकारी कारवाईचा बडगा होताच यावर पर्याय म्हणून गवळ्यांनी संघटनेव्दारे दूधाचे भाव ठरविले होते.

सारडा मील मधील संपाबाबत न्याय्य भूमिका घेऊन कामगारांचा संप मिटला होता. पण त्याच्या लगोलग 'आफाली' या औषध निर्मिती कंपनीत १९४३ साली ३०० कामगारांनी संप केला. अहमदनगर शहरातील आयुर्वेदाश्रम फार्मसी कारखान्याने नगर शहरात नव्हे तर सबंध महाराष्ट्रात औद्योगिक क्षेत्रात वरच्या दर्जाचे स्थान मिळविले होते. या कारखान्यातील कामगारांच्या सुखसोयीकडे जातीने लक्ष दिले जात होते. त्यांना मिळणाऱ्या हक्काच्या रजा, मिळणारी नियमीत पगारवाढ, प्रत्येक ऋतुमानाप्रमाणे बदलणारी कारखान्याचा वेळ, शिवाय वेळोवेळी होणारी आर्थिक मदत इ. सुविधा असूनही "कारखान्यातील कामगारवर्ग ठराविक कामगारांच्या चौकटीतून बाहेर पडू शकला नव्हता. या सबबीखाली कामगारांनी महागाई भत्त्यासंबंधी संप केला. पण त्यात त्याची महागाई भत्याची मागणी मान्य तर झाली नाहीच. उलट संप केलेल्या दिवसाचा खाडा भरुन द्यावा लागला."[126] आफालीतील कामगारांना प्रशासनाच्या कठोर वागणूकीतून आपण कामगार असल्याची जाणीव झाली. त्यामुळे कारखान्यातील सलोख्याचे वातावरण नष्ट झाले. त्यामुळे आफालीतील संपाच्या निमित्ताने मालक-कामगार संघर्ष ऐरणीवर आला होता.

"अहमदनगर येथील हमालांनी महायुद्धामुळे भडकलेल्या महागाईने मिळणारी मजुरी अपुरी आहे. ती दुप्पट मिळावी अशी व्यापारी वर्गाकडे मागणी करण्यासाठी १९४३ साली संप केला होता."[127] हा संप व्यापाऱ्यांनी तडजोडीने मिटविला. हमालांनी सुचवलेली दरवाढ मालकांनी मान्य केली होती.

"अहमदनगरच्या शिंप्यानी आपली संघटना १९४५ साली स्थापना करुन शिवणासाठी लागणारा पांढरा दोरा मिळत नाही तसेच शिवणाचा दर सार्वत्रीक एकच असावा यासाठी आपली संघटना स्थापन केली होती."[128] नामदेव को.ऑ.सोसायटी

१९१९ साली काकासाहेब गिते यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन होऊन या समाजाला आर्थिक हातभार लावत होती.  संघटनेमुळे त्यांना योग्य असा शिवणाचा दर मिळू लागला होता.

नगरी संस्कृतीची ध्वजा उंचावणारे ऋतुचक्र आता बदलू लागले. काळाचाही भरवसा नाही,असे अलिकडे लोक बोलू लागले  होते. नगरच्याच बाबतीत बोलायचे झाले तर गेल्या दोन दशकांच्या तुलनेत आता शहराचा चेहरा-मोहरा व राहणीमान बदलू लागले. कामात बदल होऊन जीवनाला थोडासा वेगही आला. पण सुधारणांचा वेग 'कासवाच्या गतीत' टिकून राहिल्याने पूर्वी मागे असलेली अनेक शहरे नगरला मागे टाकून सर्वांगिण प्रगतीत पार पुढे गेली. अशा अनेक महानगरात अनेक नगरकर मंडळी पूर्वीपासून स्थायिक होऊ लागली. काहींनी आपल्या कार्यकर्तृत्वाने बौद्धिक सामर्थ्याने मोठे नावही मिळविले आहे. ही मंडळी तेथेही स्वतःला नगरकरच म्हणवतात. नगरपासून दृश्य स्वरूपातील कोणताही लाभ दीर्घकाळ मिळत नसूनही त्यांचे नगरप्रेम आयुष्यभर कायम राहिलेले आहे. अशी ही 'कळवळ्याची दाटी' मोठे होण्यासाठी नगरकरांना बाहेर पडून आपले कर्तृत्व सिध्द करावे लागते. ही खेदाची बाब आहे. कापडबाजार, अर्बन बँक रोड, नवीपेठ, चितळेरोड, सावेडी अशा भागांत नवी मोठी दुकाने होऊ लागली.

बाजारातील गर्दी आली की व्यवहाराचे कलह आलेच. गर्दीचा कोलाहल हा अविभाज्य भाग मानला जातो. बाजाराला एक रीत असते, वळण असते. तेथील व्यापारी उलाढालींच्या स्पंदनांच्या नडीवरून शहराच्या प्रकृतीचा, प्रवृत्तीचा व विकासाचा आलेख काढता येतो. बाजारात वर्तमानाचा क्षण महत्वाचा असतो. भविष्याचा वेध घाईगडबडीतच घेतला जातो. इतिहासाचा विचार करायला तर कोणालाच वेळ नसतो. अशा या 'भरल्या बाजारी' मोक्याच्या ठिकाणी एकीकडे ग्राहकांना वस्तूंचे भाव सांगताना आपल्या इतिहास व परंपरेचा ठावही घेत राहणारी व्यापारी मंडळी खरोखरच नगरी संस्कृतीचा पाईक  आहेत.

१९६० नंतर अहमदनगर जिल्ह्यात ऊस उत्पादन वा साखर कारखान्यांचे जाळे विणले गेले. जिल्ह्याच्या अर्थशास्त्रात कापसाची जागा ऊसाने घेतली. ऊसामुळे पाटस्थळ भागातील शेतकऱ्यांची पत वाढली. कारखान्याचे वेतन व बँका, पतसंस्थांच्या कर्जाचा पैसा हातात खेळू लागला. त्यामुळे ग्रामीण भागात लग्नसराई अथवा सणावारला कापड खरेदी मोठ्या प्रमाणात करण्याचा रिवाज निर्माण झाला. पुढे हा विषय मोठेपणा अथवा प्रतिष्ठेचा झाला. नगरचा स्वस्तातला मस्त बाजार वा उधारी ठेवण्याची व्यापाऱ्यांची तयारी यामुळे अहमदनगरचा कापड बाजार केवळ जिल्ह्यातच नव्हे तर मराठवाडा, विदर्भ, नाशिक, पुणे, सोलापूर या भागातील ग्राहकांध्ये लोकप्रिय झाला. त्यामुळे नगरला बस्ता बांधायला लोकांच्या झुंडी येऊ लागल्या. सारडाने त्यांना विक्रीसेवेतील सुविधा व सेवा देत व्यवसाय वृद्धीची संधी साधली. हे झाले कापड व्यवसायाविषयी बांधकाम क्षेत्रातही नगरने कात टाकली. अहमदनगरला पूर्वापार दगड विटांची घरे चुना अथवा मातीत बांधली जात. बांधकामाच्या जवळच तात्पुरत्या स्वरुपाचा चुन्याचा घाणा बांधून जागेवरच मिश्रण तयार करत. विटांच्या भट्ट्या सीना नदी काठावर, बुरूडगाव, सावेडी इत्यादी शहराबाहेरील भागात असत. चांगली मळलेली चुना-वाळू ही भक्कम बांधण्यासाठी उत्तम असे. १९७५ नंतर सिमेंटचा वापर सर्रास सुरु झाला व नगरचे वैशिष्ट्य असलेले चुना घाणे बंद पडत गेले. तशीच इतिहास जमा होण्याची वेळ नगरी तांगे, रस्त्यावर सूत रंगविण्याचा हातमाग व्यवसाय, तालमी व कुस्त्या, नगरी पाहुणचार नगरी बोली यावरही आली आहे. तरीही सहिष्णू व सर्वसमावेशक नगरी संस्कृती यंत्रयुगात अबाधित राहिली. पण आताच्या काळात संगणक युगाचे रीतीरिवाज व बदलती मुल्ये यांच्या आक्रमणात तिचा टिकाव कसा लागणार ? ही चिंतेची बाब वाटते. पूर्वी नगरच्या बाजारपेठा तांबी पिताळीची भांडी हातमागाचे कपडे व धान्यासाठी प्रसिध्द होता. स्वातंत्र्यप्राप्तीच्या दोन दशके अगोदर अहमदनगरचा बाजार अनेकविध वस्तूंनी बहरला. अहमदनगरच्या बाजाराने आधुनिकतेकडे वाटचाल सुरु केली आहे. पारंपारिक व्यवसायांनी आपले स्वरुप बदलले. त्या व्यावसायांची व्याप्ती, आकार, स्वरुप मोठ्या

प्रमाणावर बदलले. जुने कापड व्यवसाय अत्यंत भव्य झाले. 'कोहिनूर', 'सारडा', 'गुंडू साडी' ही कापड व्यवसायातील अहमदनगरची ओळख बनली. खेड्यातून येणारे अमाप धान्य नगरच्या मुळ बाजारात सामावले न गेल्याने 'मार्केट यार्ड' नावाची नवी बाजारपेठ निर्माण झाली. अशा प्रकारे अहमदनगरने आपली पारंपारिकता जपत आधुनिकतेकडे झेप घेतली.

## संदर्भ सूची


[1] मिरीकर या.न., अहमदनगर शहराचा इतिहास, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, १९३०, पृ,२४

[2] उपरोक्त, पृ.२४

[3] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१७, अंक-१५, १८५८, पान-२२९

[4] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-२, अंक-६, १८४३, पान, पृ-८५-८८

[5] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-२, अंक -१२, १८४३, पान, पृ-१८७-१८८

[6] ह्यूम आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ६, अंक १४, १८४७, पृ.२०६

[7] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१७, अंक-३, १८५८, पृ-३५-२८

[8] ह्यूम आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ६, अंक ९, १८४७, पृ.१२४-१२५

[9] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१७, अंक-३, १८५८, पृ-८१, ८४

[10] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१७, अंक-६, १८५८, पृ-८१-८४

[11] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१७, अंक-१३, १८५८, पृ-१९६-१९७

[12] ह्यूम आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ११, अंक २४, १८५२, पृ.४०४

[13] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.६७

[14] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.१३७

[15] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.२४८

[16] उपरोक्त,पृ.१३५

[17] हेन्री बॅलंटाइन, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-४, अंक-६, १८४५, पृ-९२-९४

[18] हेन्री बॅलंटाइन, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-४, अंक-१८, १८४५, पृ-२८१-२८२

[19] ह्यूम. आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७, अंक २, १८४८, पृ.३२

[20] ह्यूम. आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७, अंक ८, १८४८, पृ.१२७-१२८

[21] ह्यूम. आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७, अंक ८, १८४८, पृ.१२८

[22] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१७, अंक-१३, १८५८, पान, पृ-२०३-२०४

[23] अहमदनगर गॅझेटीअर, पृ.३१५

[24] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.१०२

[25] अहमदनगर गॅझेटीअर, पृ.४७

[26] अहमदनगर गॅझेटीअर, पृ.२४९

[27] उपरोक्त, पृ.२९५

[28] उपरोक्त, पृ.२९५

[29] अहमदनगर गॅझेटीअर, पृ.२४४

[30] हेन्री बॅलंटाइन, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-४, अंक-१८, १८४५, पृ-२८५-२८७

[31] उपरोक्त, पृ.१७३

[32] ए.हेजन, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २१, अंक १६, १८६२, पृ.२४७-२५१

[33] ए.हेजन, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २१, अंक १८, १८६२, पृ.२७९-२८४

[34] ए.हेजन, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २१, अंक २०, १८६२, पृ.३१३-३१५

[35] उपरोक्त, पृ. ३१६

[36] शर्मा सुधीर, ज्ञानोदयाच्या पानातून महाराष्ट्राच्या प्रबोधनाचा मागोवा, अहमदनगर, १९९२, पृ. ३४

[37] टिळक ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ५९, अंक ११, १९०० पृ.८३

[38] उपरोक्त, पृ. ८३

[39] उपरोक्त, पृ.८७

[40] उपरोक्त, पृ.८८

[41] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ५९, अंक ११, १९०० पृ.१२७

[42] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ५९, अंक २२, १९०० पृ.१६६

[43] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ५९, अंक ४७, १९०० पृ.३७१

[44] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७२, अंक २८, १९१३ पृ. २२२

[45] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७२, अंक ३१, १९१३ पृ. २४७

[46] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७२, अंक १६, १९१३, पृ.१२५

[47] बोरा हेमराज, अहमदनगर जिल्हा व व्यक्ती-परिचय, भाग पहिला, अहमदनगर, १९५३, पृ. ९९

[48] उपरोक्त, पृ. ११६

[49] उपरोक्त,पृ.११७

[50] हेजन.ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७३, अंक १४, १८५९, पृ.१०९

[51] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७८, अंक ३७, १९१९, पृ. २९४

[52] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१०, पृ.क्र.१६५

[53] उपरोक्त, पृ.२१२

[54] उपरोक्त, पृ.१०३

[55] उपरोक्त, पृ.२१३

[56] उपरोक्त, पृ.२६३

[57] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-३, अंक-६, १८४४, पान, पृ-८७-८८

[58] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-३, अंक-८, १८४४, पान, पृ-११४-११६

[59] ह्यूम. आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ६, अंक १६, १८४७, पृ.२६३

[60] ह्यूम. आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ८, अंक ११, १८४९, पृ.२०२-२०३

[61] ह्यूम. आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ८, अंक २१, १८४९, पृ.४१५-४१६

[62] ह्यूम आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १२, अंक १२, १८५३, पृ.१९०-१९१

[63] एस.बी.फेअरबँक, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १३, अंक १२, १८५४, पृ.१९१-१९२

[64] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.१४३

[65] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.८८

[66] उपरोक्त, पृ.३७

[67] उपरोक्त, पृ.३९

[68] उपरोक्त, पृ.१४३

[69] उपरोक्त, पृ.७९

[70] उपरोक्त, पृ.१०६

[71] एस.बी.फेअरबँक, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १३, अंक १३, १८५४, पृ.२०८

[72] एस.बी.फेअरबँक, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १३, अंक १४, १८५४, पृ.२८७

[73] बोरा हेमराज, कुलकर्णी लक्ष्मण, अहमदनगर डिस्ट्रीक्ट डिरेक्टरी, प्रथम आवृत्ती,अहमदनगर,साल-

[74] १९५१, पृ.१०७

[75] उपरोक्त, पृ.१६५

[76] उपरोक्त, पृ.१६७

[77] उपरोक्त, पृ.१६६

[78] उपरोक्त, पृ.१६९

[79] उपरोक्त, पृ.१७०

[80] उपरोक्त, पृ.१७१

[81] उपरोक्त, पृ.१७३

[82] उपरोक्त, पृ.१७५

[83] उपरोक्त, ४४

[84] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ. क्र.१५

[85] उपरोक्त,४२

[86] उपरोक्त,४०

[87] उपरोक्त,४६

[88] उपरोक्त, ५०

[89] उपरोक्त, पृ.१०४

[90] उपरोक्त, पृ.१२१

[91] उपरोक्त, पृ.१३४

[92] ह्यूम आर. डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १२, अंक १३, १८५३, पृ.२११-२१२

[93] ए.हेजन, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १५, अंक ७,१८५६, पृ.११९

[94] निसाळ.द.रं.,संदेश, अहमदनगर, १६ जुलै, १९४२, पृ.९

[95] दर्डा राजेंद्र केसरी, पंचशताब्दी, विशेषांक, अहमदनगर, १९९०, पृ.३

[96] दर्डा राजेंद्र केसरी, पंचशताब्दी, विशेषांक, अहमदनगर, १९९०, पृ.१२

[97] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.१२

[98] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.१३

[99] मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१० पृ.क्र.१५

[100] उपरोक्त, पृ.५

[101] उपरोक्त, पृ.३

[102] निसाळ.द.र, संदेश, गुरुवार ता.२३ नोव्हेंबर सन १९४३, स्थळ - अहमदनगर, पान -४

[103] निसाळ.द.र, संदेश, गुरुवार ता. २३ नोव्हेंबर सन १९४३, स्थळ - अहमदनगर, पान -४

[104] निसाळ.द.र, संदेश, गुरुवार ता. २७ एप्रिल सन १९४४ , स्थळ - अहमदनगर, पान -३

105 उपरोक्त, पृ.३

106 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, १ जून, १९४४, पृ.३

107 उपरोक्त, पृ.३

108 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २२जून, १९४४, पृ.१०

109 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २९जून, १९४४, पृ.४

110 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २९जून, १९४४, पृ.३

111 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २९जून, १९४४, पृ.३

112 निसाळ.द.रं., संदेश,अहमदनगर, ७ डिंसे, १९३९, पृ.३

113 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, ७ डिंसे, १९३९, पृ.१०

114 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, १४ डिंसे, १९३९, पृ.९

115 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २० जुलै, १९४३, पृ.५

116 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २० सप्टें.,१९४३, पृ.२

117 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २७ सप्टें., १९४५, पृ.५

118 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २ मे, १९४६, पृ.६

119 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, ९ मे, १९४६, पृ.१

120 उपरोक्त, पृ.५

121 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २५ मे, १९४४, पृ.८

122 उपरोक्त, पृ.५

123 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २५ मे, १९४४, पृ.८

124 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, १६ मे, १९४६, पृ.२

125 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २३ मे, १९४६, पृ.८

126 निसाळ.द.र, संदेश, २३ नोव्हेंबर सन १९४३, अहमदनगर, पृ.४

127 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, ३ सप्टें., १९४२, पृ.९

128 निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २२ ऑक्टों., १९४२, पृ.३

## प्रकरण चौथे

# अहमदनगर शहरातील सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन

**प्रस्तावना**

अहमदनगरमधील सामाजिक परिवर्तन समजून घेण्यासाठी महाराष्ट्रातील धर्म क्षेत्रातील परिर्वतन, विविध सामाजिक व धर्मिक चळवळी, कामगार चळवळी, कला, शिल्प, संगीत क्षेत्रातील परिवर्तने केव्हा व कशी झाली, याचा मागोवा घ्यावा लागतो. परिवर्तनासाठी 'प्रबोधन' हा शब्द रुढ अर्थाने वापरला जातो. प्रबोधन हा शब्द सत्वशोध व जागृतीचा परिचायक आहे. एकदा आत्मचिंतनाची दिशा लाभली म्हणजे तर्क बुध्दीवर घासून पाहिले की, ग्रंथप्रामाण्य नाकारण्याची क्षमता येते. यातून नविन समाजनिर्मितीची उर्जा जन्म घेते. या दृष्टीने प्रबोधनामुळे बुरसटलेले विचार, मागासलेपणा, समाजातील दोष नष्ट होऊन समाज पुन्हा गतिमान होतो. जागतिक इतिहास लक्षात घेतला तर प्रबोधन व पुनरुज्जीवन १५ व्या शतकात सुरु झाले. त्यामुळे इतिहासातून आधुनिक काळाच्या पाऊल खुणा दिसू लागतात. कातावलेल्या सापाने कात टाकावी व पुन्हा चैतन्यमय व्हावे तसे ब्रिटीश राजवटीच्या परकीय जोखडाखाली महाराष्ट्राने राजकीय, सामाजिक, धार्मिक जीवनाची अवरुध्द झालेली गती पुन्हा प्राप्त केली. मात्र या संजीवनीचा आरंभ ब्रिटीश कालखंडातील शिक्षण व आधुनिक पाश्चात्य विचारसरणी, राज्यप्रणाली, वैज्ञानिक दृष्टीकोन, इंग्रजी भाषेतील विद्वानांचे जागतिक कीर्तीचे व नवी दृष्टी देणारे साहित्य यामुळे झाला. या संपूर्ण परिवर्तनातून महाराष्ट्राचा जसा आधुनिक चेहेरामोहरा निर्मित झाला, तसाच अहमदनगराचा चेहरामोहरा बदलून नगरच्या इतिहासालाही वेगळे वळण लागले.

सामाजिक जीवन म्हटले की त्यात कुटुंब, जाती, वर्ण, परंपरा, सामाजिक दर्जा, संस्था, स्त्री-जीवन, जीवनाचे आधार, इ. चा अभ्यास येतो. तसेच समाजरचना, शिक्षण, परंपरा, चालीरिती, रुढी परंपरा आणि संस्कृती इ. मुद्यांचा विचार करावा लागतो.

न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडेंनी राजकीय हक्क प्राप्त करुनच चांगली समाजरचना उभी करता येते असे सांगून त्यासाठी धार्मिक आधारांना महत्व दिले. त्यांनी समाजकारणाचा व समाजसुधारणेचा पहिला प्रबल विचार मांडला. त्यापूर्वी त्यात इतकी स्पष्टता व धार नव्हती. या प्रकरणात अहमदनगरचे परिवर्तन महाराष्ट्राच्या परिप्रेक्षातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## १९ व्या शतकारंभीचे समाज जीवन

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला जातीसंस्था कठोर होती. जातीनिर्बंध प्रभावीपणे पाळले जात होते. ग्रंथप्रामाण्य व परंपरागत जोपासलेले कनिष्ठतेचे विचार बुध्दिप्रामाण्याला थारा देणारे नव्हते. आध्यात्मिक व धार्मिक विचारात अंधश्रध्दा, रुढीपालन यावर भर होता. समाज बहिष्कार टाकेल, या भीतीने अस्पृश्यता पाळली जात होती. स्त्रियांची स्थिती करुणाजनक होती. हे स्पष्ट करण्यासाठी ज्ञानोदय वृत्तपत्राचा आधार घेतला आहे.

१८३१ साली अमेरिकन मराठी मिशनचे मिशनरी अहमदनगरमध्ये आले. आपल्या विचारांच्या प्रसारासाठी त्यांनी २० जून १८४२ रोजी ‘ज्ञानोदय’ या वृत्तपत्राचा पहिला अंक छापला. त्या अंकात ज्ञानोदयकर्त्यांनी आपला उद्देश पुढील प्रमाणे मांडला. "मुंबईस बहुत वर्षांपासून वर्तमानपत्रें मराठी भाषेंत छापीत आहेत. परंतू ती घेणारे इकडे बहुतकरुन थोडकेच आहेत. नगरांत जर वर्तमानपत्र छापीलें तर येथील आणि दुसऱ्या गावातील बहुत गृहस्थ घेतील असें समजून अमेरिकन मिशनरी लोक हा ज्ञानोदय छापूं लागले आहेत. यांत अनेक प्रकारच्या विद्या म्हणजे भूगोलविद्या, ज्योतिषशास्त्र, सिध्दपदार्थ विज्ञान आणि बखर अशा प्रकारणांच्या गोष्टी आणि ह्या देशाचें व इतर देशाचे वर्तमान आणि विशेषकरुन अहमदनगरसंबंधी मजकूर छापावा असा बेत आहे. आणि जर कोणी नगरांतील लोकांना कांही मजकूर जाहीर करावयाचा असेल किंवा लोकांचा धर्म, नीति, चाल वगैरे यांविषयी आपले मत सांगावयाचे असेल तर या

वर्तमानपत्रावरुन सांगण्याची सोय होईल. परंतू ज्या केवळ अयोग्य गोष्टी आहेत त्या पत्रकरता छापणार नाहीं. हे पत्र दर महिन्यांत एकवार छापले जाईल. एकेक पत्र या सांच्याची सोळा पृष्ठे होतील. एकेक पत्राला दोन आने किंमत पडेल." (२० जून १८४२, पृ.१)

अशी भूमिका स्वीकारुन ज्ञानोदयने आपले कार्य सुरु केले. हे एक ख्रिस्ती नियतकालिक आहे व शुभवर्तमान प्रसारासाठी केवळ सुरु करण्यात आले आहे. असे सुरुवातीस लोकांना वाटू लागले, यावर प्रा. गं.बा. सरदार केसरी वर्तमानपत्रात म्हणतात, "ज्ञानोदय ख्रिस्ती नियतकालिक आहे असे म्हणतात, ते बरोबर नाही...... त्यात कितीतरी इतर माहिती आलेली आहे. ती बिनचूकपणे देण्याच्या बाबतीत आपण त्या संपादकांना आणि त्याहीपेक्षा इंग्रज किंवा अमेरिकन मंडळींच्या संशोधनवृत्तीचे खरोखर कौतुक केले पाहिजे...... महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास लिहायचा असेल तर 'ज्ञानोदय' शिवाय दुसरे साधन नाही."

वि. का. राजवाडे प्राथमिक साधनांना संशोधनाचा आत्मा मानतात. खुद्द राजवाडेंनी सामाजिक इतिहासाच्या दृष्टीने ज्ञानोदयाचे अंक महत्वाचे असल्याचे सांगितले आहे.

ज्ञानोदय हे फक्त ख्रिस्ती आहे म्हणून त्याची अवहेलना करण्यात अर्थ नाही. आपल्यासमोर आलेले वस्तुनिष्ठपणे - तटस्थपणे त्याची चिकित्सा करुन आपल्या प्रगतीला ग्राह्य असेल ते स्वीकारले पाहिजे असे गं. बा. सरदार म्हणतात. हाच धागा पकडून ज्ञानोदयमधील अनेक उतारे तत्कालीन भाषेचे सौंदर्य बिघडू न देता जसेच्या तसे आवश्यकतेनुसार घेतले आहेत.

**रुढी व परंपरा**

"हिंदु स्त्रियांनी जोडे घालणे किंवा छत्र्या वापरणे ही केवळ मर्यादा आहे. या चालीचा धर्माशी काही संबंध नाही. या संदर्भात रमाबाईंनी महाभारतातील स्त्रियांचा दाखला इंदुप्रकाशात दिला होता. "अहमदनगरात सवती मत्सरापायी वडिल बायकोने अफू

खाऊन आत्महत्या केली. पुणे वैभवकर्ते, महाराष्ट्र मित्र वर्तमानपत्रांच्या मते स्पेनच्या विधवा राणीने आमच्या विधवा बादशाहिणीस एक विधवेची टोपी जुबिलीत नजर पाठविली. तिकडे तरी विधवांची टोपी निराळी असतेच मग आमच्या कुंकु पुसण्यास हसावयास नको. सती जाण्याचीच एक शेवटची श्रेष्ठ पायरी यात गोवली नाही हेच महत्वाचे."[1] वऱ्हाडप्रांती तरुण विधवा मुलीची लाज राखण्यासाठी तिच्या बापास तिचे संमतीने तिजला विषप्रयोग करुन ठार मारावे लागल्याबद्दलचा हृदयद्रावक खटला कोर्टापुढे आला.

अहमदनगरच्या रेल्वे स्टेशनचे हेड क्लार्क सान्ना अंबोजीची बावीस वर्षाची कन्या लक्ष्मीबाई सती गेली. 'शारदा' कायदा अस्तित्वात असूनही बरेच विवाह होतात. कारण हा कायदा अंमलात आणण्यासाठी जी दगदग करावी लागते, जी जबाबदारी अंगावर घ्यावी लागते ती घेण्यास लोक पुढे येण्यास तयार होत नाहीत. सरकारी अधिकारीही याबाबत उदासिन असतात. अहमदनगरच्या जिल्हा मॅजिस्ट्रेटच्या सतरा वर्षाच्या जावयाने पुन्हा १० वर्षाच्या मुलीशी दुसरा विवाह करण्याचा घाट घातला. त्याबद्दल मनाई हुकुम देण्यास नाकारले. मॅजिस्ट्रेटने निकालात म्हटले की, " बालविवाहास प्रतिबंध करावा हा शारदा कायद्याचा हेतू असला तरी जावयाचे दुसरे लग्न आपल्या मुलीच्या हितास बाधक होईल म्हणून अर्ज करण्यात आलेला असल्याने मनाई हुकुम देता येत नाही". केवळ तांत्रिक अडचणींमुळे बालविवाह रोखता आला नसला तरी आपल्या सद्हेतूबद्दल ग्वाही म्हणून काही रक्कम कोर्टाकडे अनामत ठेऊन एकही सुधारक वृत्तीचा माणूस बालविवाह प्रतिबंध करावा म्हणून पुढे आला नाही. अशा स्थितीत ग्वाल्हेर संस्थानने एक ‘बालविवाह प्रतिबंधक मंडळ’ स्थापन केले ही अभिनंदनाची बाब होती. ही सर्व उदाहरणे भारतीय समाज जीवनाचे दर्शन घडवते. याला जोड अंधश्रध्देची होती.

रुढी व परंपरांचा पगडा अहमदनगरमध्ये व एकूणच महाराष्ट्राच्या समाजजीवनावर दिसून येतो. विशेषत: स्त्रियांबाबत रुढींचे पाश अधिक जाचक दिसतात. स्त्रियांच्या चप्पल व छत्री वापरण्यावर निर्बंध दिसतो. याबाबत धर्माचे राजकारण पुढे केलेले आढळते.

तथापि पंडिता रमाबाईंनी त्याला विरोध केलेला आहे. पुरुषांच्या बहुपत्नीकत्वाला संमती असल्यामुळे स्त्रियांचे सामाजिक स्थान अधिकच खालावलेले दिसते. मात्र याबाबत खंत करण्याऐवजी सवतीमत्सराच्या घटनांकडे दुर्लक्ष केले जात होते. उलट आपण विधवा स्त्रियांना जी वागणूक देतो. तिचे समर्थन करण्याकरता परदेशात देखील विधवा स्त्रियांना काही वेगळी वागणूक दिली जात होती, याची दाखले स्थानिक वर्तमानपत्रकरते लोकांपुढे मांडीत होते. बालविवाहाची प्रथा रुढ होतीच. शारदा कायदा झालेला असूनही बालविवाहाचे प्रमाण मोठे होते.

**आरोग्य व अंध्दश्रध्दा**

"पटकीने नगरमध्ये ६३ मृत्यू तर तालुक्यात ११०० मेले.पटकी पापामुळेच होते असे लोक समजतात. काहीना वाटते इंग्रजी राज्यामुळेच पटकी येते. देवीचा कोप शांत करण्यासाठी मरीआई वाजत-गाजत मिरवून पूजा करतात. पण होम व पूजा हा उपाय व्यर्थ होय. आंबे, मेजवानीचे पदार्थ यांतून हा रोग होतो. मांगणीची पूजा हा मुर्खपणा असतो. भुतांचे भजनही अयोग्य होते."[2] आरोग्याबाबतही अंधश्रध्दा प्रबळ होती. अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांची कारमीमांसा न करता ते आजार देवाधर्माशी जोडले गेले. पश्चाताप करा व खऱ्या ईश्वरास शरण जा असे मिशनरी सांगत असत. अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न करुन ते आरोग्याचे प्रश्न सोडवत त्याचबरोबर धर्मप्रचार ही करत असत.

ग्रहण हा देवाचा क्रोध आहे. राहू ग्रहांना पीडा करतो अशी पारंपारिक समजूत होती. प्रार्थना, देवधर्म, दान, उपवास, स्नान, ही सर्व कृती अगदी अज्ञानमूलक होती. खगोलशास्त्रज्ञांना ग्रहणांचा उपयोग करुन सृष्टीचे नियम समजावून घेता येतात. ग्रहण म्हणजे छाया असून त्याला भिण्याचे कारण नाही. असा अंधश्रध्दा निर्मूलनाचा प्रयत्न करत असत.

देवळाचा गुरव देवीच्या उत्सवात डोक्यावर भळदे घेऊन नाचतो. निराकार देव अंगात येणे शक्य नाही. ही तर फक्त पोट भरण्याची विद्या होय. अशाने देवाचा अपमानसुध्दा होतो.

वाखा सुरु झाल्यावर गावकरी वनभोजनासाठी जातात. मरीआईस निवद अर्पितात. पोलिस पाटील दवंडी पिटवून मरीआईची पूजा करण्यास सांगतो. मरीसाठी भात व टोणगा ठेवतात. मांगणीच्या अंगात येऊन ती रक्त मागते. श्रोत्यांपैकी एकाने तिची परीक्षा पाहिली. तेव्हा तिने चिडून गावाची राखरांगोळी करण्याचा शाप दिला. असल्या ढोंगाला भिणारे गावकरी अज्ञानी व भोळे होते. बळी देऊनही वाख्याचा झपाटा वाढतच होता.....मरीची शांती करण्यापेक्षा औषध घ्यावे. असे मिशनरी सुचवत असत.

श्रावणी पौर्णिमेच्या या दिवशी हिंदू लोक पंचगव्य पिऊन प्रायश्चित करतात. त्यायोगे पाप पळून जाते. अशी त्यांची श्रध्दा होते. संध्याकाळी राखी नावाचा दोरा मंत्र म्हणून बांधतात. नारळी पौर्णिमेस समुद्रामध्ये नारळ टाकतात. समुद्र अनुकूल होण्याकरिता हे अर्पण करतात.

पुण्यात वैद्यापेक्षा देवऋषी जास्त होते. अज्ञान बायका व नासमज लोक यांना ते नादी लावतात. त्यांच्या अंगात देवाचे प्रखर वारे येते. ते वेड्याप्रमाणे चाळे करु लागले की, त्यांच्यासमोर लिंबू, सुया, उडीद वगैरे ठेवावे लागतात. लोक प्रश्न विचारतात, त्यांना भुताची बाधा झाल्याची थाप मारुन पैसे उकळतात. कोंबडी, नारळ, उतरुन टाकण्याचे ठराविक उपाय सांगतात. देवऋषी लोक भुतास पकडून कैद केल्याच्याही गप्पा मारतात. परंतु हे सर्व अज्ञानाचा गैरफायदा घेणे होय.

मंत्राच्या योगाने परमेश्वर ब्राम्हणाच्या स्वाधीन झाला, असे लोक मानतात. वीरदेव अनुकुल करण्याकरिता ते ढोलकी वाजवून मंत्र म्हणतात. हाडे, तांबडी फुले, औषधी, यांचा पसारा मांडतात. गारुडी व मांत्रिक हे सिध्दसाधक असतात. लिंबू खाऊन रक्त ओकण्याचा देखावा करतात. असल्या खडबुडावर विश्वास ठेवणे हे अज्ञान होय.

त्यांची जादू  व्यर्थच नाही, तर दृष्ट होते. असल्या कुविद्येचे कोणी भय धरु नये. एक माणूससुध्दा त्यांच्या विद्येने मरणार नाही.

जुने लोक अज्ञानदशेत होते.यांत्रिक सुधारणा हा त्यांना बिघाड वाटतो. सामाजिक सुधारणा ही अनिती व भ्रष्टाचार वाटतो. प्रत्येक गोष्टीवर कलियुगाचा शिक्का मारतात. यंत्राने माणसे उपाशी मरतील. छापखान्यामुळे कारकून बेकार होतील. धर्म आणि कर्म अगदी बुडाले, असे ते म्हणतात.

एखाद्याने मोहतर लावला, तर कुटुंबवत्सल लोक येत नाहीत. रंडके म्हातारे तेवढे येतात. ब्राम्हणही उरफाटे मंत्र म्हणतो. शिवाय मोहतराची बायको चैत्र महिन्यामध्ये घरी आणू नये, असेही नियम होते. तरी या गोष्टींविषयी नीट विचार व्हावा.

मांत्रिक लोक आजाऱ्यावर लिंबू, शेंदुर, असल्या वस्तूंचे प्रयोग करतात. करणीच्या कथा सांगून पैसा उकळतात. ते लबाड, ठक आणि व्यभिचारी लोक होते. यापेक्षा विद्यानिपुण डॉक्टरांकडून औषध द्यावे.

पूर्वजन्मीच्या पापकर्माचा परिणाम म्हणून रोग उत्पन्न होतात. या “रोगाच्या निरसनासाठी शास्त्राने देवपूजा, शांती, जप, दान, ब्राम्हणभोजन ही औषधे सांगितली होती. क्षयरोगासाठी सुवर्णदान, पंडुरोगासाठी भूमिदान, गर्भपात व जलोदर रोगास अन्नदान, अतिसारावर देवळे बांधणे, वायुरोगाकरिता भूमीचे दानधर्म, भगंदराकरिता सुवर्णदान, असे अनेक उपाय हिंदूच्या शास्त्रीने सुचविलेले होते.”[3] विविध आजार, भौगालिक बाबी, ग्रहमानासारख्या घटना यामागील कार्यकारणभाव न समजल्यामुळे लोक अंधश्रध्दांच्या आहारी जात. देवीचा कोप, पूर्वजन्मीचे पाप अशा कारणांवर विश्वास ठेवीत. यातून मांत्रिक, ब्राम्हण पुरोहित यांना महत्व प्राप्त होत गेल. वैद्यकाचा आश्रय घेण्याऐवजी तंत्रमंत्राचा लोक आधार घेत याबाबत मिशनऱ्यांचे सुधारणावादी विचार लोकांना पटत नसत. एकूणातच लोकांच्या मनावर रुढी, परंपरांचा पगडा दिसतो.

कर्नल स्लीमनला असे आढळले की, गव्हावर कीड पडली की, तिचे कारण म्हणून इंग्रजी राज्यातील व्यभिचार असे दिले जाते. गोवधामुळेच परमेश्वर रागावून पीक

नष्ट करतो. म्हणून गुजराथी लोकांनी गोवधबंदीचा अर्ज केला. गव्हाची कीड घालविण्यासाठी शेतकरी पागर घेऊन शेताभोवती प्रदक्षिणा करतात, हा भोळेपणा होय.

भाडा गावी एका विधवेने पतीच्या प्रेताबरोबर स्वत:स गाडून घेतले. शापाच्या भीतीने इतर लोकांनी तिला विरोध केला नाही. तिच्या नातेवाईकांना कायद्यानुसार दंड करण्यात आला.

"मुलगी शिकली, तर तिच्या भावी नवऱ्याचे आयुष्य कमी होते. अशी नेटिवांची समजूत होते. शिवाय स्वैराचाराची भीती होती. मनुस्मृतीने स्त्रीला सामाजिक अधिकार नाकारला. स्त्री जात्याच पापी. असे मनूला वाटे. मिशनऱ्यांनी १८२४ मध्ये प्रथम मुलींची शाळा घातली. दोन वर्षांत ९ शाळा चालू लागल्या. २०४ मुली होत्या. आता मुलीचे शिक्षण व्यवस्थित चालू होते. शिवणे, विणणे, गाणे, हे विषयही शिकविले जातात. साहेब व मडम उत्साहाने शिकवितात. स्वत: खर्च करतात. विद्येवाचून स्त्रियांची काही सुधारणा होणार नाही सुशिक्षित मुली"[4] लोकांच्या मनावरील अंधश्रध्दांच्या पगडयामुळे पिकांवरील रोगही राज्यातील व्याभिचारामुळे होतात असे मानले जाई. गोवधामुळे पाप लागते असे लोकांना वाटे. मनुस्मृतीतील विचार लोकांना खरे वाटत. स्त्री शिक्षणाला विरोध होताच. स्त्रियांनी सती जाणे, पतीसोबत गाडून घेणे मोठेपणाचे मानले जाई. या अंधश्रध्दांपासून लोकांना परावर्तीत करण्यासाठी मिशनऱ्यांनी मुलींसाठी शाळा काढून लोकांच्या मनातील भिती दूर करण्यासाठी पावले उचलली. या चांगल्या आया होतात. मिशनरी फार प्रीतीने व आर्जवाने शिकवतात. ख्रिस्ती शास्त्राने स्त्री-पुरुषांना समान मानले.

लोकांचे हित पहाणारा लिहितो की मरीचा उपद्रव झाल्यामुळे एका मांगणीने केळीच्या खांबाचे मंडपात बसून देवीचे वारे बोलावले. शेंदुर, लिंबाच्या डहाळ्या, फुले, असा थाट करुन एक हेल्या व चार बकरी समोर ठेवली. मांगणीस पातळे व चोळी देऊन देवीचा कोप शांत केला. मरीदेवीने खाजगीत कबूल केले की, वारे वगैरे सर्व खोटे असून

हा पोटाचा धंदा होते. वडलोपार्जित खोट्या समजुतीमधून लोकांची सुटका करणे अगत्याचे ठरते.

"कॉलरा झाल्यावर देवीच्या पूजेपेक्षा जितक्या लवकर रोग्यास औषध मिळेल, तितके चांगले असते. पण तसे न केल्याने केवळ देवीवर भाव ठेवल्यामुळे दहा लोकांमधून नऊ लोक तडफडून मरत. मुंबई इलाख्यात एकूण तेवीस हजार लोक पटकीने मेले."[5] कॉलराच्या भयंकर स्थितीतही लोक देवदेवकीवरच विसंबून असत. त्यामुळे नव्वद टक्के रुग्ण मृत्यु पावले तरी लोकांचा देवावरचा विश्वास ढळत नसे.

"महामारीचा भयंकर वाखा चाललेला होता. मूर्तिपूजक लाकडी मूर्तीस पातळे-चोळी नेसवून तिला कोंबड्याचा बळी देत. पाद्री लोक औषधे देतात, म्हणून मरीआई रागावून जास्त लोक मारते, असे ते बोलत. मरी आईच्या गाडीमधून दोन मेंढरे व सवा मण तांदूळ आणुन ते अज्ञानी लोक कोल्हारच्या यात्रेत देवीच्या नावाने अर्पण करत असत."[6] बहुतांश लोक कोळशाच्या बुकणीने दात घासत, पण त्यामुळे अनेकाना दंतविकार होत असत. मिठाने मात्र अपाय होत नाही, असे दंतवैद्याची मत असायचे. महामारीत लोकांचा मोठ्या प्रमाणावर बळी. मात्र वैद्यकीय मदत मिशनऱ्यांनी उपलब्ध करुन दिली तरी लोक ती स्विकारीत नसत. देवीच्या कोपाने महामारी होते. देवीच्या कोपाने महामारी होते, नैवेद्याने तिला शांत केले पाहिजे. मिशनऱ्यांचे औषध घेतल्यास देवीला आवडणार नाही. देवीचा कोप होऊन अधिक मनुष्यहानी होईल. अशी धारणा होती. "नगर येथे एक महिन्यात पाऊस नाही. पेरणी नाही, धान्य महाग झाले. पटकीने रोज १०-१५ तरी मरत होते. इस्पितळात औषधांची सोय होती, परंतु हिंदू लोक फार करुन औषधे घेत नसत."[7] आरोग्याविषयी पारंपारिक उपायच योजिले दिसतात. वैद्याचे मत विचारात न घेता वर्षानुवर्षे आचारणात आणलेले नियमच लोक पाळीत असत. ऐन दुष्काळात, पटकीची साथ असतानाही लोक वैद्यकीय उपचारांकडे पाठ फिरवत. इस्पितळ, औषधे यावर त्यांचा विश्वास नसे.

जालनापुरामध्ये ब्राम्हणांनी पत्नी सती जाण्याची तयारी करु लागली. कोतवालाने सरकारच्या परवानगीचा हुकुम मागितला. अधिकारी रसेलने मिरवणूक अडवली. धर्मात हात घालू नये, असा कांगावा करुन हिंदू निषेध करीत होते. स्त्रीचा निश्चय पक्का होताच. म्हणून साहेबाने सर्वांनाच अटकावून ठेवले. लष्कराची मदत घेऊन प्रेतदहन केले व स्त्रीसह सगळ्यांना गावात धाडले. 'सतीचे दुष्टकर्म' पृथ्वीवरुन अगदी बंद होवो ही ईश्वरास विनंती.

नेटिवात अंधविश्वास व शोधकता फार आहे,असे हिंदु धर्मशोधक पत्रात लिहितो. काशीची गंगा माहीमच्या विहिरीत प्रगट झाली, यावर ते विश्वास ठेवतात. कोणीतरी पाण्यात राख टाकून गंगा तेथे आल्याचा भास निर्माण केला होता. लुच्चड लोकांच्या लबाड युक्तीने लोक फसतात. अनेक ठिकाणी जमिनीतून झरे वाहतात. राजपूरची गंगा हाही असाच प्रकार होय. इंग्लंड व फ्रान्स देशांतही असे नैसर्गिक चमत्कार दिसतात. एसलंडमध्येही गरम पाण्याचे झरे आहेत. जो खरा विचार करणारा आहे त्याला त्यातला फोलपणा समजतो.

न्यायवादी लिहितो की शुद्राने ख्रिस्ती धर्म स्वीकारला तर ब्राम्हण लोक त्याचा विटाळ मानीत नाहीत. एरव्ही सालीचाही विटाळ मानितात. हे लोक व्यक्तिगत पात्रतेपेक्षा जात महत्वाची समजतात. काही ब्राम्हण चांभाराच्या घरी जेवले त्यांचा वंशच वाळीत पडला असून त्यांची आता वेगळीच जात झाली. पूर्वीच्या ऋषींची कर्मे काही वेळा चमत्कारिक वाटतात तरी त्यांचे ब्राम्हणत्व मात्र कायम राहिले हे आश्चर्य आहे.

“मुलगी आठ वर्षाची झाली की तिला थोर समजून तिचा विवाह करतात. याने तिचा नाश होतो. तिला कामसुख मिळत नाही. उभयता व्यभिचारी बनतात. म्हणून मुलीची विवाह मर्यादा १६ वर्षे ठरवणे जरुर आहे.”[8] स्त्रियांबाबत अनुदार दृष्टिकोन प्रत्ययास येतो. सती सारख्या भयानक प्रथांचा पगडा लोकमानसावर होता. अशा अघोरी प्रथांना मानसिक व सामाजिक दबावामुळे स्त्रियाही शरण जात. सती जाण्यास तयार

होऊन बालविवाहासही लोकांची संमती होती. कितीही समजावले तरी संमती वयाचा कायदा लोक पाळीत नसत.

**जातीयता**

“जातीभेद हा सुधारणूक आणि कल्याण यांतील सर्वात मोठा अडथळा होता. उत्तम जातीचे लोक आपली उपजीविका बुडू नये म्हणून ही रीत चालू ठेवतात. राज्य चालविणे व पराक्रम करणे असेल, तर सर्व जाती समान हव्यात. नदीच्या वाहत्या पाण्याप्रमाणे समानतेतच गुणांना वाव मिळतो. सद्‌गुण व मेहनत यांजकडून सन्मान व पदवी मिळते. युरोपात पाथरवट व लोहारही चांगले शिक्षण घेऊन मोठ्या पदवीस चढतात.”[9] जातीव्यवस्था लोकांच्या रक्तात भिनलेली होती. युरोपमध्ये जातीव्यवस्था नष्ट झाली असली तर महाराष्ट्रात मात्र जातीयतेचा प्रभाव होताच.

“सोलापूरजवळ माढा या गावी नाना सराफाचे घर पावसामुळे पडले. घरात पेवाजवळ त्याची विधवा बहीण व इतर माणसे झोपली होती. नानाने शुद्र नोकरांकरवी त्यांना बाजूस काढले. बहीण मृतावस्थेत होती. तिच्या अंत्यविधीच्या वेळी ती सकेशा असल्यामुळे तिच्या प्रेतास इतर ब्राम्हणच काय, पण स्वत: नानाही शिवेना. नापिकांनी केस काढण्याचे नाकारले. मग शुद्रकडूनच तिची उत्तरक्रिया करण्यात आली. हीच स्त्री लग्नसमारंभात वावरली तेव्हा सर्व ब्राम्हण भोजनासाठी हजर होते. अशा दुराभिमानामुळे आणि दुष्कर्मामुळेच ब्राम्हणांची दशा झाली होती.”[10]

"मुंबईस डॉ. गोपाळ शिवराम, डॉ.आण्णा कुंटे यांनी बाईचे पोट चिरुन ९ महिन्याचे मुल जिवंत काढले ही महाराष्ट्रातील पहिली कठीण शस्त्रक्रिया (१८८१) यशस्वी झाली, पण बाई मृत पावली. दायीणीकडून बाळंतपण केले जात असे, परपुरुषाला शरीर दाखवायचे नाही अशी परंपरा होती. बाया बाळंतपणात मरत.”[11] स्त्रियांचे आरोग्यविषयक प्रश्न अधिक जटील होते. पुरुष वैद्याकडून मग तो भारतीय असला तरी उपचार घ्यायचे नाहीत. या नियमामुळे स्त्रिया अनेकदा मृत्युमुखी पडत.

## विवाह व विधवा पुनर्विवाह

"शाळाखात्यात इन्स्पेक्टर असताना भास्कर दामोदर नगरला आले. त्याची विव्दत्ता, इंग्लिश भाषण व लेखन पाहून सर्वजण त्याची तारीफ करीत. कायदेमंडळाकडे विधवांच्या पुनर्विवाहाकरिता त्याने अनेक लोकांच्या सहयांचा अर्जसुध्दा पाठविला होता. याच रावसाहेबांनी लहान पोरीशी दुसरे लग्न केले. मुंबईतील पुनर्विवाह उत्तेजन मंडळीचे ते अध्यक्षही होते. आणखीही दोघा स्वदेशसुधारकांनी अशीच लहान पोरीशी लग्ने केली म्हणतात. यांच्याकडून या हतभाग्य देशाची सुधारणा कधीच नव्हती."[12] स्त्री व पुरुष यांच्यासाठी वेगवेगळी सामाजिक नियम आढळतात. पुरुषांबाबत बहुपत्नीकत्व असले तरी स्त्रियांना मात्र पुनर्विवाहाची परवानगी नव्हती. या विषयावर काम करुन इच्छिनारेही अंतिमत: सामाजिक रेट्यामुळे माघार घेत असत.

रंगुबाई व बाळाजी रघुनाथ या ब्राम्हणी जोडप्याचा पुनर्विवाह झाला होता. "तिच्या आईने ब्राम्हणांच्या सल्ल्यावरुन तिचे केशवपन म्हणजे गंगाविधी करावा असे ठरविले. याच सुमारास तिची बाळाजीशी ओळख झाली, तो पोलिसांचा पट्टेवाला होता. दोघांचा काही कुव्यवहार झाला. काही कारकुनांनीही तिला फितविण्याचा प्रयत्न करुन तसेच ठेवण्याचा घाट घातला होता. पण ती निश्चयाने बाळाजी बरोबर निघून गेली. नंतर बाळाजी परत अहमदनगरास आला. विष्णुपंतांनी त्याचे लग्न लावले. ब्राम्हणी राज्यात विधवा बाईस अतिशय क्रूर वर्तणुक मिळत असे."[13] अहमदनगरमधील बाळाजी रघुनाथ या युवकाने विधवा स्त्रीशी पुनर्विवाह करण्याचे धाडस दाखवले. हा विवाह बदलाचे चिन्ह मानला पाहिजे. त्याचबरोबर १८६४ मध्ये डॉ. अर्जुन सखाराम राऊत यांनी जयंतीबाई सावे या विधवेशी पूनर्विवाह करुन तिच्या कन्येसही स्विकारले. ही घटना नगरकरांच्या दृष्टीने बदलाची नांदी ठरली.

## धर्मांतर - १८६०

"बाट्ये हा शब्द रोजच्या बोलण्यात काही हलकट लोक वापरीत. पुढे सध्या संभावित पत्रकर्तेही वापरु लागले होते. या निंदय शब्दाने ख्रिस्ती लोकांना ताडन

करण्याचा त्यांचा हेतू असे.  खरे संभावित लोक हा शब्द वापरीत नसत. ‘देशी ख्रिस्ती’ असा शब्दच वापरीत. मुसलमानांना लोक व ख्रित्यांना बाट्ये म्हणत. पण एखादा हिंदु जर मुसलमान झाला, तर त्यालाही ही संज्ञा लागू पडायची नाही. शब्दकोशाच्या अर्थाप्रमाणे नीच जातीशी योनिसंबंध करणारा व अभक्ष्यभक्षण करणारा तो बाट्या होतो. मग जे ब्राम्हण असे वर्तन करतात, त्यांना हे नाम का देऊ नये ? ‘बाटावणे’ या शब्दाचा अर्थ नाणे बदलून घेणे एवढाच आहे. भ्रष्ट किंवा पतित असा त्याचा अर्थ होत नाही.”[14] लहान धातूवरुन मोठा शब्द होतो. म्हणून हा शब्द योजणे अयोग्य आहे, असे मिशनरीचे मत होते. तरी स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही ‘बाटे’ शब्द लोकांच्या तोंडी असे.

प्रत्येकास आपल्या धर्माप्रमाणे वागण्याचा अधिकार आहे, म्हणून यापुढे आम्ही ‘बाट्ये’ संज्ञा वापरणार नाही असे वृत्तपत्राने छापले होते. “हिंदू धर्माचा त्याग करणे, हे काही गाय कापण्याइतके दुष्कर्म नाही. ख्रिस्ती झालेल्यांना लोक धोंडे मारतात. त्यांची हुर्ये करतात, उपदेश करीत असताना त्यांचा पाठलाग करतात हे लाजिरवाणे असे कृत्य होय. आमच्या देशात अनेक पंथ, धर्म व जाती आहेत. स्वामीनारायण पंथात शेकडो लोक गेले. शाक्त तर इतके आहेत की, त्यांनी होर्मसजी पेस्तनजीच्या दुकानातील गावठी व इंग्रजी दारु महाग करुन टाकली.”[15] हिंदू धर्मातील पददलीतांनाही धर्मांतर करता येऊ नये अशी चिरेबंद धर्मव्यवस्था अस्तित्वात होती. धर्मांतरीतांना अपमानास्पद वागणूक देणे, 'बाटे' म्हणजे असे प्रकार नित्याचेच होते. कासम खाटकाच्या दुकानातला माल हातोहात खपतो आहे. मग एखाद्याचे खरे मतपरिवर्तन झाले, तर त्याला त्रास देणे अयोग्य होय.

**बालहत्या, बालविवाह, बालविधवा**

“ब्राम्हणातील विधवा स्त्रियांना जी दु:खे उत्पन्न होतात, त्यांवरुन विचारशील मनुष्याच्या मनात दया उत्पन्न व्हावी. सरकारने यात हात घातला, तर लोकांचे मनात आनंद होईल.”[16] अशा प्रकारे संपूर्ण भारतभर स्त्रियांचे प्रश्न एकूणच सारखे होते. प्रत्येक प्रांतात बालहत्या, बालविधवा यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारा समाज निर्माण व्हायला

सुरुवात झाली. स्त्रियांचे प्रश्न सोडवणे ही सरकारची जबाबदारी आहे. असे लोकांना वाटे. कारण रुढी परंपरा मोडण्याचे धाडस त्यांच्यात अजून आढळून आले नव्हते.

"बालविवाहजनित लाभालाभ" या अगत्याच्या विषयावर नगरमधील ज्ञानेच्छु सभेत वाद झाला. बहुसंख्य वक्ते बालविवाहास विरोधी होते. पण अध्यक्ष रा.अ.दुगल यांनी समारोपात कृष्णपक्ष धरला. मोठेपणी लग्न केल्यामुळे बायकांना मोळा लागत नाही. पुरुष दुर्गुणी होतात. सगळ्यांच्या स्त्रिया काही बालविधवा होत नाहीत. एखादी झालीच तर तो ईश्वरी संकेत समजून पुनर्विवाह करु नये, अशी मते प्रतिपादन करुन त्यांनी सर्वांना धक्का दिला. ते सुशिक्षित असून 'जागतीजोत' हे पुस्तक त्यांनी लिहिले. ते सुधारणेस अनुकुल आहेत, असा एक समज होता. पण म्हणतात की, प्रौढपणी लग्न पशुशील आहे. मुलीस ऋतुप्राप्ती झाल्यावर विवाह झाला, तर आधी प्रायश्चित दिले पाहिजे. या बोलण्याने भिक्षुक पक्षास मात्र स्फुरण आले. कारण अध्यक्षाचे मत, हेच सभेचे मत मानण्याची रीत होती. अध्यक्षांचे वागणे असभ्यपणाचे होते."[17] बालविवाह अयोग्य आहे. असे अहमदनगरमधील काही मूठभर सुधारकांना वाटे. मात्र बालविवाहाच्या पुरस्कर्त्यांची संख्या मोठी होती. अनेकदा सुधारक म्हणून प्रसिध्द असलेले सुशिक्षितही बालविवाहाला प्रोत्साहन देत. याचा प्रत्यय वरील घटनेतून येतो.

### महाराष्ट्रातील सामाजिक चळवळीची चाहूल व अहमदनगर

१९ व्या शतकाचा परिचय सुधारणांचे शतक म्हणूनच दिला पाहिजे. एके काळचा प्रगत संस्कृतीचा हा देश ब्रिटीश कंपनीचे साम्राज्य आले तेव्हा राजकीय व सामाजिक दृष्टया पोखरलेला होता. अनिष्ट परंपरांचे स्तोम माजले होते. महाराष्ट्रात मराठी सत्ता संपली पण लोकांना त्याचे दु:ख वाटत नव्हते. पुढील दोन्ही उद्‌गार महत्वाचे व बोलके वाटतात. एलफिन्स्टन म्हणतो,'सर्व स्तरांवर खोटे नाटे आहे. व्यभिचार व वेश्यागमन यांनी उच्च वर्गात आढळस्थान मिळविले आहे. जाती व्यवस्था हा प्रभावी समाजिक घटक बनला आहे.'

जेम्स डग्लसच्या मते, तत्कालीन शिक्षण दुरावस्थेला पोहोचले होते. पेशव्यांनी शिक्षण सुधारण्यासाठी कोणतेही भरीव काम केले नाही. त्याकाळी एकही श्रेष्ठ ग्रंथ निर्माण झाला नाही. सामान्य माणसाचा शिक्षणाकडे कल नव्हता व त्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे शिक्षण घेण्याची इच्छा नव्हती. महाराष्ट्रात १०० पैकी ९९ लोक अज्ञानी होते.

ब्रिटीशांनी आरंभीच्या काळात धूर्तता केली. "सनातनी, धार्मिक व सामाजिक प्रश्नांत हेतुपूर्वक दखल टाळली. पण १९ व्या शतकापासून नव्या युगाची चाहूल लागली. त्यात तीन बाबी प्रभावी ठरल्या. नवी शासन पध्दती, इंग्रजी शिक्षण व ख्रिस्ती धर्मोपदेशकांच्या धर्म प्रसाराला विरोध यामुळे ब्रिटीशाचे शांततेचे, स्थिरतेचे व सुखावह सुधारणाचे राज्य आले. दंगेधोपे, लुटालूट यांना आळा बसून शिस्तबध कारभार दिसू लागला. हे शासन आधुनिक जाण असलेले व जनतेला ईश्वरी वरदान वाटणारे होते. इंग्रजी संपर्कामुळे ज्ञान-विज्ञान, इंग्रजी शिक्षण, स्त्री शिक्षण व सामाजिक बदल व स्पृश्यास्पृश्य भेद, इत्यादी पासून समाजाची सुटका झाली. नव्या युगाच्या प्रेरणा ग्रहण करुन नविन सामाजिक जीवनाकडे लोक वळू लागले."[18] अहमदनगरच्या समाजाने आधुनिकीकरणाच्या दिशेने वाटचाल सुरु केली. यात महत्वाचा वाटा ब्रिटीशांनी दिलेल्या नविन शासनपध्दतीत आणि कायद्यात होता.

**कायद्याने जुन्या रुढीपरंपरांवर गदा – १८६० ते १९४७**

"अहमदनगर जिल्ह्यास येवले मुक्कामी गणपतीच्या दिवसात काही लोकांनी न्यायाधीश व कोर्ट यांचे सोंग आणले. या नकली न्यायाधीशाने एका वाण्यास सांगितले की तू आपले दुकान सेशन कोर्टासाठी रिकामे करु दे. परंतू काही साहेबांनी या मंडळींवर खटला भरला. कोर्टाच्या बेअब्रुवरुन २४ असामींना एकूण १ हजार रुपये दंड झाला."[19] रुढी परंपरावर भर असणाऱ्या अहमदनगरमध्ये कायद्याचे राज्य इंग्रजी अंमलामुळे स्थापन झाले. गंमत व चेष्टा म्हणूनही कायद्याची पायमल्ली गुन्हा ठरू लागली.

"मोहरमच्या सणात शांतता म्हणून जाहिरनामा निघालेला आहे. त्यानुसार ताबूत व पंजे मिरविणार दंगल करणार नाहीत. तमाशगिरांनी ते पाहाण्यास जावे. पण पळून दंगा करु नये. कोणतेही हत्यार कोणी जवळ ठेवले, तर त्यास अटक होऊन कैद होईल. १० व्या तारखेस सायंकाळी ६ च्या आधी सगळे ताबूत गावाबाहेर न्यावेत व घरी परत जाताना शांतता राखावी."[20] मोहरमसारख्या सणामध्ये ताबूत नाचविणे, पंजे मिरविणे अशा धर्माचारासोबतच दंगली भांडण, नशा पाणीही होई. इंग्रजी अंमलात मात्र यावर कडक निर्बंध आले. यामुळे सामाजिक वर्तन नियंत्रित झाले. हे अनुकूल परिवर्तन मानावे लागेल. कैफी व अंमली पदार्थांच्या दुकानदारांनी ९ व्या व १० व्या तारखेस दुकाने रात्री व दिवसा बंद ठेवावीत. वाघ वगैरे सोंग घेणारांना शिक्षा होईल, असे नियम जाहीर झाले होते.

**मद्यपान बंदी**

"मि.डायली यांनी लोककल्याणाकडे विशेष लक्ष पुरविले. नव्याने दारुच्या दुकानांच्या अर्जांसाठी कलेक्टर साहेबांनी परवाना १० रु. वरुन ५० रु. वर नेला. नवे परवाने दिले नाहीत. किरकोळ विक्रीवर बंदी घातली. तरी चोरुन हा प्रकार चालतोच. कलेक्टर साहेब लक्ष घालतील तर अवसे पुनवेस रस्त्याने होणारी धुमाळी व तंटेबंखेडे थांबतील. गरीबांच्या कुटुंबात अन्न, वस्त्र, पैसा यांना बरकत येईल. यावर ज्ञानोदय कर्ते लिहितात, मद्यपानाचे वेड सर्वच धर्मीयांमध्ये वाढते आहे, ब्राम्हणही पितात, सुधारलेले विव्दान लोक सुध्दा ही बिघडणुकीची मात्रा घेतात. जुगाराप्रमाणे मद्यपान बंदीचाही कायदा हवा."[21] व्यसनधीनता हा समाजजीवनातील मोठा दोष होता. इंग्रजी अंमलात कलेक्टरकडून यावर निर्बंध आणले गेले. जुगारावर व मद्यपानावर ही कायद्याने बंदी आली. यातून गरीबांना सामाजिक आर्थिकदृष्ट्या स्थैर्य प्राप्त झाले. परिवर्तनाला सुरुवात झाली.

**विवाह कायदा**

"या कायद्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी लग्नविधी करणाऱ्यांच्या सरकारने नेमणूका केल्या. अहमदनगर जिल्हा विभागात रे.एच.बालंतैन, हेजन, आबट, फेरबँक, बार्कर, ब्रूस, चेपिन हे अधिकारी नेमले. लग्नाची सर्टफिकेट देण्यासाठी अहमदनगरात विष्णू भास्कर करमरकर यांची नेमणूक केली."[22] विवाहाला कायद्याचे अधिष्ठान देण्याचा इंग्रजांनी प्रयत्न केला. लग्न विधी करणाऱ्यांच्या नेमणूका हा या प्रयत्नाचाच एक भाग होय.

**पुनर्विवाह कायदा**

"ख्रिस्ती लोकांच्या पुनर्विवाहाबद्दल सरकारने कायद्याचा मसुदा प्रसारित केला. धर्मांतरापूर्वी पती, पत्नी एकमेकांना मानावयास तयार नसतील तर पूर्वीच्या विवाहातून पूर्ण मोकळीक मिळेल. एक वर्षाच्या मुदतीत मत बदलले नाही तर घटस्फोट देईल. टाईम्स् ऑफ इंडिया वरुन समजते की, नगरचे जज्ज रिचर्डसन यांनी भिकाजी वल्लभ भुजाजी यास पहिली पत्नी काशी हिजशी १४ वर्षे संसार केल्यानंतर जाई नामे हिंदू स्त्रीशी विवाह केला. म्हणून एक वर्षाची शिक्षा दिली. त्याने सुटपत्रासाठी खूप प्रयत्न केले. पण कायदा आड आला म्हणून जाई हिजशी हिंदु पध्दतीने मोहतर लावला. आपण आता ख्रिस्ती धर्म सोडला व ख्रिस्ती पत्नीही सोडली, अशी जबानी दिली. हिंदू धर्मानुसार दुसरे लग्न करता येते याचा फायदा घेतला. पण न्यायाधिशाने व्यभिचारासाठी एक वर्षाची शिक्षा दिली."[23] ख्रिस्ती पुनर्विवाहाबाबतही असाच कायदा केला गेला तथापि बहुपत्नीत्वाच्या प्रथेच्या फायदा घेण्यासाठी ख्रिस्ती झालेली मंडळी ही पुन्हा हिंदू धर्माचा आश्रय घेऊ लागली. मात्र यावरही सरकार कायद्याने निर्णय घेऊ लागले. कायद्याचे आधारे विवाह संस्थेस स्थैर्य येऊ लागले.

**यात्रेविषयी ठराव - १८६९**

"सरकारने यात्रेविषयी नवा ठराव केला. यात्रेच्या ठिकाणी मैला व केरकचरा अजिबात साठू देऊ नये. पिण्याचे पाणी स्वच्छ राखावे, कपडे व जनावरे धुण्यासाठी

जागा नेमून द्यावी. पटकी फैलावणाऱ्या पदार्थांवर बंदी घातली. जत्रेच्या अगोदर जरीमरीची औषधे आणून गावपाटलाजवळ द्यावी. रोगींना बरे वाटेपर्यंत गावाकडे पाठवू नये. मृतांचे कपडे दुसऱ्याने वापरु नये. जत्रा फार जमू देऊ नये. यात्रेची आगाऊ बातमी सरकारला द्यावी असे सक्त नियम केले होते."[24] यात्रा जत्रा भरल्या की, साथीचा आजार वाढणे ही तर नित्याची बाब असे. याचे मूळ कारण म्हणजे अस्वच्छता याबाबत ही सरकारने नियम ठरवून दिले. लोकांच्या सामाजिक जीवन यामुळे नियंत्रित झाले.

**संमती वयाचा कायदा**

"संमती वयाचा पास केलेला कायदा हिंदुस्थान सरकारने रद्द करुन "राणीच्या जाहिरनाम्यातील धर्मात हस्तक्षेप न करण्याचे धोरण पाळावे" पार्लमेंटला मौलवी हिदायतुल्ला यांच्या अध्यक्षतेखाली अर्ज पाठविला."[25] इंग्रजांनी संमती व यांचा कायदा करुन अल्पवयीन मुलींना न्याय दिला. मात्र तो न स्विकारता लोक परंपरांना चिटकून राहण्याचा प्रयत्न करीत. राणीच्या जाहीरनाम्यानुसार सरकारने धर्मात हस्तक्षेप करु नये अशी भूमिका घेत. परिवर्तनासा प्रतिकूलता दर्शवणे एतद्देशीयांनी सोडले नाही.

**मुरळयांविषयी कायदा**

“मुरळ्या, देवदासी, जोगिणी, संबंधाने सरकारचा जाहिरनामा इंडियन पिनल कोडच्या कलम ३७२ प्रमाणे जो कोणी मनुष्य सोळा वर्षाच्या आतील वयाच्या अज्ञान मुलीस वेश्येचा धंदा करण्यासाठी विकून टाकेल व जे आईबाप, पालक, अज्ञान मुलींची लग्ने देवीशी लावून वेश्येचा धंदा करण्यास प्रवृत्त करतील, तसेच तो जो कोणी अज्ञान मुली विकत घेईल त्यास इंडियन पिनल कोड कलम ३७३ प्रमाणे गुन्हेगार ठरवून दहा वर्षापर्यंत सक्त मजुरीची सजा देण्यात येईल. ही वाईट चाल बंद पाडण्यासाठी प्रत्येक डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटने या कायद्याविरुध्द वर्तन करणाऱ्या संदर्भात योग्य अंमल करावा असे गर्व्हरनरने आदेश दिले होते.”[26] मुरळ्या देवदासी देवाला सोडण्याची प्रथा होती. या शोषणाला आळा बसावा याकरिता कायदा करुन इंग्रजांनी स्त्रियांचे जीवन सुसह्य केले.

**ब्राम्हणेत्तरांसाठी नोकरीतील जागा - १९२४**

सरकारी खात्यातील कारकुनी नोकऱ्या भरताना शेकडा ५० टक्के जागा ब्राम्हणेत्तरांना मिळतील अशी व्यवस्था सरकारने केली. "या ठरावाने ब्राम्हणेत्तरांचे समाधान होईल व काही वर्षापासून सुरु असलेला ब्राम्हण व ब्राम्हणेत्तर लढ्याची तीव्रता कमी होईल असा मुंबई सरकारचा हेतू होता."[27] नोकरी व अर्थार्जनाच्या संधी पुष्कळदा उच्चवर्गीयांपुरत्याच सीमित राहत असत. त्या सर्व समाजाला मिळाव्यात म्हणून इंग्रजांनी ५० टक्के जागा ब्राम्हणेत्तरांसाठी खुल्या करुन दिल्या.

**अस्पृश्यता पाळणे गुन्हा - १९३३**

अस्पृश्यता पाळणे कायदेशीर गुन्हा होणार - अस्पृश्यांच्या वतीने डॉ.आंबेडकरांनी जो जाहीरनामा सादर केला त्यात तळी, विहीरी, रस्ते, नदीचे घाट, पाणवठ्याच्या जागा, शाळा वगैरे ठिकाणी अस्पृश्यांना मज्जाव करणे कायदेशीर गुन्हा मानला जावा. या अर्थाचा एक स्पष्ट कायदा इंडियन पिनल कोडमध्ये घालण्यात यावा व नविन होणाऱ्या राज्यघटनेत ही अंतर्भाव करावा असा ठराव गोलमेज परिषदेमार्फत केला तो मान्य झाला."[28] अस्पृश्यता हा ही समाजजीवनाला लागलेला श्राप होता. ब्रिटीशांनी याबाबत कायदा करुन सामाजिक भेद मिटविण्याचा प्रयत्न केला.

**आधुनिकीकरणाकडे वाटचाल**

टपालाचे मोल सर्वसाधारण लोकांसही समजू लागले. अडाणी बाईसुध्दा गाडीत बसताना गेल्याबरोबर कागद पाठवा, वर्तमान कळवित जा. कागद म्हणजे अर्धी भेट, एका पैशात तुमचे वर्तमान आम्हास कळेल असे कळकळीने सांगत असे.

१९१२ साली प्रसिध्द सावकार श्रीमंत बागडे यांच्या दिवाणखान्यात सौ.उषाबाई मोडक यांच्या अध्यक्षतेखाली लक्ष्मीबाई टिळक यांचे "पतित भगिनींचा उध्दार" या विषयावर कळकळीचे भाषण झाले. या भाषणाने प्रेरित होऊन तेथील पंधरा गृहस्थांनी स्वप्रेरणेने स्वयंसेवक होण्याचे मान्य केले होते.

"अहमदनगर येथे १ नोव्हेंबर १९१२ पासून अमेरिकन मिशनच्या स्त्रिया व मुलांसाठी असणाऱ्या हॉस्पिटलमध्ये स्त्रियांसाठी परिचारीकेचा अभ्यासक्रम सुरु झाला होता. त्यात औषधक्रिया, शस्त्रक्रिया व सुईणकाम हे शिक्षण इंग्रजी भाषेतून दिले जात असे. "[29] अहमदनगरमधील स्त्री जीवनात परिवर्तन आणण्यात ख्रिस्ती मिशनऱ्यांचा सहभाग निर्णायक ठरला. स्त्रियांकरीता परिचारीकेचा अभ्यासक्रम सुरु करुन मिशनऱ्यांनी खऱ्या अर्थाने परिवर्तनास गती दिली. असे म्हणायला हवे.

**स्त्रियांच्या क्लबचा वाढदिवस - १९१५**

"येथिल स्त्रीयांना उत्तम शिक्षण द्यावे व त्यांची गृहस्थी अधिक चांगली व्हावी या उद्देशाने अहमदनगर येथे मिशनच्या स्त्रियांचा एक क्लब १९१४ साली स्थापना झाली."[30] मिशनचा स्त्रियांचा कल्ब स्थापन होणे ही घटना स्त्रियांना मिळणाऱ्या सन्मानाची द्योतक मानावी लागते. कारण यापूर्वी अशी संस्था (केवळ स्त्रियांसाठी) नव्हतीच. मिस हेरिस या संस्थापिकेच्या मार्गदर्शनाखाली अनेक स्त्रिया इंग्रजी, मराठी लेखन, वाचन, शिवण, स्वच्छता, आरोग्य, बालसंगोपन इ. गोष्टी शिकल्या त्या क्लबचा वाढदिवसही साजरा होत असे.

**भारतीय लोकांच्या विचारात पडत चाललेला फरक -**

"बेळगावच्या नगरपालिकेने आपल्या हद्दीतील सर्व तळी व विहीरी अस्पृश्यांसाठी खुल्या केल्या. ह्या ठरावास कोणी हरकत घेतली नाही."[31] तसेच कोचीन येथे सर्व रस्ते अस्पृश्यांसाठी खुले झाले. अश्या रस्त्याने पुलय्या म्हणजे अस्पृश्यांची मोठी मिरवणूक निघाली. त्यात अस्पृश्य परिषदेचे अध्यक्ष नारायण चंदावरकर व अनेक हिंदु पुढारी चालत होते. मुंबई युनिव्हर्सिटीची पहिली मुसलमान स्त्री पदवीधर होण्याचा मान १९२० साली बेगम अहंमदुन्निसा सिद्दीकी, हिने बी.एस.सी. परीक्षा पास होऊन मिळवला. पुनर्विवाह कोणी करावयाचा या विषयावर काशीबाई देवधर यांनी पुणे येथे विधवाविवाहाच्या कायद्याच्या जयंतीनिमित्त भाषण केले. त्यांनी खडा सवाल केला की, "पुरुषवर्ग पुनर्विवाहास उत्तेजन देतो, तो केवळ विधवांकडून होणारी अनीति बंद

करण्याकरिता म्हणजे अनीतिमान काय ती विधवा. पोरे अनाथालयात जातात ती विधवांची अनीति घडल्यास पुरुषांची हातून फक्त देह धर्म घडतो, आणि विधवेच्या हातून तेच कृत्य घडल्यास अनीति होते. असे करुन सर्व समाज अनीतिचे मोठे थोरले गाठोडे विधवेच्या माथी देऊन पुरुषाला मुक्त हस्ते वावरण्याची परवानगी देतो. मग कोणती नीतिमान, स्वाभिमानी समतोल मनाची विधवा पुनर्विवाहास तयार होईल. कारण अशा विधवेला पुनर्विवाह न करतासुध्दा नीतिमान राहणे मुळीच अशक्य नाही. "मुलामुलींचे विवाहाचे वय वाढवून बालविवाह बंद करण्याच्या उद्देशाने बडोदा सरकारने नेमलेल्या कमिटीत मेहता व हेरलोकर या दोन स्त्रिया होत्या. मुलीचे विवाह वय बारा ऐवजी चौदा व मुलाचे सोळा ऐवजी अठरा असावे अशा सूचना कमिटीने केल्या होत्या. त्यासंबंधी लोकांचे म्हणणे ऐकून घेऊन नंतर कायदा केला.[32]

प्रायमस स्टोव्ह पायी गुजराथी बायका प्राणास मुकतात म्हणून तरुण मुलींना स्टोव्ह वापरु देणे गुन्हा समजला जावा अशी ज्युरीने एकदा शिफारस केली होती. तसेच समाज सेवकांनी स्टोव्ह वापरण्याचे शिक्षण लोकांस द्यावे अशी सुचनाही ज्युरीकडून करण्यात आली. स्टोव्हचे अपघात गुजराथी साडी नेसण्याच्या पध्दतीत बदल केला तर होणार नाहीत. पाश्चात्य देशात स्त्रियांच्या चढाओढी होतात. तरुण मुलींच्या संरक्षणार्थ संस्थेने अशा चढाओढींच्या अनिष्ठतेकडे राष्ट्रसंघाचे लक्ष वेधले आहे. पोपने अनैतिक, अधार्मिक, लोकांना पतित करणाऱ्या म्हणून त्यांचा निषेध केला.

धर्म व समाजरचना एकमेकांत इतक्या गुंतलेल्या होत्या की त्याना एकमेकांपासून वेगळे करणे शक्य नव्हते. ख्रिश्चन मिशनरीनी धर्माप्रसारासोबत शिक्षण, आरोग्य, अंधश्रध्दा, धर्मांधता या कार्याला सुरुवात केली. ब्रिटीशांनीही विविध कायदेकरुन शांत, स्थिर कायद्याच्या राज्याची स्थापना केली. हे बदल समाजाने हळूहळू स्वीकारले. त्यांनी केलेल्या सुधारणा स्विकारुन जीवनात बदल घडवून आणले. महिला स्टोव्ह वापरु लागल्या. पत्राचे महत्व त्यांना कळू लागले. स्त्रिया पुरुषांच्या विरोधात सभेत बोलण्याचे

धाडस करु लागल्या, सौंदर्यस्पर्धा पोपने अनैतिक ठरविल्या तरी त्या भरविल्या जाऊ लागल्या. या सर्व घटना आधुनिकतेकडे वाटचाल करणाऱ्या होत्या.

"स्त्रियांची अगदी लहानपणी लग्ने होतात. दुर्दैवाने पती वारला, तर सगळा जन्म दु:खात काढावा लागतो. पुरुषांना मात्र पुन्हा विवाह करता येतो मग स्त्रियांनी का करु नये."[33] ताबुतात सामाजिक शांतीचाच नव्हे, तर प्राणांचाही नाश होतो. उघड्या तलवारी घेऊन हिंडणारे लोक क्षुल्लक कारण सापडले, तरी मारामाऱ्या करतात. ताबुताच्या मानावरुन सतत भांडणे होत असतात. या उत्साहात हिंदूही सामील होतात. हे केवळ अज्ञान होय.

शास्त्रात पुनर्विवाहास विरोध नाही, याविषयी लोकांची खात्री पटली होती. ही रुढी मोडण्यासाठी मद्रासमध्ये सभा स्थापन झाली होते."पुनर्विवाह हे कल्याणकारक व सुधारणुकीचे कृत्य होते. सती जाण्याचे दु:ख एकदाच होत असे. वैधव्य हे मृत्युपर्यंत जाळणारे दु:ख होते. म्हणून पुनर्विवाह प्रतिबंधरुप विषवृक्ष तोडून टाकला. तरच आत्महत्या व बालहत्या वगैरे अनर्थ कमी होतील. कोणीतरी पुढारी झालेच पाहिजे."[34] भारतातील अशा बदलांची दखल अहमदनगरनेही घेण्यास सुरुवात केलेली आपणास दिसते. अर्थात जगन्नाथ शंकरशेट किंवा गंगाधरशास्त्री फडके यांचे कार्य विसरता येणार नाही.

**रुढी परंपरांना तिलांजली देण्यास सुरुवात**

"एका माणसाने अनेक विवाह करणे ही चाल सुधारणेशी अगदी विपरीत होती. अनेक बायकांचा दादला मिरविण्यात शुध्द हेतू काहीच नाही. या अतिदुष्ट चालीविरुध्द सरकारने कायदा करावा."[35] बहुपत्नीत्वाविरुध्द सुशिक्षितीत मंडळी विचार मांडू लागलेले दिसतात. यात सरकारने हस्तक्षेप करावा असे मत व्यक्त होऊ लागले.

सरकारने सती व कन्यावध थांबविले, त्याप्रमाणे मुलींची विक्रीही थांबवावी. "कोकणात व अहमदनगरकडे मुलींच्या गळ्यांत त्यांच्या किंमतीच्या चिठ्या असतात. आंधळा, पांगळा, थेरडा का असेना, त्याने किंमत देऊन तिच्याशी खुशाल लग्न लावावे.

दहा वर्षांची कन्या ८० वर्षांच्या म्हाताऱ्यास दिली,"[36] अशी ही घटना घडली होती. मुलींची विक्री करण्याची घृणास्पद चाल अहमदनगरमध्ये होती. अशा मुली मुलांप्रमाणे विकल्या जात. याचा गैरुफायदा बाल जरठ विवाह करणारे घेत. स्त्रियांना कोणत्याही प्रकारच्या शोसनाला सामोरे जावे लागत असे. हे यातून लक्षात येते.

अहमदनगरच्या रामचंद्र नगरकरांनी बहिणीच्या लग्नात दुष्ट स्त्रियांच्या नाचाची पध्दत मोडली. "अहमदनगर जिल्ह्यातील चिखली गावच्या एका गृहस्थाने आपल्या मुलीचे लग्न ११५ रुपये हुंडा घेऊन करुन दिले."[37] नंतर द्रव्याची पैदास करण्यासाठी त्याच मुलीचे लग्न पाथर्डी येथील गृहस्थाशी लावून दिल्हे. त्याबद्दल ३१५ रुपयेही घेतले. हे प्रकरण शेवगाव येथील कोर्टात गेले होते. पैसे घेऊन मुलींचे लग्न लावणारे लोभी ग्राहक कोणत्या थराला जात याचे उदाहरण म्हणून या घटनेकडे पाहावे लागते. तर लग्नप्रसंगी कलावंतीनीचा नाच ठेवणे हे वऱ्हाडास मनोरंजक वाटले तरी या नर्तीकींचे शोषणच होत. हे ध्यानात घ्यावे लागते. अशा घटनेचे कोर्टापुढे निराकरण होणे या चाली बंद करण्याकडे लोकांचा कल होणे हे परिवर्तनास अनुकूल म्हटले पाहिजे.

**ख्रिश्चन मिशनरी व ब्रिटिश प्रशासनाचे परिवर्तनासाठी प्रयत्न**

१९ व्या शतकात महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक, राजकीय तसेच सांस्कृतिक जीवनात एक नवे युग उदयाला आले. तसेच अहमदनगरच्या सामाजिक जीवनातही नवे युग, नवे चैतन्य निर्माण झाले. ख्रिश्चन मिशनरींच्या धर्मप्रसाराला प्रारंभी मनाई होती. १८१३ च्या कायद्याने ब्रिटिशांनी त्यांना हे अधिकार दिले. त्यामुळे मिशनरींनी धर्म कार्यासोबत शिक्षण, गरीबांना मदत व आरोग्य या सेवा पुरविल्या. अहमदनगरला जेव्हा धर्मांतरीत ख्रिस्ती लोकांनी पाणवठ्यांवरचे पाणी घ्यावे कि नाही हा बखेडा निर्माण झाला, तेव्हा मानवतावाद व दृष्टीने विचार करुन सरकारने मिशनरींच्या बाजूने कायदेशीर कौल दिला. त्याप्रकरणाची सविस्तर चर्चा पुढे केली आहे.

**अहमदनगरचे पाणीप्रकरण - १८५९**

अहमदनगरमधील निजामशाहीकालीन कारंजावर पाणी भरण्याकरिता एक ख्रिस्ती स्त्री गेली असता, लोकांनी तिला पाणी भरण्यास प्रतिबंध केला. ख्रिस्तीणीने तेथे पाणी भरले, तर कारंजे जणू सडेल, अशा भावनेने सर्वांनी आरडाओरडा केला, गावात नाना अफवा उठल्या. काहींनी बाजारात हरताळ पाळला. ४३२ ग्रामस्थांनी सह्या देऊन मॅजिस्ट्रेटकडे अर्ज केला व राणीच्या जाहीरनाम्यान्वये संरक्षण मागितले. ही कारंजी बादशहांनी बांधलेली असल्यामुळे मुसलमान मंडळी अर्जावर सह्या देत नव्हते. मेजिस्ट्रेटचे असे मत पडले की, नेटीव ख्रिस्ती पूर्वीदेखील कारंज्यावर पाणी भरत होते. म्हणून त्यांचा वहिवाटीचा हक्क आहे. सर्व हक्कांत पाणी भरणे हा मोठा हक्क आहे. म्हणून असल्या मनाईस कसलाही आधार नाही. तरी ही त्याने सगळ्या लोकांनी कारंजावर पोलिसांचा बंदोबस्त ठेवलेला होता. धर्म बदलला तरी वहिवाटीचा हक्क बदलत नाही, हे अगदी अबाधित असे तत्व आहे. कायदा सर्वांना समान व निपक्षपाती ठेवलेला असतो. "धर्म बदलला तरी वहिवाटीचा हक्क बदलत नाही हे अगदी अबाधित असे तत्व आहे. कायदा सर्वांना समान व नि:पक्षपाती वागणूक देईल, असेच राणीने जाहीर केले होते."[38] कारंजे शुध्द करण्याचे निमित्त करुन नगरातील लोकांनी त्यात शेण कालविणे हे अयोग्य केले. हिंदू लोक मुस्लिमांनाच काय, पण दृष्ट वर्तणुकीच्या स्त्रियांनाही पाणी भरु देत असत. त्यावेळी त्यांचा धर्म बुडत नसे. एवढा गोंधळ होऊनही ख्रिस्ती लोक अत्यंत शांत राहिले आहेत.

पाणीप्रकरणी नगरच्या मॅजिस्ट्रेटने निकाल दिला दिला की, 'धर्म पालट करण्यापूर्वी जे हक्क नागरिकांना होते, ते कायमच राहतात. जनावरांनाही पाणी पिण्याचा हक्क आहे, मग मानवास तो का नसावा ? नगरमध्ये दुकानदारांना धाक दाखवून दुकाने बंद करण्यात आली. जो धंदा चालू ठेवील, तो बाट्याच्या बीजाचा ठरेल. म्हणून व्यापारी गप्प बसले. ब्राम्हणांनी गाव सोडून जाण्याच्या वल्गनाही केल्या. एक नेटिव अंमलदारही लोकांना चिथावीत होते. "कारंजाजवळ ५०-५० धष्टपुष्ट बाया उभ्या करुन ख्रिस्ती

स्त्रियांना भीती दाखविली जाई. काही भटांनी मुंबईस जाऊन अर्ज दाखल केला. ख्रिस्ती लोकांना वेगळा हौद बांधून द्यावा, असाही विचार पुढे आला होता. पण त्याने मूळ प्रश्न मिटणार नाही. नेटिवाचे वाजवी हक्क त्यांना मिळाले पाहिजेत. उन्हाळ्यात पाण्याचा तुटार पडल्यावर हाल होतील. हे माहित असुनही ख्रिस्ती लोकांवर जादूटोणा करण्याचे बालिश बेत काहींनी चालवले होते."[39]अहमदनगरच्या पाणीप्रकरणाविषयी नागरिकांनी केलेल्या अर्जातील गवर्नरसाहेबांचे मत असे होते की, 'ही अर्जी बहकलेल्या लोकांनी केलेली आहे. नागरिकांचे मागणे गैरसमजूतीचे व बेअदबीचेच आहे. इतर धर्मीयांनी पाणी भरले तर कारंजे बाटत नाही. मग ख्रिस्ती लोकांनाच प्रतिबंध का केला जातो ? हा राणीच्या जाहीरनाम्याचा लोकांनी चुकीचा अर्थ काढला. ते स्वत:च्याच धर्मतत्वांची अवहेलना करीत आहेत.'

गवर्नरने पाठविलेले पत्र मेजिस्ट्रेटने नागरिकांना वाचून दाखविले तरीही अहमदनगरमध्ये पाण्याच्या बखेड्यावरुन एका नेटिव ख्रिस्तास मारहाण झाली. या खटल्यात १३ जणांना ६७५ रुपये दंड झाला. इतर दोघांना ७५ रुपये व ५० रुपये असा दंड झाला होता. अहमदनगरच्या पाणी प्रकरणाचे सर्व कागदपत्र विलायतेस पाठविण्यात आले. ते पाहून राणीसरकारचे प्रधान चार्लस सी.वुड यांनी ९ ऑगस्ट १८६० रोजी ठराव केला की, "या बाबतीत फिर्यादीचे म्हणणे अमान्य करण्यात येत आहे. राणीच्या जाहीरनाम्याचा भलताच अर्थ करुन फिर्यादी लोक त्यावर उडया मारितात. पण ही त्यांची मोठी चूक आहे. कारंजातून पाणी घेणाऱ्या ख्रिस्ती लोकांना पीडा देण्याचे जे प्रयत्न फिर्यादी लोकांनी केले, त्यास जाहीरनाम्यात काही आधार नाही."[40]

"अहमदनगरचा पाणीप्रश्न इतका चर्चिला गेला होता तरी पाणी घेण्यावरुन घोडनदी गावाजवळील कर्डे या ठिकाणी ख्रिस्ती उपदेशकांना मारहाण झाली. शिपायाच्या हातून त्याचा बंदोबस्त होऊ शकला नाही. अनवाणी व बोडके असे ख्रिस्ती जवळच सूटरसाहेबांच्या छावणीत गेले. सुटरसाहेबांनी मात्र गावकऱ्यांना बोलावून समज दिली की, पाणी घेण्याचा ख्रिस्ती लोकांना अधिकार आहे."[41] पुण्यातही पाण्यावरुन धुमाळी

झाली. मिशनऱ्याला सार्वजनिक हौदातील पाणी पिण्यावरुन गंभीर मारहाण केली होती. "पुण्यातील भटांनी मात्र बुधवार पेठेचा हौद शुध्द करुन घेतला. सरकारी हौदावर जातिभेद चालणार नाही, असे सरकारने जाहीर केले. पुण्यातले मराठे व ब्राम्हण एकाच हौदातून पाणी घेण्याची मसलत करीत होते."[42] पुण्याच्या गणेशपेठ हौदावर बुरडांनी पाणी भरले, म्हणून ब्राम्हण लोकांनी तो हौद वर्ज्य केला. पुढे महारांनी तेथे पाणी भरल्यामुळे बुरड लोकांनीही तो हौद टाकला. महार-मांगाना सगळे हौद मोकळे झाले, तर पेशव्यांनी पोसलेल्या जातिभेद वृक्षाच्या मुळावरच घाव बसेल. बुरड व ब्राम्हण अहमदनगरात एकाच हौदावर पाणी भरतात. पण महारांना नीच मानतात. ब्राम्हणाच्या मांडीस मांडी लावून बसण्याचा त्यांचा हव्यास काही जात नाही.

अहमदनगरास व साताऱ्यास असा हुकूम झाला असताही पुण्यात लोकांनी त्यास हरकत घेतली, हे अयोग्य आहे. अहमदनगरच्या ग्रामस्थांनी एकत्र येऊन असा ठराव केला की, "सर्व ठिकाणी जसे पारशी व मुसलमान पाणी भरतात, त्याप्रमाणे ख्रिस्ती लोकांना पाणी भरु द्यावे. मनुष्याच्या जातिधर्मास त्यायोगे कसलाही धक्का पोहोचत नाही. या सर्वांचा विचार करुन पुण्याच्या अर्जदारांना हुकूम देण्यात येतो की, त्यांनी सार्वजनिक ठिकाणी पाणी भरण्यास ख्रिस्ती लोकांना कसलीही हरकत करु नये, खाजगी हौदाची आणि विहिरीची बाब मात्र मालकाच्या खुशीवर व मुखत्यारीवर अवलंबून असेल."[43] जातीभेद पाळण्याची वृत्ती या प्रकरणातून अधोरेखित होते. ख्रिस्ती धर्मांतरीत लोकांकडे बघण्याची अनुदार दृष्टीही यातून जाणवते. तथापि शेवटी नगरकरांनी ख्रिस्ती मंडळींना पाणी भरवून देण्यास संमती दर्शवली. हे ही कायद्याच्या धाकामुळे झालेली महत्वपूर्ण परिवर्तन मानावे लागते.

**अहमदनगरमधील न्हावी प्रकरण**

अहमदनगरच्या सर्व न्हावी लोकांनी असा कट केला की, "एक आणा मजुरी मिळल्याशिवाय कोणाची हजामत केल्यास त्याला पाच आणे दंड होईल, हे ऐक्य भावनेने काम करण्यात बळकटी आहे हे या उदाहरणावरुन दिसते. "ब्राम्हणांच्या

ग्रामण्याप्रमाणे वाईच्या न्हाव्यांनी, न्हावण्य केले. मुंजीपूर्वी ब्राम्हणांचे नापितांनी चौल केले. म्हणून ते वेदाभ्यासास पात्र झाले. तद्नंतर त्यांनी ब्राम्हणादी चार वेदांची प्रजा उत्पन्न केली. यावरुन ब्राम्हणांपेक्षा नापित श्रेष्ठ आहेत. सबब त्यांनी स्मश्रूचा दर वाढविला पाहिजे असा ठराव केला."[44] या उलट वाईच्या ब्राम्हणांनी येथील नापितांकडून स्मश्रू केल्यास जातीबहिष्कृत केले जाईल असा ठराव केला व लगेच दुसरे ठिकाणहून पाच पन्नास नापित एक वर्षाच्या कराराने बोलाविले. त्यामुळे वाईच्या गरीब नापितांना गाव सोडून जाण्याची पाळी आली.

"ब्राम्हण्याप्रमाणे आता पुण्यात न्हावण्य झाले. या रोमशत्रूनी असे ठरविले की, न्हावी जमात ब्राम्हणांची हजामत करणार नाही. ब्राम्हणलोक दुसऱ्या जातीवाल्यांच्या घरी जेवण्यास जातात, एवढेच काय, पण ते कसबिणींच्या व कलावंतिणीच्या घरीसुध्दा जेवण्यास जातात, पण न्हाव्याच्या घरी जेवण्यास जात नाहीत. म्हणून न्हाव्यांनी हरताळ पाळला. त्यांनी फिर्यादही केली. न्हावी लोकांचे म्हणणे बरोबर होते."[45] कारण न्हाव्याकडून केस कापलेले चालत होते मात्र त्याच्या घरी जेवलेले का चालत नाही ? हा न्हाव्याचा प्रश्न अगदी तर्कसंगत होता.

### मिशनऱ्याचे कार्य व ज्ञानोदय पत्राची भूमिका

अमेरिकन मिशनाचे मिशनरी भारतात सन १८१३ या वर्षी आले. या मिशनाच्या जुबलीचा उत्सव अहमदनगरास १८८१ साली झाला. अहमदनगरात मिशनाची स्थापना १८३१ साली झाली. त्यावेळी ज्ञानसिंधु, प्रभाकर, हिंदु वर्तमानपत्रे, ख्रिस्ती धर्माच्याविरुध्द मजकुर छापत. त्याला उत्तर देण्यासाठी अहमदनगर येथिल मिशनरींनी ज्ञानोदय या वर्तमानपत्राची सुरुवात केली. या "पत्राचा पहिला अंक १८४२ च्या जून महिन्यात काढला. हा अंक फुलस्केप कागदाच्या चतु:ष्पत्री साच्याचा असून २० पृष्ठांचा होता. १८४४ अखेरपर्यंत याच आकाराचे पत्र दर महिन्यास नेमाने निघू लागले. हिंदुचे 'उपदेश चंद्रिका' म्हणून एक मासिक पुस्तक निघू लागले."[46] त्याचा आणि ज्ञानोदयचा बराच वादविवाद चालत असे. १८४५ साली विद्या खाते व शाळा नव्हत्या. म्हणून इतिहास,

खगोल, भूगोल यांच्याविषयीही लोकांत पुष्कळ अज्ञान होते. म्हणून या विषयांचे ज्ञानाचा प्रसार होण्याकरिता नेमाने व क्रमवार दर अंकांतून प्रश्नोत्तराच्या सहाय्याने माहिती दिली जात होती.

सन १८४२ जून पासून जे सहा अंक निघाले ते अहमदनगरास शिलाछापाने छापले गेले. परंतु १८४३ च्या जानेवारीपासून हे पत्र मुंबईस अमेरिकन मिशनच्या छापखान्यात खिळे छापाने छापू लागले. तरी ते अहमदनगरातच प्रसिध्द होत असे. १८४५ जानेवारीपासून हे पत्र सर्वस्वी मुंबईचे झाले. तसेच त्यात इंग्रजी मजकूर येऊ लागला. दर पंधरवाड्यास महिन्याच्या पहिल्या व १५ पंधरा तारखेस १६ पृष्ठांचे वर्तमानपत्र निघू लागले. सन १८७३ पासून दर आठवड्याला दर बुधवारी १६ पृष्ठ व अंकांचा खर्च भागविण्यासाठी जाहिराती प्रसिध्द होऊ लागल्या.

सन १८६७ ते १८८५पर्यंत ज्ञानोदयाचे सर्व काम शाहुराव कुकडे करीत होते. ज्ञानोदयपत्राच्या समकालीन सर्व वर्तमानपत्रे मरुन गेली. त्यावेळच्या इंग्रजी व मराठी मिश्रित एक पत्र टिकले, पण त्यासही वर्गणीदार व हितचिंतकाचा तुटवडा असे.

“१८९८ साली कोकऱ्यांच्या मंडळीनी 'रामकृष्ण पंत फ्री लायब्ररी' सर्व जाती धर्माच्या लोकांसाठी सुरु केली. त्यात रामकृष्ण पंत मोडक यांच्या संग्रहातील पाचशे पुस्तके ठेवली होती. 'बांबे गार्डियन', 'ज्ञानोदय', 'ख्रिश्चन पेट्रियाट' ही तीन वर्तमानपत्रेही ठेवलेली असत."[47] याच ग्रंथालयात बायकांनी स्वत: हातांनी शिवलेली कापडे विकण्याकरिता ठेवलेले असत.

या ग्रंथालयाचा लोकांना धार्मिक ज्ञान मोफत मिळावे हा हेतू होताच, पंरतू स्त्रियांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी मिशनरींचा हा उपक्रम स्तुत्य होता. मिशनऱ्यांनी केलेली लोकोपयोगी कामे नजरेआड करुन त्यांच्या धर्मप्रसाराला मात्र विरोध होताना दिसतो. न्यायसिधु, प्रभाकर, हिंदू विरुध्द ज्ञानोदय या पत्रांमधील युध्द हेच दर्शविते. तथापि 'ज्ञानोदय'मधून इतिहास, भूगोल, खगोल इत्यादी विषयांची ज्ञानही दिले जात होते. सर्वात महत्वाचे म्हणजे या पत्रयुध्दातून नगरकरांची मानसिकता अधोरेखित होते.

इ.स. १९२२ च्या नोव्हेंबर महिन्यात अहमदनगर येथे भरलेल्या जनरल कौन्सिलच्या सभेत 'खेड्यातील समाजसेवेचे कार्य' या विषयावर रिपोर्ट देण्यासाठी डेमिंग, साळवे, व्हिलर, डॉ.ह्युम यांची एक कमिटी नेमण्यात आली होती. मिशनमार्फत अनेक प्रकारच्या समाजसेवेच्या कामाची नोंद करण्यात आली. ती खाली दिली आहेत.

दुष्काळग्रस्तांस पैसे, धान्य, कपडे वाटणे,लोकांच्या नोकरीची सोय, उद्योगधंद्यांना उत्तेजन, औद्योगिक शिक्षण, बीयाणे वाटणे, चांगली घरे बांधण्यास व राहण्यास उत्तेजन देणे, प्रौढ शिक्षण, अनेक मुलींच्या शाळा, मुलामुलींच्या शाळा,नविन अभ्यासक्रम ,नविन शिक्षण पध्दती, उच्च जातीच्या मुलांना शाळेत प्रवेश, मुलांसाठी पुस्तके, शिक्षकांना 'शेतकरी' व इतर मासिके मिळवून दिली. विविध विषयांवर मॅजिक लॅन्टर्नच्या सहाय्याने किंवा तशीच व्याख्याने दिली. इनॉक्युलेशन करुन घेण्यास उत्तेजन, दवाखान्यात जाण्याविषयी लोकांना उत्तेजन, स्वच्छता, आरोग्य रक्षण, औषध देणे, दवाखान्यात नेणे, आजाऱ्यांना मदत, बालसंगोपण, भांडणे मिटवणे. परक्या देशात येऊन ऐवढ्या मोठ्या प्रमाणात मानवतावादी कार्य मिशनने केले.

**एक नवीन मागास पुढारलेला वर्ग -**

"एक नवीन अद्भुत असा पुढारलेला वर्ग मिशनऱ्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे उत्पन्न झाला. या वर्गात मुंबई युनिर्व्हसिटीच्या एल.एल.बी. परीक्षेत पहिला नंबर पटकावणारे पटकावणारे मुंबई शहरात मॅजिस्ट्रेटचे काम केले भास्करराव चक्रनारायण, मॅजिस्ट्रेट रावबहादुर आठवले, हारवर्डची पी.एच.डी. प्राप्त डॉ.भास्करराव हिवाळे, स्त्री शिक्षणाच्या बाबतीत एक पारशी समाज वगळला तर खिस्ती समाजाइतका पुढारलेला समाज मुंबई इलाख्यात दुसरा नव्हता."[48] याच भास्करराव हिवाळेंनी अहमदनगर जिल्ह्यास वरदार ठरलेले अहमदनगर विद्यालय सुरु करुन जिल्ह्यास शैक्षणिक उन्नतीचा मार्ग दाखविला.मुंबईतील पहिली मॅट्रिक स्त्री, पहिली बॅरिस्टर पं. रमाबाई याच समाजातील होत्या.

नगरपालिकेने नगरच्या निरनिराळया समाजात शिक्षणाचे प्रमाण किती आहे हे प्रसिध्द केले. पुढारलेले हिंदु - ९०.३, मागासलेले हिंदु - ७०.३, जैन - ९२.२, मुसलमान - ६४.३, हिंदी ख्रिस्ती - ९१.४. म्हणजे या मागासलेल्या वर्गातील शिक्षणाचे प्रमाण पुढारलेल्या हिंदूपेक्षा जास्त असूनही तसेच जे आपल्या मातृभाषेला मुकले नाहीत, ज्यांच्या अंगात हिंदुस्थानाचे रक्त खेळते, हिंदी संस्कृतीची ज्यांना चाड आहे ते मागासलेले आणि जे हिंदीस्थानी नमक खाऊन स्वत:ला युरोपियनात घुसडू पाहतात ते पुढारलेले समजले जातात. केवळ कारकुनांच्या चाकऱ्यांसाठी ख्रिस्ती लोकांना आता मागासलेपण नको होते, तर स्वत:च्या बळावर त्यांना पुढारलेले म्हणून मिरवायचे आहे असा म्हणणारा एक सुशिक्षित पुढारलेला वर्ग निर्माण झालेला पहायचा होता. नेटिवांनी आत्मनिर्भरतेसाठी प्रयत्न सुरु केले होते.

**अमेरिकन दात्यांचे नेटिवांविषयीचे मत**

अमेरिकेत पैसा मुबलक असून तो तेथून वाटेल तसा आणता येईल ही समजूत पन्नाससाठ वर्षापूर्वी बरोबर होती. ‘‘ए सेंट फॉर पुअर इंडिया' हे वाक्य आता फारसे उपयोगी पडत नाही. तुमचा तो पुअर इंडिया पुअर तरी किती दिवस राहणार आहे, असे आजकालचे अमेरिकन दाते कंटाळून बोलू लागले. म्हणून स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर होऊन आपल्या संस्था आपणच चालविल्या पाहिजेत. अर्धवट भिक्षेकऱ्याच्या स्थितीतून बाहेर आले पाहिजे.’’[49] हा रे.ह्युम यांच्या पत्रातील उतारा म्हणजे परिवर्तनाची नांदी होती. आता नेटीव्ह ख्रिश्चन लोकांनी व्यक्तिगत, मानसिक, आर्थिक पारतंत्र्य झुगारुन दिले पाहिजे हा गर्भित नव्हे उघड दिलेला इशारा होता.

**अहमदनगरमधील सामाजिक चळवळी व समाज सुधारक**

एकोणिसाव्या शतकातील भारतीय प्रबोधनाच्या दृष्टीने राजा राममोहन रॉय, दयानंद सरस्वती, ॲनी बेझंट आणि स्वामी विवेकानंद यांचे योगदान अत्यंत महत्वपूर्ण आहे. महाराष्ट्रातील दादोबा पांडुरंग, महात्मा ज्योतीबा फुले, वि. रा. शिंदे, इत्यादी धर्मसुधारकांच्या कार्यकक्षाही विस्तारत गेल्या. राजा राममोहन रॉय (१७७२-१८३३)

आणि स्वामी विवेकानंद या दोन महापुरुषांचे कर्तृत्व एकोणिसाव्या शतकात बहरले. दोघांच्याही जीवित ध्येयांमध्ये आणि जीवन कार्यांमध्ये विविधता असली तरी त्यांनी भारतीय प्रबोधनाला विलक्षण गती दिली.

रुढार्थाने राजा राममोहन रॉय, ॲनी बेझंट, दादोबा पांडुरंग, म. फुले ही मंडळी पूर्णपणे आध्यात्मिक क्षेत्रात वावरणारी नव्हती. सामान्य माणसांची जाणीव जागृती घडवून आणण्यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. धर्मावर आत्यंतिक निष्ठा ठेवणारा विस्तीर्ण समाज त्यांच्याभोवती होता. म्हणून त्यांनी धर्मसंकल्पनांना सामाजिक आशय देण्याचा प्रयत्न केला असे म्हणता येईल. दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद आणि वि. रा. शिंदे आदी मंडळींचा धार्मिक, आध्यात्मिक क्षेत्राशी निकट संबंध होता. त्यांनाही पारंपरिक धर्म संकल्पनांना नवे रुप देण्याची गरज भासली.

महाराष्ट्रात आरंभीच्या सामाजिक चळवळीचे आधारस्तंभ जगन्नाथ शंकरशेठ, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, दादोबा पाडुरंग तर्खडकर, भाऊ महाजन, लोकहितवादी याचे कार्य या क्षेत्रातील पायाभूत कार्य होय. म्हणून त्यांना महाराष्ट्रातील जागृतीचे आद्य प्रर्वतक मानले जाते. जगन्नाथ शंकरशेठ यांनी ‘बॉम्बे नेटिव्ह स्कूल’ची स्थापना केली. महाराष्ट्रासाठी शिक्षणाची व्दारे खुली केली. बाळशास्त्री जांभेकर आद्य इतिहास संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, श्रेष्ठ पत्रकार, आद्यवृत्तपत्रकार, व्यवहारवादी सुधारक, म्हणून त्याचा मान कायम राहिल. दादोबा पाडुरंग तर्खडकर 'मराठी भाषेचे पाणिनी' म्हटले जातात. त्यांनी सामाजिक समता, बंधुता, मानवी ऐक्य यावर भर दिला. परमहंस सभा निर्मितीत त्याचा महत्वाचा वाटा होता. भाऊ दाजी लाड यांनी समाजोपयोगी नवी औषधे व उपचार पध्दती शोधल्या. लोकहितवादींनी समाजातील अज्ञान, अंध्दश्रध्दा व अनिष्ठ चालीरीती दूर करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता आहे, शिक्षणात परंपरागत ज्ञानाऐवजी नवीन पाश्चात्य ज्ञानाची गरज प्रतिपादन केली. अशाच प्रकारचे कार्य अहमदनगरमध्येही सुरु झाले होते.

## विधवा पुनर्विवाहासाठी जनमत अनुकुल

महादेव गोविंद रानडे व रा.ब.मोरेश्वर भिडे प्रायश्चित घेणार अशी खोटी गप पसरली. शकंराचार्यांच्या दरबारातील कारभारी बापूजी शास्त्री मालवणकर व मुंबईतील बहिष्काराच्या ग्रामण्यांतील पुढारी यांस सेशन जज्जने पुनर्विवाहाच्या कार्यास विरोध केल्याच्या कारणावरुन तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा दिली. पुनर्विवाहाच्या प्रकरणावरुन स्वामींचा मान लोकांत बराच कमी झाला. पैशाच्या दूराभिमानी कच्छी वाण्यात बंद झालेली पुनर्विवाहाची चाल पुन: सुरु करण्यासाठी त्याच ज्ञातीतील २०० तरुणांनी जातीच्या मुख्याकडे अर्ज केला.काही वर्षांमागे पुनर्विवाह करणे किती धोक्याचे, त्रासाचे, अपमानकारक होते. पण आता मनू बदलला होता. आता अपमान व धिक्काराच्या ठिकाणी मान व सहानुभूती होती. व्देषभाव व छळ निघून गेला होता. लवकरच पुनर्विवाहाची चाल सर्वमान्य होईल अशी आशा लोकांना वाटू लागली होती. बडोद्याच्या गणपतराव भाटे यांचा शारदासदन व कर्वे आश्रमात शिक्षण घेतलेल्या सुशिक्षित विधवा गोदुबाई नामजोशी हिच्याशी विवाह सर्वसंमतीने विवाह झाला. अनेकांनी या विवाहाची प्रशंसा केली होती. कालमहात्म्य विचित्र असते, या विवाहाला सर्व जातीधर्माचे नामांकित मंडळी उपस्थित होती.

## सामाजिक चळवळीचे योगदान

रावबहादुर म.गो.रानडेंनी अहमदनगरच्या हायस्कूलात पूर्वीच्या स्त्रियांची स्थिती कथन केली. स्त्रियांची स्थिती उन्नत होती. त्या विव्दान, ग्रंथकर्त्या होत्या, तपश्चर्या करीत, उपवर होऊन स्वयंवर करीत. याकरिता नलदमयंती स्वयंवर, रामसीता यांचे उदाहरण दिले. भारतावरील आक्रमणकर्ते स्त्रियास पुरुषांच्या उपभोगार्थ उत्पन्न केलेला एक सजीव पदार्थ समजत. बालविवाह आणि असंमत वैधव्य या अनिष्ट चालींचे शोभनीय परिणाम होतात ही गोष्ट सुज्ञ, सुशिक्षित विचारवंत लोकांस कबूल आहे. पण या चालींचे निर्मूलन करण्यासाठी सरकारची मदत घेऊ नये व मदत घ्यावी असे दोन पक्ष निर्माण झाले आहेत. सरकारची मदत घेऊन या चालीविरुध्द कायदा करावा. त्यासाठी सरकारने

मित्रत्वाच्या नात्याने आपणास मदत करावी असे मि. मलबारींचे म्हणणे आहे. सामाजिक रीतीभातीत कायद्याकडून फेरफार करावा ही गोष्ट दुखणीय वाटणारे अनेक आहेत. गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांनी बालविवाहाचे वय ठरवणारा कायदा करताना ठरावात म्हटले आहे की, या नाशकारी चाली नाहीशा करण्यासाठी जर हिंदु लोकांतील वजनदार अथवा बहुसंख्येने स्वत: सरकारचे साहय मागितले तरच सरकार साह्य देईल.

**बालविवाह कायद्याविषयी मॅक्स मुल्यर व बेहरामजी मलबारी पत्रव्यवहार**

बालविवाह प्रकरणासंदर्भात मॅक्स मुल्यर व बेहरामजी मलबारी यांच्यातील पत्रव्यवहाराप्रमाणे, "कोणत्याही देशात इंग्लिश सरकारने पितृधर्म धारण करुन पितृराज्य चालवू नये. परंतु ज्या गोष्टी निती दृष्टया न्याय्य नाहीत त्यास जरी धर्माची व सांप्रदायाची संमती असली तरी त्या सरकारने बंद केल्या पाहिजेत. बालविवाहास श्रुती किंवा स्मृती यांची संमती नाही. मनुष्य 'गृहस्थ' झाला (२४ वर्षाचा) म्हणजे त्याचा विवाह करावा. असे मनुचे मत आहे". अश्वालयन गृहसुत्राच्या भागात विधवांना दहन करण्याविषयी मनाई केली. बालविवाहाची मर्यादा ठरवणारा निबंध वाचला होता. हिंदुस्थानात प्रचारात असलेल्या बहुतेक भाषेत या व्याख्यानांचे मलबारींनी भाषांतर केले व देशभर पसरवले. सरकार बालविवाह कायदा करण्याविषयी धजत नसल्याने मॅक्समुलरने मलबारींना दोन उपाय सुचविले. पहिला इंग्लडमधील स्त्रियांना बालविवाहाचे समप्रमाण व अस्सल अशा बातम्यांची माहिती मिळवून निबंध लिहुन पाठवावा. त्या पार्लमेंटच्या प्रत्येक सभासदाची कानउघडणी करतील. त्या धैर्यशील आहेत. गैरवाजवी प्रकरणात सरकारचे काय मत आहे याची वाट पाहत नाहीत. दुसरा उपाय तुम्ही आपल्या स्त्रियांना सुशिक्षण द्या, त्या स्वत:च बंड करुन उठतील.

मि.मलबारी यांचे विलायतेत हिंदुस्थानातील स्त्रियांच्या सुधारणेकरिता इंडियन पिनल कोडच्या ३७५ व्या कलमातील मुलीचे वयाची इयत्ता १० वी बदलून १२ करावी, बायको ताब्यात घेण्याच्या कलमात सुधारणा करावी, लहानपणी झालेले लग्न मोठेपणी अयोग्य वाटल्यास स्त्रीला किंवा पुरुषाला रद्द करण्याची सोय असावी. "मुलींच्या १०

वर्षाचे वयानंतरही त्यांनी शाळेत जाऊन शिकलेच पाहिजे अशी सरकारने तजवीज करावी. ज्या विधवांना वैद्यक, आरोग्य रक्षण, कलाकौशल्य शिकण्यास उत्तेजन द्यावे. अशा सुशिक्षित विधवांना नोकऱ्या द्याव्यात. इंडियन पिनल कोडच्या ३७२ व ३७३ कलमाप्रमाणे जे लोक आपल्या मुली मुरळ्या, भक्तीनी, भावीणी बनविण्यास देवाला अर्पण करतात, नायकिणींना विकतात, त्यांना या कलमाचा वचक, दरारा वाटेल असा त्या कलमांचा अंमल सरकारने बजावावा".

बेळगावला कृष्णा नदीच्या तीरी विधवांचे जुलमाने केशवपण करण्याचा सपाटा चालत असे. जितके केस काढले जातील, तितकी वर्षे पुढे सुख मिळेल या भ्रमापायी असंमत केशवपणात अबला स्त्रीची मानसिक स्वतंत्रता हरण केली जाते. जर तो नियम पाळण्याची तिला इच्छा नाही तर तो शास्त्रोक्त असल्याचे सांगून तिची हजामत करणारे तुम्ही कोण ? जुलमाने धर्माचरणाच्या नावाखाली अशिक्षित ब्राम्हणी विधवांचे केशवपण करण्यात काय मोठा शूरपणा आहे ? या सुधारलेल्या एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी असले मुर्खपणाच्या आचार बाळगणाऱ्याच्या बुध्दीचा धिक्कार असो. मलबारी शेटच्या निस्वार्थ सेवेवर बहुतेक पत्रातून शिव्याचा वर्षाव झाला, अनेक दुष्टलापांनी आग पाखडली, ही फार शोचनीय गोष्ट आहे. अहमदनगरास पार्वतीबाईवर केशवपणाचा जुलुम असह्य झाल्यावरुन ज्ञानप्रकाशकार म्हणतात, "नविन सुधारकास केशवपणाचा विधी क्रूरपणाचा वाटतो, तरी तो कोणत्या तत्वावर चालु आहे समजत नाही. म्हातारपणी विधवांचे केशवपण करावे अशी चाल देशस्थ ब्राम्हणात असताना जुनी मंडळी हट्ट का सोडत नाहीत ?

विधवा विवाहाचा कायदा पास होऊन पन्नास वर्षे पूर्ण झाली. म्हणून शेट कसंनदास मूळजी यांच्या निधनतिथीच्या समयी चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्विवाहांबाबत समाधान व्यक्त करणारा एक कार्यक्रम झाला.

अखिल भारतीय सामाजिक परिषदेचे अमृतसर येथील अधिवेशनात परिषदेचे जनरल सेक्रेटरी सर नारायण चंदावरकर यांनी समाज सुधारणेचा अर्थ सांगितला "

बहुजन समाजाचे शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, गरीबांच्या कामकरी वर्गास सुखाने दिवस काढता येतील अशा प्रकारे त्यांना कामधंदा पुरवण्याची तजवीज, गरीबांसाठी मनोरंजनाची साधने, सायंकाळी घटकाभर विश्रांती घेण्यासाठी हवेशीर जागा, जनतेचे आरोग्य इ. कार्ये राजकीय, शिक्षण, औद्योगीकरणाशी जोडली पाहिजेत."

मुलींचे सक्तीचे शिक्षण या प्रश्नासंबंधाने जसा सहानुभूतीपूर्वक, न्याय बुध्दीने, राष्ट्रहित साधण्याच्या दृष्टीने विचार करण्याचे धैर्य समाजामध्ये दिसू लागले. तरी अस्पृश्यवर्गाची स्थिती सुधारुन त्यांना नागरिकत्वाचे पूर्ण हक्क समाजाने दिले पाहिजेत. त्यांच्यातील अज्ञान, दारिद्रय, व्यसनाधिनता, अमंगल वर्तन यांच्या मुळाशी समाजाने त्यांच्यावर लादलेली अस्पृश्यता होय. ती नष्ट झाल्याशिवाय त्यांत मोकळेपणे व्यवहार करता येणार नाही. अस्पृश्यता हा समाजास लागलेला कलंक आहे. तो सर्वांनी मिळून धुऊन काढला पाहिजे. जपानने आपल्या समाजातील इ.स.१८७० सालपर्यंत 'ईटा' आणि 'हिजिन' या नामाभिधानाच्या अस्पृश्य वर्गाचे एका कायद्याने अस्पृश्यत्व दूर केले.

हिंदु समाजाला अस्पृश्यतेच्या भेदभावामुळे आलेली दुर्बलता हळूहळू कमी होण्याची चिन्हे सर्वत्र दिसू लागली होती. अस्पृश्यतेचा नायनाट केल्याशिवाय स्वराज्य, समान हक्क या मागण्या कमकुवत राहणार हे लोकांना स्पष्ट कळू लागले होते. ह्यावरुन त्यांची सामाजिक अभिवृध्दी होऊ लागली होती. १९२४ साली दिल्लीत भरलेल्या हिंदु लोकांच्या सभेत अत्यंजांना सार्वजनिक पानवठे खुले असावेत, शाळेत भेदभाव नसावा, देवळात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा या ठरावांचा पुनरुच्चार झाला, लोक त्याप्रमाणे काही प्रमाणात कृती करताना दिसू लागले.

**अहमदनगरमधील सुधारक व सुधारणा चळवळी**

"लालशकंर उमियाशकंर यांच्या भरीस पडून अहमदनगरची विधवा पार्वतीबाई पुनर्विवाहास तयार झाली अशा समजावरुन तिच्या बापाने उमियाशंकरवर फिर्याद केली. त्या मुलीच्या बापाला देवी डॉक्टराला लोकांनी वर्गणी करुन मदत केली."[50] आता उमियाशंकरला विनाकारण त्रास सोसावा लागत आहे. अहमदनगरमधील घटना,

घडामोडी राष्ट्रीय, सामाजिक चळवळींमुळे प्रभावित होत होत्या. पूर्णविवाहाची चळवळ नगरमध्ये पोहोचली होती. मात्र एखाद्या स्त्रीचा पुनर्विवाह व्हावा हे नगरकरांना पसंत नव्हते. त्यातून पुनर्विवाहास मदत करणाऱ्याचा बिमोड करण्यासाठी लोक एकत्र येऊन कायदेशीर लढाही लढताना दिसतात.

अहमदनगरास प्रार्थना समाज, आर्य समाज, थिऑसोफिकल वगैरे सर्व काही असून त्यांचे कार्य वळवाच्या पावसाप्रमाणे चालू असे. नोकरीकरिता आर्यसमाजाच्या आणि ख्रिस्ती मिशनांच्या मागे एकसमयावच्छेदेंकरुन लागलेला बाप्तिस्मा पावलेला ब्राम्हण आर्य समाजाची दीक्षा घेईल असे पुष्कळांना वाटत होते. परंतु विजापुरास ब्रदर मिशनमध्ये चांगली चाकरी मिळत असल्यामुळे त्याने आर्यसमाजी होण्याचा विचार रहित केला. तेथील नोकरी न मिळाली तर हे आर्यसमाजाच्या मागे लागणार 'एते कुलस्याधय:' या वचनाची आठवण होते. धर्मांतर करण्यामागे मनपरिवर्तन हेच ऐकमेव कारण नसे. तर भौतिक लाभासाठी, नोकरी मिळविण्यासाठी देखील लोक धर्मांतर करीत. अर्थात काही काळ ख्रिस्ती धर्म स्विकारुन फायदा न झाल्यास पुन्हा मूळ धर्मात परतण्याचा मार्गही लोक अवलंबित असे दिसते.

अहमदनगरमध्ये अनाथ वसतिगृह, सोशल सर्व्हिस लीग, कलाशिक्षण, अहमदनगर सोशल क्लब या चार उपयुक्त संस्था स्थापन झाल्या.

१) अनाथ वसतिगृह - अहमदनगरात माधुकऱ्यांची संख्या दिडशेपर्यंत असे. उन्हाळ्यात जमीन तव्यासारखी तापलेली असताना किंवा पावसाळ्यात कर्दमाचा पसारा माजला असता “पाच ते सतरा वर्षाचे बटू विद्यार्जनाला वाहिलेले हुशार विद्यार्थी 'भिक्षां देहि' म्हणत दारोदार हिंडत.”[51] वाईट संगतीमुळे पुष्काळांच्या जीवनाचा नाश होत असे. त्यांची ही स्थिती लक्षात घेऊन ‘अनाथ वसतीगृह’ ही संस्था स्थापन झाली होती. बाळासाहेब देशपांडेनी आपला वाडा त्यासाठी दिला. वेदशास्त्र संपन्न रावेरकर त्यांचे स्वयंप्रेरित संस्कृतचे अध्यापक बनले. या संस्थेत पंचावन्न मुलांमध्ये पाच ब्राम्हणेत्तर व एक मुसलमान मुलाचा समावेश होता.

२) सोशल सर्व्हिस लीग - अमेरिकन मिशन हायस्कूलमधील अध्यापक मि. डेमिंग यांनी विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना समाजसेवेची गोडी लागण्यासाठी या संस्थेची उभारणी केली.

३) कला शिक्षण - ही संस्था १९०८ साली केशव वामन सोले यांनी धुळ्याप्रमाणे अहमदनगर मुक्कामी सुरु केली होती. त्यांनी शिवणकलेच्या वर्गास जोडून ड्रॉईंगचे व पेंटींगचे वर्ग सुरु केले होते. या संस्थेस एक प्रदर्शन जोडण्यात आले होते. ठिकठिकाणच्या स्त्रियांची कलाकौशल्याची कामे व विद्यार्थ्यांची चित्रकलेची कामे यांचे प्रदर्शन भरवून उत्कृष्ट कामास बक्षीस देत असत.

४) अहमदनगर सोशल क्लब - ही सन्माननीय व्यवसाय करुन आपला चरितार्थ चालविणारी तरुण मंडळींची संस्था होती. या क्लबच्या सदस्यांनी योग्य, परिशुध्द स्वरुप देऊन त्राटिका सादर करुन पैसे मिळवले व ते सर्व अनाथ विद्यार्थी गृहास दिले होते.

**अहमदनगरमधील संस्था परिचय**

**प्रार्थना समाज**

"हिंदुस्थानांत इंग्रजी राज्य सुरु झाल्यानंतर जुनी संस्कृती व नव्या इंग्रजी शिक्षणाने हिंदू स्थानांत परिचित झालेली पाश्चात्य संस्कृती या उभय संस्कृतीचा तौलनिक व चिकित्सक अभ्यास करुन हिंदुस्थानात जो नवा युगधर्म बंगालचे सुप्रसिध्द पुढारी राजा राममोहन रॉय यांनी आखला व प्राचीन वैदिक धर्मावर आधारलेला एकेश्वरी व निर्गुण परब्रम्हाची उपासना करण्याचा ब्रम्होसमाज नावाचा जो पंथ बंगालमध्ये काढला."[52] अहमदनगरच्या संस्थात्मक सार्वजनिक जीवनास अनाथ वसतिगृहाच्या रुपाने सुरुवात झालेली दिसते. सोशल सर्व्हीस लिग, कलाशिक्षक या संस्था समाजसेवी स्वरुपाच्या आहेत तर व्यापारी क्लब ही संस्था व्यावसायिकांची होती. त्याचीच पुनरावृत्ति महाराष्ट्रांत न्यायमूर्ति रानडे भांडारकर प्रभूति पुढाऱ्यांनी प्रार्थना समाज मुंबई, पुणेसारख्या ठिकाणी काढून स्थापन केला. या पुढाऱ्यांचा भर सर्वांगीण सुधारणेचा असल्यामुळे धार्मिक बाबतीतही नवा पंथ स्थापण्याकडे असल्याने न्या. रानडे, भांडारकर

विशेषत: नगरला त्यावेळी अमीन म्हणून असलेले त्यावेळेचे प्रसिध्द समाज सुधारक रा. व. लालशंकर उमियाशंकर हे असल्याने त्यांच्याच प्रेरणेने व शंकर पांडुरंग पंडित, मोहनलाल वकील यांच्या साहाय्याने अहमदनगर येथे प्रार्थना समाज स्थापन झाला.

त्यांत त्यांस स्थानिक पुढारी सहदेव रावजी बागडे, कोंडो रावजी घाटे प्रभृतीचे साहाय्य मिळाल्याने ही शाखा येथे बरीच वर्षे उत्तम प्रकारे चालली. रानडे, भांडारकरांच्या साहाय्याने स्थानिक वर्गणी जमवून इमारतीकरता जागा खरेदी करुन समाजाकरिता एक मंदिर बांधून या शाखेला स्थैर्य आणले. या मंदिराच्या उद्‍घाटन समारंभ ११ नोव्हेंबर १८८७ साली झाला.

## नगरची वक्तृत्व सभा

“इंग्रजी अमदानींत महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे व विशेषत: पुण्यांतील सार्वजनिक संस्थाचे प्रेरक न्या. रानडे, गोपाळ हरी देशमुख, ऊर्फ लोकहितवादी व पुण्याचे सार्वजनिक काका  गणेश वासुदेव जोशी हे होत, त्यांनी पुण्यास वक्तृत्वोतेजक सभा स्थापन केली व त्याच धर्तीवर नगरसही तशीच संस्था १८७३ साली स्थापन झाली. तिचे संस्थापक ‘न्यायसिंधु’ प्रेसचे मालक व न्यायसिंधु वर्तमान पत्राचे संपादक गोविंदपंत कुकडे हे होते. नगरच्या त्यावेळच्या सर्व सार्वजनिक कामांत ते प्रमुख असल्यामुळे त्यांस ‘अहमदनगरचे सार्वजनिक काका’ असे म्हणत. या सभेने स्वदेशीचा प्रचार करण्यात बरेच प्रयत्न केले.”[53] ओमीया शंकर यांच्या पुढाकाराने प्रार्थना समाजाची शाखा अहमदनगरमध्ये सुरु झाली. या घटनेमुळे अहमदनगरचे सामाजिक जीवन विस्तरले. त्याचबरोबर नगरला गोविंदपंत कुकडेंनी वक्तृत्व सभा सुरु करुन पुण्याच्या वक्तृत्वोतेजक मंडळाशी नाते जोडले.

गोविंदराव कुकडे यांचेनंतर या संस्थेचे चिटणीसपद  रामचंद्र कृष्ण जोशी,  केशवराव पटवर्धन यांचेकडे आले. हे जोशी पुण्याचे सार्वजनिक काकांचे चुलत बंधु होत. त्यांचे चिरंजीव  विनायकराव जोशी उर्फ अप्पा जोशी हे पुण्यास आगरकराचे सुधारक पत्र चालवीत.

**श्रीपांजरापोळ (गोरक्षण संस्था) अहमदनगर**

"या संस्थेची स्थापना १८९४ साली पाशुभाई माटे यांनी आपल्या मालकीच्या जमिनी मध्येच केली व पुढे हा नंबर संस्थेस बक्षीस देऊन टाकला. संस्थेची जोपासना व वाढ करण्याचे श्रेय अहमदनगर येथील व्यापारी वर्गासच प्रामुख्याने आहे. कारण त्यांनी आपण होऊनच आपल्या व्यवहारावर लागू करुन घेतलेल्या लाग्यावरच (टॅक्स) या संस्थेचा खर्च चालतो. याशिवाय विणकर, जिनींग फॅक्टरी, वगैरेकडूनही संस्थेस देणगी मिळते."[54] या संस्थेचे मुख्य उद्देश जनावरांचे क्रूरतेने वागविणाऱ्यापासून संरक्षण करणे, दुबळया जनावरांना आश्रय देऊन ती पोसणे, जनावरांची उत्तम निपज होण्याविषयी प्रयन्त करणे, शेतकरी लोकांस शेतीच्या उपयोगी पडणारी जनावरे काही सवलतीने व शर्तीने देणे, नागरिकांना चांगल्या दुधाचा पुरवठा करणे हा आहे. दुष्काळाचे दिवसांत अनाथ, दुबळी व सोडून दिलेली जनावरे पांजरापोळांत आणून या संस्थेत घातली जातात.

**दलित दोस्त-दल १९३३**

या संस्थेची स्थापना अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाजांतील मुलामुलींना मोफत शिक्षण देण्यासाठी म्हणून १९३३ साली करण्यात आली होती. या संस्थेचे मुख्य कार्यकर्ते भाई सथ्था होते, त्यांस कदम शिक्षक हे मदत करीत असतात. या संस्थेच्या दिवाळीबाई बार्शीकर प्राथमिक शाळा, मांडवगांव कन्या छात्रालय, राजूर छात्रालय, कोळगांव छात्रालय, कोळगांव कन्या छात्रालय, सार्वजनिक वाचनालय नगर, सार्वजनिक व्यायाम शाळा इत्यादी संस्था मंडळातर्फे चालविल्या जात होत्या. या संघटनेने नगरला अस्पृश्योध्दाराच्या चळवळीस जोडले.

**अहमदनगर वाचनालय १८३८**

"ही जुनी इमारत दमदार आहे, खरी परंतु वाचनालयाच्या वाढत्या व्यवसायासाठी अपुरी पडत असल्याने याच वाचनालयात लोकमान्य टिळकांच्या पुण्यस्मरणार्थ स्थापलेले मोफत वाचनालय व त्याचकरीता स्वतंत्र दिवाणखाना यातच सामील

केला."[55] १९३९ साली नगर शहरांत महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले असता त्याबरोबरच 'वाचनालय परिषद' या वाचनालयाच्यातर्फे भरविली आणि वाचनालयाचा शतसांवत्सरिक उत्सवही त्या साली साजरा करण्यात आला. या उभय सभांचे अध्यक्ष महाराष्ट्रीय सुप्रसिध्द साहित्यीक व विनोदी लेखक प्राध्यापक चिं. वि. जोशी हे होते.

"काँग्रेस सरकार अधिकारारुढ झाल्यानंतर शिक्षण मंत्री ना. बाळासाहेब खेर यांनी मुंबई इलाख्यात वाचनालयाची चळवळ आरंभिली व जिल्ह्याजिल्ह्यांत असलेल्या वाचनालयांस सरकारी देणग्या देण्याबद्दलचा उपक्रम आरंभिला. या योजनेच्या अन्वये हे वाचनालय जिल्हा केंद्र वाचनालय म्हणून गणले जाऊन त्यास खर्चाची निम्मी रक्कम सरकारांतून ग्रँट म्हणून मिळत होती."[56]

**अहमदनगर रिमांड होम १९४२**

"या संस्थेची स्थापना १९४२ साली करण्यात आली. या संस्थेचा मुख्य उद्देश १६ वर्षांचे आंतील लहान मुलांना कायद्याच्या मदतीने संरक्षण देणे हा होय व त्यांची काळजी घेणे हे या संस्थेचे मुख्य ध्येय होय. येथे मुले आल्यानंतर जुविनाईल कोर्टामार्फत अशा मुलामुलींच्या भावी आयुष्यासंबंधी विचार केला जातो. त्यांस सुरक्षित वातावरणात वाढवून उदयाचा उत्तम नागरिक बनविण्याचे सामाजिक कार्य हे अशा रिमांड होमचे ध्येय असते."[57]

**वाङ्:मयोपासक मंडळ १९२८**

"या संस्थेची स्थापना १९२८ साली अहमदनगर येथे असलेले सब जज्ज फाटक यांच्या प्रोत्साहनाने झाली व तेच त्याचे पहिले अध्यक्ष होते. १९३० साली मंडळ रजिस्टर करण्यात आले, मंडळाचे मुख्य उद्देश नगर जिल्ह्यांत वाङ्:मयाची अभिवृध्दि करणे, प्राचीन व ऐतिहासिक वाङ्:मयाचे परिशीलन करुन त्याच्या प्रसिध्दीची खटपट करणे व उत्साही लेखकांस उत्तेजन देणे."[58]

मंडळ स्थापन झाल्यानंतर प्रथम अहमदनगर येथेच अहमदनगर, नाशिक संमेलन मुंबईचे प्रि. पाध्ये यांचे अध्यक्षतेखाली यशस्वी रीतीने पार पाडले.

“सन १९३४ साली मंडळाने साहित्य क्षेत्रांत एक मोठी कामगिरी बजावली. ज्ञानेश्वरांनी आपला ग्रंथ ज्ञानेश्वरी हा नेवासे येथे निर्माण केला. तेव्हा त्यांच्या ग्रंथ संपत्तीची यथार्थ ओळख करुन देणारे "ज्ञानेश्वर दर्शन" हा ग्रंथ तयार करुन हा नेवासे या ठिकाणी संमेलन भरवून तो प्रसिध्द केला हे कार्य होय. मंडळाच्या आमंत्रणावरुन १९३९ चे ‘महाराष्ट्र साहित्य संमेलन’ अहमदनगर येथेच म. म. दत्तोपंत पोतदार यांचे अध्यक्षतेखाली भरले होते.”[59]

वाङ्:मयोपासक मंडळाचा एक उद्देश ऐतिहासिक ग्रंथाचे संशोधन करणे हा असल्याने ज्याप्रमाणे वाङ्:मयोपासक मंडळाचे ज्ञानेश्वर मंडळ असे एक पोटमंडळ नेमले त्याचप्रमाणे वरील कार्यासाठी इतिहास संशोधन मंडळ असेही एक पोट मंडळ स्थापन करुन १५-३-१९५३ रोजी प्रा. कृ. दा. कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली या पोट मंडळच्या स्थापनेचे उद्घाटन झाले. सदर इतिहास संशोधन मंडळ, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे या संस्थेशी संलग्न केले आहे व या मंडळाची कचेरी मिरीकर यांचे वाङ्मयांतच असून सरदार बाबासाहेब मिरीकर यांच्या नेतृत्वाखाली हे मंडळ काम करीत असे.

**बालिकाश्रम १९३३**

“महात्मा गांधीच्या विधायक कार्यांचे हरिजन सेवा हे एक प्रमुख अंग होते. हरिजनांच्या मुलांमुलीस शिक्षण दिल्यानेच त्यांची स्थिती सुधारेल या दृष्टीने हरिजन मुलींना शिक्षण देण्याकरिता १९३३ साली दिल्ली दरवाजाबाहेरील हरिजन वस्तीतील चावडीमध्ये अहमदनगरमधील प्रसिध्द समाज सेविका व कार्यकर्त्या जानकीबाई आपटे यांनी ही शाळा उघडली. भारतीय हरिजन सेवक संघ हा महात्मा गांधींनी स्वतंत्र हरिजनांच्याच उध्दारासाठी म्हणून स्थापला व त्याचे कार्ये चालविण्यासाठी म्हणून भारत सेवक समाजाचे उपाध्यक्ष व समाज सेवक ठक्करबाप्पा यांस मागून घेतले. पूज्य ठक्करबाप्पा यांनी आपले उत्तरीय आयुष्य याच कार्यासाठी वाहून घेतले होते व या संपाचे अध्यक्षपदही त्यांचेकडे आले. बालिकाश्रमाच्या या नवीन बांधलेल्या इमारतीचा

उद्‌घाटन समारंभही अशा थोर समाज सेवकाकडून व्हावा (ता. २४ ऑक्टोबर १९४३) हे उचितच होय. या संस्थेस बालिकाश्रम हे नाव त्या समारंभाचे वेळी देण्यात आले."[60]

या बालिकाश्रमांत हरिजन मुलींबरोबर सर्व जातीच्या मुली असत. यामुळे जातिभेद मोडण्यास व अस्पृश्यता कृतीने घालविल्यास फार मदत होते. या संस्थेने एक बालवर्ग व एक प्राथमिक शाळेचा वर्ग असेही वर्ग सुरु केले. या संस्थेस मदत व्हावी म्हणून बालिकाश्रम सहकारी संस्था काढली. त्यात गावातील स्त्रियांना घरगुती लागणारे पापड, लोणची व इतर जिनसा तयार करण्यात येतात व त्या संस्थेचे नफ्यातून या संस्थेस मदत होत असे.

**सनातन धर्मसभा नगर १९०७**

"या सभेची स्थापना चैत्र शु. ५ शके १८२९ (इ. स. १९०७) रोजी श्रीमत् शंकराचार्य शिवगंगामठ यांचे प्रेरणेने कै. विनायक बळवंत ऊर्फे भाऊसाहेब बाबाजी ऋषि या सर्वांनी मिळून ही संस्था नावारुपास आणली."[61] सभेचे उद्देश अहमदनगर शहर व जिल्हा यामध्ये सनातन वैदिक  धर्माची वाढ होण्याच्या दृष्टीने धार्मिक संस्कृत, व प्राकृत हस्तलिखित किंवा छापील ग्रंथ, योध्दा वगैरेचा संग्रह करणे, उपनीत ब्राम्हण मुलांना संध्यादी ब्रम्हकर्माचे शिक्षण देणे धर्मासंबंधी, वय नियमांची जंत्री करणे, वर्णाश्रम धर्मावर, सदाचार धर्मावर विविध विषयावर अहमदनगर शहरात व जिल्ह्यात व्याख्याने व प्रवचने करणे, नित्य नैमित्तिक धर्मविहीत कर्मे करणे, अनाथ प्रेत संस्काराकरीता मनुष्याची व द्रव्याची मदत करणे इत्यादी सभेचे प्रमुख उद्देश आहेत.

सभेच्या ग्रंथसंग्रहालयात आज जवळजवळ २००० ग्रंथ व १५००० पोथ्या आहेत. यामध्ये हस्तलिखित शिवलिखित पोथ्यांची संख्या एक हजार आहे.

**प्रेत संस्कार सहाय्यक मंडळ १९४४**

"दुसऱ्या महायुध्दाच्या वेळी सर्वच वस्तूंची हर्गता वाढली. त्याचप्रमाणे अंत्यविधिकरता लागणाऱ्या वस्तूही तशाच महागल्या. त्यांत या वस्तू निरनिराळ्या ठिकाणाहून आणाव्या लागणे ही एक आणखी अडचण, या दोन्ही अडचणी दूर

होण्यासाठी सर्व सामान एके ठिकाणीच व शक्यतो माफक दरात मिळावे अशी योजना नगरपालिका मध्ये काम करणारे धर्माधिकारी व देवकर यांचे मनात आली व उभयतांनी शहरांतील प्रमुख व्यक्तीशी विचारविनिमय करुन ही व्यवस्था करण्यास व त्यास अशी संस्था काढल्यास त्याचे सभासद होण्याबद्दल मान्यता मिळवून वरील नावाचे मंडळ ता. ९ एप्रिल १९४४ रोजी सुरु केले. अहमदनगर नगरपालिकानेही या मंडळास त्यावेळचे नगरपालिका चे मुख्याधिकारी रा. व. हिवरगांवकर यांचे शिफारशीमुळे नाममात्र : भाडे घेऊन नगरपालिकाच्या बैल गोठ्यांतील एक तबेला या मंडळाचे दुकानाकरता दिला."[62]

मंडळाचे उद्देश अंत्यविधीकरता लागणारे सर्वच साहित्य एकाच ठिकाणी या दुकानात वाजवी दराने मिळण्याची व्यवस्था करणे, अनाथ प्रेत दहनास मदत करणे व नदीकाठी आदर्श स्मशानभूमि तयार करणे ही होती. आदर्श स्मशानभूमि तयार करण्यासाठी लागणारी नदीकाठची जागा नगरपालिकेकडून मिळविण्याबद्दल मंडळाने बरेच परिश्रम होते.

**सत्यशोधक चळवळ**

"अहमदनगर जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीची पायाभरणी महात्मा फुले याचे सहकारी कृष्णराव भालेकर आणि तरवडी तालुका नेवासे येथील गणपतराव पाटील यांनी १८९० मध्ये केली. कृष्णराव भालेकर हे विदर्भातील सत्यशोधक समाजाची कामगिरी पूर्ण करुन व्यवसायानिमित्त इ. स. १९०६ मध्ये नगरला आले. त्यावेळी ते बागडे थिएटरचे बांधकाम पाहात होते. या दरम्यान आसपासच्या लोकांना जमून ते व्याख्यान देत असत. त्यातून शिक्षणाचे महत्व, धर्मातील थोतांड, अनिष्ट चालीरीती, अंधश्रध्दा याच्याविषयी प्रबोधन करीत असत. येथे सत्यशोधक समाजाची मुहर्तमेढ रोवली गेली."[63] या समाजाचा प्रसार करणारी ते प्रभावी वक्ते होते. अहमदनगर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एक कार्यकर्ता १३० वर्षापूर्वी पुण्यासारख्या शहरात जाऊन सत्यशोधक समाजाचे कार्य वेगवेगळ्या माध्यमातून करीत होते, याचा अभिमान नगरकरांना वाटतो.

कृष्णराव भालेकरांच्या निधनानंतर मुकंदराव पाटिल यांनी 'दीनमित्र' हे बहुजन समाजाचे मुखपत्र सुरु केले. त्यातून ब्राम्हण, ब्राम्हणेत्तर संघर्षाला वाचा फोडली, कुलकर्णी वतने बंद करण्यासाठी जनमत जागृत केले. "मुकंदराव पाटिलांनी केलेल्या प्रबोधनामुळे नगर जिल्ह्यात गावोगावी सत्यशोधक समाजाच्या शाखा सुरु झाल्या. इ.स.१९१५ मध्ये अहमदनगर येथे सत्यशोधक समाजाची परिषद भरविण्यात मुकुंदरावानी पुढाकार घेतला."[64] या परिषदेमुळे अहमदनगर जिल्ह्यात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. "सत्यशोधक पध्दतीने धार्मिकविधी व विवाह करणारे अनेक कार्यकर्ते निर्माण होऊ लागले."[65] त्यांना ब्राम्हण पुरोहिताचा विरोध होऊ लागला. सत्यशोधक चळवळीचे अहमदनगरमधील कार्यकर्ते प्र.क. भापकर, हिराबाई भापकर, ह.कृ. काळे, रामभाऊ आगरकर, विनायकराव मुळे, साहेबराव निसळ, अमन पाटिल, रामकृष्ण मोडक इ. सत्यशोधक चळवळीत सक्रियपणे सहभागी झाले होते.

**डिप्रेस्ड क्लास मिशन**

महात्मा फुले याच्या सत्यशोधक अभियानाचे एक महान प्रवक्ते महर्षि विठ्ठल रामजी हे १९०६ साली अहमदनगरला आले होते. युरोपातील सर्व धर्मांचा त्यांनी तौलनिक अभ्यास केला होता. प्रार्थना समाजाचे ते प्रचारक होते. अहमदनगरला आल्यावर त्यांनी नगर कँटोन्टमेंटमध्ये सैनिकांच्या व अधिकाऱ्यांच्या सर्व तऱ्हेच्या सेवा करणाऱ्या महार समाजातील मंडळींनी सभेसाठी आमंत्रित केले होते. तेथे जमलेल्यानी त्याना भोगाव्या लागणाऱ्या जातीयतेच्या यातना महर्षींना ऐकविल्या. त्याच वेळी वि. रा. शिंदे यानी पुढील जीवन अस्पृश्योध्दाराच्या कार्यासाठी वाहून घेण्याचा क्रांतीकारी निर्णय अहमदनगरला घेतला. त्यानी डिप्रेस्ड क्लास मिशन म्हणजे 'निराश्रित सहाय्यकारी मंडळी' स्थापन केली आणि अस्पृश्योध्दाराच्या कार्यास संस्थात्मक प्रयोग केला. जगातील विविध देशातील जातियतेच्या वास्तवाचा शोध घेऊन 'अस्पृश्यांचा प्रश्न' हा ग्रंथ लिहिला. कुटुंबासह दलित वस्तीत जाऊन राहिले. त्याच्यासाठी वसतिगृहे व शाळा महाराष्ट्र भर काढल्या.

### डॉ. बाबासाहेब आंबडेकर व अहमदनगर

"बाबासाहेबानी अस्पृश्यांच्या आत्मोध्दाराच्या सुरु केलेल्या चळवळीचा परिणाम अहमदनगर जिल्ह्यातील महार जातीवर मोठ्या प्रमाणावर झाला. अहमदनगरच्या दलित वस्तीत पंचशिल नावाच्या शाळेची शिळा रोवली. आपल्या भाषणातून जुन्या रुढी परंपरा सोडून द्याव्यात. शिकून मोठे व्हावे असा संदेश दिला."[66] प्रकृती स्वास्थाकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुर्वेद रुग्णालय येथे उपचाराकरीता येत असत. त्यावेळी त्यांचे वास्तव्य पटवर्धन वाडा येथे असे. या वास्तव्यात त्यांनी दलित वस्तीतील पंचशील शाळेस भेट दिल्याचे उल्लेख शाळेच्या नोंदीत सापडतात.

### अहमदनगर महिला मंडळ १९३५

"अखिल भारतीय महिला मंडळाची शाखा अहमदनगर येथे ६ जानेवारी १९३५ रोजी इंदिराबाई कानिटकर यांच्या प्रयत्नाने स्थापन झाली. मंडळाच्या पहिल्या अध्यक्ष वेणुबाई मोडक, उपाध्यक्ष सुशीलाबाई सप्तर्षि, सेक्रेटरी इंदिराबाई कानिटकर व खजिनदार सिंधूताई हिवरगांवकर असे हे पहिले कार्यकारी मंडळ होते. अहमदनगरची ही शाखा अखिल भारतीय महिला परिषेदच्या महाराष्ट्र प्रांतिक शाखेची ही उपशाखा म्हणून चालविली जाते."[67] अहमदनगरच्या महिला मंडळाचे ध्येय, धोरण व हेतू अखिल भारतीय महिला परिषदेप्रमाणेच खालीलप्रमाणे होता :-

१. स्त्रिया व मुले यांच्या उन्नतीसाठी झटून त्यास आदर्श नागरिक बनविण्याचा प्रयत्न करणे.

२. स्त्रिया मुले यांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे.

३. समान हक्कावर आधारलेल्या सामाजिक सुधारणा घडवून आणणे.

४. न्याय व स्वातंत्र्य यावर आधारलेल्या जागतिक शांततेचा पुरस्कार करणे.

५. वरील सर्व कार्य राजकीय पक्षापासून अलिप्त राहून करणे.

१९३७ साली महाराष्ट्राचे प्रांतिक अधिवेशन अहमदनगर येथेच भरविण्यात आले. वेणूबाई मोढक या स्वागताध्यक्ष व लक्ष्मीदेवी निंबाळकर, फलटणच्या राणीसाहेब

या अध्यक्ष होत्या. हे अधिवेशन सर्वतोपरी यशस्वी होऊन अहमदनगर शहरात व अहमदनगर जिल्ह्यांत स्त्रियांचे चळवळीस जोरदार चालना मिळाली.

मंडळाने आजपर्यंत साक्षरता प्रसाराचे वर्ग चालविले. शिवण काम, इंग्रजी व हिंदी शिक्षणाचे वर्ग चालविले. आरोग्य व रुग्णोपयोगी वस्तूंचे केंद्र चालविले. सरकाराशी सहकार्य करुन ग्रामसुधारणा केली. शिशु संगोपन केंद्र, कुटुंब नियोजन केंद्र व दुग्ध केंद्र चालविणे वगैरे बहुविध व भरीव कामगिरी मंडळाने स्थापनेपासून आजतागायत केली.

दुष्काळ समयी मंडळातील सदस्यांनी गरीबांसाठी चालविलेल्या अन्नछत्रांत बरेच काम केले व पाण्याच्या दुर्भिक्षतेचे वेळीही म्युनिसिपालिटीने आरंभिलेल्या श्रमदानाच्या कार्यात बरेच साहाय्य केले.

**भगिनी समाज १९४५**

"ही संस्था २३-७-१९४५ रोजी स्थापन झाली. सभासदांची वर्गणी अत्यल्प, चार आणे इतकीच ठेवली आहे. त्यातुनच स्त्रियांच्या खेळण्याची सोय करणे व त्यांची मानसिक व शारिरिक उन्नति करणे हे समाजाचे ध्येय ठेवून ही संस्था काम करीत असते. विशेषत: देशी खेळास प्राधान्य देण्यात येते."[68] संस्थेस स्वत:ची स्वतंत्र जागा नाही. परंतु हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी मराठी शाळेच्या पटांगणांत या संस्थेच्या सभासद भगिनी खेळत असतात. "'स्वातंत्र्य दिन', 'प्रजासत्ताक दिन' यासारखे राष्ट्रीय उत्सव व स्त्रियांचे आवडते असे वासंतिक हळदी-कुंकू, कोजागिरी वगैरे समारंभ सामुदायिक रीतीने घडवून स्त्रियांची व मुलींची संघटना वाढविण्यांत ही संस्था महत्वाचे कार्य करीत असते व यासाठी मधूनमधून महत्वाच्या ठिकाणी सहलीही सभासद काढीत. संस्थेच्या एकूण ४० सभासद होत्या."[69]

या संस्थेचे वैशिष्ट्य हे म्हणता येईल की शहरांत कोठेलेही सार्वजनिक कार्य, परिषद किंवा सत्कार वगैरे असो त्यांत भगिनींच्या कार्याचा वाटा या समाजातील सभासद मोठ्या आनंदाने उत्साहाने उचलत.

## अहमदनगरमधील कर्तृत्ववान स्त्रिया

अहमदनगरमध्ये अनेक कर्तृत्वान स्त्रियांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला. एलिझाबेथ बॅलेंटाईन यांनी मिसेस फ्रॉग व रिड या स्त्री कार्यकर्त्यांच्या मदतीने कापड बाजारात अहमदनगर जिल्ह्यातील मुलींसाठी १८३८ मध्ये पहिली शाळा सुरु केली. "स्त्रियांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा एलिझाबेथ बॅलेंटाईन यांनी सुरु करुन शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी क्रांती केली. त्यांच्या या प्रयोगामुळे स्त्रियांच्या जीवनातील अंधार दूर होण्यास मदत झाली."[70] पुढे क्लेरा ब्रुस यांनी या शाळेचा विस्तार केला. लक्ष्मीबाई टिळकांनी शालेय शिक्षणाचा गंध नसतानासुध्दा काव्य, किर्तने, भाषणे यात भाग घेऊन सामाजिक प्रबोधनास सुरुवात केली. समाज जागृतीसाठी पंडिता रमाबाई काही काळ नगरात वास्तव्यास होत्या. जेष्ठ समाजसेविका जानकीबाई आपटे यांनी 'हिंद सेविका संघ' स्थापून त्याव्दारे खादी विक्री, दारुबंदी प्रभात फेऱ्या इ. उपक्रम राबविले. हिराताई भापकर या जिल्हा लोकल बोर्डाच्या महाराष्ट्रातील पहिल्या स्त्री अध्यक्षा होत्या. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची मुहर्तमेढ रोवली. शांताबाई तांदूळवाडकर यांनी 'बंगाल फंड', 'कस्तुरबा फंड','बिहार फंड' जमवून आर्थिक व्यवहार चोख केले. सिंधूताई हिवरगांवकर, वेणुताई मोडक, यमुनाताई दुधाट, कमलाताई जिन्सिवाले, मालतीबाई देशपांडे, जानकीताई पवार, कमलाताई रानडे, रुथबाई हिवाळे, मिसेस टिशकीन (सिसल फायबर इंडस्ट्रीच्या संचालिका) या महिलांनी नगरच्या समाजिक जीवनात उल्लेखनीय कामगीरी बजावली.

## रचनात्मक कार्य समिती, अहमदनगर - ग्राम रचना कार्यालय १९४१

"ही संस्था महात्मा गांधी यांनी प्रतिपादलेला जो विधायक कार्यक्रम तो अहमदनगर शहरांत अमलात आणण्यासाठी अण्णासाहेब सहस्त्रबुध्दे यांचे विचाराने अहमदनगर जिल्ह्यातील प्रमुख मंडळींनी १९४१ साली स्थापन केली. "या संस्थेचे आजचे ध्येय खादी ग्रामोयोग या रचना कार्यास प्रोत्साहन देणे हे होय. या समितीचे विश्वस्त मंडळ कु. सो. फिरोदिया पुनमचंद भंडारी व शं. भा. दिघोळकर हे होते."[71]

नियमितपणे सूत कांतणे, खादी वापरणे, हातचक्की आटा, हातसडिक तांदूळ, बैल घाण्याचे तेल, गूळ, अहिंसक चामडयाच्या वस्तु अशा ग्रामोदयोगी वस्तूच वापरणे असे समितीचे नेमधर्म व आहार विहारदी नेमधर्म बऱ्याच लोकांना जमणे कठीण झाल्यामुळे या संस्थेतील बरेच लोक गळाले, मतमतांतरेही अनेक झाली. म्हणजे पूज्य विनोबाजी भावे यांच्या विचारे या संस्थेचे नाव 'ग्रामरचना कार्यालय' असे सुरू केले.

महात्मा गांधींनी सकाळ प्रार्थनेची पध्दत जी आखून दिली ती नियमितपणे या कार्यालयात चालू असे. ही समिती स्थापन झाल्यापासून गेली बारा वर्षे सतत शहरांत व जिल्ह्यांत ग्राम रचना कार्य पध्दतशीरपणे लोकांपुढे मांडले जाई. पूज्य विनोबाजींनी भूदान आंदोलन सुरु केल्यापासून रचनात्मक कार्यालाच 'ग्राम रचना' हे नाव देऊन गावाची सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न या समितीमार्फत झाला.

**माताबालक मंदिर १९३६**

"स्त्रियांच्या संक्रांतीचा सण सामुदायिक रीतीने साजरा करण्याच्या कल्पनेने जानकीबाई आपटे व सुशिलाबाई सप्तर्षि यांनी स्त्रिया व मुले यांकरिता माताबालक मंदिर ही संस्था १०-२-१९३६ रोजी स्थापन केली. रावसाहेब पटवर्धन यांनी या संस्थेकरीता आपल्या वाड्यांतील मागील तबेला व बखळ जागा दिली. या पुढील सरकारची राखीव जागा नगरपालिकेच्या ताब्यात होती ती नगरपालिकेकडून मिळवून त्या भोवती पत्र्याचे कम्पौंड म्युनिसिपालीटीकडून घालून घेऊन त्याचा खर्च या संस्थेने हप्त्याने फेडला. ही जागा खुली ठेवण्याची शर्त असल्यामुळे तेथे कम्पौंडचे भोवती आतील बाजूस बागबगीचा करुन स्त्रियास व मुलामुलींस क्रीडांगण म्हणून वापरण्यात येते. संस्थेला जे कर्ज होते ते फेडण्यासाठी संस्थेतील भगिनींनी 'माईची माया' हा नाट्यप्रयोग केला. केवळ स्त्रियांनी अहमदनगरात केलेले हे पहिलेच नाटक होते."[72] तशाचप्रमाणे १९४६ व १९४८ साली संस्थेच्या मदतीसाठी 'कुलवधु' व 'पाणीग्रहण' ही दोन नाटके सादर झाली. संस्थेच्या उद्देश माता व बालक यांची शारीरिक, मानसिक व बौध्दिक उन्नति करणे हा असल्याने या उद्देशास पोषक अशी सर्व कामे ही संस्था करीत

असते. थोर पुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करणे, राष्ट्रीय दिन साजरे करणे व मातृदिन साजरा करणे वगैरे समारंभ साजरे करुन अहमदनगरच्या स्त्रियांची सेवा ही संस्था करीत आहे.

**ग्रामोद्योग प्रचिती लि. अहमदनगर**

"१९४२ च्या चळवळीनंतर विधायक कार्यक्रमास प्राधान्य आले व यांत खादी व ग्रामोद्योग यांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो असे महात्मा गांधी म्हणत. लहान लहान उद्योगधंदे काढणे व ते लोकांना शिकवणे हाच ग्रामोद्योग. असे ग्रामोद्योग प्रचितीचे संचालक वि. ग. लुकतुके यांनी ठरवून त्याप्रमाणे ते कार्यास लागले. बैलाचे तेलघाणे या कार्यास त्यांनी प्रथम प्रारंभ केला. या तेघाण्यांतून तयार झालेल्या पेंडीपासून बिस्किटे व इतर खाद्य पदार्थ तयार करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. यानंतर लुकतुके हात कागदाच्या निर्मितीकडे वळले. परंतु असे धंदे हे धमार्थ संस्था म्हणून न चालविता धंदेवाईक दृष्टीने चालविण्याचा निर्णय त्यांनी घेतला व भांडवलाची जमवाजमव करुन २५ जून १९४८ रोजी ग्रामोद्योग प्रचिती लि. या नावाने कंपनी ॲक्टखाली ही संस्था नोंदविली."[73]

"तेल, हात कागद, कातडी कमावणे हे तीन मुख्य धंदे कंपनीने हाती घेतले. व शेंगादाण्यापासून ग्रॅली प्रोटीन बिस्कीटेही करण्यात कंपनी यशस्वी झाली. कंपनीची मॅनेजिंग एजन्सी मेसर्स व्ही, जी. लुकतुके आणि कंपनी यांचेकडे होती. लुकतुके यांनी हे सर्व धंदे यशस्वी करण्याची हिंमत बाळगली. तूर्त या कंपनीचे काम स्थगित झाल्यासारखेच आहे. भारतात एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात सुरु झालेल्या वैचारिक क्रांतीमुळे मानवी जीवनाकडे पाहण्याचा नवा आधुनिक दृष्टिकोन विकसित झाला. बुध्दिवाद, तर्कनिष्ठा, मानवतावाद या तत्वांनी आधुनिक दृष्टिकोनाला आधार दिला. भारतात सामाजिक सुधारणेचे युग सुरु झाले. अहमदनगरनेही ही सुधारणेची परंपरा पुढे चालवून आधुनिकतेकडे वाटचाल केली.

सामाजिक परिवर्तनाप्रमाणेच अहमदनगर शहरामध्ये सांस्कृतिक परिवर्तन देखिल झालेले आहे.

## अहमदनगरमधील सांस्कृतिक परिवर्तन

अहमदनगर शहरामध्ये विविध जातीधर्मांचे लोक राहतात. त्याच्या सांस्कृतिक परंपरादेखिल भिन्नभिन्न आहेत. त्यामध्ये विविध सण, विविध उत्सव, जत्रा-यात्रा, ऊरुस इत्यादी सांस्कृतिक परिवर्तन आढळून येते.

## अहमदनगर येथील वृत्तपत्र व्यवसाय

अहमदनगरच्या साहित्यिकांच्या व संतांच्या परंपरेबरोबर अहमदनगर जिल्ह्याच्या वृत्तपत्र व्यवसायाची परंपराहि अभिमानास्पद आहे. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी अहमदनगर शहरात प्रसिध्द केलेले ज्ञानोदय वर्तमानपत्र हे जिल्ह्यातील पहिले वर्तमानपत्र होय. ते सन १८४२ साली शिलाछापावर काढले होते. याशिवाय अहमदनगर शहरातून पुढील महत्वाची वर्तमानपत्रे निघत होती. त्यातील अनेक अल्पायुषी ठरवून काळाच्या उदरात गडप झाली. त्यातील काहींची धावता आढावा पुढीलप्रमाणे घेतला आहे.

'वृत्तवैभव' या नावाचे वृत्तपत्र सन १८६१ साली अहमदनगरला निघू लागले. **'न्यायसिंधु' हे** अहमदनगरचे जुने वर्तमानपत्र १८६६ साली जन्मास आले. १८९३ सालापर्यंत हे पत्रहि शिलाछापावरच छापले जाई. नंतर ते खिळेछापावर निघू लागले. त्यावेळचे अहमदनगरमधील वजनदार आणि वयोवृध्द पुढारी दाजी चिमणाजी ऊर्फ दाजीसाहेब कुकडे हे या पत्रकाचे व छापखान्याचे मालक होते. "पूर्वी वर्तमानपत्रांस पगारी संपादक नेमण्याची प्रथा नव्हती. वर्तमानपत्रांत लेखक हौसेने आपले लेख पाठवीत असत."[74] हे न्यायसिंधुनंतर 'नगर समाचार' या नावाचे पत्र अहमदनगरमध्ये अवन्ना लिंगोजी या कामाठी गृहस्थाने सुरु केले. 'जगदादर्श' नगर समाचार नंतरचे वर्तमानपत्र होय. याचे संपादक व छापखान्याचे मालक काशीनाथ भैरव लिमये हे होते. जगदादर्श आणि न्यायसिंधु ही दोन पत्रे अहमदनगरात समकालीन होती. त्यामुळे या दोन्ही पत्रांचा एकमेकांवर टीकेचा भडीमार होत असे. सन १८७७ साली 'न्यायप्रकाश'

नावाचे मासिक अहमदनगरमध्ये सुरु झाले होते. हे मासिक न्यायसिंधु छापखान्यातच प्रसिध्द होत असे. ‘मुत्सद्दी’ या नावाचे एक साप्ताहिक सन १८७७ मध्ये जगदादर्श छापखान्यात निघू लागले. जहागीरदार गणेश कृष्ण दाभोळकर ऊर्फ मामा दाभोळकर, शिवराम एकनाथ ऊर्फ बुवा भारदे व प्रो. हरीभाऊ परांजपे हे तिघे या साप्ताहिकाचे संपादक होते. ‘विचार साधना’ हे वृत्तपत्र सन १८९५ साली पुण्यास आयोजित राष्ट्रीय सभा होण्यापूर्वी, त्याची पूर्वतयारी म्हणून राष्ट्रीय सभेची चळवळ बरीच वर्षे अहमदनगरमध्ये चालू होती व पुण्याच्या या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनापूर्वीच काही महिने महाराष्ट्राचे त्यावेळचे नेते न्या. रानडे यांच्या आशीर्वादाने ‘विचार साधना’ या नावाचे अहमदनगरच्या प्रागतिक प्रवृत्तीच्या काही उत्साही मंडळींनी हे साप्ताहिक सुरु केलेले होते. ‘तुकाराम’ नावाचे एक छोटेखानी पत्र साळुंके नावाच्या एका गृहस्थाने काढले होते. त्यात त्यावेळी केवळ मामुली नोटीसांचा भरणा फार असे. ‘सुदर्शन’ या नावाचा छापखाना काही मंडळींनी एकत्र जमून समाईक भांडवलावर उभारलेला होता. त्यात मारवाडी व्यापारी रतनशेठ व दगडुशेठ मुथा भागीदार होते व पुढे काही वर्षांनी तेच या छापखान्याचे सर्वस्वी मालक झाले. ‘शेतकरी’ हे वृत्तपत्र रावबहादूर चितळे यांनी बादशहाच्या राज्यारोहणप्रसंगी सुरु केले. ‘नागरिक’ हे वृत्तपत्र इ. स. १९२३ मध्ये सुरु झाले. ‘देशबंधू’ या नावाचे पत्र कै. माणकचंद किसनदास मुथा वकील, व भाऊसाहेब फिरोदिया यांनी सन १९२७ साली सुरु केले. ‘संघशक्ति’ हे वृत्तपत्र सन १९३६ साली अहमदनगर जिल्हा कॉंग्रेस पक्षाने सुरु केले. त्याचे संपादक रावसाहेब पटवर्धन व भाऊसाहेब फिरोदिया हे होते. अहमदनगर जिल्ह्यातील अभिमानाने नाव घेण्याजोगे असे वृत्तपत्र म्हणजे रावसाहेब मुकुंदराव पाटील यांनी काढलेले ‘दीनमित्र’ वृत्तपत्र होय. दूर अशा लहानशा तरवडी या गावी स्वकष्टाने चालविलेले हे वृत्तपत्र होते. “द. रं. निसळ यांनी इ. स. १९३९ साली ‘संदेश’ हे वर्तमानपत्र काढून या पत्राची अल्पावधीतच त्यांनी बरीच मांड बसविली.”[75] अहमदनगरच्या आर्थिकदृष्ट्या यशस्वी अशा वृत्तपत्रांत त्याची गणना करता येईल. परकीयांचे जूं झुगारुन देण्याच्या दृष्टीने स्वातंत्र्य संग्रामांत राष्ट्रीय

प्रवृत्तीचा प्रचार करण्यात संदेश या साप्ताहिकाचा बराच महत्वाचा वाटा आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आपल्या सरकारच्या निरनिराळ्या विकास योजना, पंचवार्षिक योजना आणि काँग्रेस सरकार आपलेच असल्याने त्याच्या ध्येय-धोरणाचा धडाडीने प्रचार करणारे अहमदनगर जिल्ह्यातील हे प्रमुख वृत्तपत्र होते.

पुणे-मुंबईच्या आकर्षणाने झपाटलेल्या या अहमदनगर जिल्ह्याची सांस्कृतिक क्षेत्रातही पुणे-मुंबईचीच नक्कल करण्याकडे कल अधिक असे. या बड्या शहरांच्या पावलावर पाऊल ठेऊन अहमदनगरने प्रगती साधली. किंबहूना या शहरांनी समर्थ मार्गदर्शकाची भूमिका बजावली असे म्हणता येईल त्यामुळे या जिल्ह्याला पत्रकारितेचा अतिशय गौरवास्पद वारसा वारसा. स्वातंत्र्यपूर्व काळात पत्रकारिता हे एक ध्येयवादी काम आहे व ते केले पाहिजे, वृत्तपत्र हा समाजाचा आरसा आहे. त्यात समाजाचे प्रतिबिंब पडले पाहिजे. व वृत्तपत्र हा सामान्यजनांचा मार्गदर्शक आहे. अशा हेतूंनी प्रेरित होऊन अनेक दिग्गजांनी आपल्या जिल्ह्याची बौध्दिक गरज भागविण्यासाठी पत्रकारिता सुरु केलेली दिसते. शाळा महाविद्यालयाचे एक व्यापक जाळे जिल्हाभर पसरल्यामुळे सुशिक्षितांच्या संखेत प्रचंड वाढ झाली. समाजातील समस्यांना सरकारपुढे मांडण्यासाठी वृत्तपत्र हा महत्वाचा दुवा समजून सुशिक्षितांनी अनेक समस्यांना वृत्तपत्राद्वारे वाचा फोडलेली दिसते. या महत्वाच्या वृत्तपत्रांना कोणतेही राजकीय अथवा शासकीय पाठबळ नसताना केवळ इच्छाशक्तीवर चालणारी ही वर्तमानपत्रे अपुऱ्या खपामुळे, आर्थिक अडचणीमुळे, शासनाच्या गैरमर्जीमुळे अकाली नाश पावली. अहमदनगरच्या सांस्कृतिक वाटचालीत या वृत्तपत्रांनी महत्वाची भूमिका बजावलेली दिसते.

**अहमदनगरमधील साहित्यिक**

अहमदनगर शहराच्या जन्माआधी मराठीच्या साहित्यिक भूगोलात एक वाजते गाजते केंद्र ‘नेवासा’ किंवा ‘अधिनिवास’, हे ‘अनादि पंचक्रोश’ क्षेत्र असून ‘भूवनैकपवित्र’ असल्याचे ज्ञानदेवांनी सांगितले आहे. याच अधिनिवासात महानुभाव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यांनी आपली एक दिवाळी साजरी केली होती. 'उभय

गंगातीर' हा श्रीचक्रधरांचा भ्रमणप्रदेश. विशेषता: उत्तरार्धात बीड, औरंगाबाद आणि अहमदनगर ही त्यांची संचार भूमी राहिली. याच भागात फिरुन त्यांनी 'लिळाचरित्र' हा बीजग्रंथ म्हणजे इतर अनेक ग्रंथाना जन्म देणारा ग्रंथ रचला.

याच नेवाशाच्या पुण्यभूमीत प्रवरेकाठी असलेल्या शिवालयात, सद्‌गुरु निवृत्तीनाथ आणि संतश्रोत्यांच्या मंडलाकृती सभेत आपण गीतेचे निरुपण करीत आहोत अशी भूमिका घेऊन ज्ञानेश्वरांनी 'ज्ञानेश्वरी'ची रचना केली.

मध्ययुगाच्या विचाराकरता मध्ययुगात मराठी साहित्यनिर्मीतीची केंद्रे काळाच्या ओघात बदलत गेलेली दिसतात. "यादव काळात नेवासा, पंढरपूर आणि ऋध्दिपूर ही ठिकाणे महत्वाची होती. यापैकी पंढरपूर नामदेवांपासून श्रीधरांपर्यत मराठी साहित्य निर्मितीचे केंद्र राहिलेले दिसते. ऋध्दिपूरला पुढील काळात साहित्यनिर्मिती होत राहिली. परंतू नेवाशाचे केंद्र पुन्हा इतक्या महत्वास कधीच पोहचले नाही. एकनाथकाळात नेवाशाचे महत्व पैठणला प्राप्त झालेले दिसते."

मध्ययुगातील साहित्यनिर्मितीची केंद्रे ही तिर्थक्षेत्रे, मठ, मंदिरे व राजधान्या हीच होती. याठिकाणी विविध धर्मसांप्रदायिकांनी आपले साहित्य समृध्द केलेले आहे. यात प्रामुख्याने शेख महम्मद बाबा श्रीगोंदेकर, त्यांचे शिष्य आजम, वृतकथा लिहिणारे शिवदास यांचा उल्लेख करावा लागतो. मध्ययुगीन वाङ्मयव्यवहार मौखिक होता. त्याच्यावर मुद्रणाचे संस्कार घडले ते इ.स. १८०४ च्या आसपास, त्यानंतर थोड्याच काळात पेशवाईची अखेर होऊन ब्रिटीश राजवटीला प्रारंभ झाला. या दोन घटनांनी वाङ्मयव्यवहाराचा चेहरामोहरा बदलून गेला आणि अर्वाचिन मराठी वाङ्मयाचा जन्म झाला. या बदलत्या मन्वंतराची जीवनपध्दती, नवीन मूल्ये, विचारविश्व, शिक्षण यांना संवादी पध्दतीने भाषा आणि वाङ्मय यांची निर्मीती झाली. परकीय शासनव्यवस्थेने ती वाङ्मय निर्मिती घडवून आणण्यास सहेतुक परिश्रमाने, विविधांगी सहाय्य केले. पारलौकिक ज्ञानापेक्षा ऐहिक आणि व्यवहाराला उपयोगी अशा ज्ञानाचा संग्रह आणि प्रसार हाच या विराट निर्मिती उद्योगाचा उद्देश होता.

राजकीय आणि औद्योगिक दृष्टीने मुंबई हीच महाराष्ट्राच्या केंद्रस्थानी असल्याने अव्वल इंग्रजीतील आधुनिक चळवळीचे पुढारपण स्वाभाविकपणे मुंबईकडे आले. नव्या मराठी गद्याची घडण मुंबईसच झाली. याच काळात व्याकरण आणि कोश यांच्या आधाराने भाषेच्या अभ्यासाचा शास्त्रीय पाया घातला गेला. इंग्रजी-फारसी या भाषांमधून मराठीत अनेक ललित व शास्त्रीय ग्रंथांची भाषांतरे झाली. या भाषांतर युगाला मिशनऱ्यांनी मुद्रण सुविधा, उपलब्ध करुन नियतकालिकांद्वारे वाङ्मय निर्मितीस सुरुवात करुन महत्वाचा हातभार लावला.

मुंबई आणि पुणे या दोन शहरांशिवाय महाराष्ट्राच्या फारच थोड्या उर्वरित भागात अशा वाङ्मय निर्मितीच्या घडामोडीचा प्रवास घडू शकला. त्यापैकी अहमदनगर हे एक महत्वाचे केंद्र म्हणावे लागेल. "ॲलन व ग्रेव्हज २० डिसेंबर १८३१ रोजी अमेरिकन मिशनच्यावतीने अहमदनगरमध्ये दाखल झाले. बायबलच्या मराठी भाषांतराचे ते पाचपैकी एक संपादक आणि भाषांतरकार होते. त्यांनी  इ. स. १८३३ मध्ये 'गितांचे नवीन पुस्तक' लिहून त्यांनी मिशनच्या मराठी पद्यवाङ्मयाची सुरुवात केली."[76] बाबाजी रघुनाथ या मुळच्या मुंबई येथील मराठी ख्रिस्त्याने देशी छंद-वृत्तांचा वापर करुन मराठीत पहिली काव्यरचना केली. पण त्याच्या या नवनिर्मितीला स्वधर्मात परतण्याच्या अविश्वासाचे गालबोट लागल्याने प्रसिध्दी मिळू शकली नाही. मिशनऱ्यांनी स्वत: साहित्यनिर्मिती केली. शाळा काढून साहित्यव्यवहाराला आवश्यक आणि उपयुक्त अशा शिक्षणाला आरंभ केला. "इ. स. १८४२ मध्ये 'ज्ञानोदय' या नियतकालिकाने ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराबरोबर एक धर्ममीमांसा केली, व्यसने, अंधश्रध्दा यांना आळा घालण्याचा प्रयत्न केला, सामाजिक, प्रागतिक मतांचा पुरस्कार केला."[77] अहमदनगरच्या परिसरातील वाङ्मयाचे पोषण केले. हे युगच ज्ञानाचे महत्व सांगणारे होते. त्याच्याशी सहकंप पावणारे असेच ज्ञानोदयाचे काम होते, हे त्याच्या शिर्षकावरुन ध्यानी येते.

ब्रिटीशांनी आणलेली पाश्चात्य संस्कृती आणि आपली परंपरागत पौर्वात्य संस्कृती यांच्यातील संघर्ष, ताण, आणि समन्वय यातून आधुनिक महाराष्ट्र वाढत घडत

गेला. पाश्चात्य संस्कृती, भाषा आणि साहित्य यांनी स्वातंत्र्य आणि समता ह्या मूल्यांचे नवे भान दिले सामाजिक नवजागरणाला चालना मिळाली. त्यातून समकालीन सामाजिक जीवनातील परिवर्तनाचे प्रतिसाद टिपणारे अर्वाचिन वाङ्मय जन्माला आले. (इ. स. १८७४ ते १९२०) पुढील वाङ्मयाला स्फूर्ती मिळाली. ती लोकहितवादी, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, विष्णूशास्त्री चिपळूणकर यांच्या विचार सृष्टीतून. पुणे आणि मुंबई या साहित्यिक केंद्रानी घडविलेल्या वाङ्मयाला अहमदनगरनेही हातभार लावलेला दिसतो.

पुढील काळात अहमदनगरच्या साहित्य निर्मितीला चालना मिळाली. ती लोकहितवादींच्या अहमदनगरमधील वास्तव्यामुळे. त्यांच्याच प्रेरणेने अहमदनगरचे सार्वजनिक वाचनालय १८३८ साली सुरु झाले. इथल्या वाङ्मय चर्चा मंडळात लोकहितवादींनी तुकारामांची सॉक्रिटिस बरोबर तुलना करणारा निबंध वाचून अशा तऱ्हेच्या साहित्य चर्चाना आरंभ करुन दिला. याच काळातील एक मोठे प्रकाशक दामोदर सावळाराम यंदे यांनी महात्मा फुलेंपासून प्रेरणा घेऊन वयाच्या अवघ्या १९ व्या वर्षी 'शेतकऱ्यांचा कैवारी' हे पत्र सुरु केले. श्रीमद्‌भागवत, त्यातील चरित्र कोश, महाभारताची सार्थ आवृत्ती, तुकाराम गाथा अशी अनेक महत्वची पुस्तके त्यांनी प्रकाशित केली. अहमदनगरच्या साहित्य जगतात नवनवीन साहिंत्यिक चमकले. त्यांनी अहमदनगरच्या साहित्य जीवनात परिवर्तनात्मक लेखन करुन येथील दुष्काळी भूमित गद्य व पद्य लेखनाची हिरवळ निर्माण केली. त्यातील निवडक साहित्यिकांचा आढावा पुढे घेतला आहे.

**पांडुरंग महादेव बापट ऊर्फ सेनापति बापट**

अहमदनगर हायस्कूलमधून मॅट्रिक्युलेशनची परिक्षा उत्तीर्ण होऊन संस्कृतची जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळविणारे म्हणजे पां. म. बापट हे होत. केवळ शिक्षणक्षेत्रांतच गुरफटून न राहात राजकीय क्रांतीकडे वळले. त्यांचा पिंड वैदिक धार्मिक अध्यात्मज्ञानाचा असल्याने उपनिषद्‌कालीन  मुनीप्रमाणे आजच्या काळातहि ते जनतेस

आदर्श वाटतात. त्यांच्या लेखणीतून अनेक काव्ये व अभंग उतरलेले आहेत. ते सर्व त्यांच्या अध्यात्मिक ज्ञानाची साक्ष देतात.

**शंकर देवराव क्षीरसागर**

१८९४ साली जगन्नाथ शंकरशेठ ही मानाची संस्कृत विषयाची शिष्यवृत्ती मिळविणारे ते पहिले विद्यार्थी होते. त्यांचा कल अध्यात्मविद्येकडे विशेष असल्याने त्यांनी त्रोटक काव्ये व संस्कृत मराठी स्तोत्रेहि बरीच लिहून ठेविली आहेत. त्यांचे कुलदैवत नरसिंहपूरचे 'नृसिंह' हे असल्याने त्यांनी 'नृसिंह विजय' या नावाचा ग्रंथ लिहून प्रकाशित केला.

**बापूसाहेब काथवटे**

न्यायखात्यात जुन्या पिढीतील सुशिक्षित व सुधारणावादी सरकारी नोकरांचा भरणा अधिक असे. या खात्यातील न्यायमूर्ति रानडे, गोविंद वासुदेव कानिटकर, ना. गो. चाफेकर इ. मंडळी साहित्य क्षेत्रात चमकली. त्यात अहमदनगरचे न्यायाधीश बापूसाहेब काथवटे यांचाहि प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. न्यायमूर्ती रानडेंच्या सर्वांगीण सुधारणा व स्त्री शिक्षणाच्या चळवळीचे महत्व काथवटेंना पटलेले होते.

त्यांनी लिहिलेली पुस्तके 'आर्याचा प्राचिन इतिहास', 'पारश्यांचा इतिहास', 'सुधारणेचा उद्गम आणि उत्कर्ष', 'खलीफ अबू बकर' यांचे अल्प चरित्र, इत्यादि त्यांनी लिहिलेली पुस्तके सर्वांना परिचितच आहेत.

**रे. नारायण वामन टिळक**

सन १८९५ साली रे. ना. वा. टिळक यांनी ख्रिस्ती धर्माचा अभ्यास केल्यानंतर स्वखुषीने या धर्माचा स्वीकार केला. महाराष्ट्रात त्या वेळच्या काही जुन्या संस्कृत शास्त्रीपंडीतावरहि ख्रिस्ती धर्माचा कसा पगडा बसत होता, याचे ना. वा. टिळक, हे एक उदाहरण होय.

ना. वा. टिळक, यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला असला तरी इतर हिंदू ख्रिस्त्यांप्रमाणे त्यांनी मराठी भाषा, जुने रीतीरिवाज व आपले पूर्वीचे सर्व संबंध यांजकडे

तुटकवृत्तीने पाहिले नाही. धर्माने ख्रिस्ती तर आचार विचारांमध्ये हिंदू असा नवा मनु हिंदू ख्रिस्त्यांमध्ये निर्माण झाला, त्यांचे ते आद्य प्रवर्तक म्हणता येतील. थोडक्यात “अराष्ट्रीय वृत्तीच्या ख्रिस्त्यांची संख्या कमी कमी होत जाऊन राष्ट्रीय वृत्तीने पहाणारा असा नवा ख्रिस्ती सांप्रदाय निर्माण करण्याचे ते आद्य प्रवर्तक होत.”[78] त्यांनी १८९५ ते १९०० पर्यंत अनेक स्फुट काव्ये केली. ते आपणास केशवसुताचे अनुयायी अभिमानाने म्हणवून घेत. ‘ज्ञानोदय’ व ‘बाळबोध मेवा’ यांमध्ये त्यांच्या बऱ्याच कविता प्रसिध्द झाल्या. परंतु त्यांचे महत्वाचे कार्य म्हणजे मराठी भाषेत अभंग लिहून ख्रिस्ती चर्चमध्ये प्रार्थनेच्या वेळी म्हणण्याचा परिपाठ आरंभला.

“फादर स्टीफन्स् यांनी लिहिलेल्या ‘ख्रिस्तपुराण’ या महाकाव्याप्रमाणे रे. ना. वा. टिळकांनी येशू ख्रिस्ताच्या चरित्रावर ‘ख्रिस्तायन’ या नावाचे महाकाव्य रचण्यास १९०९ साली सुरुवात केली. त्याचे त्यांनी ९ अध्याय लिहिले. त्यांच्या अकाली निधनामुळे त्यांची पत्नी लक्ष्मीबाई टिळक यांनी ७५ अध्यायापर्यंत या काव्याचे पौराणिक काव्याच्या धर्तीने लिखाण केले. ७६ वा अध्याय देवदत्त टिळकांनी लिहून या काव्याला पूर्णविराम दिला. पती, पत्नी व मुलगा तिघेही कवी ; व ख्रिस्तायन काव्याचे निर्माते ! जगाच्या पाठीवर असे उदाहरण सापडणे दुर्मिळ.” आज महाराष्ट्रात संत वाङ्‌मयामधील भक्ति लीलामृत व वसंतलीलामृत या धर्तीवर लिहिलेले हे ख्रिस्तायन मराठी वाचकांच्या पुढे आहे. टिळकांची कविता, "फुले व मुले" या बद्दलचे त्यांचे प्रेम विशेष व्यक्त होते. "वनवासी फूल" हे त्यांचे काव्य सुप्रसिध्द आहे. बालकवि ठोंबरे यांच्यावर त्यांचे फार प्रेम असे, स्वत: ठोंबरे हे आपणास टिळकांच्या काव्यापासूनच काव्य स्फूर्ति मिळे, असे म्हणत असत.

**लक्ष्मीबाई टिळक**

“टिळकांच्या मृत्युनंतर त्यांच्या पत्नि लक्ष्मीबाई टिळक यांनी ख्रिस्तायन पुरे केले. त्यांचे शिक्षण फार झालेले नव्हते. परंतु पतीच्या दीर्घकाळ सहवासाने त्यांची भाषा व विचार यांजवर त्यांचाच पगडा असल्यामुळे ख्रिस्तायनांतील टिळकांचा भाग कोणता व

लक्ष्मीबाईचा कोणता हे कळणे दुरापास्त आहे."[79] लक्ष्मीबाईंनी जी आपली 'स्मृतिचित्रे' म्हणून लिहून ठेविली तीच सर्व मराठी वाचकांस प्रिय झाली आहेत. त्यांची अक्षर साहित्यकृती म्हणजे 'स्मृतिचित्रे' जरी नाशिकला लिहिली गेली तरी त्यातून अहमदनगरमधील विविध अनुभव शब्दबध्द झालेले आहेत. या आत्मवृत्तातून केवळ व्यक्तीच नव्हे तर एक समाज आणि एक कालखंड सजीव होतो.

**बळवंत रामचंद्र हिवरगांवकर**

यांनी सन १९२१ साली भास कवीच्या समग्र १३ नाटकांची गद्यपद्यात्मक भाषांतरे करुन पहिला खंड प्रसिध्द केला. त्यानंतर 'कौटिलीय अर्थशास्त्र' याचे भाषांतरे त्यांनी आरंभिले. दुर्दैवाने कौटिलीय अर्थशास्त्राचा दुसरा भाग व भासकवीच्या नाटकाचा दुसरा खंड त्यांच्या मृत्युनंतर प्रसिध्द झाला. परंतु त्यांचे अप्रसिध्द असे महाराष्ट्र साहित्य, विविध ज्ञानविस्तार, नवयुग, प्रफुल्लता इत्यादि मासिके आणि केसरी, ज्ञानप्रकाश इत्यादि वर्तमानपत्रे यातून प्रसिध्द झालेले अनेक स्फुटलेख एकत्र करुन छापावयाचे होते, ते कार्य तसेच राहून गेले.

**मनोरमाबाई रानडे**

यांनी आपल्या स्फुट कविता "गोपिका तनया" किंवा व्दारकाबाई हिवरगांवकर या नावाखाली "मनोरंजन" आणि "उद्यान" वगैरे मासिकांतून प्रसिध्द केल्या. प्रा. श्रीधर बाळकृष्ण रानडे यांनी "श्रीमनोरमा" या नावाचा त्यांचा कविता संग्रह अहमदनगर येथे सन १९३९ साली भरलेल्या साहित्य संमेलन प्रसंगी प्रसिध्द केला.

**बालकवी – त्रिंबक बापुजी ठोंबरे**

१९०७ साली जळगांव येथे जे कवी संमेलन भरले, त्यांत त्यांनी काव्यगायन केल्यामुळे त्यांना बालकवि ही पदवी मिळाली. अहमदनगरला त्यावेळचे सुप्रसिध्द कवी रे. नारायण वामन टिळक व त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाई यांच्या आश्रयाने त्यांच्या पुत्राप्रमाणे ते अहमदनगरास जवळपास सहा वर्षे राहिले. आरंभीच कवीचे मन व त्यात थोर कवीचा सहवास यामुळे त्यांच्या काव्यास जास्त स्फूर्ति मिळाली. बालकवींची कविता 'सुंदरतेच्या

सुमनावरचे दंव चुंबून घेणारी' कविता आहे. "गोविंदाग्रजांनी ज्यांना 'नवकवितेच्या जरी पटक्याचा अधिकार' बहाल केला. त्या बालकवींच्या प्रतिभेची लालनपालन अहमदनगरच्या भूमित झाले."[80] हे केवढे अभिमानाचे!

कीटस् या इंग्रज कवीप्रमाणे निसर्ग, आकाशातील तारका, निर्झर, फुले व मुले इत्यादि सुंदर वस्तुवर त्यांनी लहान मोठी काव्ये रचली. 'मधुगीते' व 'बालकवीचे काव्य' हे त्यांचे प्रसिध्द झालेले कवितासंग्रह वाचकांस फार प्रिय झाले.

**अमृत बापूजी रसाळ**

यांचा संत वाङ्मयातील संशोधनाचा फार गाढा अभ्यास होता. ज्ञानेश्वरीवर ते प्रवचने करीत. दादासाहेब धनेश्वर यांचेबरोबर ज्ञानेश्वरीची पाठशुध्द आवृत्ति काढण्यासाठी संशोधकाची महत्वाची भूमिका पार पाडली. त्यांचा ९ अध्याचांचा एक खंड प्रसिध्द झाला परंतु सर्व पाठशुध्द आवृत्तीची ज्ञानेश्वरी प्रसिध्द झाल्याचे पाहण्यास ते राहिले नाहीत, त्यांनी 'ज्ञानेश्वर दर्शनाप्रमाणेच 'एकनाथ दर्शन' ग्रंथाच्या प्रसिध्दिकरणात सहभाग नोंदवला.

**केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर**

१९२८ साली अहमदनगरला जे वाङ्मयोपासक मंडळ स्थापन झाले त्याच्या आद्य संस्थापकांपैकी केशव लक्ष्मण टेंभुर्णीकर ते एक होत. वाङ्मयोपासक मंडळांने ज्ञानेश्वरी दर्शन ग्रंथ प्रसिध्द केला. त्यातील लेखांचे संकलन करण्याचे कार्यात त्यांचा मोठा भाग होता. त्यांनी तुळसीदासाचे 'श्री. रामचरित्र मानस' या हिंदी काव्याचे मराठी भाषेत ओवीबध्द भाषांतर केले.

**त्रिंबक गंगाधर ऊर्फ दादासाहेब धनेश्वर**

"दादासाहेब धनेश्वर हे न्या. रानडे यांचे कट्टर समर्थक होते. न्या. रानडेंच्या सर्वांगीण सुधारणावादाचे प्रणालीचा प्रसार करण्यासाठी अहमदनगरमध्ये 'लिबरल क्लबची' स्थापना झाली. त्यामार्फत दादासाहेब धनेश्वरांनी आपले परम मित्र दाजी कुकडे यांच्या न्यायसिंधु वर्तमानपत्रातुन जनजागृती केली."[81]

पुण्याचे सर्वात जुने ‘ज्ञानप्रकाश’ वृत्तपत्र ते विराम पावेतोपर्यंत त्या वृत्तपत्रात अहमदनगरचे बातमीदार व स्वतंत्र लेखक या नात्याने त्यांनी बरेच लिखाण केले. वाङ्मयोपासक मंडळाचे ते अध्यक्ष होते. त्यांनी ज्ञानेश्वरीची पाठशुध्द आवृत्ति करण्यासाठी संशोधन केले. सनातन धर्मसभेचे ग्रंथालय वाढविण्यात त्यांनी बराच हातभार लावला.

१९२० ते १९४७ या दोन महायुध्दांच्या मधला काळ साहित्याच्या दृष्टीने महत्वाचा ठरला. या काळात कार्ल मार्क्स, सिग्मंड फ्राइड, महात्मा गांधी यांच्या नवविचाराच्या लाटा उसळत राहिल्या. बहुजन समाजाला एक आत्मभान आले. राष्ट्रीय चळवळीच्या मध्यवर्ती प्रवाहात हा वर्ग सहभागी झाला. सामाजिक स्थित्यंतराला एक वेग आला. पण या गतीशी जसे मराठी साहित्याचे नाते राहिले नाही तसे अहमदनगरचेही नाते राहिले नाही. या काळात वाङ्मयाच्या क्षेत्रात गुणाढ्य निर्मिती झालेली दिसत नाही. तरीही आपला नगरी बाणा जपत. काही साहित्यिकांनी आपले योगदान नोंदविलेले दिसते.

“यात विठ्ठल दत्तात्रय घाटे हे माधव जुलियन यांच्या ‘रविकिरणमंडळा’चे सभासद होते. त्यांनी ‘काही म्हातारे व एक म्हातारी’, ‘दिवस असे होते’ ही अविस्मरणीय पुस्तके लिहिली.”[82] बहुजन समाजातील गजानन लक्ष्मण ठोकळ यांनी 'मीठभाकर', 'सुगी' अशी काव्यसंग्रहे लिहिली. पण खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य या दोघांच्याही हातून लिहिले गेले नाही. सत्ता-संपत्तीच्या दृष्टीने या काळातील बहुजन समाजाने पुष्कळ प्रगती केलेली असली तरी सांस्कृतिकदृष्ट्या मात्र तो तितकासा प्रगल्भ झालेला दिसत नाही.

अनेक साहित्यिक अहमदनगर परिसराशी संबंधित होते. त्यांनी लिखाण करुन साहित्यात मोलाची भर घातली. त्यात काहीसे वेगळे दुर्गा भागवत, सरोजिनी बाबर, भा.द. खेर, वि. शं. चौगुले यांचा समावेश करता येईल. वरील सर्व साहित्यिकांनी नगरच्या साहित्य विश्वात उल्लेखनीय कामगिरी केली. महाराष्ट्राच्या आणि मराठी भाषेच्या जडणघडणीवर आणि मराठी संस्कृतीवर आपली छाप अहमदनगरच्या

साहित्यिकांनी उमटवलेली दिसते. त्यांनी संस्कृत भाषेतील अनेक धर्मग्रंथाचे परिशिलन केले. अनेक नवीन ग्रंथ रचले, भाषांतरे केली. श्री चक्रधर स्वामींपासून सुरु झालेली लेखन परंपरा आजही तीतकीच खंबीरपणे वाटचाल करत असलेली दिसते.

**चित्रकला**

प्राचीन काळापासून अहमदनगरने अनेक परंपरा जोपासल्या आणि जपल्याही. निजामशाहीमध्ये 'अहमदनगर कलम' म्हणून कलेतील वेगळेपण जपणारी चित्रकला प्रचलित होती. गडद रंगसंगती, सुबक रेषा, व एतद्देशीय संकल्पना ही अहमदनगर कलमची वैशिष्टे होती. अहमदनगर चित्रशैलीतील दोन चित्रे अहमदनगरच्या ऐतिहासिक वस्तूसंग्रहालयात पहावयास मिळतात. ही चित्रकला कालौघामध्ये लयास गेली. परंतु या भूमीने अनेक व्यासंगी अभ्यासू चित्रकार, शिल्पकार आजही जपलेले दिसतात. १०० वर्षापूर्वी शिंदे नावाचे व्यक्तिचित्र करणारे चित्रकार येथे होते. "१९३५ च्या दरम्यान र. बा. केळकर या व्यंगचित्र व कथाचित्रकाराचे अहमदनगरला आगमन झाले. त्यांच्यामुळे येथील चित्रकलेच्या विश्वास एक नवीदृष्टी प्राप्त झाली. त्यांच्या कल्पनेतून व पुढाकारातून अहमदनगरला 'प्रगत कला महाविद्यालय' सुरु झाले."[83] विष्णूपंत विटणकर, येवलेकर, श्रीगोंदेकर, बी. एन. देशमुख हे चित्रकार स्वत: रंग तयार करण्यापासून मांडवाचे पडदे, प्रवेशद्वार, घरावरील चित्रकारी, रंग भूमिवरील नाटकांचे पडदे, चितारीत असत.

दोन महायुध्दांच्या दरम्यान ब्रिटीश सरकारने जर्मन कैद्यांना अहमदनगर येथे बंदिवासात ठेवले. त्यात अनेक प्रसिध्द चित्रकार होते. मायदेशापासून अत्यंत दूरच्या ठिकाणी बंदिवासात जीवन व्यतीत करत असताना त्यांनी आपले भावनिक विश्व चित्रांतून व्यक्त केले. त्याचा अनुपम ठेवा पॅरिस स्थित डॉ. शशी धर्माधिकारी यांनी नुकताच प्रसिध्द केला. त्यातील काही चित्रे परिशिष्टामध्ये समाविष्ट केली आहेत.

अहमदनगर येथील चित्रकारांची यशस्वी परंपरा आजही टिकून असलेली दिसते. येथील चित्रकारांनी जागतिक दर्जाचे स्थान निर्माण केलेले आहे. या जिल्ह्यातील अं. ज.

घारे हे ‘राष्ट्रपती पारितोषिक विजेते’ कला शिक्षक आहेत. बाल चित्रकलेसाठी त्यांचे योगदान महत्वाचे समजले जाते. कलाध्यापकांची संघटना बांधण्याचे महत्वाचे काम श्री. ना. पाठक यांनी केले. बिरजे हे चारकोल पेटिंग करणारे अहमदनगरमधील महत्वाचे चित्रकार म्हणून ओळखले जातात.

**नाट्यकला**

अहमदनगरच्या वैशिष्ट्यपूर्ण ऐतिहासिक पार्श्वभूमि व भौगोलिक रचनेमुळे यादव कालीन कालखंडापासून थेट इंग्रजांच्या आगमनापर्यंत हा प्रदेश युध्दोपजीवी लोकांच्या ताब्यात होता. नाट्यकलेच्या समृध्दीसाठी आवश्यक ते पोषक वातावरण येथे नसल्याने त्या काळात इथल्या जमिनीत नाटक रुजू शकले नाही. मात्र तत्कालीन वातावरणात बऱ्याच लोककला जोपासलेल्या दिसतात. त्या काळी इथल्या सांस्कृतिक जिवनात अविभाज्य झालेल्या किर्तनाबरोबरच कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, गोंधळ, भारुड, वासुदेव पांगुळ, बहुरुपी इत्यादी लोककला खुपच लोकप्रिय असल्याचे दिसते. पेशवाई अनंत फंदी, शाहीर परशुराम इत्यादी शाहीरांच्या लावण्याबरोबरच तमाशा या नृत्य नाट्यप्रकाराने व वगनाट्य पोवाडे ऐकू येऊ लागले.

नाट्यकलेची उपजत आवड असणाऱ्या नगरवासियांना विष्णुपंत भावे यांच्या १८४३ सालच्या 'स्वयंवरा', बरोबरच पुढील काळातील किर्लोस्कर, खाडिलकरांव्यतिरिक्त देवल, वरेकर, गडकरी, अत्रे इत्यादी नाटककार आणि गणपतराव बोडस, चिंतामणराव कोल्हटकर, बालगंधर्व, मास्टर कृष्णराव इत्यादी नाटकमंडळीही परिचित झाली. त्यावेळी नगरची मंडळी आपली नाटकाची तहान पुण्या-मुंबईची नाटके बघून भागवीत. मात्र २० वे शतक उजाडले आणि काही झपाटलेल्या नाट्यवेड्या नगरकरांना नाटकांची स्वप्ने पडू लागली. अहमदनगरच्या रंगभूमीवरील पहिल्या काही नाट्याविष्कारात पाध्ये आणि पारोळकर यांच्या 'कन्या-कुमार' या मेळ्याचा अग्रक्रम लागतो. त्यानंतर खराडे, गोपाळकृष्ण आणि ताम्हणकर यांचे मेळे

गाजले. पुढे नरवणे यांची 'स्नेहलता' व 'मातृसंदेश' ही संगीत प्रहसने झाली. अशा प्रकारे अहमदनगरच्या रंगभूमीचा जन्मसोहळा साजरा झाला.

"अहमदनगरमधील सोशल क्लबने १९१३ साली हरी नारायण फडके यांची नगरच्या नाट्यप्रेमींना ओळख करुन दिली. या क्लबतर्फे 'त्राटिका', 'तोतयाचे बंड', 'एकच प्याला', इत्यादी नाटके केली." या शतकाच्या दुसऱ्या, तिसऱ्या दशकातील शंकरराव पारनाईक, गोपाळराव देवस्थळी, घोटणकर, इत्यादी कसलेले नाट्यदिग्दर्शक होते.

तेल्या तांबोळ्याचे दिग्दर्शक म्हणून ख्याती असलेल्या सोसायटी हायस्कूलच्या देवस्थळी या शिक्षकाने 'संशय कल्लोळ', 'कुलवधू', 'जग काय म्हणेल?' इत्यादी नाटके बसवली. 'छाया' हे अहमदनगर शहरातील सर्वात जुने टॉकीज होते. १९३० साली त्याचे नाव 'बागडे थिएटर' झाले. बालगंधर्व, मास्टर नरेश, यांची नाटके इथे रंगली. "नगरला एखादे नाटक हीट झाले की, ते सर्व महाराष्ट्रभर गाजत असत. म्हणून नगरच्या नाट्यरसिकांवर बऱ्याच नाटकांची भिस्त असे." दुसऱ्या महायुध्दानंतर नाट्य सृष्टी डबघाईला आली. तिला उर्जितावस्था प्राप्त व्हायला बळ देणारे नेतृत्व लाभले नाही. अहमदनगरमधील आणखी एक जुने थिएटर म्हणजे सरोश. ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या करमणूकीसाठी खास इंग्रजी शो इथे होत असत. १९४२ साली 'चले जाव' च्या आंदोलनाचे वारे नगरमध्ये होते. तेव्हा या टॉकीजमध्ये बॉम्ब टाकण्यात आला. त्यामुळे फारसे नुकसान झाले नाही. पण सरोश बॉम्ब खटला मात्र भारतभर गाजला.

"एकेकाळी चित्रपट पाहायला जाणे धाडसाचे असे. स्त्रियांची व पुरुषांची बैठकव्यवस्था वेगवेगळी असे. बहुतेक नाटक व चित्रपट सामाजिक व ऐतिहासिक प्रसंगांवर बेतलेले असत. चित्रपटगृहात 'कुलीन स्त्रियांसाठी वेगळी व्यवस्था' अशा जाहिराती वर्तमानपत्रातून झळकत असत." वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर नाटक किंवा चित्रपटाची जाहिरात असे. सामाजिक कार्यासाठी फंड गोळा करण्यासाठी अनेक नाटके व चित्रपट दाखवण्याची पध्दत असे. घरातील जेष्ठ व कर्ते पुरुषांची

चित्रपटाबाबत पावती मिळाल्याशिवाय कुटूंबातील इतर सदस्यांना तो पाहण्याची परवानगी नसे. सरदार बाबासाहेब मिरीकरांनी आपल्या चिरेबंदी सेंट्रल हॉलमध्ये साहित्य, कला, नाट्य इत्यादी क्षेत्रातील दिग्गजांना प्राचारण करुन नगरवासियाना त्यांचा परिचय करुन दिला. बालगंधर्व, जोत्स्नाबाई भोळे, बालकवी, वीर सावरकर इत्यादी प्रभूती केवळ सरदार मिरीकरांमुळे इथल्या रसिकांना बघता आल्या. ऐकता आल्या. ऐतिहासिक आणि पौराणिक चित्रपटातून भूमिका करणारे अहमदनगरमधील महत्वाचे नट म्हणजे शाहू मोडक. त्यांनी माणूस, संत ज्ञानेश्वर, भरतभेट, माया बाजार, वसंत सेना, इत्यादी मिळून २०० चित्रपटात भूमिका करुन अहमदनगरचे नाव चित्रपटसृष्टीत उंचावले.

**अहमदनगमधील महाराष्ट्र साहित्य संमेलन**

अहमदनगरमधील वाङ्मयोपासक मंडळाने महाराष्ट्रातील २४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन द. मा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली १९३९ साली अहमदनगरच्या बागडे थिएटर म्हणजे हल्लीच्या छाया टॉकीज या इमारतीत घडवले. १९३९ साली अहमदनगरच्या बागडे थिएटर म्हणजे हल्लीच्या छाया टॉकीज या इमारतीत भरवले. त्यापूर्वी १९२८ मध्ये नगर-नाशिक साहित्योपासक संमेलन रा. ब. पाध्ये यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. या संमेलनाचे उद्दिष्ट साहित्योपासकांचा परिचय वाढवून, एकमेकांचा विचारविनिमय व्हावा, एकमेकांच्या कार्याची माहिती व्हावी. सर्वांच्या हातून संघटित कार्य व्हावे या उद्देशाने हे संमेलन भरले होते. महाराष्ट्र साहित्य संमेलन दरवर्षी मोठमोठ्या शहरात होत. तेथे सामान्य साहित्यिकास आपले कौशल्य दाखविण्यास वाव मिळत नसे. तसेच जिल्ह्याजिल्ह्यात होऊन गेलेल्या साहित्यसेवेची चर्चा मोठ्या संमेलनात होत नसे. या संमेलनाचे सभासद टेंभूर्णीकर, पारसनीस, फाटक, चौकर, बापट हे होते. (४ ऑक्टोबर १९२८, पान ३१७, पु. ८७, अंक ४०, ज्ञानोदय)

१९३९ साली बागडे थिएटरमध्ये भरलेल्या या साहित्य संमेलनासाठी पुणे, मुंबई, सातारा, सांगली, कोल्हापूर, नाशिक इत्यादी ठिकाणाहून न.ची. केळकर, कवी यशवंत,

ना. सी. फडके, श्री. म. माटे, आचार्य अत्रे, माधव ज्युलियन, गो. नी. दांडेकर, नानासाहेब परुळेकर इत्यादी साहित्यिक आले होते. साहित्यिक आले होते. या संमेलनासोबत नगरपालिकेच्या हॉलमध्ये चित्रकला प्रदर्शन आयोजित केले होते. या कमिटीचे प्रमुख र. बा. केळकर होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन शंकरराव किर्लोस्करांनी केले होते. प्रदर्शनात किर्लोस्कर, स्त्री, मनाहेर इत्यादी मासिकांमधून प्रसिध्द झालेली, चित्रकार बाबूराव पेंटर, शिसुर, माळी इत्यादी कलावंताची मूळ चित्रे होती.

**धार्मिक समन्वय**

अहमदनगर शहरामध्ये निजामशाहीचे राजवट असल्यामुळे नगरशहरामध्ये सिया आणि सुन्नी पंथाचे लोक आहेत. त्यामध्ये सुन्नींची संख्या जास्त आहे. शहरामध्ये मशिदींची संख्या खूप आहे असे म्हटले जाते की, एका व्यक्तीने वर्षभर रोज एका मशिदीमध्ये नमाज पठण केले तरी पूर्ण मशिदीमध्ये नमाज पठण होणार नाही. “अहमदनगरच्या ‘बारा इमाम कोठला’ या इमारतीचा मूळ संस्थापक शाहा ताहीर होता. त्याने बुऱ्हाणशहा या निजामशहाच्या आश्रयाने नगरशहरात शिया या पंथाचा अभ्यास करण्यासाठी ‘कोठला’ व ‘हुसैनी मदरसा’ हे दोन विश्वविद्यालय स्थापन केली.”[84] येथील नामांकित ग्रंथ वाचण्यासाठी जगभरातून विद्यार्थी येत. मुस्लिम धर्मातील प्रसिध्द बारा इमामांच्या स्मृती प्रित्यर्थ 'बारा ईमाम कोठला' ही मशिद १५३६ मध्ये बांधली गेली. बारा ईमाम सवारीची स्थापना करण्याची प्रथा तेव्हापासून सुरु झाली. सवारीस बांधली जाणारी शस्त्रे शाहा ताहीरने करबाला येथून आणली. त्यांची संख्या २६ असते. मोहरमच्या उत्सवात सर्व धर्मीयांचा सहभाग असतो. अनेक हिंदू कुटूंबे बारा ईमामला नवस बोलतात. नवसाची पूर्ती झाल्यावर 'वाघ' व मुलीला 'मालीन' सारखे रंगून आभार मानतात. हिंदू मुस्लिम समन्वय गेली ५०० वर्षे अवरित सुरु आहेत.

त्याकाळी कुठलेही सण-समारंभ किंवा विवाहाच्या वेळी वाद्य वाजविण्याची प्रथा अस्तित्वात होती. न वाजवण्याचा अलिखित नियम काटेकोरपणे पाळला जात असे. तर त्या काळी हिंदू लोकांच्या विवाहात किंवा इतर उत्सवांमध्ये मशिदीजवळ वाद्य हे

लोक वाजवत नसत. यावरुन असे लक्षात येते की, प्रत्येकजण परधर्माचा आदर करत होता. व त्या आदरापोटीच मशिदीसमोर कुठलेही वाद्य वाजवले जात नसे. अहमदनगरचे ताबूत भारतामध्ये दुसऱ्या क्रमांकाचे आहे. उत्तर प्रदेशातील लखनव मधील ताबूत खूपच प्रसिध्द आहे. अहमदनगरमधील या सणाच्या वेळी अहमदनगर शहरतील हिंदू व मुस्लिम दोन्ही समाजातील समाजबांधव एकत्र येऊन 'मोठी सवारी' आणि 'छोटी सवारी' बनवत असत. व हे दोन्ही समाज मोठ्या संख्येने कुठलाही जातीभेद न बाळगता यामध्ये भाग घेत असत. त्यात 'कत्तलची रात' असो किंवा 'ताबूताची मिरवणूक'. तसेच रेवड्या वाटणे सरबत वाटणे व ताबूताला हार घालणे ह्या गोष्टीही कुठलाही जातीभेद न बाळगता केला जात होता.

"अहमदनगर शहर आणि आसपासच्या गावांमध्ये अनेक संतांचे उरुस उत्सव साजरे केले जातात. त्यामध्ये मिरावली पहाड, शहा शरीफ दर्गा दायरा, रमजान बाबा यांचे उरुस साजरे केले जातात."[85] या उरुसाला देखील सर्व धर्मीयांचा सहभाग असतो. आजदेखील शहा शरीफ दर्गा येथे शहाजी राजे भोसले यांचे वंशज उरुसाच्या दिवशी हजेरी लावतात. या सर्व गोष्टी पाहता हिंदू मुस्लिम धार्मिक समन्वय असल्याचे दिसून येतो.

**सण उत्सव**

**पचंबा उत्सव**

'पंच-अंबा' शब्दावरुन पचंबा हा शब्द तयार झाला. महाराष्ट्रात कोठेही न आढळणारा हा उत्सव अहमदनगरचे वैशिष्ट्ये आहे. अहमदनगरच्या मुख्य चार दिशेला असणाऱ्या मारुती मंदिरासमोर आजही श्रावणातील प्रत्येक शनिवारी येथे यात्रा भरते. ५०० वर्षाची परंपरा असणाऱ्या यात्रेत अनेक जीवनोपयोगी वस्तू कापड, खेळणी, धान्य, मेवा मिठाई, यासारख्या वस्तूंची विक्री होऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होत असे. वर्षभरासाठी लागणाऱ्या अनेक वस्तूंची खरेदी अशा प्रकारे यात्रेंच्या वेळी केली जात असे. अनेक शाळांना यात्रेनिमित्त सुट्टी असायची.

अहमदनगरच्या हातमपूर भागात एकाच रस्त्यावर मंदिर, मशिद, गुरुद्वारा, पारशी अग्यारी व चर्च ही धार्मिक समन्वयाची साक्ष देतात.

**सगर**

अहमदनगरमधील बहुतेक लोकांच्या घरी गाई असत. त्यामुळे दिवाळीच्या सणामध्ये गाई म्हशींना महत्व असे. अहमदनगरमधील वीरशैव लिंगायत समाज म्हशींचा सगर नावाचा खेळ, कसरती किल्ला मैदानावर आयोजित करत. त्यात म्हशींच्या शर्यती व रेड्यांच्या झुंजी लावत. व जिंकणाऱ्या मालकाला जातीचे पंच फेटा बांधत. ही परंपरा आजही टिकवून आहे.

**समारोप**

अहमदनगरमध्ये कला साहित्य लोककला, नाटक, चित्रपट यांची रेलसेल असे. येथे लोक हौशी व कलासक्त असलेली दिसतात. येथील विविध धर्माच्या समन्वयामुळे सामाजिक जिवन सौहार्दपूर्ण असल्याचे आढळते. ५०० वर्षाच्या सामाजिक व सांस्कृतिक एकोप्यामुळे येथे जातीय दंगली झाल्याचे आढळत नाही. येथे कर्नाटकातून आलेला विरशैव लिंगायत समाजाचा सगर हा प्रसिध्द म्हशींचा खेळ, नगरची वैशिष्ट्यपूर्ण कोजागिरी, मारुतीसमोरील पचंबा, चाहुराणा राजवटीतील औट घटकेच्या राजाची स्मृती जपणारी शिराळशेट यात्रा आंध्रातून आलेल्या पद्मसाळी समाजाचा वनभोजनाचा आनंदा घेणारा ‘बागल पंडुगु उत्सव’, मुस्लिमांचा बारा ईमाम कोठल्याचा मोहरम इत्यादी सण यात्रा, जत्रा, उरुस, उत्सव, अहमदनगरमध्ये आजही नित्यनियमाने साजरे होतात. त्यातून सांस्कृतीक समन्वय साधलेला दिसतो.

# संदर्भ सुची

[1] ह्युम.आर.ए, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ४०, अंक २१, १८८१, पृ.१४३

[2] यादव आनंद, ग्रामसंस्कृती, दुसरी आवृत्ती, पुणे,२००४, पृ.९३

[3] उपरोक्त, पृ.९८

[4] बॅलंटईन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१, अंक-१५, १८४२, पृ.१११

[5] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १८,अंक १०, १८५९, पृ.१७९

[6] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १८, अंक ९, १८५९, पृ.१४२-१४४

[7] शहा घनश्याम (अनु),चिकटे प्राची, भारतातील सामाजिक चळवळी, पुणे, २००८, पृ.७९

[8] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक-२३, अंक १८, १८६४, पृ.३१५

[9] हयूम आर.डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७,अंक २२, १८४८, पृ.३३५

[10] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १८,अंक २१, १८५९, पृ.३३४-३३५

[11] वाळींबे रा.शं., एकोणिसाव्या शतकांतील महाराष्ट्राची समाजिक पुनर्घटना, पुणे, १९६२, पृ.५०

[12] उपरोक्त, पृ.६७

[13] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २०,अंक १५, १८६०, पृ.२३५-२३८

[14] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २०, अंक १०, १८६०, पृ.१४५-१४८

[15] रेगे मे.पुं., हिंदू धार्मिक परंपरा आणि सामाजिक परिवर्तन, १९९४,पृ.४५

[16] फेअरबँक एस.बी., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १३,अंक ५,१८५४, पृ.१०९

[17] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक-२३, अंक १७, १८६४, पृ.२६०-२६२

[18] सरदार,गं.बा.- महाराष्ट्र जीवन, (खंड २) (आ.स.१९६०)

[19] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १९,अंक १,१८६०,पृ.३१-३२

[20] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १९, अंक १५,१८६०,पृ.२३५-२३६

[21] बॅलंटाइन हेन्री, ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २३,अंक २०,१८६०,पृ.३०९-३१३

[22] उगले जी.ए., ज्ञानोदय आणि महात्मा फुले, वर्धा,२००४,पृ.१०१

[23] उपरोक्त, पृ.६७

[24] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २८, अंक ३,१८७९,पृ.२६६

[25] उपरोक्त, पृ.२९५

[26] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ६८, अंक ४२, १९०९,पृ. ३३१

[27] टिळक.ना.वा.,ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ८३, अंक २३, १९२०,पृ.२०-२४

[28] हिवाळे.भा.पां.,ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ९२, अंक ३३, १९३३,पृ.२६१

[29] टिळक.ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७२, अंक २, १९१३,पृ. १२

[30] रेगे मे.पुं.,विवेक आणि न्याय आधुनिक महाराष्ट्रातील प्रबोधन पर्व, पुणे, २००२ पृ.११५

[31] टिळक दे.ना., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ७९, अंक २७, १९२०,पृ. २०५

[32] सरदार गं.बा.- महाराष्ट्र जीवन,(खंड २) (आ.स.१९६०),पृ.४८

[33] हयूम आर.डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ११,अंक २०, १८५२, पृ.३३४

[34] हयूम आर.डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १२, अंक १३, १८५३, पृ.२१४

[35] नवा महाराष्ट्र (कसा असेल - कसा असावा ) प्रकाशक -नॅशनल इन्फर्मेशन ॲन्ड पब्लिकेशन लि.मुंबई १९४८,पृ.७४

[36] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १५,अंक १७,१८५६, पृ.२७७-२७८

[37] हेन्री बॅलंटाईन, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१७, अंक-१३, १८५८, पृ-२०७-२०८

[38] सरदार,गं.बा.- महाराष्ट्र संस्कृती, आ.स.१९७९,पृ.३६

[39] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १८, अंक २०, १८५९, पृ.३०५-३०९

[40] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १९, अंक ५, १८६०, पृ.७२-७५

[41] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २०,अंक ६,१८६०, पृ.८२-८५

[42] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २०,अंक २,१८६०, पृ.८१-८२

[43] बेहरे पु.रा.महाराष्ट्राचे मन -प्रकाशक बलवन्त प्रकाशक - मुंबई १९६०,पृ.५४

[44] करमरकर सु.वि., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ५३, अंक ४७,१८९४, पृ.३५७

[45] हेजन ए., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १८,अंक १७,१८५९, पृ.२८७-२८८

[46] अबॅट.जे.ई., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक २७,अंक २८,१८८०,पृ.२०७

[47] करमरकर सु.वि., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ५७,अंक ४२,१८९८,पृ.३३६

[48] टिळक दे.ना., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ८६,अंक ३१,१९२७,पृ.२३०

[49] टिळक दे.ना., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ८६, अंक ४१, १९२७, पृ.३२८

[50] भोळे भा.ल.व बेडकीहाळ किशोर (संपादक) बदलता महाराष्ट्र-प्रकाशक-आंबेडकर अकादमी, सातारा-२००३, पृ.१५५

[51] टिळक ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक-७३, अंक-०३, १९१४, पान-१९

[52] बागल मधवराव, बहुजन समाजाचे शिल्पकार, पुणे,१९६६, पृ.१९६६

[53] तारकुंड सिताराम रघुनाथ, ब्राम्हणेतर व मराठे याच्या चळवळीचा पूर्वेतिहास, मराठ्याची पुर्वपीठिका पुणे,१९२२, पृ.१५-३६

[54] निसाळ द.रं., संदेश, गुरुवार ता.२५ जुलै सन १९४६, स्थळ-अहमदनगर,पान ९

[55] निसाळ द.रं., संदेश, गुरुवार ता.२२ जुन सन १९४४, स्थळ-अहमदनगर,पृ. ९

[56] उपरोक्त,पृ. ९

[57] ग्रंथ प्रकाशन समिती, अहमदनगर ब्युरो नगरपालिका शतसंवत्सरिक स्मारक ग्रंथ, अहमदनगर, १९५०, पु.क्र.३०४

[58] उपरोक्त,पृ.३०५

[59] उपरोक्त, पृ.३०९

[60] उपरोक्त, पृ.३८१

[61] उपरोक्त, पृ.३८१

[62] उपरोक्त, पृ.३८२

[63] लांडे सुमती, पैस, ७० वे, अखिल भारतीय मराठी सहित्य, संमेलन, अहमदनगर, १९९७, पृ.१५

[64] टिळक ना.वा., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक-,अंक ६७, १९१५, पृ.२६०-२६२

[65] दीनमित्र सिल्व्हर ज्युबिली अंक-२६ जाने.पृ.२८

[66] लांडे सुमती, पैस, ७० वे, अखिल भारतीय मराठी सहित्य, संमेलन, अहमदनगर, १९९७, पृ.३२

[67] मांडे अरुण, आपट्याचे पान, अहमदनगर, २००७, पृ.१४०

[68] उपरोक्त, पृ.१५५

[69] उपरोक्त, पृ.१२३

[70] सं.शर्मा सुधीर, ज्ञानोदयाच्या पानातून महाराष्ट्राच्या प्रबोधनाचा मागोवा, अहमदनगर, १९९२, पृ.४३

[71] लेले, रा.का.-मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, (आ.स.१९८४)

[72] मांडे अरुण,आपट्याचे पान,अहमदनगर,२००७,पृ.१४९

[73] उपरोक्त,पृ.१५९

[74] ग्रंथ प्रकाशन समिती, अहमदनगर ब्युरो नगरपालिका शतसंवत्सरिक स्मारक संमेलन, अहमदनगर, १९५०, पृ. ३०५

[75] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, १९३९, पृ.१

[76] खानोलकर गंगाधर देवराव, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, पृ. ११०-११२, १९७५

[77] उपरोक्त, ९६, ९७

[78] लांडे सुमती, पैस, ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अहमदनगर १९९७, पृ. २६-३०

[79] ग्रंथ प्रकाशन समिती, अहमदनगर ब्युरो नगरपालिका शतसंवत्सरिक स्मारक संमेलन, अहमदनगर, १९५०, पृ.९९

[80] गिंडे वासुदेव पुरुषोत्तम, बालकवींची कविता ! एक रसास्वाद बेळगाव, पृ.८५-८६, १९७२

[81] निसाळ द.रं., संदेश, अहमदनगर, १९३९, पृ.५

[82] उपरोक्त, पृ.६

[83] लांडे सुमती, पैस, ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अहमदनगर, १९९७, पृ.४०

[84] ऋषी पी.डी. १०० वर्षातील नगरचे बदलते समाजजीवन १९०१-२०१४, अहमदनगर, पृ. ८०-८६, २०१६

[85] कुलकर्णी जी.टी. अध्यक्षीय बीज भाषण, दख्खनी सल्तनती आणि संमिश्र संस्कृतीचा उदय, कोल्हापूर, पृ. १४, १५, २०१२

# प्रकरण पाचवे

# अहमदनगर शहरातील शैक्षणिक परिवर्तन

## प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकाचा पूर्वार्ध हा भारताच्या इतिहासातील मन्वंतराचा काळ होता. या काळात देशामध्ये मोठ्या प्रमाणात वैचारिक क्रांती घडून आली. बुध्दिवाद, तर्कनिष्ठा, शास्त्रीय विचारप्रणाली, व्यक्तिवाद, राष्ट्रवाद, मानवतावाद इ. आधुनिक संकल्पना भारतीय समाजात प्रस्तृत होऊ लागल्या. त्याचबरोबर मानवी जीवनाकडे पाहण्याचा एक नवा आधुनिक दृष्टिकोन विकसित होऊ लागला. देशाच्या अवनतीचे मूळ सामाजिक अधोगतीत आहे. भारतीय समाजात दृढमूल झालेल्या अंधश्रध्दा, कर्मकांडांचे स्तोंभ, परंपरानिष्ठा, खोलवर रुजलेल्या जातिप्रथेसारख्या अनिष्ठ चालीरीती व रुढी, कूपमंडूक वृत्ती व त्यामुळे आलेली गतिहीनता ही सर्वसमाजाच्या अधोगतीची कारणे असून त्यांचे निर्मूलन करुन त्याजागी नवीन, आधुनिक विचारांचे बीजारोपण केले पाहिजे. असा विचार करणारा सुधारणावाद्यांचा वैचारिक परिवर्तनाचा जो टप्पा आहे त्यास भारतीय प्रबोधनकाळ म्हणतात. भारतात प्रबोधन काळाचा उदय व्दंव्दात्मक प्रक्रियेतून झाला. पाश्चात्य सत्ताधीशांशी आलेला संपर्क, त्यातून त्यांच्या संस्कृतीचा, जीवनपध्दतीचा, विचारप्रणालीचा व भौतिक विकासाचा परिचय झाला. परकीय राज्यकर्त्यांनी भारतीयांना दडपण्यासाठी केलेले प्रयत्न यामुळे भारतीयांच्या मनात त्यांच्याविषयी निर्माण झालेली चीड व आपल्या संस्कृतीचे पुनरुज्जीवन करण्याची जिद्द या बाबी भारतीय प्रबोधनास कारणीभूत ठरल्या. या वैचारिक मंथनातून मध्यम वर्गाचा उदय झाला. हा मध्यम वर्ग परंपरागत चालीरीती, रुढींच्या व शब्दप्रामाण्यांच्या आवर्तात अडकून न पडता आधुनिक विचार, आधुनिक जीवनमूल्ये, पाश्चात्य ज्ञान यांचा अंगीकार करण्यास सहज प्रवृत्त झाला. हा वर्ग आधुनिक विचारांच्या प्रसाराचे माध्यम ठरला.

इंग्रजी सत्तेच्या स्थापनेनंतर या राज्यकर्त्यांनी भारतात प्रचलित असलेली शासनपध्दती व जीवनपध्दती मोडीत काढून नव्य पध्दती रुढ केल्या.

ब्रिटीशांच्या आधुनिक विचारप्रणाली, ज्ञानभांडार, भौतिक विकास यांची या मध्यम वर्गाला भूरळ पडली. त्यामुळे पाश्यात्य ज्ञान आत्मसात करण्याची निकड त्यांना भासू लागली. त्या दृष्टीने पाश्यात्य ज्ञान देणाऱ्या शिक्षणसंस्थांची निकड त्यांना भासू लागली. भारतात पाश्यात्य शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था प्रथम स्थापन करण्याचे श्रेय मिशनरींना आहे.

**इंग्रजपूर्व काळातील शिक्षण**

इंग्रजी सत्तेपूर्वी भारतात सर्वत्र शिक्षणसंस्था अस्तित्वात होत्या. प्राथमिक शिक्षण हे प्रामुख्याने व्यावहारिक स्वरुपाचे तर उच्च शिक्षण आर्थिक, तात्विक व साहित्यिक स्वरुपाचे होते. अशी माहिती मिशनऱ्यांच्या लिखाणातून सापडते. हिंदूच्या पाठशाळांतून दिले जाणारे शिक्षण परंपरागत पध्दतीचे असे. येथे तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, गणित, व्याकरण, तत्वज्ञान, प्राचीन साहित्य असे विषय शिकवले जात. शब्दप्रामाण्य व पाठांतर यावर विशेष भर असे. या शिक्षणात नव्या आशयाची भर पडत नव्हती. संस्कृत हे शिक्षणाचे माध्यम सामान्यांच्या बौध्दिक कक्षेबाहेरचे होते. बाहेरच्या जगातील घडामोडींची, ज्ञानाची प्रगती या शिक्षणातून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचत नसे. अशीच परिस्थिती मुस्लिमांच्या मदरसातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची होती. हे शिक्षण इंग्रजी सत्तेच्या स्थापने बरोबर बदलू लागलेल्या परिस्थितीत कालबाह्य ठरु लागले आणि पाश्चात्य ज्ञान अवगत करुन घेण्याची गरज भारतीयांना भासू लागली. हे कार्य मिशनरी वर्गाने केले.

**शिक्षणाबाबत इंग्रज सरकारचे धोरण**

१८१३ साली ब्रिटीश पार्लमेंटने पास केलेल्या सनदी कायद्यात भारतात शिक्षणाचा प्रसार करण्याबाबत तरतुद करण्यात आली आणि शिक्षण प्रसाराला हातभार लावण्याची जबाबदारी कंपनी सरकारवर टाकण्यात आली. तोवर कंपनी सरकारचे

कोणतेच धोरण निर्धारित नव्हते. वॉरन हेस्टिंग्ज, चार्लस् विल्किन्स, सर विलियम जोन्स, थॉमस मन्रो, इ. इंग्रज अधिकारी प्राचीन भारतीय साहित्यात रस घेत. त्यातील काहींना भारतीय व ब्रिटीश संस्कृतीचे आदानप्रदान व्हावे असे वाटत होते. अधिकृत शासकीय धोरण मात्र शिक्षणाबाबत उदासीनच होते.

१८१३ सालच्या सनदी कायद्यातील शिक्षणाबाबतच्या तरतुदीनंतरही सुमारे दहा वर्षे कंपनी सरकारने आपले शैक्षणिक धोरण निर्धारित केले नाही. १८२३ साली प्रथमच लॉर्ड हेस्टिंग्जने 'कलकत्ता स्कूल बुक सोसायटी' आणि कलकत्ता स्कूल सोसायटी' यांना अनुदान दिले. त्या वर्षी गव्हर्नर जनरल अॅडमने 'कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन' स्थापन केले. या समिती पुढे सरकारी अनुदान कोणत्या शाळांना द्यावे व शाळांतून शिक्षणाचे माध्यम काय असावे हे दोन प्रश्न होते. पुढे कशा प्रकारचे शिक्षण द्यावे ह्या प्रश्नाची भर पडली. त्यात दोन गट तयार झाले.

प्रचलित शिक्षण पध्दतीचा पुरस्कार करणाऱ्या गटाला 'ओरिएंटॅलिस्ट' तर आधुनिक पाश्चात्य शिक्षण पध्दतीचा पुरस्कार करणाऱ्या गटाला 'आंम्लीसिस्ट' अशी नावे रुढ झाली.

१८३४ साली लॉर्ड मेकॉलेची नियुक्ती कमिटी ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनवर झाली. त्याने पाश्चात्य शिक्षणाचा पुरस्कार केला. पाश्चात्य विद्या शिकवल्यास भारतात इंग्रजी सत्ता बळकट होईल, एक इंग्रजी पुस्तक शेकडो भारतीय ग्रंथांपेक्षा महत्वाचे आहे, इंग्रजी शिक्षण घेतलेले भारतीय हे केवळ रक्ताने व वर्णाने भारतीय राहतील, त्यांची जीवनमूल्ये पाश्चात्यांसारखी बनतील, त्यामुळे इंग्लंडच्या वस्तूंना भारतात मागणी वाढेल पाश्चात्य शिक्षणाला प्रोत्साहन द्यावे पौर्वात्य शिक्षणावर खर्च करु नये अशा आशयाचा प्रस्ताव अवघ्या एक महिन्यात मान्य झाला. ७ मार्च १८३५ चा त्याचा प्रस्ताव भारताच्या शैक्षणिक क्षेत्राच्या इतिहासातील महत्वाचा टप्पा ठरला. मेकॉलेच्या या विचारांना विरोध झाला म्हणून १८३९ पासून काही रक्कम इंग्रजी शिक्षणावर व काही रक्कम पौर्वात्य शिक्षणावर खर्च करण्याचे ठरले. त्यामुळे शिक्षणाबाबत वर्षानुवर्षे

चाललेला वाद थंडावला. १८४३ पासून इंग्रजी शिक्षण घेतलेल्या भारतीयांना कंपनी सरकारच्या सेवेत सामाऊन घेतले जाईल या घोषणेनंतर शाळांची व विद्यार्थ्यांची संख्या खूप वाढली.

**वूडचा शिक्षणविषयक खलिता**

शिक्षणाची व्याप्ती वाढविण्यासाठी व दर्जा सुधारण्यासाठी वूड ने इंग्रजी व प्रादेशिक भाषांचा वापर केला जावा अशी मोलाची शिफारस केली या शिवाय एक स्वतंत्र शिक्षणखाते असावे, मुख्य शहरी विद्यापीठे असावीत, शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था असाव्यात, प्राथमिक व माध्यमिक सरकारी व खाजगी शाळांना परवानगी द्यावी, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून तर उच्च शिक्षण इंग्रजी भाषेतून असावे, शैक्षणिक अभ्यास क्रमात धार्मिक शिकवणीला स्थान देऊ नये, स्त्री शिक्षणाला सरकारने विशेष उत्तेजन द्यावे. अशा वूडच्या खलित्यातील महत्वाच्या शिफारसी होत्या. त्या सर्व शिफारसीकांनी सरकारने मान्य करुन त्वरीत अंमलबजावणी केली.

**मुंबई ईलाख्यातील शिक्षणप्रसार**

मुंबई ईलाखा ताब्यात येताच या भागात शिक्षणप्रसाराची जबाबदारी सरकारची असल्याची जाणीव मुंबईचा पहिला गव्हर्नर एलफिन्स्टनला झाला. इंग्रजी भापेतून शिक्षण दिले जावे ही मागणी मुंबई शहरातच असल्याने, मुंबई व्यतिरिक्त इतर भागात पाश्चात्य शिक्षण स्थानिक भाषांतून दिले जावे, प्राथमिक शिक्षण मातृभाषेतून दिले जावे, प्राच्यविद्येला प्रोत्साहन द्यावे, अशी त्याची शिक्षणविषयक भूमिका होती.

पेशव्यांची सत्ता नामशेष झाल्यामुळे प्राच्यविद्येच्या अभ्यासकांत निर्माण झालेला शेष दूर करावा म्हणून १८२१ साली पुण्याला संस्कृत कॉलेजची स्थापना केली. १८२७ साली 'बॉम्बे नेटिव एज्युकेशन सोसायटी' स्थापन झाली. या संस्थेने भारतीय भाषांतून पाठ्य पुस्तके केली, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था, इंग्रजी शिक्षण देणाऱ्या संस्था स्थापने इ. कामे केली. १८३४ साली मुंबईला विल्सन कॉलेज हे मिशनरी कॉलेज व पुणे, अहमदनगर, सुरत, राजकोट इ. ठिकाणी मिशनरी शाळा स्थापन झाल्या, हेतूनेही प्रयत्न

झाले. अमेरिकन मिशनरी सोसायटीने १८२४ साली मुंबईला मुलीसाठी शाळा काढली. या सोसायटी तर्फे १९३१ साली अहमदनगरला शाळा सुरु झाली.

या कालावधीत इंग्रजी शिक्षणाचे महत्व पटलेले काही स्थानिक लोकही शिक्षणप्रसाराच्या कार्यात उत्साहाने भाग घेऊ लागले. वहरामजी मलबारी, जगन्नाथ शंकरशेठ, दादाभाई नौरोजी इ. मंडळी अग्रेसर होती.

या क्षेत्रात अत्यंत मोलाचे कार्य महात्मा जोतीबा फुलेंनी १८४९ साली पुण्याला मुलींसाठी व १८५१ साली दलित समाजासाठी शाळा काढून केले.

अहमदनगरच्या आजच्या सामाजिक जीवनाची परंपरा निजामशाहीच्याही आधी अस्तित्वात असलेल्या परिसरातून आणि कालातून आलेली असली, तरी आपण आपणाला अवगत असलेल्या इतिहासाच्या आधारे म्हणजे निजामशाही पासून सोयीसाठी स्वीकारणे भाग आहे. निजामशाहीच्या प्रारंभापासून स्थलकाल सापेक्ष बदल स्वीकारीत आजची जीवन परंपरा आपणापर्यंत आलेली आहे. सांप्रत त्या काळातील चळवळीपासून बरेच दूरवर आहोत त्यामुळे तत्कालीन चळवळीची तीव्रता आपणास इतकीशी जाणवत नाही. खऱ्याखुऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडण्यासाठी त्या समाजातील व्यक्तीला समाज प्रबोधनाची स्पष्ट संकल्पना म्हणजे आपणाला नेमके काय साधायचे याची जाण असावी लागते. ती जाण निर्माण झाली म्हणजे समाज परिवर्तनाला फारसा वेळ लागत नाही.

अहमदनगरच्या प्रारंभ काळात धार्मिक, सामाजिक प्रबोधनाचे काम संतांनी केले. सुदैवाने नगर ही संतांची भूमी होती. संत हे लोकशिक्षक होते. पक्षीय, जातीय, आर्थिक हेतूंपेक्षा त्या सामाजिक चळवळींचा भर नीती, आचार, धर्माचरणावर होता. लोककल्याणासाठी शिक्षण होते. त्याकाळात 'लोकसेवा' हे आपणहून स्वीकारलेले सतीचे वाण होते. त्या काळातील सामाजिक वा धार्मिक चळवळी फारशा उग्र झाल्या नाहीत. किरकोळ संघर्ष झाले. "अहमदनगरचे मुसलमान राजे मुळातले हिंदू. धर्मांतराने मुसलमान झाले होते. पण सामाजिक जीवनपध्दती, संस्कृती, परंपरा आदी अंगांनी ते

भारतीयच-महाराष्ट्रीय राहिले होते. तसे नसते तर शिवछत्रपतींच्या स्वराज्याची पायभरणी शहाजीराजे यांच्याकरवी निजामशाहीत झालीच नसती. मुसलमान राज्यकर्त्यांबरोबरच आलेल्या 'सुफी' सांप्रदायिकांनाही हिंदू-मराठी संतांनी आपल्यात सामावून घेतले असते. जबरदस्तीने बाह्यरेट्यांनी झालेले परिवर्तन काही काळ टिकते हे खरे. पण जेव्हा एखाद्या विशीष्ट जनसमूहाला समाजाला आपल्या मूळ परंपरेची, आपल्या अस्मितेची जाणीव होते तेव्हा तो समाज जीवनसंदर्भात नव्या जोमाने वाढू लागतो. असे वाढणे सामाजिक चळवळींचे खरे बळ असते. हे बळ त्या समाजाने स्वीकारलेल्या शिक्षणपध्दतीवर अवलंबून असते. या प्रकरणात मिशनऱ्यांनी केलेले शिक्षणविषयक प्रयत्न व सरकारने नगरपालिकेअंतर्गत केलेले प्रयत्न अशा दोन टप्प्यांमध्ये अहमदनगरमधील शिक्षण व्यवस्थेचा विचार केला आहे.

**मराठी मिशनचे शैक्षणिक कार्य**

"मिशन शाळेत शिकल्यास अन्नवस्त्राचा खर्चही मिळतो सर्व विद्यांसह बैबलही शिकतात. त्याने दुर्गुण नाहीसे होतात."[1] खऱ्या शांतीचा धर्म म्हणून कन्या ख्रिस्ताकडेच वळत आहेत. कारण त्यात मरणाची भीती वाटत नाही कुत्सित कर्मे टाकून देवास शरण जावे.

"मिशनऱ्यांनी धर्माच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी राज्यकर्त्यांपूर्वी देशभर शैक्षणिक संस्था स्थापन केल्या होत्या. बंगालमध्ये विल्यम कारे प्रभूतिनी या क्षेत्रात आलेले यश दृष्टी समोर ठेऊन लक्ष गाठण्याची शिकस्त केली."[2] १८१३ च्या कंपनीच्या सनदेनुसार मिशनऱ्यांना "हिंदुस्तानात प्रचारासाठी रान खुले झाले. या सनदेनुसार शिक्षणाची जबाबदारी तत्वता राज्यकर्त्यांनी उचलण्याचे मान्य केले."[3] मिशनऱ्यांनी सरकारी शाळांमधून धार्मिक शिक्षण देण्याचा (विल्यम प्रभूतिनी) धरलेला आग्रह व्यर्थ गेला.

मिशनरी शाळेतून ख्रिस्ती धर्माची शिकवण मिळे. "धार्मिक ग्रंथादी साहित्य मोफत व गावोगाव प्रत्येक व्यक्ती पर्यंत स्वतः मिशनरी आणून देत."[4] त्यामुळे अहमदनगर

मधील मिशन शाळेत १८३३ ते १८५४ या काळात विविध जातीधर्मांची शेकडो मुले मुली व प्रौढ स्त्री-पुरुषांच्या ज्ञानार्जनात भर पडली.

१८३३ साली पहिली सहभोजन शाळा तर १८३६ साली पहिली मुलींची शाळा अहमदनगर येथे या मिशनऱ्यांनी उघडली. "मुलींच्या 'सिंथिया फारा' शाळेपासून महात्मा ज्योतीराव फुलेंनी प्रेरणा घेऊन पुण्यात मुलींची पहिली शाळा उघडली. हा निर्वाळा ज्ञानोदयकाराने दिनांक १५ डिसेंबर १८५३ च्या अंकात दिला आहे. पुरुषांबरोबर स्त्रियांनी शिक्षण घेण्याचा विचार अहमदनगर मध्ये मिशनऱ्यांनीच रुजवला. या शाळेपासून स्फूर्ती घेऊन अहमदनगर मधील स्त्रिकल्यानोत्सुक मंडळीनी मिस सिंथिया फाराच्या मार्गदर्शनाखाली १ ऑक्टो. १८५१ रोजी मुलींच्या २ शाळा अहमदनगर मध्ये सुरु केल्या."[5] मिशनरी शाळांमधून सर्व जातीजमातीच्या मुलींना शिक्षण देण्यास अमेरिकन बोर्डाच्या खर्चातील कपातीच्या सूचनेनुसार मिशनऱ्यांनी नकार दिल्यामुळे ही शाळा उभारणीचा निर्णय घेतला असावा शिवाय त्याचा आपल्या पाल्यांना धर्मांतराच्या संकटापासून मुक्त करण्याचाही विचार असावा.

"सरकारी व खाजगी शाळा निघू लागल्या व मिशनऱ्यांनी ख्रीस्तेतर मुलामुलींस शिक्षणास आडकाठी घातल्यामुळे १८५४ नंतर मिशनरी शाळा बंद पडू लागल्या. उच्चवर्णीयांच्या व शिक्षकांच्या धर्मांतरामुळे मिशनरी शाळांवर समाज बहिष्कार टाकत असे."[6] १८४९ साली ३२ मिशनरी शाळांमधून १४५३ विद्यार्थी तर १८५१ साली ७ मुलींच्या शाळेत २४५ मुली शिक्षण घेत असल्याचा उल्लेख मिशनऱ्यांच्या शैक्षणिक कार्याची भरीव प्रगती असल्याचे मान्य करावे लागेल.

मिशनऱ्यांनी उच्च शिक्षणासाठी १८३३ मध्ये शाळा काढली. या शाळेत १८५१ साली ८३ विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. "१५ मार्च १८८७ च्या ज्ञानोदयच्या अंकात इ.स. १८४५ सालच्या प्रसिद्ध झालेल्या महाराष्ट्रातील जिल्हानिहाय शाळा व मुलींच्या अहवालातील संख्येनुसार अहमदनगर जिल्ह्यात पुण्यापेक्षाही जास्त म्हणजे पंचवीस शाळेतून १५०० विद्यार्थी शिकत असल्याचे भरीव चित्र दिसून येते."[7] हा विकास

व विस्तार या जिल्ह्याच्या विकासास व महाराष्ट्रात या जिल्ह्याला आघाडीवर आणण्यास उपयुक्त ठरला असावा यात शंका नाही. या शाळांमधून मुला-मुलीना लेखन, वाचन, व्याख्यान, स्पर्धा, इंग्रजी वाङ्मय, खगोल, गणित, भरतकाम ,विणकाम इ. विषयाचेही ज्ञान मिळे.

“मुलाच्या दैवात विद्या असेल तर तो शिकेल हा विचार अयोग्य आहे. वाईट कामाचा निषेध करुन शिक्षा लावली पाहिजे. चुकीने उडी मारली की पाय मोडतोच. त्यात दैवाचा संबंध नाही जत्रा, सण, दिवाळी, लग्नकार्य, गारुड्याचे खेळ यांत मुलांचे ६-६ महिने व्यर्थ जातात. शिक्षणावर शून्य पडते. मोठी झाल्यावर मुलांना शिकण्याची लाज वाटते. मग चोरी, गांजा, शेवटी तुरुंग, अशी अवस्था होते. शाळेत न जाणे, शिव्या देणे याबद्दल कडक शिक्षा द्यावी. मुलगा मूर्ख निपजणे ही लौकिकात फार लहानवी नव्हे काय.”[8] शाळांमधून मिशनरी हिंदू धर्मातील मूर्तीपूजा, यात्रा, मेळावे, सणोत्सव आदीवर टीका करून बालमनावर हिंदुधर्मविरोधी संस्कार करीत.

हिंदू धर्म परंपरेवरील श्रद्धा व विश्वास ढासळून ख्रिस्ती धर्माकडे आकृष्ट करण्याचा त्याचा हट्ट असे. हजारो वर्षांची ज्या संस्कृती, परंपरांना समृद्ध पार्श्वभूमी आहे. मिशनऱ्यांना लोकांच्या श्रद्धा चाळविण्यापलीकडे फारसे यश मिळाले नाही.
मात्र मिशनरी कार्याचा समाजजीवनावर अप्रत्यक्ष परिणाम उमटला. येथील सुशिक्षितानी छापखाने वृत्तपत्रे, पुस्तके शाळा काढून स्वसंस्कृतीचे श्रेष्ठत्व पटऊन देण्यासाठी अंतर्मुख होऊन विचार करू लागले, आणि मिशन-यांच्या हल्याना समर्थपणे तोंड देऊ लागले.

“या हल्ल्यामुळे भारतीयांच्या अस्मिता जागृत होऊन राष्ट्रवादी वृत्ती वाढत जाऊन स्वातंत्र्य आंदोलनास त्याचा हातभार लागला येथील समाज जीवनात वैचारिक मंथन चालू झाले, पण प्रत्यक्ष कृतीप्रवणता १८६० नंतर सुरु झाली.”[9] “बुके वाटणे, शाली घालणे, हिंदु धर्माची निंदानालस्ती करणे, यामुळे हिंदुचा बुध्दिभ्रंश होऊन कित्येक बाटले प्रभाकरने यावर उपाय सुचविला की मुलांना त्यांच्या शाळेत पाठवू नये. बहिष्कार

घालून ब्राम्हणांस वाचवावे. संपादकांचे उत्तर असे की बहिष्काराने केवळ दुफळी, विरोध, प्रतिबंध माजून गोंधळ मात्र होईल. तुमच्या वेडेपणाचे हसू होईल."[10]

## मिशनऱ्यांच्या इतर कार्याचा शिक्षणावरील परिणाम

१८२४ साली मुंबईस सुरु केलेल्या मिसेस विल्सन ने "सोसायटी फोर प्रमोटिंग फिमेल एजुकेशन इन दी इस्ट" या संस्थेच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन अमेरिकन मिशनऱ्यांनी स्त्रीदास्यविमोचनाचे प्रयत्न सुरु केले.

मुलींचा जन्म, लग्नाचे वय, सती, बालहत्या, मुलींच्या विक्रीची चाल, विधवा विवाह, बाला-जरठ विवाह, अनेक भार्या पद्धती, केशवपनादी स्त्रिजीवनाच्या जन्मापासून अंतापर्यंतच्या सर्व प्रचलित व्यवस्थेवर त्यांनी चौफेर रान उठवले. या कामी हिंदी सुधारक व राज्यकर्त्यांचे मिशनऱ्यांना सहाय्य लाभले, आणि कायद्याने या रूढी परंपराना मूठमाती देण्याचे प्रयत्न सुरु झाले. अफू, भांग, मद्यप्राशानादिंचे सामाजिक जीवनावर घडत असलेल्या परिणामाचे चित्र काव्य लेखनातून लोकांपुढे उभे करून त्या पासून परावृत्त करण्याचे त्यांनी प्रयत्न केले. सरकारला आर्थोत्पादनाच्या लोभापायी समाजव्यवस्था बिघडण्याची जणू परवाच नव्हती. मिशनऱ्यांनी दारूबंदीसाठी केलेले प्रयत्न व टीका यांची राजकर्त्यांनी विशेष दखल घेतली नाही. मात्र अशा चळवळीचा आदर्श येथील सुधारणावाद्यांचा मार्गदर्शक ठरला. "हिंदूंचे नागपंचमी, होळी, पोळा सण, यात्रा, उत्सव, इ.वर तोफा डागून त्यातील भिभस्यपणा व विवेकशून्य प्रकार टाळण्यासाठी सरकारला कायदा करण्याचा आग्रह धरला. त्यांच्या कार्याची योग्य पावती विष्णुशास्त्री कोल्हटकर अहमदनगरला इंग्रजी शाळेच्या तपासणीसाठी आले असता भाषणातून दिली होती."[11] मिशनरी अहमदनगर जिल्ह्यातील रांजणगाव, कोल्हार, टोके, नेवासे येथे तीर्थमेळावे प्रसंगी जातीने उपस्थित राहून उपदेश करीत. अशा तत्कालीन जनसमुहापुढे शाब्दिक कोट्या करून त्याच्या श्रद्धा मालविण्याचा ते प्रयत्न करीत. हिंदू धर्मातील पापपुण्य, स्वर्ग, मोक्ष, आत्मा, परब्रम्ह, माया, पुनर्जन्म आदी कल्पना त्यांना अनाकलनीय होत्या म्हणूनच वरकरणी वाटणाऱ्या आचार, विधींवर ते टीका करीत.

ईश्वराचे जळीस्थळी, काष्टीपाषाणी मानलेले अस्तित्व त्यांना मान्य नसावे. अशा धर्म कल्पनांवर तात्विक हल्ले करण्याइतपत संस्कृतीविषयीच्या त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या नव्हत्या हे स्पष्ट होते.

"मुले सतत शाळा बदलतात, म्हणुन ती मूर्ख राहातात. मिशन शाळेत प्रत्येक विद्यार्थ्यांची सतत चौकशी केली जाते. शिस्तीकडेही लक्ष दिले जाते. चांगल्या वागणुकीबद्दल बक्षिसेही दिली जातात. यंदा तर साहेबाने स्वत: परीक्षा घेतली पालकही उपस्थित होते."[12] तिघांना खास विद्यावेतन सुरु झाले. अशा प्रकारे शिस्त व शिक्षण देण्याचा मिशन शाळेचा हेतू असे.

**मिशनऱ्यांनी केलेली ठळक कामे**

मिशनऱ्यांनी स्वप्राण धोक्यात घालून कॉलरा, प्लेग, कुष्टरोगादिवर विनामुल्य औषोधोपचार पुरविले. रोग निवारणाच्या पारंपारिक उपासना, जप, तप, देवपूजा, शांती, दान, ब्राम्हणभोजन, कर्मकांडादी उपायातील पोकळपणा लेखमालेद्वारे लोकांना सांगितला. रोगांची शास्त्रीय कारणे व त्यावरील उपाययोजना लोकांपर्यंत पोहचविल्या. आंधळे, पंगु, सामाजबहिष्कृत, वृद्ध, अस्पृश्यादींना अनाथाश्रमातून आश्रय देऊन त्यांनी मोफत सेवासुश्रुषा केली.

"ज्ञानोदयातून पाश्चिमात्य देशातील नवोदित चाली, कला, साहित्य, विज्ञान, भाषा, यांचे ज्ञान दिले."[13] या नवीन ज्ञानातून नवीन उपक्रम सुरु करण्याच्या कल्पना लोकमानसात रुजू लागल्या ही आधुनिक भारताच्या जडणघडणीची सुचिन्हे मानावी लागतील.

**मिशनऱ्यांच्या कार्याचे सर्वांगीण परिणाम**

मिशनऱ्यांचे समाजसुधारणेचे प्रयत्न सहेतुक असूनही त्यांचा या जिल्ह्याच्या सर्वांगीण उन्नतीसाठी उपयोग झाला ही वास्तुस्थिती आहे. "मिशनऱ्यांनी शैक्षणिक संस्थाचा आदर्श डोळ्यापुढे ठेऊन महाराष्ट्रात अशावेळी संस्था उभारल्या ज्या वेळी या जिल्ह्यात एकही मुलीला लिहिता वाचता येत नव्हते. अशा वेळी मिशनऱ्यांनी येथे

मुलामुलींसाठी शिक्षण देण्याचा अभिनव उपक्रम राबविला."[14] त्यांच्या या प्रयत्नांमुळे या जिल्ह्याच्या आधुनिकीकरणास हातभार लागला. मिशनऱ्यांच्या संपर्कामुळे विज्ञाननिष्ठ संस्कृतीचा धर्माधीष्टीत हिंदी संस्कृतीशी जवळून व लवकर संपर्क आला त्यामुळे बदलाला प्रारंभ झाला. नवशिक्षित सुधारकांच्या सहाय्याने व मिशनऱ्यांच्या आग्रहामुळे निषिद्ध रूढी परंपरांना कायद्याने गाडण्याची पाऊले राज्यकर्त्यांना उचलावी लागली. त्यामुळे हिंदी संस्कृती संक्रमणाला आरंभ झाला. हिंदी सुधारणावाद्यांनी पाश्चात्य संस्कृती परंपराचा भारतीय संस्कृतीच्या चौकटीत बसवून स्वीकार केला.

शुद्रअतिशुद्रांना विद्या शिकविण्याविषयी आग्रही पुढारी जोतीराव गोविंद फुले आहेत. आईच्या योगे मुले सुधारतात. म्हणून नगरच्या फरार मडमेची मदत घेऊन पुण्यात मुलींची शाळा काढली. "अशा कामामुळे वडील रागावले, घर सोडावे लागले, जातवाले रुष्ट झाले. कोणी शाळेस जागा देईना. शेवटी राघूराऊत मांग व राणबा महार यांनी वर्गणी जमविण्यास मदत केली. सदाशिव बल्लाळ गवंडी यांनी जागा दिली. शाळा बरी चालू लागली."[15] पण मुलींना शेजारचे लोक पिण्यास पाणीही देईनात. जवळ उभे करीत नसत. हळूहळू लोकांची मने पलटू लागली. आता या शाळेत बरे दिवस आले. दक्षिणेतून २५ रुपये मिळतात.

ज्यावेळी नवीन मूल्यांचा राज्यकर्त्यांकडून अतिरेक झाला त्या वेळी १८५७ साली संघर्षाचा ज्वर निर्माण झाला. हा ज्वर निमल्यानंतर हिंदी विचारवंताना प्रबोधनाची निकड भासू लागली. त्यातून १८६० साली 'प्रार्थना समाज', १८६६ साली 'पुनर्विवाहोत्सूक मंडळी', 'सार्वजनिक सभा' १८७०, 'आर्य समाज' १८७५ आदी चळवळी महाराष्ट्रात सुरु झाल्या. या संस्थाद्वारे धर्मादी शिक्षणाला फाटा फुटून भौतिकशास्त्रांचा अभ्यास होऊ लागला. भटभिक्षुकी, पंडितगिरी, शिलेदारी व जमीनदारी वर्गाची जागा शिक्षक, सरकारी नोकर, संपादक, साहित्यिक, व्यापारी, व उद्योगपतींनी घेतली. मिशनऱ्यांच्या आक्रमक हल्ल्यांना प्रत्युत्तर करणारे विचार लहरी, धुमकेतू, दर्पण, प्रभाकर, इ. वृत्तपत्रे झळकू लागली. त्यांच्या विचारद्वंद्वातून पौराणिक ग्रंथादी

साहित्याचे अध्ययन अध्यापनास चालना मिळाली. राज्यकर्त्यांच्या इच्छेविरुद्ध भाषण, मुद्रण, लेखन, चर्चा मानवी मुलभूत हक्कादीसाठी संघर्षाच्या फेरी, वृत्तपत्रे, भाषणे, अधिवेशने, आदी मधून झडू लागल्या. 'बॉम्बे लिटररी सोसायटी'द्वारा पाश्चात्यांना महाराष्ट्रीय संस्कृती जीवनाचा जवळून परिचय होऊ लागला. त्याचे महाराष्ट्रीयन बाबतचे विचार बदलू लागले. व त्यांनी शुभवर्तमानप्रसार चळवळ जोरकसपणे चालू केली. पण "मिशनऱ्यांना अल्प प्रतिसाद मिळाल्याने रिचर्ड टेम्पलने नमूद करताना म्हटले आहे की, "हिंदू धर्माची जागा घेईल इतका ख्रिस्ती धर्म बलवान नाही." स्वसंस्कृती श्रेष्ठ मानून हिंदू संस्कृतीमूल्यांच्या हजारो वर्षांची परंपरा लाभलेल्या संस्था, परंपरांना मिशनरी बाष्कळ हल्ल्याने तडका  फडकी पुसून टाकू पहात होते."[16] हे त्यांचे प्रयत्न केविलवाणे होते. स्वदेशबांधवांच्या राजकीय व लष्करी विजयाच्या उन्मादाने मिशनरी स्वधर्म संस्कृती श्रेष्ठ मानू लागले. त्यांच्या कार्यामुळे हिंदी धर्मशास्त्र अभ्यासास उत्तेजन मिळाले. गं. बा. सरदार त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करताना लिहितात," अर्वाचीन महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, वाङ्:मयीन इतिहासात या मिशनरी लोकांच्या चळवळीचे स्थान महत्वाचे आहे." हिंदी समाज चैत्यन्यशून्य , थंड गोळ्या प्रमाणे बनला असता त्याला चैतन्य प्राप्त करून देण्याचे श्रेय मिशनऱ्यांकडे जाते. अहमदनगरपासून पूर्वेकडील पाथर्डी, जामखेड, कर्जत व श्रीगोंदा या परिसरात मिशनऱ्यांना विशेष प्रतिसाद मिळाला नाही.

कारण हा प्रदेश डोंगराळ असल्याने मिशनऱ्यांच्या रहदारीस अडवळणी होता. हा प्रदेश बरीच वर्षे निजामी अमलाखाली मोडत होता. तसेच श्रीगोंद्याच्या शिंदे संस्थानिकाने मिशनऱ्याकडून पुस्तके घेणाऱ्यास व त्यांच्या सभेला जाणाऱ्यास दंड योजना जाहीर केली होती.  म्हणून या भागात ख्रिस्तीधर्म प्रसार झाला नाही.

अहमदनगरच्या पश्चिम व उत्तर भागात रहदारीसाठी रस्ते मिशनऱ्यांच्या सोयीचे होते त्यामुळे शेंडी, शिंगवे, कामत, भिंगार, कोल्हार, वांबोरी, राहुरी, वडाळा, नेवासा, लोणी, रांजणगाव, कारेगाव इ. ग्रामीण केंद्रांचा स्थानिक अमलदाराच्या आश्रयाने ख्रिस्ती

धर्माचा विकास झाला. तेथे सरकारी पाठराखण मिळून हरी ख्रिस्ती या नेटिवाने युरोपीय मॅजिस्ट्रेट अहमदनगरला आले असता संतती व पत्नीवरील हक्क १४ फेब्रुवारी १८५१ रोजी मान्य करून घेतला.

अहमदनगरला कोर्टात चापमन मॅजीस्ट्रेट बदलून आल्यावर शाहू कुकडे, दाजी कुकडे व लक्ष्मण साळी यांनी नातेवाईकांच्या इच्छेविरुद्ध मिशनऱ्यांच्या समवेत राहण्याचा हुकुम मिळवून घेतला.

नेवाशाच्या महाराने तेथील कुलकर्णी पटलाविरुद्ध वंशपरंपरागत चालत आलेले वतनवाढीचे हक्क, तेथील मुनसफ  कोर्टाकडून आबाधित करून घेतले. मात्र अशा सरकारी पाठराखणीमुळे धर्मांतरीताना दिलासा मिळण्यापलीकडे धर्मांतराला विशेष चेतना मिळाल्याचे आढळत नाही. मिशनऱ्यांनी केवळ स्वधर्म बांधवांसाठी कायदेशीरपणाचा पुरस्कार केला सामाजिक समतेचा व लोकशाही विचारप्रणालीचा त्यानी स्वदेशाप्रमाणे येथे विचार केला नाही. केवळ ख्रिस्ती लोकांसाठी शैक्षणिक सोई, शाळा, वसतिगृहे, रुग्ण सेवा चालवून त्यांना कायदेशीर हक्क मिळऊन दिला. परंतु तेथील बहुसंख्य हिंदूना दुखावण्याचा प्रकार त्यांच्याहातून घडून आला. त्यामुळे त्यांचे कार्य ऐतिहासिक पटलावर संकुचीत ठरले. त्यांचे हे प्रयत्न अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी झाले असते तर त्यांच्या कार्याला जगाच्या इतिहासात तोड  नसती.

इ.स. १८३१ साली ख्रिश्चन मिशनरी रेव्हरंड ॲलन व रेव्हरंड रीड अहमदनगरमध्ये आले. इंग्रजांच्या आणि मिशनऱ्यांच्या आगमनाबरोबर नगरच्या शिक्षणाचे स्वरुप बदलले. त्यामुळे नगरचे शैक्षणिक पर्यावरण बदलू लागले.

"अमेरिकन मराठी मिशनने इ.स. १८१५ मध्ये हिंदू मुलांसाठी पहिली शाळा मुंबईस सुरु केली. त्यावेळी त्या शाळेत २५ विद्यार्थी होते. अहमदनगरमध्ये १८३१ साली आलेल्या मिशनऱ्यांनी मुंबईच्या धर्तीवर अहमदनगर शहर आणि अवतीभवतीच्या खेड्यांत आपल्या शाळा सुरु केल्या."[17] त्या सर्व शाळातून कमीत कमी १०,००० विद्यार्थी-विद्यार्थीनी लिहावाचायला शिकले. तसेच ख्रिस्ती धर्म व त्याचे तत्व त्यांना

कळले, असे १८८२ साली प्रसिध्द झालेल्या अमेरिकन मिशनच्या रिपोर्टात नमूद केलेले आढळते. अशा प्रकारचे शैक्षणिक कार्य व शाळा चालविण्यासाठी त्यांना कोणकोणत्या अडचणींतून जावे लागले. या संबंधीची माहिती अमेरिकन मिशन मेमोरियल पेपर्स (१८१३-१८८१) या त्याच्या रिपोर्टवरुन मिळते.

## मुलींसाठी निवासी शाळा

"अहमदनगरला पहिली मिशनरी मंडळी येताच त्यांच्या बायकांनी बोडक्या मुलींना शाळेत आणण्याचे कार्य आरंभिले. त्यांनी मुलींना लिहिण्या - वाचण्याला शिकविले आणि बायबलमधील सत्याची प्राथमिक मूलतत्वेही शिकविली. प्रारंभीच्या काळात स्त्रीशिक्षणाबाबत इतका कडक दुषितग्रह होता की मुलींना शाळेत पाठविण्याबाबत अगदी थोडक्याच लोकांची मने वळविता आली."[18] १८३२-३३ मध्ये रीड लिहितात - सततचा विरोध अन पूर्वग्रहदूषितता असताना रीड बाई एक एप्रिलपासून मुलींच्या शाळा चालविण्यात, मोठ्या मुष्किलीने यशस्वी होती, आणि या शाळा चालवितात त्यातली विद्यार्थीनींची संख्या अगदी कमी होती. त्यांनी छोटी प्रश्नोत्तरमाला दहा आज्ञा, प्रार्थना, स्तोत्रे इत्यादींचे पाठांतर केले आहे. येथे स्थायिक झालेल्या युरोपियन महिलांच्या देणग्यांमुळे आर्थिक सहाय्य प्राप्त होऊन शाळेस बरे दिवस येऊ लागले.

"आपल्या हिंदू नातेवाईकांबरोबर राहतांना चिकटलेल्या वाईट सवयींपासून व संगतीपासून दूर ठेवण्यासाठी आणि त्यांना पूर्णपणे ख्रिस्ती प्रभावाखाली आणण्यासाठी काही वर्षांनंतर थोड्या मुलींना निवासी शाळेत ठेवले गेले. त्या मुलींचे पालनपोषण मिशन करीत असे. ही घटनाच मुलींना मिशनरी प्रभावाखाली ठेवण्याबाबतच्या सर्व शंका दूर करणारा पालक मनातला आकर्षण विषय होता."[19] मात्र निवासी शाळेत प्रवेश दिलेल्या सगळ्या मुली चांगल्या कुटुंबातल्या होत्या आणि त्यांच्या जातीविषयक भावभावनांची तूर्त तरी कदर केली जात होती. कारण प्रेमळपणाची वागणूक देऊनच त्यांना व त्यांच्या मैत्रिणींना आपलेसे करुन घेण्याचा हेतू होता.

हे मुद्दाम ध्यानात घ्यावे की या सर्व मुली हिंदू पालकांच्या होत्या. अशा शाळेत जावून मुली दाखल केल्या जातील असा ख्रिस्ती समाजच तेव्हा आकाराला आलेला नव्हता. प्रारंभीच्या काळातील मुलींच्या शिक्षणाचे आणि त्या काळातील शाळांचे स्वरुप वरील उताऱ्यावरुन आपल्या लक्षात येईल.

"या काळांत ख्रिस्ती लोकांनी चालविलेल्या शाळांतून शिकविण्याचे काम करणारा शिक्षक धर्मांतर न केलेले आणि त्यातही ब्राम्हण शिक्षकांचा भरपूर भरणा होता. त्या काळात ख्रिस्ती समाजातील शिक्षक मिळण्याची अडचण होती. पुढेही दीर्घकाळ ख्रिस्ती शिक्षक मिळविण्यासाठी प्रयत्नशील रहावे लागले. या संदर्भात त्यांचे म्हणणे होते. आमच्या धर्मप्रसाराचा हेतू व ख्रिस्ती शिक्षण देण्यास जे वातावरण आम्हाला तयार करावयाचे होते त्याची बैठक तयार झाली. कारण हे हिंदू ब्राम्हण शिक्षक ख्रिश्चन शाळांची क्रमिक पुस्तके अनेक परिक्षांच्या तयारीसाठी वारंवार वाचत होते."[20] विद्यार्थ्यांना ख्रिस्ती धर्मातील सत्य कळावे या हेतूने तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली मिशनने ती पुस्तके तयार केली होती. शाळेत येणाऱ्या मुलांच्या पालकांची व इतर वाचकांची मने ख्रिस्ताकडे वळविण्यासाठी मिशनऱ्यांना त्या पुस्तकांचा फार उपयोग झाला. तरी सर्व विद्यार्थ्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारावा ही त्यांची अपेक्षा मात्र फलद्रुप झाली नाही. याचे कारण इथल्या हिंदू लोकांना ख्रिस्ती धर्म खोटा वाटत होता. मिशनच्या शाळेत पैशासाठी ते आपल्या मनाविरुध्द वागत होते. ही गोष्ट अमेरिकन मिशनच्या उशीरा लक्षात आली आणि त्यांनी हिंदू शिक्षक काढून टाकले व ख्रिस्ती शिक्षक तयार करण्याची योजना आखली.

इ.स. १८३५ मध्ये सेमिनरी वा धार्मिक उच्च शिक्षणासाठी शाळा उघडण्याची योजना आखण्यात आली. इ.स. १८३७ मध्ये ही शाळा सुरु झाली. तेव्हा त्या शाळेत ५ ते १४ वयोगटातील ४५ विद्यार्थी होते. भिन्नभिन्न जातीतील मुले असल्याने त्या काळानुसार त्यांना एकत्र स्वयंपाक करुन एकत्र जेवण घेण्यास सांगणे अवघड होते. मुलांच्या पालकांनी आपापल्या घरुन अन्न तयार करुन आणून दयावे असे ठरले. इ.स.

१८६५ मध्ये जे.एस.हेग यांच्या संचालकत्वाखाली पश्चिम महाराष्ट्रात शिक्षण देण्यासाठी एक संस्था सुरु झाली. या शाळेतील विद्यार्थ्यांच्या फीच्या खर्चाचा काही भाग मिशन देत असे. पण शिक्षकांचे पगार ख्रिश्चन व्हर्नाक्युलर एज्युकेशन कडून भागविले जात.

या शिक्षणामुळे नगरच्या पारंपारिक शिक्षण पध्दतीत आणि स्वरुपात फार मोठे बदल झाले ते असे.

१. समाजातील सर्व थरांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षणाचे दरवाजे उघडे झाले.

२. एका विशीष्ट वर्गात बंदिस्त झालेले शिक्षण अनेक अंगांनी प्रवाही झाले.

३. जातीजातीतील अभिसरणाला शिक्षणाच्या माध्यमातून अधिक गती मिळू लागली.

४. मौखिक परंपरेचे महत्व कमी व्हायला लागले आणि लिहिण्या वाचण्याला आधिक महत्व येऊ लागले.

५. आधुनिक काळात चांगले जगायचे असेल तर शिक्षण अपरिहार्य आहे. ते समाजधुरीणांच्या लक्षांत आले. त्या दृष्टीने निरनिराळ्या नेत्यांनी शिक्षण संस्था निर्माण केल्या.

६. इंग्रजी पध्दतीच्या शिक्षणाने एक अत्यंत महत्वाची गोष्ट नगरच्या जीवनात घडली. ती म्हणजे इंग्रजी भाषेतून आलेले विचार, विज्ञान आदी विषयावरील ग्रंथ वाचून आपली अस्मिता जागृत झाली. आपली भाषा, आपली जीवनपध्दती, संस्कृती परंपरा आदींचे थोरपण पुन्हा एकदा नव्या निकषांवर तपासून घेण्याची गरज निर्माण झाली. त्यासाठी लागणाऱ्या वस्तुनिष्ठ संशोधनाचे ज्ञान त्यांनी इंग्रजीतून पराकाष्ठेने मिळविले.

"मिशनरी आणि इंग्रजी राजवटीत शाळांतून दिलेले शिक्षण स्वातंत्र्याची, राष्ट्रप्रेमाची अस्मिता उभी करण्यास समर्थ नव्हते. ही बाब ज्यांनी मिशनरी व इंग्रजांनी चालविलेल्या शाळांतून शिक्षण घेतले होते, त्यांच्या लक्षात आली त्यातून अहमदनगर एज्यूकेशन सोसायटी, राष्ट्रीय पाठशाळा, गंगाधरशास्त्री गुणे यांचे आयुर्वेद कॉलेज (१९१७) अमेरिकन मिशन गर्ल्स स्कूल (१९१६) सुतारकाम प्रशिक्षणासाठी उद्योग मंदिर स्थापन झाले. अहमदनगरचा इतिहास लिहिण्याचे काम नानासाहेब मिरीकर यांनी १९३३

मध्ये पुरे केले. १४ जून १९४३ मध्ये ग.ज.चितांबर यांच्या प्रयत्नाने कन्या विद्या मंदिर सुरु करुन मुलींच्या शिक्षणाची सोय करण्यात आली."[21] मुसलमान विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी १९४५ मध्ये 'उर्दू अँग्लो स्कूल'चे हायस्कूल झाले. "सांप्रत ते 'चांद सुलताना' या नावाने ओळखले जाते. नव्या शिक्षणामुळे आणि ज्ञानामुळे नगर परिसरातील नवशिक्षीतांची दृष्टी अनेक अंगांनी व्यापक होऊ लागली आणि त्यातून नव्या सामाजिक, औद्योगिक आणि राजकीय चळवळींना वेग आला. [22] त्यात, जातीभेद निर्मूलन, बालविवाह पध्दती आणि विधवाविवाह पध्दती मोडणे, कुटुंब नियोजन, गृहशिक्षण, व्यवसाय शिक्षण, सर्व जाती धर्मांचे सहजीवन, अंधश्रध्दा निर्मुलन, राष्ट्रीय जागृती, स्वदेशी वस्तू वापरणे आदी संबंधी बाबी होत्या.

"स्वातंत्र्यपूर्व काळातील शैक्षणिक संस्था राष्ट्रप्रेमाने भारलेल्या होत्या. त्यामुळे 'शिक्षण पोट भरण्यासाठी' असा प्रथम उद्देश नव्हता."[23] सर्व राजकीय पक्ष भिन्नभिन्न मतांचे होते, तरी राष्ट्रप्रेमाबद्दल सर्वांचे मतैक्य होते.

शिक्षणाची उद्दिष्टे बदलू लागली. पूर्वी स्वतंत्र्य होण्यासाठी शिक्षण होते नंतर पोट भरण्यासाठी शिक्षण  होऊ लागले आणि इ.स. १९७० नंतर म्हणजे स्वातंत्र्योत्तर ३०-४० वर्षांनी शिक्षणाचा उद्देश केवळ पैसा-संपत्ती मिळविणे असा झालेला दिसतो. अनेक शिक्षण महर्षि आणि तत्कालीन सत्तेच्या पाठिंब्यावर आपली शिक्षणाची रेशनिंग दुकाने ठिकठिकाणी मांडली. कित्येक समाजधुरीणांचा तर हा बिन भांडवली धंदा बनला.

खरे तर पाश्चिमात्य शिक्षण विशिष्ट काळापुरते आपणाला उभे करण्यासाठी काही अंशी फलदायी ठरले. पण इथल्या परिसराशी सांस्कृतिक परंपरांशी धागा राखून समकालीन जीवनासंदर्भात समर्थ बनवू शकत नाही हे आता समजून आले आहे. याचे कारण कोणतेही सामाजिक प्रबोधन - परिवर्तन त्या त्या परिसराशी, सांस्कृतिक परंपरांनी नाट्य जीवन संदर्भाशी केलेली जाणीवपूर्वक तडजोड असते.

महाराष्ट्रातील इंग्रजांची सत्ता दृढमूल होण्यापूर्वी बहुजन समाजांत शिक्षणाची अनास्था होती. त्यावेळी तात्या पंतोजीच्या काही प्राथमिक खाजगी शाळा असत, या

शाळा केवळ धनिकांच्या किंवा राजेरजवाड्यांच्या अनियमित मदतीवरच चालत असल्यामुळे त्या नियमितपणे चालत नसत.

**बदलाला प्रारंभ झाला.**

"नवशिक्षित सुधारकांच्या सहाय्याने व मिशनऱ्यांच्या आग्रहामुळे निषिद्ध रूढी परंपरांना कायद्याने गाडण्याची पाऊले राज्यकर्त्यांना उचलावी लागली. त्यामुळे हिंदी संस्कृती संक्रमणाला आरंभ झाला."[24] हिंदी सुधारणावाद्यांनी पाश्चात्यसंस्कृती परंपराचा भारतीय संस्कृतीच्या चौकटीत बसऊन स्वीकार केला. ज्यावेळी नवीन मूल्यांचा राज्यकार्त्यांकडून अतिरेक झाला त्यावेळी १८५७ साली संघर्षाचा ज्वर निर्माण झाला. हा ज्वर निमल्यानंतर  हिंदी विचारवंताना प्रबोधनाची निकड भासू लागली.

**इंग्रजी राज्यातील शैक्षणिक स्वरुप**

मुसलमानी राज्यकर्त्यापेक्षा युरोपिय राज्यकर्ते आणि ख्रिस्ती मिशनरी अनेक अंगांनी वेगळे होते. एकतर प्रारंभी व्यापाराच्या निमित्ताने ते भारतात आले आणि इ.स. १८१८ मध्ये पेशवाई गेल्यावर त्यांनी आपले राजकीय हेतू साधण्यास सुरवात केली. या सर्व युरोपिय राज्यकर्त्यांनी युरोपातून येताना ख्रिस्तिधर्मश्रध्दा जशी आपणाबरोबर आणली होती, तशी नवी विद्या, तंत्रज्ञान, चालीरीती बरोबर आणल्या होत्या. अद्यावत बंदुका, युध्द साहित्याने आपण इथे राज्य स्थापू शकू, अशी त्यांना उमेद होती. त्यांच्या नवीन ज्ञानाने आणि विज्ञानाने आपल्याकडील लोक आश्चर्यचकित झाले आणि त्यांचे अनुकरण करण्यात धन्यता मानू लागले, असे प्रारंभीचे चित्र दिसते. या मागचे रहस्य जेव्हा आपण शोधतो, तेव्हा आपल्या लक्षात येते, की नव्या जगाच्या संदर्भात जर ताठपणे उभे राहायचे असेल तर, तर नव्या ज्ञानाला आणि विज्ञानाला सामोरे जावे लागते. आता जगण्याचे हेतू बदलले. जगण्यासाठी उपयुक्त पडेल असे शिक्षण घेणे आवश्यक ठरु लागले. साक्षरतेला, लिहिण्या वाचण्याला महत्व प्राप्त होऊ लागले. नव्या राजवटीबरोबर छापण्याची कला आली. नियतकालिके आली. वर्तमानपत्रे वाढू लागली. जीवनाला एक वेगळाच वेग येऊ लागला आणि बदलत्या परिस्थितीत

ब्राम्हणादि - ज्या वर्गाला लिहिण्या वाचण्याचे संस्कार होते तो वर्ग नव्या परिस्थितीला तोंड देण्यास कसाबसा धजावला.

इ.स. १८१८ साली इंग्रजी राजवट सुरु झाल्यावर त्यावेळचे गव्हर्नर माऊटं स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांनी शिक्षणासंबंधी चौकशी केली, त्या चौकशीत देशांत चोहोकडे शिक्षणासंबंधी अनास्था असल्याचे त्यांना आढळून आले. त्यांनी जगन्नाथ शंकरशेठ वगैरे एतद्देशीयांच्या मदतीने सन १८२२ साली 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली. सर्व जातीत शिक्षण प्रसार करुन पाश्चात्य देशांच्या योग्यतेस हिंदुस्थानास पोहोचविणे हे त्या सोसायटीचे ध्येय होते. या सोसायटीच्या नियंत्रणाखाली महाराष्ट्रात मोठमोठ्या गावी शाळा सुरु झाल्या.

अहमदनगरात पहिली शाळा सन १८२८ च्या ऑगस्ट ६ तारखेस स्थापन झाली. आरंभी ही शाळा खाजगी तात्या पंतोजीच्या चालकत्वाखाली होती. त्यावेळी बाळशास्त्री नावाचे पंतोजी होते. तारीख १८ जून १८३३ रोजी ही शाळा एज्युकेशन बोर्डाच्या नियंत्रणाखाली आली. तीच आजची नगरपालिकेची शाळा क्रमांक एक ही होय.

त्याचवेळी अहमदनगर शहरात तात्या पंतोजीच्या काही शाळांखेरीज सन १८३१ डिसेंबर मध्ये रे. मेसर्स ग्रेव्हज रीड आणि हवे इत्यादी प्रभूतींनी मिशनरीतर्फे लोकांस शिक्षण देण्याचे काम सुरु केले होते.

नंतर सन १८४० साली अहमदनगर शहरामध्ये नवीनच एक मुलींची शाळा सुरु झाली. याचवेळी शहरामध्ये काही खाजगी शाळा सुरु होत्या. त्यांतून मराठी लेखन, वाचन, अक्षर व व्यापारी जमाखर्च शिकवीत असत. या शाळा मुलांनी दिलेल्या फी वर चालत असत.

### सरकारने केलेले शहरातील शैक्षणिक परिवर्तन

"ज्यावेळी सन १८५४ मध्ये अहमदनगर शहरात नगरपालिकेची ची स्थापना झाली त्यावेळेसपासून शिक्षण क्षेत्रात बरीच झपाट्याने क्रांती होत गेली. सन १८८५ मध्ये 'डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनची' मुंबई प्रांतात स्थापना झाली. त्यामुळे शिक्षणाचा

प्रश्न अधिकच तन्मयतेने हाताळला गेला."[25] सन १८६३ साली 'एज्युकेशन सेस' लागू केला आणि शिक्षणावर होणाऱ्या खर्चाची तरतूद करण्यात आली. अर्थातच शिक्षण प्रसार झपाट्याने होऊ लागला.

शहरातील नागरिकांच्या मुलांना सोईचे व्हावे व मुलांना शिक्षणाची आवड उत्पन्न व्हावी, म्हणून शहरातील माळीवाडा विभागात व आनंदीबाजार विभागात अनुक्रमे शाळा क्रमांक २ व शाळा क्रमांक ३ या शाळा १८६५ साली सुरु करण्यात आल्या.

अहमदनगर शहर पूर्वी निजामशहाची राजधानी असल्यामुळे मुसलमानांची वस्ती बरीच होती. तेव्हा त्यांच्या मुलांचीही शिक्षणाची सोय व्हावी, म्हणून सन १८६७ मध्ये एक उर्दू मुलांची शाळा सुरु करण्यात आली.

तसेच त्यावेळच्या अस्पृश्य म्हणविल्या जाणाऱ्या मुलांकरिता सन १८८० साली एक स्वतंत्र शाळा सुरु झाली, यामुळे अस्पृश्यांच्या मुलांची देखील शिक्षणासंबंधी होत असलेली कुचंबणा दूर झाली.

**स्कूल कमेटीची स्थापना**

ता. १ एप्रिल १९८५ रोजी स्कूल कमिटीची स्थापना झाली व शिक्षण देण्याचे बाबतीत काही अधिकार लोकप्रतिनिधींकडे आले. शिक्षणक्रम व परीक्षा वगैरे बाबींचे अधिकार शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांकडे होते, परंतु शाळांच्या बाबतीतील सोईगैरसोयी व देखरेख स्कूल कमेटी व तिचे चेअरमन पहात असत.

स्कूल कमिटी स्थापन झाल्यावर नगर शहरात सन १८८८ साली स्कूल कमिटीच्या एकूण १० शाळा होत्या, त्यांतून १२७१ विद्यार्थी शिक्षण घेत होते. नगरपालिकेची शाळा क्रमांक ४ ही स्वतंत्र हरिजनांकरिता (त्यावेळच्या अस्पृश्यांकरिता) असून त्या शाळेत १३९ विद्यार्थी शिकत होते. त्याचवेळी नगरपालिकेची शाळा क्रमांक ५ ह्या उर्दू शाळेत १८६ विद्यार्थी शिकत होते. मुलींकरिता दोन शाळा स्वतंत्र असून त्यातून १३२ मुली शिकत होत्या. हिंदुस्थानीकरिता एक स्वतंत्र शाळा होती. तीत ५७ मुले शिकत होती.

या वेळी बौध्दिक शिक्षणावरच अधिक भर दिला जात असून प्रामुख्याने त्यात हिशेब, लेखन व वाचन हे विषय प्रमुख गणले जात असत, अर्थातच पाठांतरावर जास्त भर दिला जात असे. त्यावेळी क्रमिक पुस्तकातून असणाऱ्या कविता आजही वृध्दजन मुखोद्गत म्हणताना दिसून येतात. त्याचप्रमाणे उजळणी, औटकी, आकरकी, एकोत्री, आणे, टाक इत्यादी तोंडपाठ करुन घेण्याकडे अधिक कल असे.

**साथीचा कहर आणि त्याचा शिक्षणावर दुष्परिणाम**

"अहमदनगर शहरात प्लेगचे साथीने कहर केला. पहिला प्लेग सन १८९७ साली, दुसरा सन १८९९ नंतर १९०४ व १९१२-१९१३ ची साथ फार लहान होती."[26] पहिल्या तीन प्लेगात मृत्यूसंख्येपेक्षा भीतीचे वातावरण जास्त होते. त्यावेळी पुष्कळशा नागरिकांनी स्थलांतर केल्यामुळे शाळेतील मुलांच्या संख्येवर व हजेरीवर अनिष्ट परिणाम झाला. त्यामुळे काही शाळा बंद केल्या होत्या.

१ जानेवारी १९०१ रोजी बादशाह सातवे एडवर्ड यांचा राज्याभिषेक समारंभ झाला. त्यावेळी नगर स्कूल कमिटीने २३३१ रुपये जमवून गरिबांना जेवण व मुलांना खाऊ वाटला तसेच शोभेची दारु उडविण्यात येऊन तो दिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. स्वकूळसाळी समाजाच्या उन्नतीकरिता सन १९०३-१९०४ साली रा.ब. मारुतराव भुजगराव सासवडकर यांनी ५००० रुपयांची देणगी नगरपालिकेकडे दिली. त्या रकमेच्या व्याजातून या साळी समाजाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देण्यात याव्यात, असा करार करण्यात आला होता. त्याप्रमाणे जिल्हा डेप्यूटी इन्स्पेक्टर नगर यांचे नियंत्रणाखाली स्वतंत्ररीतीने त्या समजातील मुलांच्या दरवर्षी परीक्षा घेऊन त्यांना शिष्यवृत्त्या देण्यात येऊ लागल्या. १९०१ पासून कॉटन मार्केटमधील व्यापाऱ्यांच्या मुलांकरिता एक स्वतंत्र शाळा- ज्यात लिहिणे, वाचणे व हिशेब शिकविण्यासाठी काढण्यात आली. त्या शाळेस नगरपालिकेकडून दरवर्षी २५० रुपये अनुदान देण्यात येत असे. सन १९२१-२२ मध्ये ही शाळा ख्रिस्तगल्लीमध्ये चालू होती. सन १९१४ ते

१९१८ पर्यंत पहिले महायुध्द झाले, महर्गता पुष्कळ वाढल्यामुळे शिक्षकांस युध्द भत्ता देण्यात येऊ लागला.

सन १९१६ साली प्लेग व १९१८ साली एन्फ्लूएन्झा या दोन्ही रोगांच्या साथी एका मागून एक आल्याने त्या मुदतीत मुलाची संख्या शाळांतून बरीच घटली होती. सन १९२१ साली नगर शहरातील नगरपालिकेच्या शाळापासून शिक्षण घेणाऱ्या मुलांचे लोकसंख्येशी प्रमाण शेकडा ७.६ असे होते. सन १८८५ मध्ये स्कूल कमिटी स्थापन झाल्यापासून सन १९२५ सालापर्यंत स्कूलबोर्ड अस्तित्वात येण्याच्या आधी शाळांची संख्या १६ होती. त्यातून २१६० मुलगे व ७७९ मुली शिक्षण घेत होत्या. शिक्षणाचा व्याप वाढल्यामुळे सर्व शाळांवर देखरेख करण्याकरिता स्कूल कमेटीने 'सुपरिटेडेंट'ची एक नवीन जागा निर्माण केली, व त्या जागेवर ता. १ एप्रिल १९२२ रोजी द. रा. वाडेकर यांना नेमण्यात आले.

**स्कूलबोर्डाची स्थापना**

सन १९२३ सालच्या शिक्षण कायद्याप्रमाने प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था स्कूलबोर्डाकडे आली. नवीन घटनेप्रमाणे स्कूलबोर्ड सभासदांची संख्या १.१ ठरली, त्यापैकी दोन सरकार नियुक्त, पाच विशिष्ट जागेकरीता, एक शिक्षणतज्ज्ञ, एक स्त्रियांतर्फे, एस मुसलमान, दोन मागासलेल्या वर्गाचे आणि चार नगरपालिकेचे सभासद होते. या कायद्याप्रमाणे लोकल सभासद स्कूलबोर्ड यांना स्वतंत्र अधिकार देण्यात आले.

**अहमदनगरमधील शैक्षणिक प्रगती**

पूर्वी शिक्षणाचा प्रसार एका विशिष्ट वर्गातून होत असे किंवा ज्यांची शिक्षण घेण्याची इच्छा असेल अशांनाच शिक्षण मिळत असे. तसेच बौध्दिक शिक्षणावरच विशेष भर दिला जात असे, "या बौध्दिक शिक्षणाचा व्यवहारात व जीवनात जास्त उपयोग व्हावा म्हणून त्यास औद्योगिक शिक्षणाची जोड देण्यात आली."[27] तसेच इतिहास, भूगोल, विज्ञान यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमात करण्यात आला. स्कूलबोर्डाची स्थापना होताच स्कूलबोर्डाचे पहिले चेअरमन म्हणून माणिकचंद किसनदास मुथा, हे

निवडून आले. मुलांना बौध्दिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण मिळावे म्हणून लाकूडकाम, विणकाम, सूतकाम, कागदकाम ह्या शिक्षणाचे वर्ग सुरु करण्यात आले. हे वर्ग इतके कार्यक्षमतेने चालले होते की, महात्मा गांधी नगर येथे आले असता त्यांनी या वर्गांना भेट देऊन आपले समाधान व्यक्त केले. प्राथमिक शिक्षणातून इयत्ता चौथी पास झाल्यावर ज्यांना दुय्यम शिक्षण घेण्याची इच्छा व ऐपत आहे. अशी मुले इंग्रजी शाळेत पुढील शिक्षणाकरिता जात असत. तथापि मध्यम वर्गालासुध्दा इंग्रजी शिक्षण घेणे सोयीचे जावे, म्हणून सन १९२६-२७ मध्ये ज्या प्राथमिक शाळेत इयत्ता ५-६-७ चे वर्ग होते, अशा बारा शाळेत इंग्रजी विषयाची शिकवणी काढून इंग्रजी शिक्षणाची सोय करण्यात आली. या शिकवणीमुळे २१२ मुले इंग्रजी शिक्षण घेत होती. पुढे हे शिकवणी वजा क्लास बंद करण्यात आले.

**सक्तीचे शिक्षण**

"सन १९२५-२६ साली स्कूलबोर्डाने नगर येथे सक्तीचे शिक्षण सुरु व्हावे म्हणून प्रयत्नास सुरुवात केली व त्याप्रमाणे सन १९२५-२६ साली नगरपालिकेतील शिक्षकांकडून ६ ते ११ वयाच्या मुला-मलींची शिरगणती करण्यात आली. सरकारकडून मंजूरी मिळताच तारीख १ जून १९२७ पासून सक्तीचे शिक्षणाचा कायदा नगर शहरास लागू करण्यात आला."[28] या प्रमाणे सर्व मुंबई प्रांतात प्रथम अहमदनगरच्या नगरपालिकेने मुलांसाठी सक्तीचे शिक्षण सुरु केले. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे सन १९२७ मध्ये ६ ते ११ वयाचे ४५० मुले शाळेत जादा दाखल झाले.

**विद्यार्थ्यांच्या उन्नतीकरिता नगरपालिकेने केलेले प्रयत्न**

मुलांच्या अभ्यासाच्या बाबतीत चढाओढ उत्पन्न व्हावी, म्हणून इ. ४ थी पासून पुढील इयत्तावर दर महिन्यास वर्गांत पहिला व दुसरा नंबर येणाऱ्या मुलांना शिष्यवृत्ती देण्यात येई.

मुलांचे वाचन व सामान्यज्ञान वाढावे, म्हणून त्यांच्या मगदुराप्रमाणे इयत्तावर अवांतर वाचनाची पुस्तके निवडून बालवाचनालये काढली होती. वेळापत्रकांत त्याबद्दल

आठवड्यातून एक तास ठेवून मुलांनी कोणते पुस्तक वाचले याबद्दल नोंद ठेवली जाई. मुले वाचतांना अर्थाकडे लक्ष देत नाहीत व नुसतेच वाचन वाचतात त्या करिता वाचन समजून उमजून वाचले म्हणून म्हणून काही मजकुराचे छापील परिच्छेद मुलांना वाचण्याकरता पुरविले जात, व त्यामध्ये परिच्छेदातील मजकुरावर काही प्रश्न दिलेले असत. तसेच परिच्छेदातील मजकुराचे मानाने नियमित वेळ वाचण्यास दिला जात असे व प्रश्नांची उत्तरे विचारली जात असत. त्यामुळे मुलांना समजून वाचण्याची सवय लागली व त्याचा परिणाम म्हणजे भाषा, इतिहास भूगोल वगैरे विषय सुधारण्याकडे झाला.

**मिडलस्कूल व हायस्कूल शिष्यवृत्ती परीक्षा**

शाळेचे नवीन वर्ग सुरु होताच इ.४ मधील विद्यार्थ्यांची बौध्दिक चाचणी घेऊन वर्गातून निवडक मुले काढून अनुभवी शिक्षकाच्या मार्गदर्शनाखाली वर्ग चालविले जात असत. त्यामुळे सरकारी शिष्यवृत्ती परीक्षेत नगरपालिकेच्या शाळेतील बरेच विद्यार्थी यशस्वी होत असत.

सन १९३०-३१ मध्ये जिल्ह्यातील १८ शिष्यवृत्तीपैकी ९ मुलांना शिष्यवृत्ती व १९३५-३६ मध्ये १८ पैकी १३ मुलांना शिष्यवृत्ती मिळविल्या. याप्रमाणे दरवर्षी शे. ५० चे वर नगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या मिळाल्या आहेत. त्याचप्रमाणे हायस्कूल शिष्यवृत्तीचा निकालदेखील असाच समाधानकारक लागत असे.

**परिक्षा पध्दती**

पूर्वी अहमदनगर जिल्हा शिक्षण इन्स्पेक्टर (विस्तार अधिकारी) हे वार्षिक परीक्षा घेत असत, त्यावेळी अंकगणित व शुध्दलेखन या विषयावर जास्त भर दिला जात असे. त्यानंतर एका शाळेचे मुख्याध्यापक दुसऱ्या शाळेत जाऊन त्या मुख्याध्यापकांच्या नियंत्रणाखाली परीक्षा घेत असे, त्यानंतर म. गो. मोडक त्यावेळचे प्रशासकीय अधिकारी होते. यांनी परीक्षा पध्दतीत आमूलाग्र बदल केला.

या पध्दतीत शक्य तितकी गुप्तता राखण्यात येत असे. मुलांस प्रश्नपत्रिकेवर फक्त विषय व अनुक्रमांक घालावा लागे, त्यामुळे उत्तरपत्रिका तपासणारालासुध्दा शाळा कोणती व मुलगा कोण हे कळत नसे. सामान्य मुलांससुध्दा निदान दोनतीन प्रश्न सोडविता यावेत अशी दृष्टी प्रश्न काढतांना असे. ‘‘परीक्षेचे निकाल योग्य तऱ्हेने लावले आहेत किंवा नाहीत हे अत्यंत कसोटीने पाहून लायक मुलांना वर जाता येईल अशी व्यवस्था केली होती.’’[29]

**शाळेतील प्रदर्शने**

शाळेतून वेळोवेळी जे उत्सव व समारंभ होतात, त्यावेळी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली समाजोपयोगी व राष्ट्रोपयोगी, अधिक धान्य पिकवा, समाज-शिक्षण, दारुबंदी, सुधारलेल्या शेतीबाबतची प्रात्यक्षिके, नकाशे, तक्ते इत्यादी साहित्य मुलांकडून करवून घेऊन प्रदर्शने भरविली जात.

**हस्तलिखितांचे वार्षिक अंक**

विद्यार्थ्यांच्या भाषाज्ञानांत भर पडावी, स्वतंत्र विचार करण्याची व ते विचार प्रकट करण्याची सवय लागावी, तसेच निरनिराळ्या विषयांची संगतवार मांडणी त्यांना करता यावी, आणि कलात्मक आवड उत्पन्न व्हावी, म्हणून विविध सदरे घालून वरचे वर्ग असलेल्या शाळांतून नियमितपणे प्रतिवर्षी हस्तलिखितांचे अंक काढण्यात येत.

**सहली**

खालच्या वर्गांच्या अभ्यासक्रमानुसार, ऋतुमानाप्रमाणे व मुलांच्या वयोमानानुरुप निरनिराळ्या ठिकाणी सहली काढण्यात येतात. त्यांत ऐतिहासिक ठिकाणे, निसर्गाचे देखावे, औद्योगिक कारखाने, पिके इत्यादी गोष्टीकडे विशेष लक्ष पुरविले जात असे.

**वादविवाद मंडळ**

मुलांमध्ये भावी राष्ट्राचे नेते निर्माण करण्याच्या हेतूने व विशेषत: त्यांना आपले विचार आपल्या भाषेतून मांडता यावेत व सभाधीटपणा यावा, यासाठी त्यांना निरनिराळे विषय देऊन विद्यार्थ्यांच्या सभा नियमितपणे घेतल्या जात. त्यामुळे विद्यार्थ्यांस सभेत

बोलण्याची सवय लागून शाळेतील उत्सव समारंभातून ते चांगल्या तऱ्हेने विषय प्रतिपादन करु शकत. शाळेच्या उत्सवात ते स्वत:च्या जबाबदारीने व शिक्षकांच्या सहाय्याने मोठ्या उत्साहाने पार पाडत.

**प्रौढ साक्षरता प्रसार**

सन १९४० साली सुशीलाबाई सप्तर्षि या स्कूल बोर्ड चेअरमन असताना त्यांना प्रौढाच्या साक्षरता प्रसाराकडे आस्थापूर्वक लक्ष दिले. पुरुषांकरिता व स्त्रियांकरीता वर्ग काढले. हे वर्ग प्राथमिक शिक्षक चालवीत असत.

**हरिजन शिक्षण**

"स्कूलबोर्ड स्थापन होण्यापूर्वी म्हणजे सन १९२५ च्या पूर्वी हरिजनांकरीता निराळ्या शाळा असत, परंतु पुढे सर्व मुलांचे शिक्षण, जातीभेद न मानता एकत्र देण्यात येऊ लागले."[30] सन १९२६-२७ मध्ये मागासलेल्या वर्गाच्या शिकत असलेल्या मुलांची संख्या १२६ होती. राष्ट्रीय चळवळीची जोर वाढू लागल्यानंतर महात्मा गांधींच्या तत्वानुसार अस्पृश्योध्दाराची चळवळ जोर धरु लागली. तेव्हा सर्व जातीधर्माच्या मुलांना एकत्र शिक्षण देण्याची पध्दत सुरु झाली.

**बालवीर चळवळ**

बौध्दिक शिक्षणाशिवाय शिस्त, नीतिमत्ता आणि परस्परांस सहाय्य करणे या गुणांची वाढ व्हावी, म्हणून शाळांतून बालवीर चळवळीकडे विशेष लक्ष पुरविले गेले. सन १९२५-१९२६ साली सहा मुले व शिक्षक सातारा येथे शिबीरासाठी पाठविले होते. सन १९२५-१९२६मध्ये मिरी येथे रॅली भरविली होती. १५ शिक्षकांना स्कॉउटचे शिक्षण देण्यात आले. सन १९२७-१९२८ साली ४ शिक्षक व आठ मुले मुंबई येथे भरलेल्या स्कॉउट जाबोरीस गेली होती. सन १९३५-१९३६ साली डी. पी. जोशी, यांनी शिक्षणाकरिता शिशुवीर शिक्षणाचा वर्ग काढला होता. त्यात २४ शिक्षक शिकून तयार झाले. त्यानंतर ११ शिशुवीर पथके व ३ वीरबाला पथके सुरु करण्यात आली.

सन १९३६-३७ साली मुलांच्या शाळांतून २ बालवीर, १२ शिशुवीर व मुलींच्या शाळातून ६ वीरबाला पथके होती. स्त्री शिक्षिकाकरीता मिसेस राइट व मिसेस डेविस यांनी उद्‌बोधन वर्ग काढला होता. बदलत्या काळानुसार झालेली शैक्षणिक प्रगती शिक्षकांना अंगिकारता यावी म्हणून अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची सुरुवात झाली.

**शारीरिक शिक्षण व क्रीडांगणे**

स्कूलबोर्ड स्थापनेपूर्वी शारीरिक शिक्षण देण्याकरीता दोन शिक्षक होते. त्यापैकी १ शिक्षक सर्व शाळांतून फक्त कवायत घेत असे व दुसरे शिक्षक तालीम घेत असत. १९२५-१९२६ साली मुलांची संख्या वाढल्यामुळे जम्मादादा व्यायामशाळा बडोदे येथील अभ्यासक्रमाचे शिक्षण घेतलेले त्रि. गो. देशपांडे यांची नेमणूक करण्यात आली. त्यांच्या देखरेखीखाली २० शिक्षकांना शारीरिक शिक्षणाचा कोर्स देण्यात आला. शारीरिक शिक्षणांत एकसूत्रीपणा यावा म्हणून शारीरिक शिक्षणाचा शिक्षणक्रम आखण्यात आला व शाळांतून डील व खेळ सक्तीचे करण्यात आले. खेळांच्या आंतरशालेय स्पर्धा सुरु करण्यात येऊन विजयी संघास पारितोषिके देण्याची पध्दती सुरु झाली. लाठी, लेझिम, डंबेल्स वगैरे खेळांचे साहित्य शाळांना पुरविले गेले, त्यांचा शाळांतून भरपूर उपयोग होऊ लागला.

**दुबार पध्दती**

दिवसानुदिवस मुलांची संख्या वाढत असल्यामुळे शाळागृहांच्या इमारती अपुऱ्या पडू लागल्या. शिवाय शिक्षणाचा खर्च भरमसाठ वाढल्यामुळे असलेल्या शिक्षकांत व असलेल्या जागेत शिक्षणाची योजना करणे सरकारास भाग पडले, यास्तव शिफ्ट (दुबार) पध्दतीचा अवलंब करावा लागला, म्हणून सन १९३८-३९ साली दुबार पध्दतीचे १४ वर्ग चालवावे लागले.

## शाळागृहे

"सन १९२२-२३ साली कै. बाळासाहेब देशपांडे यांनी आपल्या पत्नीचे स्मरणार्थ मैदानाच्या आडाजवळ शाळेकरीता एक इमारत देणगी म्हणून दिली, तीच इमारत मैनाबाई गर्लस्कूल होय."[31]

दिनांक २० ऑक्टोबर २६  रोजी लेडी कावसजी जहांगीर यांचे हस्ते शाळा क्रमांक १ च्या इमारतीचा पायाभरणी समारंभ झाला. शाळेच्या सोईच्या ११ खोल्यांची दुमजली दगडी इमारत पूर्ण होऊन त्या इमारतीत जुलै १९२९ पासून शाळा नं. १ भरु लागली. नगरपालिकेच्या मालकीची नगर शहरातील ही पहिलीच इमारत होय.

सन १९३४-३५ मध्ये शाळा क्रमांक ५ ची सिटी पोलिसलाईन समोरील इमारत विकत घेतली. शाळा नंबर १ ची जुनी इमारत शैक्षणिक दृष्ट्या ऐतिहासिक महत्वाची असल्यामुळे ती जैन पंचाकडून विकत घेण्यात आली. तेथे शाळा क्रमांक १४ व शाळा क्रमांक २५ चे वर्ग भरत. सिटी पोलिसलाईनमागे पूर्वी ज्या इमारतीत लोकलबोर्डचे कार्यालय होते, त्या ठिकाणी सन १९२८ पासून नगरपालिकेची शाळा क्रमांक २ भरु लागली. ही इमारत नगरपालिकेच्या मालकीची असून या ठिकाणी शाळा नंबर २ व २६ या शाळा भरत.

नगरपालिकेच्या मुला-मुलींच्या मिळून २९ शाळा होत्या. त्यापैकी नगरपालिकेच्या मालकीच्या आठ इमारतीत व बाकींच्या सर्व भाड्याच्या इमारती होत्या.

## शिक्षक

स्कूल कमेटीच्या वेळी सन १८८८ मध्ये शिक्षकांची संख्या ४० होती व मुलांची संख्या ३२७१ होती. पुढे १९०१-१९०२ मध्ये शिक्षकांची संख्या ५३ झाली. त्यांत प्रशिक्षित १९ व अप्रशिक्षित ३४ शिक्षक होते व मुलांची संख्या १७१३ होती. स्कूलबोर्ड स्थापनेच्या पूर्वी सन १९२३-२४ मध्ये शिक्षकांची संख्या ९७ झाली. त्यात १३ तृतीय वर्ष १९ द्वितीय वर्ष २२ प्रथम वर्ष व ४३ अप्रशिक्षित याप्रमाणे शिक्षकांची वर्गवारी होती व मुलांची संख्या ३३५२ होती.

शिक्षकांमध्ये शिक्षणाविषयी कार्यक्षमता निर्माण व्हावी म्हणून प्रशिक्षण घेण्याकरिता सरकारकडून शिष्यवृत्ती मिळत असे, परंतु केवळ शिष्यवृत्ती घेऊन प्रशिक्षण घेणे शिक्षकांस कठीण जाऊ लागले, म्हणून १९३९ सालापासून सरकारने ४० वर्षांचे आतील सर्व अप्रशिक्षित  शिक्षकांस प्रशिक्षित करण्याचे धोरण ठेवून ड्युटी पे देण्यास सुरुवात केली. त्याप्रमाणे नगरपालिकेतील बरेच शिक्षक प्रशिक्षित झालेले आढळून येतात.

पसंत मुलां-मुलींच्या पाच शाळांतून एकंदर ३५८ मुलगे व ३९९ मुली शिक्षण घेत. म्हणजे एकंदर पालिकेच्या नियंत्रणाखाली ५९४३ मुलगे ४०१० मुली एकूण १९५३ मुले प्राथमिक शाळांतून शिक्षण घेत.

**अहमदनगर नगरपालिकेच्या मुला-मुलींच्या शाळेचा तक्ता**

| शाळा क्रमांक | स्थापना | स्थळ | शेरा |
|---|---|---|---|
| मराठी मुलांची शाळा नंबर १ | १३-६-१८३३ | गांधी मैदान | - |
| मराठी मुलांची शाळा नंबर २ | १-८-१८६५ | माळीवाडा | - |
| मराठी मुलांची शाळा नंबर ३ | २४-५-१८६५ | आनंदीबाजार | - |
| मराठी मुलांची शाळा नंबर ४ | २-८-१८८० | करशेटजी स्ट्रीट | ही पूर्वी त्या वेळीची अस्पृश्यांची शाळा होती ८-१६ विलीन. |
| उर्दू मुलांची शाळा नंबर ५ | ३०-९-१८६७ | बुरुडगल्ली | शाळा नंबर ३२ विलीन |
| मराठी मुलांची शाळा नंबर ६ | १-८- | काटेगल्ली | २८-८-१८६८ मुलींची |

| | | | |
|---|---|---|---|
| | १८५२ | | शाळा होती नंतर ३७ हा नंबर दिला. |
| मराठी मुलींची शाळा नंबर ७ | १-१०-१८७२ | तापकीरगल्ली | - |
| मराठी मुलींची शाळा नंबर ८ | १-७-१८४९ | तापकीरगल्ली | शाळा नंबर ३४ ला हा नंबर दिला. |
| मराठी मुलींची शाळा नंबर ९ | १-६-१८८१ | माळीवाडा | |
| मराठी मुलांची शाळा नंबर १० | १-९-१८९६ | कापडबाजार | |
| मराठी मुलींची शाळा नंबर ११ | १९०४ | चौपाटी कारंजा | |
| मराठी मुलांची शाळा नंबर १२ | २१-४-१९०४ | सारडा गल्ली | शाळा नं. ३५ विलीन |
| उर्दू मुलांची शाळा नंबर १३ | | तेलीखुंट | शाळा नं. ३६ विलीन |
| मराठी मुलींची शाळा नंबर १४ | १-३-१९२४ | गांधी मैदान | शाळा नं. ६, २९, ३३ विलीन |
| मराठी मुलांची शाळा नंबर १५ | १-४-१९५० | कॉटन मार्केट रोड | पूर्वी शाळा नं. ३८ हा नं. होता पूर्वीची शाळा नं. ३० |
| मराठी मुलींची शाळा नंबर १६ | १-२-१९४८ | माळीवाडा | पूर्वीची शाळा नं. ३० |
| मराठी मुलांची शाळा नंबर १७ | ७-७-१९३४ | तोफखाना | |

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी मुलींची शाळा नंबर १८ | २-१०-१९२५ | माळीवाडा | |
| मराठी मुलांची शाळा नंबर १९ | १८-३-१९२६ | पोलिस हेडक्वार्टर | |
| मराठी मुलांची शाळा नंबर २० | १-८-१९३० | नगर स्टेशन | |
| उर्दू मुलींची शाळा नंबर २१ | | तेलीखुंट | |
| उर्दू मुलींची शाळा नंबर २२ | ३-८-१९३५ | कलेक्टर कचेरीजवळ | |
| गुजराथी मुलांची शा.नं. २३ | २०-६-१९३५ | कापडबाजार | |
| तेलगू मुलांची शाळा नंबर २४ | २७-६-१९४० | गांधी मैदान | |
| मराठी मुलांची शाळा नंबर २५ | १-२-१९४८ | गांधी मैदान | |
| मराठी मुलांची शाळा नंबर २६ | १-२-१९४८ | माळीवाडा | |
| मराठी मुलांची शाळा नंबर २७ | १-२-१९४८ | आनंदीबाजार | |
| मराठी मुलींची शाळा नंबर २८ | १-२-१९४८ | चौपाटी कारंजा | |
| सिंधी मुलांची शाळा नंबर २९ | १९-६-१९५० | हेल्थकँप | |

अशा प्रकारे नगरमध्ये शैक्षणिक प्रगती होऊ लागली होती."[32]

## शहरातील इतर शिक्षण संस्था

### अमेरिकन मिशन मुलींचे हायस्कूल १८३८

"मिशनरींनी सन १८३८ साली मुलींच्याकरता स्वतंत्र हायस्कूल स्थापन केले. या हायस्कूलांत जरी प्रामुख्याने हिंदी ख्रिस्ती समाजातील मुली असल्या तरी शिक्षण प्रचारामुळे व मिशनऱ्यांच्या वाढत्या उदार धोरणामुळे हिंदु कुटुंबांतीलही मुली या हायस्कूलांत शिक्षणासाठी पाठविण्याची प्रथा वाढतच चालली."[33] कारण सन १८९२-९३ साली या हायस्कूलच्या मुख्याध्यापिका असलेल्या मिस एमिलीबाई बिस्ले व ब्रूसबाई या शिक्षणतज्ज्ञ, कडक शिस्तीच्या व उदार धोरणाच्या या संस्थेस लाभल्या होत्या. मिस ब्रूसबाईंनी या संस्थेची ३५ वर्षे सेवा करुन ती मोठ्या नावलौकिकास चढविली.

### अहमदनगर एज्युकशेन सोसायटीचे हायस्कूल १८४८

अहमदनगर येथे सन १८४८ साली प्रथम सरकारी इंग्रजी शाळा स्थापन झाली व पुढे सन १८६६ साली हायस्कूल स्थापन करण्यात आले. सरकारने जुनी इमारत सन १८७७ मध्ये बांधली. पुढे सरकारने ज्या ठिकाणी खाजगी एज्युकेशन सोसायटीज् स्थापन झाल्या असतील, त्या खाजगी संस्थेकडे सरकारी हायस्कूले चालविण्यास देण्याचे धोरण आखले. त्याची अंमलबजावणी प्रथम मुंबई सरकारने नगर शहरात करण्याचे ठरविले होते. या धोरणानुसार येथील अमेरिकन मिशन हे सरकारी हायस्कूल आपणाकडेच मिळण्याबद्दल खटपट चालविली होती. परंतु त्यावेळी महादेव गोविंद रानडे, हे नगर जिल्ह्यातच सरकारी नोकरीनिमित्त येत असल्यामुळे त्यांच्याच प्रोत्साहाने व सल्ल्याने इसवी सन १८८६ साली अहमदनगर एज्युकेशन सोसायटीची स्थापना होऊन या सोसायटीकडे हे हायस्कूल चालविण्यास मिळावे अशी सरकारकडे खटपट आरंभिली. वरील प्रयत्नास यश येऊन इसवी सन १८८९ साली वरील हायस्कूल या संस्थेच्या ताब्यात दिले.

**अमेरिकन मिशनची हायस्कूले १८८२**

"अमेरिकन मिशन हायस्कूल ही संस्था जेम्स स्मिथ यांनी सन १८८२ सालामध्ये स्थापन केली. या संस्थेस अहमदनगर शहरांतील मध्यवर्ती जागा कवीजंग महालापैकी मिळालेली असल्यामुळे या शाळेची उत्तरोत्तर भरभराटच होत गेली. प्रथम या शाळेस जरी थोडे विद्यार्थी मिळाले तरी रे. स्मिथसारखा व्यवस्थित व टापटिपीचा असा शिक्षणतज्ज्ञ मुख्याध्यापक लाभल्याने शहरातील या मध्यवर्ती शाळेत विद्यार्थी आकर्षिले गेले."[34] स्मिथ हे केवळ बौध्दिक शिक्षणाचे भोक्ते नव्हते तर त्यांनी आपल्या शाळेस सुतारकाम, चित्रकला, हातमागावरील कापड विणणे, गालीचे तयार करणे वगैरे औद्योगिक व्यवसायांचीही जोड दिलेली होती. १८९७ साली त्यांनी नगरला 'अहमदनगर कॉलेज' या नावाचे आर्टस् कॉलेज स्थापन केले. या कॉलेजच्या उद्घाटन समारंभाचे समयी ड्यूक ऑफ कनॉट व मुंबईच्या विल्सन कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. मॅकलिन हे उपस्थित होते. पुढे हे महाविद्यालय बंद पडले. डॉ. पांडुरंग हिवाळे यांनी सन १९४७ साली अहमदनगर महाविद्यालयाची स्थापना केली.

**अमेरिकन मिशन मुलांची हायस्कूल**

मिशन हायस्कूलचे प्रिन्सिपॉल एस्. आर. पंडित, एम.ए.बी.टी. हे या शाळेचे जुने नामवंत प्रिन्सिपॉल स्मिथ, बर्ड, मॅकबाईड वगैरे मुख्याध्यापकांप्रमाणेच हे आपले काम त्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालवीत. या शाळेचे ब्रीद वाक्य "नॉट थींग्ज बट मेन" हे असून या धोरणानुसार शिक्षण दिले जात असे.

**गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कूल १९२०**

"अहमदनगर जनतेच्या विनंतीवरुन सरकारने नगरला मुलींची इंग्रजी शाळा काढण्याचे १९२० साली ठरविले. पुणे येथील हुजूरपागेतील शिक्षिका श्रीमती वेणुबाई मोडक यांच्याकडे नगरच्या या शाळेचे सरकारने चालकत्व दिले."[35]

"या शाळेचे रुपांतर पूर्ण हायस्कूलांत व्हावे अशी योजना आखून दरवर्षी एक एक वर्ग वाढविण्यात आला व १९३७ ते १९३९ सालापर्यंत ज्यावर्षी कॉंग्रेस मंत्रीमंडळांनी

अधिकार सूत्रे हाती घेतली त्या वर्षात पूर्ण हायस्कूल करण्याचे ठरविले. या हायस्कूलांतून १९४२ साली मुलींची पहिली बॅच मुंबई युनिर्व्हसिटीच्या मॅट्रिक परिक्षेस पाठविण्यात आली. या मॅट्रीकच्या वर्गात ६ मुली होत्या. त्या सर्व पास झाल्याने "प्रसाद चिन्हानि पुर: फलनि" या उक्तीप्रमाणे या हायस्कूलचा भावी यशाचा चांगला भक्कम पाया घातला गेला."[36]

शाळेत चित्रकला, साहित्य परिषदेच्या परीक्षा, हिंदी परीक्षा यातही शाळेने चांगले यश मिळविले. शाळेच्या अभ्यासाव्यतिरिक्त बहि:शाल चळवळी, वादविवाद मंडळे, समाज सेवा संघ, रेडकॉस, न्यायमंडळ, गर्ल गाईड्स, कॅडेट कोअर, को. सोसायटी वगैरे व्यवसायांतही शाळेतील मुलींनी चांगली प्रगती दाखविली.

१ ऑगस्ट १९४७ रोजी मुंबई प्रांतांतील एकमेव मुलींची लोकशाळा व वसतिगृह याच शाळेला जोडून, सरकारच्या नव्या प्रयोगासाठी म्हणून काढण्यात आले. या शाळेत इंग्रजी खेरीजकरुन मॅट्रीकचा बहुतेक सर्व शिक्षणक्रम असे. सारांश या परीक्षेस मराठी मॅट्रिक असे यथार्थ नाव पडले होते. या शाळेत मुलीस आवश्यक अशा गृहजीवनशास्त्राचा अभ्यासक्रम, आदर्श गृहव्यवस्था व रचनासौंदर्य, स्वयंपाक, फर्स्ट एड, आजाऱ्यांची शुश्रुषा, लहान मुलांचे संगोपन, शिक्षण व विणकाम, हस्तव्यवसाय, गायन, वगैरे गोष्टींचाही अभ्यास मुली या ठिकाणी करीत असत. पुढे इंग्रजीचे महत्व कमी झाल्यामुळे हिंदी किंवा स्वभाषा घेऊन एस. एस. सी. परीक्षेस बसण्याची सवलत मिळाल्यामुळे ही लोकशाळा १९५२ पासून बंद करण्यात आली.

श्रीमती वेणुबाई मोडक, एम.ए, एस.टी.सी. यांनी वरील गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कूल १९२० साली स्थापन केले. सेवानिवृत्त होईपर्यंत बाकीची सर्व नोकरी या नगरच्या मुलींच्या सरकारी हायस्कूलातच झाली, त्यामुळे वेणुबाई मोडक यांची मुलींची शाळा असे नाव विनोदाने पडले होते.

**हिंद सेवा मंडळ, अहमदनगर यांच्या संस्था**

**अनाथ विद्यार्थी गृह १९१३**

कै. बाळासाहेब देशपांडे यांच्या प्रोत्साहनाने व प्राथमिक देणगीने, अहमदनगर येथे सन १९१३ साली गरीब विद्यार्थ्यांच्याकरता म्हणून, अनाथ 'विद्यार्थी गृह' ही संस्था स्थापन झाली. "या संस्थेतील विद्यार्थी शहरातील प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांतून पाठविले जात. या अनाथ विद्यार्थी गृहास जोडूनच ड्रॉईंगचे वर्ग व सुतारकामाचे वर्ग जोडले होते, व या वर्गाच्या सोयीसाठी सुतार कारखानाही काढला होता. या संस्थास जोडून मॉडर्न हायस्कूल हे तारीख ६ जून १९३५ ला स्थापन करण्यात आले."[37]

**जातीनिर्देश करणारी वसतिगृहे**

"जून महिना सुरु होताच निरनिराळ्या शाळा वसतीगृहांच्या जाहिराती झळकू लागत. नगर शहरात जवळ जवळ १०, १२ वसतीगृहे आहेत पण या बोर्डींगची नावे जातीभेद उत्तेजन पाहून कोणत्याही मानवास कापरे भरल्या वाचून राहणार नाही."[38] ब्राम्हण बोर्डींगजैन बोर्डीग, माहेश्वरी मारवाडी बोर्डींग, माळी बोर्डींग, मराठा बोर्डींग, अहिल्या बोर्डींग, खोजा बोर्डींग, ख्रिस्ती बोर्डींग, नापीत बोर्डींग, मुस्लीम बोर्डींग, सोमवंशीम बोर्डींग, मातंग वसतीगृह, हरिजन बोर्डींग अशी विविध जाती व पोटजातीची वसतीगृहे आपल्या हीन-दीन देशातील सडक्या समाज पध्दतीची द्योतक आहे. आपल्या देशात जातीभेदाचा इतका बुजबुजाट झाला आहे की, विद्यार्जनाच्या पवित्र कामातही ती साथ पसरु लागली आहे हे शिक्षणाचे विडंबन होय. जिल्ह्यात महार व मातंग समाजांनी एकमेकांशी मिसळत नसे. जातीभेदाच्या अस्पृश्यता पाळता ही खेदाची बाब होती.

**विद्यार्थी संघ अहमदनगर**

"विद्यार्थ्यांना कागद व इतर शैक्षिणीक साहित्य वगैरे संबंधीच्या अडचणींवर विचार करण्यासाठी विद्यार्थी संघ स्थापन झाला. त्यासाठी ७०० विद्यार्थी सभासद होते."[39] ह्या संघाद्वारे महायुध्दकाळात शैक्षणिक साहित्यावर जे नियंत्रण ठेवलेले असे, त्याबाबत विद्यार्थी सरकारकडे दाद मागत असत.

**कन्या विद्या मंदिर १९४३**

अहमदनगरला मुलींची हायस्कूले दोन, एक मिशन गर्ल्स हायस्कूल व दुसरे सरकारी मुलींचे हायस्कूल परंतु वाढत्या मुलीच्या संख्येमुळे या दोन शाळा मुलींना अपुऱ्या पडत. व शहरांतील दोन मोठी मुलांची हायस्कूले, एक सोसायटी हायस्कूल व दोन मॉडर्न हायस्कूल या हायस्कूल्समधून काही मर्यादित संख्येने मुलींनाही प्रवेश मिळत असे. तथापि काही पालकांची मुलांच्या शाळेत मुली न पाठवता स्वतंत्र मुलींच्या शाळांमधूनच पाठविण्याची इच्छा असल्यामुळे अशा मुलींच्या सोयीसाठी सोसायटी हायस्कूलमधीलच विद्यार्थी, व शिक्षक गणपत जयदेव चितांबर यांना मुलींचे स्वतंत्र हायस्कूल काढण्याची कल्पना सुचली. एक मध्यवर्ती मंडळ स्थापून 'कन्या विद्या मंदिर' असे हायस्कूल सुरु केले.

**रेसिडेन्शिअल हायस्कूल व मराठा बोर्डिंग १९२२**

"मराठा विद्याप्रसारक समाज, अहमदनगर, या मंडळाने या संस्थेची स्थापन १९४३ साली केली आहे. विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील, हे या संस्थेचे अध्यक्ष होते. हायस्कूलचे आधी प्रथम सन १९२२ साली नुसती बोर्डिंगची स्थापना केली होती."[40] बोर्डिंगसाठी समाजातून वेळोवेळी आर्थिक मदत घेऊन ती प्राथमिक अवस्थेत सजीव ठेवण्याचे प्रयत्न त्यातील कार्यकारी मंडळाने केलेले दिसतात.

**चांद सुलताना हायस्कूल १९३७**

"नगर शहरात सन १९३७ साली यंग मुस्लिम सोसायटी ही संस्था स्थापन झाली. तिचा उद्देश मुस्लिम समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा हा होता. "त्यासाठी त्यांनी मोफत वाचनालय सुरु केले व मुसलमानी धर्मांचे शिक्षण देण्यासाठी म्हणून सन १९३८ साली 'सीरत कमिटी' स्थापन केली. सीरत म्हणजे पैगंबराचे चरित्र, ही कमिटी पैगंबराचे चरित्रावर व धार्मिक विषयावर व्याख्याने करी. असे या संस्थेची स्कूल कमिटी सन १९३८ साली स्थापन होऊन तिने एक अँग्लो ऊर्दू स्कूल १९३९ साली स्थापन केले." [41]

१९४५ मध्ये या शाळेचे पूर्ण माध्यमिक शाळेत रुपांतर होऊन मॅट्रीकच्या परीक्षेसाठी विद्यार्थी बसत असत.

**प्राथमिक शाळेची प्रतिवर्षी नवीन बदलणारी पुस्तके आणि पालक १९३९**

महायुध्दाच्या परिस्थितीमुळे आर्थिक हलाखीची परिस्थिती, पट्टी वसूली, महागाई इत्यादिमध्ये नवीन बदलण्याऱ्या पुस्तकांच्या कराचा भार पालकावर पडला. "नगर जिल्हा स्कूल बोर्डाने दोन वर्षांपूर्वी पुस्तके बदलली व गेल्या वर्षीही काही फेरफार केले तरी बहुजन समाजाला शिक्षणाचा जास्त फायदा व्हावा ही इच्छा ठेवून स्कूल बोर्डाने नवीन पुस्तकांच्या कराचे ओझे पालकावर लादले होते."[42] असे अनंत खर्चाचे ओझे पालकांच्या खांद्यावर असताना शाळेची पुस्तके प्रतिवर्षी बदलल्याने आणखी एक भार पालकांवर पडत असे.

**शैक्षणिक चित्रपट १९४६**

"शैक्षणिक चित्रपट निर्मित्तीसाठी अहमदनगर येथे 'दी एज्युकेशनल अॅड इंडस्ट्रियल सिनेटोन लि.' या नावाची कंपनी स्थापन झाली होती. नामवंत शिक्षण तज्ञाचे मार्गदर्शन व या धंद्यातील अनुभवी व तज्ञांची देखरेख यायोगे शैक्षणिक चित्रपटांची वाढती गरज ही कंपनी पुर्ण करत असे. खात्याधिकाऱ्यांनी तिला पाठिंबा दिला होता."[43] दृकश्राव्य माध्यमाचे महत्व पटल्यामुळे मुलांची शैक्षणिक प्रगती होण्याच्या दृष्टीने हा स्तूत्य उपक्रम राबवला जात असे.

**शिक्षकाचे संप १९४६**

नगर - ता. २७ मार्च १९४६ रोजी जिल्हाभर शिक्षकांचे मोर्च निघाले होते. नगर शहरामध्ये शिक्षक पालक मिळून मिरवणूक निघाली. "कलेक्टर व शिक्षणाधिकारी यांचे ऑफिसवर मोर्चे नेले होते. पारनेर, श्रीगोंदे, पाथर्डी, शिवाय बेलापूर, कोपरगांव, राहुरी-जामखेड, कर्जत, शेवगाव वगैरे तालुक्यांतून 'मोर्चा दिन' पाळण्यात येऊन मामलेदार यांना शिक्षकांची गाऱ्हाणी सांगितली. नगर जिल्ह्यात सुमारे सव्वासातशे शाळा व १४०० शिक्षक कार्यरत होते. युध्दकाळात आर्थिक टंचाई असूनही सरकार पगार व महागाई

भत्याची वाढ करत नव्हते. अपुऱ्या पगारामुळे काही शिक्षकाना प्राण गमवावे लागले होते. शहरातील २४ शाळातून सुमारे २०० शिक्षक संपावर गेले होते."[44] शिक्षकांचे पगार बेताचेच असत. त्यांच्यावर समाजसुधारण्याची नैतिक जबाबदारी मात्र फार मोठी असे. शिक्षकांना आपल्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागले होते.

**समारोप**

शिक्षणक्षेत्रातील कार्यक्षमता माजण्याचे तीन प्रमुख मार्ग म्हणजे लोकसंख्येतील साक्षर मुला-मुलींचे प्रमाण. हे सामान्यत: लोकसंख्येच्या शेकडा १५ टक्के मुले मुली साक्षर झाली असतील, तर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या वयातील (६ ते ११) सर्व मुले साक्षर झाली असल्यास सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याच्या अंमलबजावणीचा पूर्ण फायदा पदरात पडला असे म्हणता येईल. कार्यक्षमता पाहण्याचा दुसरा मार्ग म्हणजे एकूण शिक्षकांच्या संख्येपैकी प्रशिक्षित शिक्षक किती व अप्रशिक्षित शिक्षक. किती याचे प्रमाण हे होय. जितके प्रशिक्षित शिक्षक स्थानिक संस्थाकडून नेमले जातील व जुने अप्रशिक्षित शिक्षक प्रशिक्षित करुन आणले जातील त्याच प्रमाणात शिक्षणाची पातळी वाढत जाईल. शिक्षणाच्या कसोटीचा तिसरा मार्ग म्हणजे शाळेच्या इमारती हा होय. स्थानिक संस्थेच्या शाळेच्या इमारती स्वत:च्या मालकीच्या प्रशस्त, हवेशीर, क्रीडांगणासहित अशा असल्या पाहिजेत. हे ध्येय नगरपालिकेस पूर्ण गाठता आले नाही, तरी नगरपालिकेस एक कार्यक्रम असा आखावयास पाहिजे की, शहरातील सर्व शाळा या स्वत:च्या मालकीच्या असाव्यात. आणखी एक कसोटी की, सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा अमलात आल्यापासून महत्वाची वाटते ती ही की, या कायद्यान्वये शिक्षण घेणारे विद्यार्थी यांची संख्या वाढते ही गोष्ट खरी, (एक्सेंटेनसिव्ह एज्युकेशन) परंतु बहुजन समाजातील सर्व थरांतील मुलामुलीस एकत्र शिक्षण देण्याच्या पध्दतीचे जे उच्च पातळीचे शिक्षण त्यातील बुध्दिवान मुलांची पातळी कमी होण्याची सार्थ भिती असते, (एक्सेंटेनसिव्ह एज्युकेशन) तिही टाळण्याची आवश्यकता असते. राष्ट्रांतील बहुजनसमाजास सर्वांगीण शिक्षण मिळाले पाहिजे व त्या उद्देशानेच सक्तीचे प्राथमिक

शिक्षण दिले जाते. परंतु या उद्देशाबरोबर राष्ट्रास बुध्दिमान विद्यार्थ्यांनेच शिक्षणाचीही तरतूद करणे अवश्य असल्यामुळे प्राथमिक शिक्षणापासून तो उच्च विद्यापीठीय शिक्षणापर्यंत या सर्व कसोट्या त्यास लावूनच आवश्यक त्या पध्दतीचा अवलंब करणे आवश्यक असते.

नगरपालिकेच्या मर्यादित क्षेत्रांतही या कसोट्या लावल्यास आपणास असे आढळून येईल की, विद्यार्थ्यांची संख्या १३०० (१९०१) पासून पालिकेने ने सक्तीच्या शिक्षणाची योजना आखल्यामुळे सुमारे ९५०० (१९५३) वाढली असताही, ती अद्यापपर्यंत सर्व शाळांच्या इमारती आपल्या मालकीच्या करु शकली नाही. नगर शहर हे अत्यंत दाट वस्तीचे असल्यामुळे शहरांत क्रीडांगण तर राहोच परंतु शाळेस योग्य अशा खाजगी इमारतीही उपलब्ध होऊ शकत नाहीत.

# संदर्भ सूची

[1] लांडे सुमती, पैस, ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अहमदनगर, १९९७, पृ.२४-२७

[2] बॅलंटाईन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-१, अंक-३, १८४२, पृ-५-८

[3] मोरजे गगांधर, ज्ञानोदय, लेखनसारसुची, खंड-१, भाग-१, प्रथम आवृत्ती, सातारा, १९८६, पृ.३७

[4] Rose,Isabel B.Rpse Something Attempted Something Done, Mysore, 1927, p. 34

[5] उपरोक्त, २७

[6] मोडक रा.वि., मंडळाची संक्षिप्त बखर, प्रथम आवृत्ती, पुणे, १९६०, पृ.१३

[7] शिरगावकर श.रा., प्राटेस्टंट ख्रिस्ती मिशनऱ्यांची महाराष्ट्रातील चळवळ, १८१८ ते १८५८, प्रथम आवृत्ती, मुंबई १९६५, पृ.३५

[8] बॅलंटाईन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-२, अंक-५, १८४३, पृ-७५-७९

[9] Devadhar G.K. map of India,Ahmednagar,1910,p.34

[10] बॅलंटाईन हेन्री, ज्ञानोदय, अहमदनगर, पुस्तक-२, अंक-१०,१८४३, पृ-१५६-१५७

[11] रेगे मे.पुं., परंपरा आणि परिवर्तन, प्रथम आवृत्ती, वाई, १९९४, पृ-५३

[12] ह्यूम.आर.डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक ६, अंक १३, १८४७, पृ.१९९

[13] Hazen William, a century in india, Bombay, 1913, P.23

[14] टिळक लक्ष्मीबाई, स्मृतिचित्रे, पाचवी आवृती, कोल्हापुर, २०१३, पृ.३३०

[15] ह्यूम.आर.डब्ल्यू., ज्ञानोदय, मुंबई, पुस्तक १२, अंक २३, १८५३, पृ.३९६-३९७

[16] टिळक लक्ष्मीबाई, स्मृतिचित्रे, पाचवी आवृती, कोल्हापुर, २०१३, पृ.३७६

[17] वाळींबे रा.शं., एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राची सामाजिक पुर्नघटना, १८०० ते १९४५, पृ.१३६

[18] Wheeler Wendell mr.mrs.[helping India grow,report of the American Marathi mission for 1930-31,p.30

[19] वाळींबे रा.शं., एकोणिसाव्या शतकांतील महाराष्ट्राची सामाजिक पुर्नर्घटना, १८०० ते १९४५, पृ.१६७

[20] उपरोक्त, पृ.१३६

[21] उपरोक्त, पृ.१३७

[22] Bombay City,Gazetteer,Vol iii, P.203

[23] देशमुख गोपाळ हरी, शतपत्रे लोकहितवादी, आवृत्ती ४,पुणे, २०१६, पृ.७६

[24] उपरोक्त, पृ.८२

[25] शिरगावकर श.रा.,प्राटेस्टंट ख्रिस्ती मिशनऱ्यांची महाराष्ट्रातील चळवळ, १८१८ ते १८५८, प्रथम आवृत्ती, मुंबई १९६५, पृ.३५

[26] निसळ श्री.वि.,अध्यक्ष नगरपालिका,ग्रंथ प्रकाशन समिती,अहमदनगर ब्युरो मुनिसिपालिटी शतसंवत्सरिक स्मारक ग्रंथ, अहमदनगर, १९५०,पु.क्र.२७९

[27] उपरोक्त, पृ.२८०

[28] उपरोक्त, पृ.२८२

[29] निसाळ.द.रं.,संदेश, अहमदनगर, १५ फेब्रु..,१९४०, पृ.९

[30] अहमदनगर गॅझेटीअर, पृ.३७०

[31] निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, ७ मार्च., १९४६, पृ.९

[32] मुनिसिपालिटीचे वार्षिक अहवाल, सन १९३० ते १९५०, जावक नंबर ६७००, दि.२४.०९.१९५१

[33] मुनिसिपालिटीतील मराठी व इंग्रजी रेर्काडमधील फाईल, सरकारचे पत्र २२५४/१६०४५ अ, दी.२५.५.५४

[34] दर्डा राजेंद्र केसरी, पंचशताब्दी , विशेषांक, अहमदनगर, १९९०,पृ.३

[35] मुनिसिपालिटीचे वार्षिक अहवाल, सन १९३० ते १९५०, जावक नंबर ६८००, दि.२४.०९.१९५१

[36] मुनिसिपालिटीतील मराठी व इंग्रजी रेर्काडमधील फाईल, सरकारचे पत्र २२५४/१६०४५ अ, दी.२५.५.५४

[37] निसळ श्री.वि., अध्यक्ष नगरपालिका, ग्रंथ प्रकाशन समिती, अहमदनगर ब्युरो मुनिसिपालिटी शतसंवत्सरिक स्मारक ग्रंथ,अहमदनगर,१९५०,पु.क्र.३०३

[38] निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २२ जून., १९४४, पृ.९

[39] निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, ७ आक्टो., १९४३, पृ.६

[40] उपरोक्त, पृ.४

[41] जनरल स्कूल बोर्ड, ठराव नं.२७०, सन १९५१

[42] निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, २ मे., १९४०, पृ.९

[43] निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, ७ मार्च., १९४६, पृ.४

[44] निसाळ.द.रं., संदेश, अहमदनगर, ५ एप्रिल., १९४६, पृ.५

# प्रकरण सहावे

## निष्कर्ष

अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास (१८१८ ते १९४७) या विषयाचा अभ्यास करण्यासाठी अहमदनगरच्या परिवर्तनाच्या इतिहासाचा प्रस्तुत कालावधीतील घडामोडींचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक सविस्तर आढावा प्रबंधामध्ये घेतला आहे.

प्रबंधाचे पहिले प्रकरण हे प्रास्ताविक स्वरुपाचे आहे. या प्रकरणात अभ्यास विषयाची ओळख करुन देऊन प्रबंधाची रुपरेषा मांडलेली आहे. तसेच संशोधन साधनांची संक्षिप्त ओळख करुन दिलेली आहे. इतिहासाची संकल्पना स्पष्ट करताना व्यक्ती, समाज, स्थळ, आणि काल हे अनुबंधचतुष्टय, इतिहासाची अन्वयार्थत्मकता, भूतकाळ व वर्तमान काळ यांचा सततचा संवाद इतिहासाची शास्त्रीयता, सत्यशोधन या मुद्यांवर भर दिलेला आहे.

अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास हा प्रस्तुत प्रबंधाचा विषय स्थानिक इतिहासाशी संबंधित असल्याने त्याच्या प्रास्ताविक भागामध्ये प्रादेशिक व स्थानिक इतिहास या संकल्पना समजविण्याचा विस्ताराने प्रयत्न केला आहे. इतिहास अभ्यासामध्ये आपण जागतिक व राष्ट्रीय इतिहासाला 'सम्रग्रलक्ष्यी' अभ्यास म्हणतो, तर 'प्रादेशिक' व 'स्थानिक' इतिहासाला अंशलक्ष्यी अभ्यास अशी संज्ञा दिली आहे.

प्रादेशिक इतिहासामध्ये भौगोलिकतेला महत्वाचे स्थान आहे. तरी त्या भौगोलिकतेमागील मानसिकता व संस्कृती जास्त महत्वपूर्ण आहे. एखाद्या ठिकाणाचे वा त्या स्थान या घटकाची भौगोलिक मर्यादा लहान असते. स्थानिक इतिहास अभ्यासामध्ये गावाचा इतिहासच नव्हे तर गावातील समाज, सामाजिक संस्था इत्यादींचा इतिहास सामाविष्ट केला आहे.

स्थानिक इतिहासामध्ये इतिहासलेखनासाठी निवडलेल्या स्थानाच्या भौगोलिक घटकांप्रमाणेच सांस्कृतिक व मानसिक घटकही महत्त्वाचे आहेत.

तथापि प्रस्तुत प्रबंधाचा विषय अहमदनगर जिल्ह्याचा स्थानिक इतिहास अभ्यासणे हा नसून या जिल्ह्यातील परिवर्तनाचा अभ्यास करणे हा आहे. त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनाच्या संकल्पनेशी प्रामाणिक राहून, परिवर्तनाचा इतिहास मांडण्याचा प्रयत्न सदर प्रबंधात करावयाचा आहे.

आपण ज्या समाजात राहतो त्याची संरचना व स्वरुप यांमध्ये सतत बदल होत असतो. परंतु आधुनिक काळात निरनिराळ्या कारणांमुळे मानवी समाजामध्ये अतिशय वेगाने परिवर्तन होत आहे. आपण ज्या समाजामध्ये राहतो त्याचे स्वरुप समजावून घेणे जितके महत्वाचे आहे, तितकेच त्या समाजामध्ये परिवर्तन कसे व कोणकोणत्या कारणांमुळे होते, त्याची दिशा कशी आहे, हे जाणून घेणेही महत्वाचे आहे.

अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा अभ्यास करताना स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतात, महाराष्ट्रात, विशेषत: अहमदनगरच्या संदर्भात कोणत्या स्वरुपाची परिवर्तने घडली त्यांना कोणते घटक व परिस्थिती कारणीभूत झाली हे प्रस्तुत प्रबंधातुन स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या देशात आधुनिकीकरणाची प्रक्रिया ब्रिटीश राजवटीपासून सुरु झाली. समाजाचे आधुनिकीकरण होत असताना समाजातील निरनिराळ्या स्तरांमध्ये व समूहांमध्ये नव्या जाणिवा निर्माण होऊ लागल्या. त्यातून स्वातंत्र्य चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली. सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक स्वरुपाचे बदल घडून आले. या बदलांचा अभ्यास प्रस्तुत प्रबंधातून केला आहे.

समाजाच्या मूलभूत संरचनेतील परिवर्तन म्हणजे 'समाज परिवर्तन' होय. समाजाची संरचना मूल्ये, नियमने, गट किंवा उपगट आणि भूमिका यांनी बनलेली असते. यांपैकी कोणत्याही घटकात परिवर्तन झाल्यास सामाजिक परिवर्तन घडून येते. परिवर्तनाचे अनेक घटक किंवा कारक असतात. उदाहरणार्थ, लोकसंख्यात्मक, तांत्रिक, जैविक, सांस्कृतिक, इत्यादी. परिवर्तनाचे परिणाम संपूर्ण समाजाच्या जीवनावर व त्याच्या विविध अंगोपांगांवर होत असतात.

सामाजिक संरचनेतील परिवर्तन म्हणजे सामाजिक परिवर्तन. सर्वाधिक महत्वाचे परिवर्तन म्हणजे सामाजिक मूल्यात होणारे परिवर्तन असते. हॅरी जॉन्सनच्या मते सामाजिक परिवर्तन म्हणजे मूलभूत अर्थाने समाजरचनेतील बदल असतो. समाजाच्या विविध भागांच्या परस्परसंबंधांच्या स्वरुपात बदल झाला म्हणजे समाजरचनेत बदल होतो.

१८१८ ते १९४७ या १२९ वर्षातील महत्वाच्या घटना व परिवर्तनाचा इतिहास प्रस्तुत प्रबंधातून नोंदविलेला आहे. सर्वच घटना-घडामोडींची शिरगणती न करता ज्या घटनांमुळे परिवर्तनास वेग प्राप्त झाला अथवा परिवर्‍तन घडले त्या महत्वपूर्ण घटनांचीच नोंद सदर प्रबंधात घेतलेली आहे.

स्थानिकता ही तुलनात्मक संकल्पना आहे. साधारणपणे तिचे व्यापकतेबरोबर तुलना केली जाते. प्रत्येक स्थानिक घटकाची स्तत:ची एक स्थानिकता म्हणून वेगळी ओळख असते. राष्ट्रीयतेचा विचार करत असताना प्रभाग किंवा एखादा लहानसा भाग हा स्थानिक म्हणून गणला जातो. यात लहानसे खेडे किंवा जिल्हा या घटकांचा समावेश असतो. आधुनिक काळात लहानसे खेडेदेखील प्रशासकीयदृष्ट्या एक महत्वाचे केंद्र बनले आहे. मोठ्या प्रशासकीय घटकांचे ते लहानसे प्रतिरुप असते. म्हणून स्थानिक इतिहासाला अलिकडच्या काळात महत्व प्राप्त झाले आहे.

**प्रकरण दुसरे : अहमदनगर शहरातील राजकीय परिवर्तन**

प्रस्तुत प्रकरणातून १८०३ ते १९४७ या कालखंडात ब्रिटीशांनी अहमदनगरचा ताबा मिळविल्यानंतर येथील लोकांच्या राजकीय जीवनात झालेले परिवर्तन प्रस्तुत प्रकरणातून अभ्यासले आहे. इंग्रजांनी सन १८०३ मध्ये शिंदयाच्या ताब्यातील अहमदनगर जिंकून घेतले. पुढे शिंदे, होळकर व पेशवे ही तीन बडी प्रस्थे नमवून इ.स.१८१८ साली इंग्रजांनी हेन्री पॉटिंजरची प्रथम कलेक्टर म्हणून नियुक्ती केली. सत्यवर येताच त्याने जनतेला शांततेचे अवाहन करणारा जाहिरनामा काढला. इंग्रजांनी अहमदनगर शहरांवर वर्चस्व मिळवले असले तरी अहमदनगर जिल्हयातील कोळी व

भिल्लांनी १८८२ पर्यंत चैन पडु दिले नाही. असेच अस्वस्थ करणारे अनेक प्रसंग इंग्रजांना दडपावे लागले त्याची सुरुवात अहमदनगरमध्ये छत्रपती चौथे शिवाजी महाराजाची झालेली हत्या. ही घटना अहमदनगरच्या राजकीय जीवनात उद्रेक निर्माण करणारी ठरली. शिवजंयती प्रसंगी सोसायटी हायस्कूलमधील शिक्षकांनी छत्रपती चौथे शिवाजी महाराजाचा हत्येचा निषेध करणारे भाषण केले. हा विद्रोह शासनाने या शिक्षकांना बडतर्फ करुन दडपून टाकला. परंतु १९०५ च्या बंगाल फाळनीने अहमदनगरची राष्ट्रीयता चेतवली. 'स्वदेशी', 'बहिष्कार','वंदे मातरम्' ने अहमदनगर शहर दुमदुमले. बहिष्काराला व्यापाऱ्यांनीच धार चढवली. तर सेनापती बापटांनी हातबॉम्ब व भूमिगत या गोष्टी शिकविल्या. डॉ.ॲनी बेझंट, लो. टिळक यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केल्याने मावळ जहाल समेट होऊन दोन्ही तत्वप्रणाली एका व्यासपीठावर कार्य करु लागल्याचे दिसतात.

अहमदनगरमधील गांधी युगातील अहिंसावादी चळवळ महत्वाची ठरली या आंदोलनात स्त्री-पुरुष, अबाल-वृध्दांनी भाग घेतला. येथील मिठाच्या सत्याग्रहाला पिकेटिंगची जोड मिळाली. आदिवासीना न्याय मिळवून देणारा जंगल सत्याग्रह संपूर्ण भारतात गाजला. अहमदनगरमधील नेते कायदेभंग करुन जेलमध्ये गेले. जनता लाठीहल्ले, निरोधन, बहिष्कार, तुरुंगवास याबाबत इतकी निडर झाली की सुटुन आल्यावर आनंदोत्सव साजरे करु लागली.

गांधी युगातील अस्पृश्योध्दाराची चळवळ येथे खूप गाजली. अस्पृश्यासाठी मंदीर प्रवेश, शाळा प्रवेश, हळदी कुंकू, सार्वजनिक सत्यनारायण, सार्वजनिक पाणवठे खुले करणे इत्यादी मोहीमा राबविलेल्या दिसतात.

१९३७ साली प्रांतिक कायदेमंडळाची निवडणूक कॉंग्रेसने बहुमताने जिंकली तेव्हा सरकारी अधिकारी राजबंद्यांना सलाम ठोकताना दिसू लागले. पण दुसऱ्या महायुध्दाला विरोध करण्यासाठी सर्व मंत्र्यानी राजीनामे दिले.

चले जाव आंदोलन काळात पं.जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल इ. १२ प्रभूती अहमदनगरच्या किल्लयात बंदीवासात होत्या. त्या काळात नेहरुनी इतिहास प्रसिध्द डिस्कव्हरी ऑफ इंडिया ग्रंथ लिहिला. १९४२ च्या आंदोलनात 'चलेजाव' व 'करेंगे या मरेंगे' या महामंत्राच्या अंगिकारासाठी स्त्री, पुरुष, मुले सरसावले. सत्याग्रह, मिरवणूका, लाठी हल्ले, तुरुंगवास भोगला. वैयक्तिक व सामुहिक सत्याग्रहांना उधान आले. राष्ट्रीय काँग्रेस कार्यकर्त्यांना अहमदनगरच्या किल्ल्यात बंदीवासात ठेवले. ही घटना राष्ट्रीयता प्रज्वलीत ठेवण्यास कारणीभूत ठरली. कँपमधील लष्करी छावणीत ब्रिटीशांबद्दल व्देश व स्वदेशाबद्दल राष्ट्रीय भावनेचे सुरुंग काँग्रेसकार्यकर्त्यांनी पेरले. सरोश टॉकीजमध्ये, चॉकलेट सोल्जर नावाचा चित्रपट पाहण्यास आलेल्या ब्रिटीश सैनिकांवर केलेला बाँब हल्ला ब्रिटीशद्वेशाचा निदर्शक होता. वटहुकूमभंग, मद्यपान निरोधन, विलायती औषधे, निरोधन, परदेशी वस्तुंवर बहिष्कार, पाटील दरबार प्रचार, खादी निर्मिती अशा प्रकारच्या सत्याग्रहांद्वारे तसेच सरकारी रेकॉर्ड जाळणे, टेलीफोनच्या तारा तोडणे, हातबाँब फेकणे इ. कार्य मानवहानी न होता अहिंसक मार्गाने सुरु होते. अहमदनगर जिल्हा पुर्नघटना परिषधेचे अध्यक्ष ल. मा. पाटील होते. त्यामुळे लोकशाही कारभाराचा हेतू सफल करण्याचा मान प्रथम अहमदनगरला मिळाला. १४ ऑगस्ट १९४७ रोजी युनियन जॅक काढून आचार्य नरेंद्रदेव यांनी शेकडो अहमदनगरकरांच्या साक्षीने अहमदनगरच्या किल्ल्यावर तिरंगा फडकवला.

## प्रकरण तिसरे : अहमदनगर शहरातील आर्थिक परिवर्तन

अहमदनगर शहर निजामशाहीच्या राजधानीचे शहर असल्याने येथे धान्य, धातूंची भांडी, कापड मलमल इ. वस्तूंचा देशविदेशांशी व्यापार चाले. निजामशाहीच्या उतरत्या काळात अहमदनगर ऐवजी सुरत शहराला व्यापारी महत्व प्राप्त झाले. मुघल व मराठे काळात व्यापाराची बरीच हानी झालेली दिसते. या काळात सावकारांचे वर्चस्व समाजावर असलेले दिसते. दर तीन वर्षांनी पडणाऱ्या दुष्काळांना जोड रोगराई व अंधश्रध्देची असल्यामुळे सावकारी व्यवसाय पोसायला मदत झालेली दिसते. ब्रिटीशांना

स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर त्यांनी नवीन करविषयक धोरण राबवले. नवीन चलन वापरात आणले सुरुवातीच्या काळात जनतेने केलेला विरोध हळूहळू मावळलेला दिसतो. दुष्काळावर मात करण्यासाठी ब्रिटीश सरकारने विविध उपाय योजिलेले दिसतात. यांत ज्वारी, बटाटे यांची पिके घेतली जाऊ लागली. डनलॉप कलेक्टरच्या काळात चांगल्या गुरांची पैदास होण्याकरिता खानदेश व गुजरातमधून न बडविलेले बैल आणवले. त्यांच्यापासून संकरीत जनावरे निर्माण करावीत अशी सोय केलेली दिसते. कमकुवत पोळापासून निपजलेली वासरेही कमकुवत असतात. संकरीत गुरांची पैदास वाढवण्यासाठी सरकारने शेतकऱ्यांवर दंडेली करण्यापेक्षा लोकमान्यतेसाठी पन्नास ते शंभर रुपये बक्षीशीचे आयोजन केलेले दिसते. याच डनलॉप कलेक्टरने उत्तम घोड्यांची पैदास होण्यासाठी विलायत व अरबस्थानातून उमदे घोडे मागवले. येथेही मोफत रेतन पध्दतीचा वापर करुन १०० ते ३०० रु. पर्यंतचे बक्षिस जाहीर केले. ईस्ट इंडिया कंपनीने आधुनिक पध्दतीने संकरीत गुणवत्तपूर्ण पशुधन महाराष्ट्रात प्रचलित करुन महाराष्ट्रातील दळणवळण व कृषीउत्पन्न वाढण्यासाठी हातभार लावला.

अहमदनगरमध्ये राजस्थान, गुजरात, आंध्रप्रदेश, मधुन आलेली 'हिंदू माहेश्वरी' व जैन ओसवाल कुटूंबे स्थलांतरीत झाली. मुथा, गांधी, फिरोदिया, चंगेडिया, सारडा, गुगळे, भळगट, संकलेचा, कटारिया, मुनोत, येमुल, जंगम, भुसा, अशी व्यापारावर प्रभुत्व निर्माण करणारी व सध्या स्वत:ला 'अस्सल नगरी' समजणारी मंडळींचे अहमदनगरच्या व्यापारवर प्रभुत्व असलेले दिसते. अहमदनगर दुष्काळीप्रांत आहे त्यामुळे येथील लोक अत्यंत काटक व सहनशील आहेत. दुष्काळ आपल्या सोबत कॉलरा, पटकी, प्लेग इ. रोगांना बरोबर घेऊन येत असे. दुष्काळात खेडी ओस पडत, रोगराईने अनेक माणसे भरत, धान्य महाग होत असे. मारवाडी धान्याचा काळा बाजार करत, खेड्यांत लोक जनावरांचे मांस खात. १८६२ साली सरकारने २८००० रु. ची मरत गोळी करुन अन्नछत्र सुरु केलेले दिसते. रोग्यांच्या सेवेसाठी डॉक्टरची व्यवस्था होती. दुष्काळपिडीतासाठी सरकारने वारुळवाडी, भिंगारजवळ कँप उधडून तेथे लोकांच्या अन्न

व रोजगाराची व्यवस्था केली. त्यांच्या मुलांसाठी कंगालखाना उभारुन लोकांना जगविण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. अहमदनगरचे रेल्वे स्टेशनचा भराव दुष्काळी कामातून पूर्ण केला असल्याचे आढळते. मिशनऱ्यांनी राहुरी, वडाळा, कोळगाव इत्यादी दुष्काळी खेड्यातून आणलेल्या मुलांची सोय अहमदनगर शहरात केली. जुन्या बाजारात निराक्षीत उच्च कुलाच्या स्त्रियांसाठी वस्त्रदान, साळी लोकांसाठी लुगडी विणण्याचे काम रिलिफ कामामार्फत धान्य व कपडे वाटप या योजना राबवलेल्या दिसतात.

प्लेगच्या निवारणासाठी सरकार स्वच्छता मोहीम राबवत असे, प्लेग ग्रस्तांची सोय सिध्दी बागेत व काही खेड्यांत राहुट्या टाकून केली जात असे. अंधश्रध्देमुळे प्लेग निवारण करण्यास अडचणी येत असे दिसते. मिशनरी डॉक्टर, धर्मगुरु, प्लेगबाधीत लोकांची मनोभावे सेवा करीत असत.

१८७८ साली अहमदनगरहून जाणारी दौंड, मनमाड रेल्वे सुरु झाल्याने येथील धान्य व्यापाराला गती मिळाली. पंजाबवरुन शेकडो पोती धान्य येऊ लागल्याने अहमदनगर रेल्वे स्टेशनला 'पंजाबचा धक्का' म्हटले जाऊ लागले. अहमदनगरमध्ये हातमाग व्यवसाय, तांबे पितळेची भांडी बनवणे, लाकुडकाम इ. पारंपारिक व्यवसाय होते. १९३३ साली मुंबईच्या नरिमन कंपनीने क्रुड ऑइलवर चालणाऱ्या वीजनिर्मिती अहमदनगरमध्ये सुरु केली.

रेल्वे व विज यामुळे अहमदनगरमधील व्यापारास गती आलेली दिसते. अहमदनगरमधील औदयोगिकीकरण वाढले. लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. रेल्वेमुळे धान्य व इतर वस्तूची आयात निर्यात वाढली.

निजामशाही कालापासून अस्तित्वात असलेले विणकाम, ओत काम, लाकूड काम, इत्यादी व्यवसाय मागे पडून टायपिंग, चष्मे बनविणे, बेकरी, घडयाळ, गॅसबत्ती इत्यादीशी संबंधीत व्यवसाय निर्माण झालेले दिसतात. ह्या सर्व व्यवसायाचे केंद्रीकारण नव्यापेठेत झालेले दिसते. याच दरम्यान झालेल्या सहकाराच्या उदयामुळे लोकांच्या जीवनात बँक, पतपेढी अशा आर्थिक घटकांचा समावेश झाला.

दुसऱ्या महायुध्दकाळात काळाबाजार, साठेबाजी या समस्याचा उदय झाला. त्यावर उपाय म्हणून सरकारने दैनंदिन वापराच्या वस्तूंवर नियंत्रण ठेवले. याची प्रतिक्रीया म्हणून औषध विक्रेत्यानी संप पुरकारलेला दिसतो. महायुध्द काळात ग्राहक भांडाराची व्यवस्था करुन लोकांना स्वस्त दरात धान्य, कापड, साखर उपलब्ध करुन दिलेली दिसते.

अन्नधान्य तुटवडा असूनही येथील व्यापाऱ्यानी दुष्काळाग्रस्त बंगालसाठी लोकवर्गणीतून अन्नछत्र उभारुन मानवतावादाचे दर्शन घडविल्याचे दिसते. अहमदनगरच्या आर्थिक जीवनात अनेक प्रकारचे परिवर्तन झालेले दिसते. त्यातील ठळक परिवर्तनाचा आढावा प्रस्तूत प्रकरणात घेतला आहे.

**प्रकरण चौथे : अहमदनगर शहरातील सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन**

या प्रकरणात तत्कालीन समाजजीवनावरील धर्माचा पगडा, वर्णधर्म, जातीव्यवस्था, अस्पृश्यता, गावगाडा, कुटूंब व्यवस्था, स्त्री जीवन, विविध सामाजिक रुढी व वैगुण्ये इत्यादींचा परामर्श घेतल्यावर असे दिसून येते की, अहमदनगरमध्ये समाजव्यवस्थेची परंपरागत चौकट उर्वरित महाराष्ट्रापेक्षा फारशी भिन्न नव्हती. अहमदनगरच्या समाजात परिवर्तनाच्या व नवनिर्मितीच्या सुप्त शक्तींचा झालेला विकास या प्रकरणात अभ्यासला आहे. मिशनऱ्यांनी येथील स्त्रियांसाठी केलेली ठळक कामे म्हणजे अहमदनगरच्या स्त्रियांना उत्तम शिक्षण घेता यावे, त्यांची गृहस्थी चांगली चालावी म्हणून १९१४ साली मिशनच्या स्त्रियांचा क्लब सुरु झाला. त्यामार्फत स्त्रियांना लेखन, वाचन, शिवण, स्वच्छता, आरोग्य, बालसंगोपन शिकवले जाई. १८५९ सालचे पाणी प्रकरण अहमदनगरसोबत महाराष्ट्र व इंग्लंडच्या संसदेत गाजले. धर्मांतराच्या भितीपोटी नेटिवांना सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्यासा मज्जाव करणारे प्रकरण थेट इंग्लंडच्या संसदेतून सोडविले गेले. येथील जनतेच्या मनातील जातीयतेच्या कल्पना घट्ट असलेल्या दिसतात. अहमदनगरमधून निघणाऱ्या ज्ञानोदय वर्तमानपत्राने मानवजातीच्या उद्धाराचे कार्य केलेले दिसते. मिशनऱ्यांच्या शिक्षणाने प्रभावित झालेला

एक सुशिक्षित मागासवर्ग निर्माण झालेला दिसतो. महाराष्ट्रातील प्रबोधनाच्या रेट्यामुळे अहमदनगर येथे सुधारकांची एक पिढी निर्माण झाली. त्यातून ‘अनाथ वस्तीगृह’, ‘सोशल सर्व्हिस लीग’, ‘प्रार्थना समाज’, ‘पांझरपोळ’, ‘दलितदोस्त दल,’ ‘रिमांड होम,’ ‘बालिकाश्रम’, ‘प्रेत संस्कार सहाय्यक मंडळ,’ ‘सत्यशोधक मंडळ,’ ‘निराश्रित मंडळ,’ ‘महिला मंडळ’ यांची निर्मिती झालेली दिसते.

अहमदनगरच्या साहित्य क्षेत्रात ना. वा. टिळक, बालकवी, वि. द. घाटे, बळवंत हिवरगावकर, दादासाहेब, धनेश्वर, इत्यादी साहित्यीकांचा उदय झालेला दिसतो. या प्रकरणातून विविध सण समारंभ उत्सव, उरुस, जत्रा, यात्रा, यांच्या माध्यमातून सामाजिक समन्वयाचा अभ्यास केलेला आहे.

अहमदनगरहून 'ज्ञानोदय' हे वृत्तपत्र १९४२ सालापासून निघू लागले. त्यानंतर अनेक वृत्तपत्रे निघाली. पण ती अल्पजीवी ठरलेले दिसतात. दिर्घकालीन चालणाऱ्या वर्तमानपत्रात न्यायसिंधु, संदेश, नगर समाचार, ही होती. या वृत्तपत्रातून राजकारण, समाजकारण, धर्मकारण, ब्रिटीश नीती इत्यादींची माहिती मिळवून लोकांच्या ज्ञानात भर पडू लागली.

अहमदनगरमध्ये सर्व जातीधर्मांचा समन्वय झाल्याने येथे एक विशिष्ट प्रकारचा समाजप्रवाह प्रभावी असल्याचे दिसत नाही. एकमेकांच्या रुढी परंपरामध्ये हस्तक्षेप न करता धार्मिक सलोखा ठेवून येथील समाज गुण्यागोविंदाने नांदताना दिसतो. अहमदनगर ही साधुसंतांची पुण्यभूमी आहे. विश्वस्वरुपात विलीन होण्यासाठी समाधी घेणे हे संताचे श्रेष्ठ लक्षण मानले जाते. अहमदनगर परिसरात पाच संतांनी जीवंत समाधी घेतली. येथील सर्व संत मोठे साहित्यिक, किर्तनकार व कवी असल्याचे आढळते.

हिंदूंचा सर्वात मोठा सण दिवाळी असे. प्रत्येकाच्या घरी गाई असल्याने गाईची पूजा करुन दिवाळ सणाची सुरुवात होत असे. वीरशैव लिंगायत समाज रेडे व म्हशींचा

'सगर' नावाचा खेळ किल्ला मैदानात आयोजित करत. मारुतीच्या मंदिरासमोर श्रावणातल्या तिसऱ्या शनिवारी मोठी 'पचंबा' यात्रा भरत असे. या यात्रेला पाचशे वर्षांची परंपरा आहे. यात्रेच्या काळात कापड, धान्य, संसारोपयोगी वस्तू यांची खरेदी विक्री होऊन मोठी आर्थिक उलाढाल होत असे. यावेळी वर्षभरासाठी लागणाऱ्या अनेक वस्तू लोक खरेदी करत. कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी विविध आकाराच्या साखरेच्या पाकातील टोप्यांना 'चिपाडा किंवा चांदोबाची टोपी' म्हणत. या टोपीचे व दुधाचे औक्षण करुन दुधात टोपीचे तुकडे घालून दुध पिण्याची परंपरा अनेक वर्षांपासून नगरमध्ये चालत आलेली आहे. सामूहिक वनभोजनाचा बागल पंडुगु हा सण पदमसाळी समाजात महत्वाचा असे. बारा इमाम कोठला येथील मोहरमच्या सणास पाचशे वर्षांची परंपरा आहे. या सर्व सण-उत्सवांमधून अहमदनगरमधील सामाजिक समन्वयाची जाणीव होते.

अहनगरच्या मातीत अनेक साहित्यिक संतांचा उदय झाला. त्यात संत ज्ञानेश्वर, चक्रधर स्वामी यांचा आद्य क्रमांक लागेल. रे. ना. वा. टिळक, बालकवी ठोंबरे, लक्ष्मीबाई टिळक या नगरमध्ये काही काळासाठी वास्तव्यास असलेल्या कवी, साहित्यिकांनी नगरचे साहित्य विश्व समृध्द केले. ना. वा. टिळकांनी टाळ, मृदुंग, केशरी कफणी घालून अभंगाच्या चालीवर चर्चमधील प्रार्थना गायल्या. फादर स्टिफन्स यांनी लिहिलेल्या 'ख्रिस्तपुराण' च्या धर्तीवर ना. वा. टिळकांनी 'ख्रिस्तायन' नावाचे येशू ख्रिस्ताच्या जीवनावरील काव्य लिहिण्यास सुरुवात केले. हे अर्धवट राहिलेले कार्य त्यांच्या मृत्युनंतर लक्ष्मीबाई टिळक व देवदत्त टिळक यांनी पूर्ण केले. लक्ष्मीबाईंचे 'स्मृतीचित्रे' या आत्मवृत्तातून अहमदनगरचेही आत्मवृत्त खुलते. बालकवींनी अहमदनगरमध्ये रचलेल्या 'भिंत्त खचली, कलथून खांब गेला' या पाखराच्या गीतातून त्यांची राष्ट्रीय वृत्ती झळकते. दादासाहेब धनेश्वर यांनी न्यायसिंधु, ज्ञानप्रकाश या वृत्तपत्रांसाठी लेखन केलेले दिसते. तसेच ज्ञानेश्वरांची 'पाठशुध्द' आवृत्ती करण्यासाठी संशोधन केले. वि. द. घाटे, ग. ल. ठोकळ हे याच परिसरातले नावाजलेले साहित्यिक होते.

येथील चित्रकलेला प्राचीन परंपरा आहे. 'निजामशाही कालीन चित्रकलेला 'अहमदनगर कलम' म्हणत पुण्याचे प्रसिध्द चित्रकार र. बा. केळकरांनी प्रगत महाविद्यालय सुरु करुन येथील चित्रकलेला अध्यासन प्राप्त करुन दिले. दोन महायुध्दादरम्यान ब्रिटीशांनी अहमदनगरला बंदिवासात ठेवलेल्या जर्मन कैद्यांनी आपल्या अंतरीच्या व्यथा चितारीत केलेल्या दिसतात.

येथील बागडे थिएटर नाटकांचे माहेरघर होते. प्र. के. अत्रे, बाळ गणेश गडकरी, बालगंधर्व यांची नाटके येथे गाजली.

१९२८ साली नगर-नाशिक साहित्योपासक संमेलन तर १९३९ साली २४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन द. वा. पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली बागडे थिएटरमध्ये पार पडले. एकूणच नगरचे सांस्कृतिक जीवन कला, साहित्य, नाटक यांनी ओतप्रोत भरलेले होते.

**प्रकरण पाचवे : अहमदनगर शहरातील शैक्षणिक परिवर्तन**

अहमदनगरमध्ये शिक्षणाची मुहूर्तमेड मिशनऱ्यांनी रोवली. सरकारी शाळांनी मिशनऱ्यांचे अनुकरण करत सर्व धर्मियांसाठी शिक्षणाची सोय केली. त्यातून झालेले परिवर्तन या प्रकरणात अभ्यासले आहेत.

येथील रुढी परंपरा, अंधश्रध्दा, देवभोळेपणा नष्ट होऊन वैचारिक प्रगती साधण्याच्या दृष्टीने मिशनऱ्यांनी शैक्षणिक सुधारणांचा पाया घातला. १८३३ साली पहिली सहभोजन शाळा, १८३६ साली पहिली मुलींची शाळा अहमदनगरमध्ये सुरु केली. सहशिक्षणाचा विचार, प्रशिक्षित शिक्षक, निर्धारित अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तकांची निर्मिती, शाळेसाठी स्वतंत्र इमारती, खेळाचे, व्यायामाचे साहित्य व क्रिडांगण या सोबत स्त्रिया आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी शिवणकाम, विणकाम, चांगली गृहस्थी चालविण्याचे वर्ग इत्यादी अनेक नवनीवन संकल्पनांचा पाया मिशनऱ्यांनी घातला. रे. जेम्स स्मिथ यांनी १८२९ साली अहमदनगरमध्ये अमेरिकन मिशन हायस्कूल ही संस्था सुरु केली. त्यांनीच १८८७ साली 'अहमदनगर कॉलेज' नावाचे आर्ट्स कॉलेज सुरु

केले. हे कॉलेज फार दिवस चालले नाही. पुढे १९४७ साली डॉ. भा. पां. हिवाळे यांनी अमेरिकन मिशनच्या हॅरीस हॉल म्हणून शहराबाहेरील इमारतीत अहमदनगर कॉलेजची स्थापना केली.

मिशनरी शाळांमधून शुभवर्तमानप्रसाराची धास्ती घेतल्याने मिशनच्या शाळेत ख्रिस्तेत्तर मुले जाण्यास तयार नसत म्हणून १८५४ पासून सरकारी व खाजगी शाळा निघू लागल्या. १८३३ ते १९५० पर्यंत या शाळांची संख्या १९ पर्यंत पोहोचली होती. त्यात उर्दू शाळा, गुजराथी शाळा, तेलुगू शाळा व हरिजनांसाठी वेगळी शाळा यांचा समावेश होता. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात अनेक शाळांमध्ये हरिजनांना प्रवेश मिळू लागला. खेड्यापाड्यातील विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यासाठी अनेक दानशूर व्यक्तींनी जातीनिहाय वस्तीगृहे सुरु केले. अहमदनगरमधील सरकारी शाळा भरवस्तीत सुरु झाल्याने बहुतेक शाळांना क्रिडांगणे नव्हती. म्हणून १९१० साली सरकारने एन. एम. वाडिया या मुंबईतील दानशूर ट्रस्टच्या मदतीने १९१५-१६ साली वाडीयापार्क पॅव्हेलियन' बांधून क्रिडांगणाची समस्या दूर केली.

राष्ट्रीय चळवळीच्या कालखंडात शिक्षणाच्या अनेक सोयी व शिक्षण घेण्याच्या उर्मी अनेकांच्या ठायी निर्माण झाल्या. त्यामुळे सुशिक्षितांचे प्रमाण वाढले. शिक्षण पूर्ण झाल्यावर वकिल व डॉक्टर होऊन समाज सेवा करण्याचे व्रत अनेकांनी अंगिकारले.

अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास या विषयावर सुक्ष्मपणे संशोधन केल्यानंतर ठळकपणे काही निष्कर्ष आढळून आलेले आहेत.

लॉर्ड वेलस्लीने १८०३ साली अहमदनगर किल्ला हस्तगत केला.

ब्रिटीशांना १८८२ सालापर्यंत कोळी व भिल्ल या आदीवासींच्या उठावांना सामोरे जावे लागले. भेदनितीने आदीसींचे उठाव इंग्रजांनी दडपले.

छत्रपती चौथे शिवाजी महाराजांची अहमदनगरमध्ये झालेली हत्या ही घटना अहमदनगरमधील जनतेच्या मनात राष्ट्रवादी वृत्ती जागृत करण्यास कारणीभूत झाली.

३१ मे १९१६ रोजी ईमारत कंपनीच्या पटांगणात लो. टिळकांनी ' स्वराज्य माझा जन्मसिध्द हक्क आहे, तो मी मिळवणारच हा स्वतंत्र्याचा महामंत्र दिला. या घटना अहमदनगरवासियांना प्रेरित करणाऱ्या होत्या.

दलितांसाठी मंदिर प्रवेश, दलित वस्ती स्वच्छता, दलितांसाठी शाळा, सार्वजनिक हळदी-कुंकू व सत्यनारायण, पाणवठे खुले करणे, या अहमदनगरमधील अस्पृश्यता निवारण चळवळीतील महत्वाच्या घटना होत्या.

'चलेजाव' आंदोलन काळात पंडित नेहरु, सरदार वल्लभभाई पटेल, इत्यादी एकूण बारा प्रभूती अहमदनगरच्या किल्ल्यात २० एप्रिल १९४५ पर्यंत बंदिवासात होत्या. या वास्तव्यात पंडित नेहरुंनी 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' ग्रंथ लिहिला.

१९३२ सालच्या सत्याग्रह चळवळीत यमुनाबाई कडूसकर, हंसाबाई चांदेकर, शांताबाई हिरे, दुर्गाबाई जोग, शांताबाई कुलकर्णी सुलोचना बडदे, या स्त्रियांनी सहभाग नोंदवला. १९४२ च्या चले जाव लढ्यात जाई बाई राठोड ही ख्रिश्चन महिला, फातेमाबेन ही मुस्लिम महिला याखेरीज राधाबाई देशमुख, सुगंधाबाई औटी, इत्यादी स्त्रियांनी सहभाग नोंदवला.

लो. टिळक, वि. दा. सावरकर, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल, ॲनी बेझंट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, वी. रा. शिंदे, महात्मा जोतिबा व सावित्रीबाई फुले, ना. वा. टिळक, बालकवी इत्यादी सामाजिक, राजकीय, साहित्यीक क्षेत्रातील लोकांचे दौरे व वास्तव्य अहमदनगरमध्ये होते.

अहमदनगरचे गांधी मैदान राजकीय कार्यक्रमांचा बालेकिल्ला तर बागडे थिएटर सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे महत्वाचे व्यासपीठ होते.

स्वातंत्र्यलढयाच्या कार्यकाळात वटहुकूमबंदी, रस्ता सत्याग्रह, झेंडावंदन, जालियनवाला बाग दिन, प्रभात व सायंफेरी, पाटील दरबार प्रचार, रॉकेल, साखर, पेट्रोल, परदेशी वस्तू, सरकारी शाळा, विलायती औषध इत्यादीवर बहिष्कार इत्यादी सत्याग्रहांचे प्रकार अहमदनगरमध्ये सुरु होते.

निजामशाही काळात देशी व परदेशी मालाचे अत्यंत महत्वाचे शहर म्हणून अहमदनगरची ख्याती होती. निजामशाहीच्या उतरत्या काळात ते महत्व सुरत शहराला प्राप्त झाले.

राजकीय स्थिरता आल्यावर ब्रिटीशांनी येथील सावकारी पध्दतीला आळा घातला.

१८२२ ते १८४२ या काळात ईस्ट इंडिया कंपनीने महाराष्ट्रात संकरीत पशुधन विकास धोरण राबविले. म्हैसूरहून 'हनम' जातीच्या गायी शेतकऱ्यांना नाममात्र दराने उपलब्ध करुन दिल्या. खानदेश, गुजरातहून उत्तमप्रतीचे बैल, मागवून शेतकऱ्यांना पुरविले. त्या बैलापासून नवीन संकरीत बैल पैदा करणाऱ्या शेतकऱ्यांचा बक्षिस देऊन त्यांना सन्मान केला. सरकारने महाराष्ट्रातील दळणवळण विकास व कृषि उत्पन्न वाढविण्यासाठी उचलले हे महत्वाचे पाऊल होते.

अहमदनगरला 'टांग्याचे गाव' म्हणत. दरवर्षी सरकार उत्तम घोडे, गाई, बैल, म्हशींचे प्रदर्शन भरवत असे. त्यातून लोकांना उत्तम प्रकारची जनावरे उपलब्ध करुन देण्याचा उद्देश असे.

सतत पडणारे दुष्काळ, परप्रांतातून आलेल्या व्यापाऱ्यांच्या व्यापारी कौशल्याचा प्रभाव, अहमदनगरहून जाणारी दौंड मनमाड रेल्वे, नरीमन विजनिर्मिती केंद्र यांचा परिणाम येथील पारंपारिक व्यवसायावर पडलेला दिसतो. हातमाग, धातूंचे ओतकाम, वाद्य व भांडी बनवणे, सुतारकाम, या धंद्यातील तांबटकर, कासार, मुसलमान, पद्मसाळी, गुरव, यांचे व्यवसाय डबघाईस आले.

दोन महायुध्दांच्या दरम्यान अनेक नवीन सहकारी पतपेढ्यांचा व सहकारी बँकांचा उदय झाला. सहाकाराने नवीन उद्योगांना चालना दिली. इमारत कंपनीने सहाकरी तत्वावर अल्प दरात व्यावसायिकांना गाळे पुरवून अहमदनगरची क्रयशक्ती व गरजा मर्यादित राखवून अहमदनगरची बाजारपेठ स्वस्त ठेवण्यात योगदान दिले.

विविध विव्हिंग मिल्स, टायपिस्ट, पॅसेंजर मोटार कंपन्या, बिस्कीट कारखाने, बेकरी, मेवा मिठाईची दुकाने, गॅसबत्ती, घड्याळे, लॉन्ड्री, फोटोग्राफी अशा नवीन व्यवसायांचा आर्थिक जीवनात समावेश झाला.

'दुधदुभत्याचे गाव' अशी ओळख असणाऱ्या अहमदनगरमध्ये मेवा मिठाईची दुकाने मारवाडी व गुजराथी व्यापाऱ्यानी सुरु केली. ब्रिटीशांचे सैन्य व परदेशी मिशनऱ्यांसाठी पाव, लोणी, बिस्कीटे या वस्तू बनविणारी बेकरी सरोष टॉकीज जवळ सुरु झाली, पुढे 'प्रभात' ही शाकाहरी बेकरी सुरु झाल्याने बेकरी पदार्थाचा समावेश अहमदनगरच्या अन्न पदर्थात झाला.

अहमदनगर शहराच्या स्थापनेपासून ५०० वर्षाच्या काळात येथे एकूण बारा मोठे दुष्काळ पडले. कॉलरा, पटकी, व प्लेग दुष्काळात हातात घालून येत. सरकार दुष्काळात साऱ्यात सूट, अन्नछत्र दुष्काळी कामे, दुष्काळी छावण्या, मुले, वृध्द, रुग्णांसाठी कंगालखाने, औषधोपचार व डॉक्टरची डॉक्टरची व्यवस्था उपलब्ध करत.

दुष्काळात मिशनऱ्यांनी अनेक लोकांच्या अन्न, वस्त्र निवाऱ्याचा प्रश्न सोडविला. प्लेग निवारणासाठी प्लेगची लस स्वत: टोचवून घेतली, प्लेग बाधीतांची सेवा, त्यांच्यासाठी प्रार्थना केली.

सर्व जातीधर्माच्या समाजाने 'आणा फंड' उभारुन दुष्काळग्रस्तांना मदत केली. दुष्काळ फंडात अफरातफर करणाऱ्या लोकांना कडक शिक्षा झालेल्या दिसतात.

दुसऱ्या महायुध्द काळात अन्न तुटवडा, काळाबाजार, भ्रष्टाचार दूर करण्यासाठी अन्न परिषद भरवली. जिल्हा धान्य कमिटी स्थापून ठोक धान्य विक्रीवर निर्बंध आणले. साखर, तेल, धान्य, सरकारी शिक्का नसलेले कापड यावर नियंत्रण ठेवले. साठेबाज व्यापाऱ्यांना शिक्षा केल्या. माफक दरात जिवनावश्यक वस्तू प्राप्त होण्यासाठी 'फेयर प्राईज ग्रेन शॉप' कमिटी स्थापली. हे सरकारी उपक्रम कौतुकास्पद होते.

बंगालमधील तीव्र दुष्काळाची जाणीव होऊन अहमदनगरच्या व्यापाऱ्यांनी 'बंगाल मदत खेड जिल्हा समिती' स्थापन करुन अहमदनगर जिल्ह्यातून मिळणाऱ्या आर्थिक मदतीवर चार महिने दुष्काळी बंगालसाठी अन्नछत्र चालविले.

मिशनरींनी येथील स्त्रियांना लेखन, वाचन, शिवण, स्वच्छता, आरोग्य, बालसंगोपण याचे ज्ञान देण्यासाठी स्त्रियांचा क्लब सुरु केला.

धर्मांतराच्या भितीने अहमदनगरचे लोक नेटिवांना सार्वजनिक हौदावर पाणी भरण्यास मज्जाव करत. या प्रकरणात इंग्लंडच्या राणीला हस्तक्षेप करावा लागला. त्यामुळे धर्मांतरीत ख्रिस्ती लोकांना सर्वाजनिक हौदावर पाणी भरुन दयावे असा सरकारी फतवा निघाला. अहमदनगरचे पाणी प्रकरण देश विदेशात गाजले.

१८४२ साली अहमदनगर येथून सुरु झालेले 'ज्ञानोदय' वर्तमानपत्राने अखिल मानवजातीच्या उध्दाराचे कार्य केले. खुद्द राजवाडेंनी 'सामाजिक इतिहास अभ्यासण्याच्या दृष्टीने ज्ञानोदय महत्वाचे आहे' असे सांगितले. ब्रिटीश आल्यानंतर येथील सुशिक्षित लोकांवर 'विज्ञान' व 'ख्रिस्तप्रेरित मानवतावाद' या दोन गोष्टींचा मोठा प्रभाव राजाराम राजा माममोहन रॉय पासून महात्मा गांधींपर्यंत पडलेला दिसतो.

स्त्रिया व शुद्रांच्या शिक्षणासाठी महात्मा फुलेंना मिळालेली प्रेरणा, Work is worship हे सुश्रुषेचे परोपकारी सूत्र, विठ्ठल रामजी शिंदेंच्या 'डिप्रेस्ड् क्लास मिशन' मधील 'मिशन'ची कल्पना इत्यादी मिशनऱ्यांची देण होती.

शिक्षण प्रसाराचा उगम, अस्पृश्य चळवळीचा उगम, जातीभेद निर्मूलन, रुढी परंपरावर आघात, सामाजिक प्रश्नांवर निबंध स्पर्धा, ज्ञानेच्छू सभेमार्फत सामाजिक प्रश्नांवर चर्चा, स्त्रियांच्या प्रश्नाबाबतची तळमळ, धर्मचिकित्सा यांचा वस्तूनिष्ठपणे अभ्यास करण्यासाठी ज्ञानोदयचे सहाय्य होते.

१८९४ साली 'साल्वेशन आर्मी'द्वारे चालवला जाणारा 'दगडी दवाखाना' म्हणजे 'ईव्हॅन्जेलीन बूथ' हॉस्पिटल मिशनऱ्यांनी केवळ स्त्रिया व मुलांसाठी चालवलेले पहिले रुग्णालय व डॉ. जुलिया बिसल  तेथील व अहमदनगरमधील पहिल्या महिला डॉक्टर

होत्या. डॉ. ह्यूम यांच्या प्रयत्नाने अमेरिकेतील महिला मंडळाने इमारतीसाठी निधी गोळा करुन पाठविला त्यातून रुग्णालयाची दगडी इमारत उभा राहिली.

अहमदनगरमधील रंगूबाई या ब्राम्हण बालविधवेचा बाळाजी या राहुरीच्या पोलिस खात्यातील पट्टेवाल्याशी १८६१ मध्ये रे. विष्णू भास्कर यांच्यामार्फत झालेला विवाह अहमदनगरमधील पहिला पुनर्विवाह आहे असे दिसते.

परिवर्तनवादी चळवळीचा उगम शोधण्यासाठी ख्रिस्त धर्म चळवळ अभ्यासावी लागते.

मुस्लिम धर्मातील जगप्रसिध्द 'ताबूत' व 'सवारी' हिंदू समाजाच्या सहभागाशिवाय पूर्ण होत नाही. लिंगायत समाजातील 'सगर', मारुती मंदिरासमोरील ‘पचंबा’,’दिवाळी,’ ‘कोजागिरी’, ‘बागल पंडुगु’ हे सण, उत्सव, उरुस धार्मिक एकजिनसीपणाची साक्ष देतात.

ज्ञानोदय, न्यायसिंधु, वृत्तवैभव, नगरसमाचार येथील नावाजलेली वृत्तपत्रे होती. त्याकाळी वर्तमानपत्रास पगारी संपादक नेमण्याची प्रथा नव्हती. लेखक हौसेने लेख पाठवत. वर्तमानपत्राचे सामूहिक वाचन व चिंतन आवडीचा विषय असे.

स्वातंत्र्य चळवळ काळात संदेश, इन्कलाब, देशबंधू इत्यादी वृत्तपत्रे राष्ट्रीयतेची निदर्शक होती.

अहमदनगरमधील वाङ्मय चळवळ आघाडीवर होती. येथील मातीत अनेक संत, कवी, साहित्यिकांचा उदय झाला. फादर स्टिफन्स, रे. ना. वा. टिळक, लक्ष्मीबाई टिळक, बालकवी ठोंबरे, पंडित जवाहरलाल नेहरु, दुर्गा भागवत, सरोजनी बाबर, भा.द. खेर अशा अनेक साहित्यिकांनी अहमदनगर येथील वास्तव्यात उल्लेखनीय कामगिरी बजावली.

शाहू मोडक, रामचंद्र चितळकर (सी. रामचंद्र) रामनगरकर, मधुकर तोरडमल पुढील काळातील सदाशिव अमरापूरकर असे अनेक कलावंत अहमदनगरने भारतीय कलाक्षेत्राला दिले.

१९२८ साली स्थापन झालेल्या वाङ्मयोपासक मंडळाने अहमदनगरजिल्ह्यातील वाङ्मयाची अभिरुध्दी वाढवून, प्राचीन व ऐतिहासिक वाङ्मयाचे परिशिलन केले. त्यास प्रसिध्दी दिली. येथील लेखकांना प्रोत्साहन दिले.

१८३८ साली स्थापन झालेल्या अहमदनगर वाचनालयाने  पुस्तकांचा संग्रह करुन विविध तज्ज्ञ मार्गदर्शकांची  व्याख्याने आयोजित केली. ती व्याख्यानाची परंपरा आजही सुरु असलेली दिसते. तर १९०७ साली स्थापन झालेल्या सनातनधर्मसभेने अहमदनगर जिल्हा व शहरातील सनातन वैदिक धर्माची वाढ होण्याच्या दृष्टीने धार्मिक, संस्कृत व प्राकृत हस्तलिखिते यांचा संग्रह करुन धार्मिक वाङ्मयाची निर्मिती व जोपासना केलेली दिसते.

मिशनऱ्यांनी स्वप्राण धोक्यात घालून कॉलरा, प्लेग, कुष्ठरोगादींवर विनामूल्य औषधोपचार पुरविले. रोग निवारणाच्या पारंपारिक उपासना, जप, तप, देवपूजा, शांती, दान, ब्राम्हण भोजन, कर्मकांडादी, उपायातील पोकळपणा लोकांसमोर मांडला. रोगांवरील उपाययोजना, रोगांची शस्त्रक्रिया लोकांपर्यंत पोहोचविल्या. अपंग, रुग्ण, वृध्द, समाजबहिष्कृतांसाठी अनाथालय स्थापून मोफत सेवा सुश्रुषा केली. त्यासाठी त्यांनी शिक्षण हे माध्यम वापरले.

मिशनरींच्या शैक्षणिक प्रयत्नामुळे समाजातील सर्व थरातील मुलामुलींना शिक्षणाची कवाडे खुली झाली. विशिष्ट वर्गात बंदिस्त असलेले शिक्षण अनेक अंगांनी प्रवाही बनले.

जातीय अभिसरणाला शिक्षणाच्या माध्यमातून गती मिळाली.

मौखिक परंपरेचे महत्व कमी होऊन लिहिण्या, वाचण्यास महत्व आले.

आधुनिक काळात उत्तम जीवनपध्दतीचा स्विकार करायचा असेल तर शिक्षण अपरिहार्य आहे. हे समाजधुरिणांच्या लक्षात आले.

इंग्रजी पध्दतीच्या शिक्षणामुळे इंग्रजी भाषेतून आलेले ज्ञान, विचार, विज्ञान, इत्यादी विषयावरील ग्रंथ वाचून येथील लोकांची अस्मिता जागृत झालेली दिसते. आपली भाषा,

जीवनपध्दती, संस्कृती, परंपरा आदींचे थोरपण पुन्हा एकदा नव्या निकषांवर तपासून घेण्याची गरज निर्माण झाली. त्यासाठी लागणाऱ्या वस्तूनिष्ठ संशोधनाचे ज्ञान इंग्रजीतून पराकाष्ठेने मिळविणारे संशोधक निर्माण होऊ लागलेले दिसतात.

मिशनरी व इंग्रजांनी चालवलेल्या शाळांतून शिक्षण घेतलेल्या विद्वानांना स्वातंत्र्याची, राष्ट्रप्रेमाची अस्मिता निर्माण करण्यास हे शिक्षण अपुरे वाटू लागले. म्हणून अहमदनगरमध्ये त्यांनी 'अहमदनगर एज्युकेशन सोसायटी', 'राष्ट्रीय पाठशाळा', 'आयुर्वेद महाविद्यालय' ची उभारणी केली. नानासाहेब मिरीकरांनी ‘अहमदनगरचा इतिहास’ लिहून प्रादेशिक अस्मिता जागृत केली.

नव्या शिक्षणामुळे आणि ज्ञानामुळे अहमदनगर परिसरातील नवशिक्षितांची दृष्टी व्यापक होऊन त्यातून नव्या सामाजिक, औद्योगिक व राजकीय चळवळींना वेग आला. सुधारणावाद्यांनी पाश्चात्य संस्कृती परंपरांना भारतीय संस्कृतीच्या चौकटीत बसवून स्विकार केल्याने सांस्कृतिक संक्रमणाला सुरुवात झाल्याचे दिसते.

# निवडक संदर्भ - साहित्य-सूची


## अप्रकाशित प्राथमिक साधने

### १. मराठी

१.अहमदनगर नगरपालिका वार्षिक अहवाल सन १९३०-१९५०

२.अहमदनगर नगरपालिका  मराठी व इंग्रजी रेकॉर्ड फाईल

३. पेशवे दफ्तर, जाहिरनामा, संशोधनासाठी निवडलेले कागदपत्र,१४/६५७७

४. भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, केळकर य. न., खाजगी संग्रह,

## प्रकाशित प्राथमिक साधने

### १. मराठी

**१.** खानोलकर गंगाधर देवराव, १९ व्या शतकातील महाराष्ट्र,औरंगाबाद, १९७५

२. संदेश समकालीन वृत्तपत्रे (सप्ताहीक, अहमदनगर, १९३९ ते १९५२)

३. ज्ञानोदय समकालीन वृत्तपत्रे (सप्ताहीक,अहमदनगर, १८४२ ते १९४७)

४. हिवाळे भा. पां. (संपा), ज्ञानोदयाची पहिली १०० वर्षे, १८४२ ते १९४१, मुंबई, १९४२

### २. English

1. American Marathi Mission, Ahmednagar Station Report,Ahmednagar 1911
2. Clark A. H., The Ahmednagar Christian Community,Ahmednagar,1927
3. Clark A. H., The Indian Mission Board, Ahmednagar, 1927
4. Dr. Hume, Fundamental Facts and figures, Ahmednagar, 1991
5. Devadhar G.k. map of India, Ahmednagar, 1910,
6. Hazen William, a Century in India, Bombay, 1913B.
7. Indian design and Interiors Dec-Jan, Ahmednagar, 2004

8. Rose Isabel B., Rpse Something Attempted Something Done, Mysore, 1927

9. Rev. and Mrs., Wright H. K., The Union Training School, Ahmednagar, 1930

10. Wheeler Wendell mr. mrs. helping India grow, report of the American Marathi mission for 1930-31, Ahmednagar,

## Secondary Sources

### English

1. Chopra P. N., Quit India movement of 1942,Delhi,1980

2. Chaudhari K. K., Maharashtra and Indian freedom struggle, Mumbai, 1985

3. Chandra Bipin, Modern India, NCERT, New Delhi 1971

4. Tarachand, History of the Freedom movement in India, (vol. 4), New Delhi 1972

## दुय्यम साधने

१. आठवले सदाशिव, उमाजी राजे मुक्काम डोंगर, पुणे, १९९१

२. उगले जी.ए., ज्ञानोदय आणि महात्मा फुले, वर्धा, २००४

३. ओक प्रमोद, एलफिन्स्टन, पुणे, १९९०

४. ओतुरकर रा.वी., घारे पां. श्री., भारतीय राज्यघटनेचा सोपपत्तिक इतिहास, पुणे, १९७२

५. कुलकर्णी ल. ग., कासेगावकर वैद्य, सातारचे प्रतिसरकार : स्वतंत्र्यलढ्याच्या स्मृती, मुंबई, १९८८

६. केतकर कुमार, कथा स्वातंत्र्याची, पुणे, १९८५

७. केळकर श्रीपाद, छोडो भारत, १९४२ काही महत्वाच्या घटना व कार्यक्रम, मुंबई,

१९६०
८. ऋषी पी.डी. १०० वर्षांतील नगरचे बदलते समाज जीवन, १९०१ ते २०१४, प्रथम आवृत्ती अहमदनगर २०१६
९. त्रैमासिक, इतिहास संशोधन प्रदीप, अहमदनगर, १९८५
१०.कऱ्हाडकर, के. सी., बाबा पद्मनजी काल व कर्तृत्व, मुंबई, १९७९
११.जावडेकर शं. दं आधुनिक भारत, पुणे, १९३८
१२.गवंडी पुंडलिक, लालसूर्य, पुणे, २००४
१३.गिंडे वासुदेव पुरुषोत्तम, बालकवींची कविता : एक रसास्वाद, बेळगाव, १९७२
१४.टिळक लक्ष्मीबाई, स्मृतिचित्रे, पाचवी आवृती, कोल्हापुर,२०१३
१५.तारकुंडे सिताराम रघुरनाथ, बाम्हणत्तेर व मराठे याच्या चळवळीचा पूर्वतीहास, मराठ्याची पुर्वपीठिका पुणे, १९२२
१६. देवचक्के अनिरुध्द, अच्युतराव पटवर्धन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, मुंबई, २००५
१७. दीनमित्र सिल्व्हर ज्युबिली अंक-२६ जाने.
१८. दीक्षित राजा, एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र मध्यमवर्गाचा उदय, पुणे, २००९
१९. देशमुख प्रभाकर, भारताची अर्थव्यवस्था, नागपूर, २००५,
२०. देशमुख गोपाळ हरी, शतपत्रे लोकहितवादी, आवृत्ती ४, पुणे, २०१६
२१. नवा महाराष्ट्र (कसा असेल - कसा असावा ) प्रकाशक - नॅशनल इन्फर्मेशन अॅन्ड पब्लिकेशन लि. मुंबई १९४८
२२. पाटील उत्तमराव, क्रांतिपर्व, धुळे, १९४७
२३. प्रधान ग. प्र., स्वातंत्र्याचे महाभारत, पुणे, १९८९
२४. पारखे ग. ह., आमचा नगर जिल्हा, पुणे, १९३१
२५. पटवर्धन रा. प., सेनापती दादा चौधरी, मुंबई, १९४०
२६. पाठक ना. वा. विठ्ठल, भारदे बाळासाहेब, जोशी सुरेश, अहमदनगर जिल्ह्यातील

स्वातंत्र्य संग्राम, प्रथम आवृत्ती अहमदनगर, १९९३

२७. पाचलग, भारतीय, राऊसाहेब पटर्वधन, प्रथम आवृत्ती २००३

२८. फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड १ ते ३, पुणे, १८८९

२९. बोरा हेमराज, अहमदनगर जिल्हा व व्यक्ती -परिचय, भाग १ ला, अहमदनगर, १९५३

३०. बोरा हेमराज, कुलकर्णी लक्ष्मण, अहमदनगर डिस्ट्रीक्ट डिरेक्टरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, १९५१

३१. बेहरे पु.रा.महाराष्ट्राचे मन -प्रकाशक बलवन्त प्रकाशक - मुंबई १९६०

३२. बागल मधवराव, बहुजन समाजाचे शिल्पकार, पुणे,१९६६

३३. भोळे भा.ल.व बेडकीहाळ किशोर (संपादक) बदलता महाराष्ट्र - आंबेडकर अकादमी, सातारा — २००३

३४. मोरजे गंगाधर, ज्ञानोदय लेखनसारसूची, खंड १ ते ३, सातारा, १९८६

३५. मेहता जे. एल., (अनु), मार्डीकर म.म., आधुनिक भारताचा इतिहास, एक प्रगत अभ्यास, १७०७ ते १८१३, पुणे, २०११

३६. मोडक रा.वि., मंडळाची संक्षिप्त बखर, प्रथम आवृत्ती, पुणे, १९६०

३७. मिरीकर या.न., नगरशहराचा इतिहास, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, १९३०

३८. मिरीकर श्रीपाद, अस्सल नगरी, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, २०१०

३९. मांडे अरुण, आपट्याचे पान, अहमदनगर, २००७

४०. यादव आनंद, ग्रामसंस्कृती, दुसरी आवृत्ती, पुणे, २००४,

४१. रेगे मे. पं., विवेक आणि न्याय आधुनिक महाराष्ट्रातील प्रबोधन पर्व, पुणे, २००२

४२. रेगे मे.पुं., परंपरा आणि परिवर्तन, प्रथम आवृत्ती, वाई, १९९४

४३. लाड जी. दी., पेटते पारतंत्र्य धुमसते स्वातंत्र्य, पुणे, १९८६

४४. लेले,रा.का.-मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, १९८४

४५. लांडे सुमती, पैस, ७० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, अहमदनगर, १९९७

४६. वाळींबे रा.शं., एकोणिसाव्या शतकांतील महाराष्ट्राची समाजिक पूर्नघटना, पुणे, १९६२

४७. शर्मा सुधीर, ज्ञानोदयाच्या पानातून महाराष्ट्राच्या प्रबोधनाचा मागोवा, अहमदनगर, १९९२

४८. शिरगावकर श.रा.,प्राटेस्टंट ख्रिस्ती मिशनऱ्यांची महाराष्ट्रातील चळवळ, १८१८ ते १८५८, प्रथम आवृत्ती, मुंबई, १९६५

४९. शहा घनश्याम (अनु), चिकटे प्राची, भारतातील सामाजिक चळवळी, पुणे, २००८

५०. सरकार सुमित, मॉडर्न इंडिया, नवी दिल्ली, १९८३

५१. सरदार,गं.बा.- महाराष्ट्र जीवन, (खंड २) १९६०

५२. सरदार गं.बा.महाराष्ट्र - जीवन परंपरा, प्रगति आणि समस्या , खंड-१, पुणे, १९६०

५३. हतवळणे शं. रा., एका माध्यमिक शिक्षकाचे स्व-चरित्र, पुणे, १९७८

III **स्मरणिका**

१. अहमदनगर नगरपालिका, शतसंवत्सरिक स्मारक ग्रंथ, अहमदनगर, १९५०

२. अहमदनगर एज्युकेशन सोसायटी स्मारक ग्रंथ, १९८१

VI **विशेषांक**

१. सकाळ नगर पंचशताब्दी विशेषांक

२. लोकमत नगर पंचशताब्दी विशेषांक,

३. केसरी, नगर पंचशताब्दी विशेषांक,


# अनुक्रमणिका

## स्वातंत्र्यपूर्व अहमदनगर शहराच्या परिवर्तनाचा इतिहास


| परिशिष्ट क्रमांक | परिशिष्टाचा तपशिल | पृ.क्र. |
|---|---|---|
| परिशिष्ट १ | जुन्नर परिसरातील किल्ले पाडण्याबाबतचे ईस्ट इंडिया कंपनीने माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनला दिलेले आदेश | २८५ ते २९७ |
| परिशिष्ट २ | ईस्ट इंडिया कंपनीकालीन महाराष्ट्रातील संकरीत पशुधन विकास धोरण इ.स. १८२२ ते १८४२ | २९८ ते ३१६ |
| परिशिष्ट ३ | शिवनेरी किल्ला ताब्यात घेण्याबाबत जेम्स कॅनिंगहॅम ग्रँट डफ व परशराम खंडेराव यांच्यातील चर्चेचा तपशील | ३१७ ते ३१९ |
| परिशिष्ट ४ | किल्ल्याने पाहिलेल्या राजवटी | ३२० |
| परिशिष्ट ५ | माळीवाडा वेश व त्यावरील शिलालेख | ३२१ |
| परिशिष्ट ६ | प्रथम कलेक्टर अहमदनगर हेन्री पॉटिंजर (१८१८ ते १८२५) | ३२२ |
| परिशिष्ट ७ | पंडित जवाहरलाल नेहरु दालन | ३२३ |
| परिशिष्ट ८ | सीना नदीवरचा लोखंडी पुल | ३२४ |
| परिशिष्ट ९ | दत्त मंदिर, डांगे गल्ली, अहमदनगर | ३२५ |
| परिशिष्ट १० | ह्यूम मेमोरिअल चर्च | ३२६ |

पुढे दिलेली सर्व मोडी कागदपत्रे व त्यांचे लिप्यांतर **डॉ. चंद्रकांत अभंग** (इतिहास विभाग प्रमुख, के. जे. सोमैय्या महाविद्यालय, कोपरगाव) यांच्या सौजन्याने प्राप्त झालेली आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळ, य. न. केळकर संग्रहातील अप्रकाशित पत्रे पुडका क्र. १ व पेशवे दफ्तर, पुणे येथील आहेत.

## परिशिष्ट क्र. १ - जुन्नर परिसरातील किल्ल्ये पाडण्याबाबतचे ईस्ट इंडिया कंपनीने माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनला दिलेले आदेश



श्री

१३

प. न. केळकर
खाजगी संग्रह

प. न. केळकर
खाजगी संग्रह

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

श्री

अ. नं. २८

कृपानाथ हनहि
पाटंज र साहब
बाहादर कडक
टरआ म दानगर

प. ल. [illegible]
खाजगी संग्रह

[illegible]

[illegible]


[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]



प. न. केळकर
खाजगी संग्रह

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

श्री

3-7-22

क
पाट... साहब
... कजक
... नम

[illegible]

[illegible]

श्री

प. न. फडके
खाजगी संग्रह

प. न. फडके
खाजगी संग्रह

ਮਧਜਅਸਮਪਥੰਤੇਸ ਧੀਤੁਸਮਧੇ

ਹੋਏਸੇਤੇਸਾਪਾਧੇਸੇਧਾਸੇਤੁਸਾਲਿਖਿ

ਸਧਲਾਧਿਧੇਤੁ ਲੇਕਤੇਨੁਸਮਪਸੀਰਸਦੁ

ਜਉਸਰਾਲਤੋਪਮਸੇਪਮਸੇਸਰਤੋਏਪਸੇ

ਵਤਿਪਮਸਪਨੁਪਾਧਸਾਲਸੋਰਾਗਲਚੋ

ਧਰਜਉਸਪੈਸਸਾਚਾਕਸੈਸਾਲਾਗੋ

ਸਾਸ ਉਗਸੋਗਲਧੇਲ ਨਾ ਏਸਾਡਾਪਥੇ

ਤਪਸਸਲਾਤੁਲਾਲ ਵਸਾਏਲ

ਤਥਲਾਸੁ ਸੇਸਸਾਲਾਗੋ ਤਾਏਕਾਸਲ

2 ਪੂਰਕੀਪੀਗੋਰ ਕੇਤੇ ਪਾਗਆ

ਤਿਤੇਤਸਤਸਸਲੇਤਿਏਪਾਗਸਏਤੁਪਸਸੇਤੁਪਸੁਨਥ

## परिशिष्ट क्र. १ - मधील मोडी कागदपत्रांचे लिप्यांतर

## जुन्नर परिसरातील किल्ल्ये पाडण्याबाबतचे ईस्ट इंडिया कंपनीने माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनला दिलेले आदेश

इंग्रजांनी पेशवाई संपुष्टात आणल्यानंतर महाराष्ट्रातील सर्व किल्ल्यांवर हळुवार ताबा मिळविला. ज्या किल्ल्यांच्या आधाराने छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी केली होती त्याच किल्ल्यांच्या आश्रयाने मराठ्यांनी आपले राज्य टिकविले. इंग्रजांनी पेशवाई संपुष्टात आणून प्रथमदर्शनी हे सर्व किल्ले पाडण्याची मोहिम हाती घेतली. जुन्नर परिसरातील सर्व किल्ले पाडून टाकावेत अशी आज्ञा ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या प्रशानसाने माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यास दिली याविषयीचा हा विस्तृत पत्रव्यवहार -

श्री

'कपतान हनरि पार्टनर साहेब बहादर कलकटर आमदानगर. ईजत असार रामराव नरसीव्ह कमावीसदार तालुके सीवनेर सलमहु अजतर्फे कपतान हनरी पाटंजर साहेब बहादूर कलकटर कीले आमदानगर सलाम आंकी मेहेरबा वाईट साहेब याजकडे तालुके सीवनेर येथील कोले बीतपसील.

१ कीले शीवनेर १ कीले हरिश्चंद्र

१ कीले हडसर १ कीले कुजरगड

१ कीले चावंड १ कीले जीवधन

येकूण सहा कील्याचे बंदोबस्ताचे काम मेहेरबा अलिशान बडे साहेब याचे चगदी अन्वये बाईटसाहेब करतील तुम्ही दखलगिरी न कर्णे तूम्ही कारकुन ठेवीले

असतील ते उठवून माघार आणावे बाईटसाहेब यास रुपये ११७३।।।८४ आकरासे पावणे चवऱ्यात्तर रुपये चवऱ्यांशी रसीद घेऊन कबज घ्यावे ज्यादा काय लिहिणे २।। तारीख १४ माहे जून १८१८.

श्री

'कपतान हनरि पाटंजर साहेब बाहाद्दूर कलकटर आमदानगर. इजत असार रामराव नरसीव्ह कमावीसदार तालुके सीवनेर प्र।।। जुन्नर सलमहु अजतर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब बहादूर कलकटर कीले आमदानगर सलाम आंकी तूम्ही पत्र पाठविले ते पावले पत्री मजकूर की तालुके सीवनेर वगैरे साहा कीले हुकुमाप्रा।। बोईट साहेब याचे स्वाधीन केले. बंडाकडील पन्नास स्वार व काही पायदळ येऊन भील व रामोसी मीलोन कसबे बापूर येथे घासदाणा घेतला. आणि दोन प्रहर रात्रीस निघोन गेले त्याचा ठीकाण नाही या प्राा च कसबे कोतूळ येथीलही पत्र आहे. तेच ब जीनस पो आहे म्हणोन लीहीले त्यास तालुके सीवनेर वगैरे साहा कीले वोईटसाहेब याचे स्वाधीन केले ते ठीकच केले. कील्याचे बंदोबस्तास पुणे पो दोनसे लोक आहेत. त्याचा इतका हजेरी वगैरे बंदोबस्त साहेब राखतील. तुम्ही त्या लोकांची दखलगीरी न करावी महाल समंधे तुम्हापासी सीबंदी आहे त्याचा बंदोबस्त तुम्ही राखून तुमचे नजीक मौजे ब्राम्हणवाडे येथे घाटात बंडवाले यांना काही भील व रामोसी वगैरे जमा करुन डोंगरात आहेत म्हणोन बातमी आहे, याजकरिता तुम्ही बहुत हुशारीने राहून महालचा बंदोबस्त राखावा व हुशारीने राहणे पुण्याहुन जाहीरनामे आले त्याज प्रो (प्रमाणे) दोन तुम्हाकडे पाठविले आहेत हे सर्वास जाहीर कराव. गाव ब गाव नका द्याव्या या प्रो (प्रमाणे) सर्वास ल्याहावे कीले हायचे छावणीचा बंदोबस्त सालाबाद सीरस्ते प्रो तुम्ही बोईट साहेब याची भेट घेऊन लोकास बरसातीत कील्यावर राखावयाची सोय यथास्थित साहेबाचे हुकुमाप्रो करुन घ्यावी छपरबंदीस मरामतीस खर्च होईल त्याची यादी लेहून जलद मुाा पाठवावी ज्यादा काय लीहीणे २ ।।

तारीख २२ माहे जून सन १८१८ हे किताबत. सही इंग्रजी हेन्री पॉटिंजर कलेक्टर जून २२, १८१८

'कपतान हनरि पार्टभीजर साहेब बहार कलकटर आमदानगर.

ईजत असार रामराव नरसीव्ह कमावीसदार ताा सीवनेर व प्रांतजुन्नर सलमहु अजतर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब कलकटर कीले आमदानगर सलामआंकी तुमचे प्रांतात किले पाडावयास कपतान इस्टनस साहेब बहादूर आले आहेत त्यास दूध वगैरे जो हम जिनस लागेल तो खुष खरेदी मोलास देत जाणे कमत्ती न करणे ताकीद स जाणीजे तेरीख १८ माहे दशंबर सन १८१८ इसवी.

सही —इंग्रजी हेनरी पॉटिंजर'

श्री

'कपतान हनरि पाटंजर साहेब बाहाद्दूर कलकटर आमदानग. हसबुल हुकूम कपतान हनरी पाटंजर साहेब बहादूर कलक्टर कीले आमदानगर, ताा मोकदमान देहाय प्रांत जुनर व माहालनिहाय सुभे आमदानगर मालूम बहादरी वीला पांत मजकुरी कीले पाडावयास कपतान इस्टनस साहेब बाहदूर आले आहेत. त्यास दूध वगैरे जो हमजीनस लागेल तो खुष खरेदी मोलास देत जाणे कमती न करणे ताकीद सख्त जाणीजे २ ।। तेरीख १८ माहे दशंबर सन १८१८ इसवी.

इंग्रजीत सही हेनरी पॉटिंजर

श्री

'कपतान हेनरि पाटंजर साहेब बहादर कलकटर आमदानगर. इजत असार रामराव नरसीव्ह कमावीसदार ताा सीवनेर सलमहु अजतर्फ कपतान हनरी पाटंजर साहेब बहादूर कलकटर कीले आमदानगर सलामआंकी तुम्ही अर्जदास्ती पाठविल्या त्या पावल्या त्याचे बी पतसील कलमे

१ बहुट्याचा वेळू पाठविला तो पावला १ ते दी १२ दीशंबरची अर्जीत लीहीले की पूणीयातून मेहेरबान इंजेनर वीष्णूजी साहेब कीले नारीयणगडास आले आहेत. कीले पाडावयाकरिता आले तूर्त कीले मजकूर लिहून विनंती शेवेसी पाठवितो. कीले नारायणगड पाडीतात तेथे दफेदार व कारकून व जवान मिलोन सत्तावीस आहेत. त्यास नगरास पो कीवा बडतर्फ करावे. येवीसीची आज्ञा जाहाली पाहिजे. कीले मजकूरावर दारु व तोफा लाहान व जेंजेला व बंदुका वगैरे सरंजाम जकीरा आणून जुनरास ठेवावा किंवा कसे करावे येवीसीची आज्ञा जाहाली पाहिजे म्हणोन लिाा. त्याजवरुन तुम्ही जकीरा वगैरे कील्यातील कीले सीवनेरीस ठेवावा. तोही कीला पाडावा आसे जाहाल्यास जुनरास आणोन ठेवावे. सीबंदीचे लोक कील्यातील साहेबांनी कीला पाडल्यानंतर देतील ते हुजूर पाा जाणे. २ सदरहू दोन कलमे लिहिल्याप्रमाणे अमलात आणून हुशार सरकार हुकूमाप्रमाणे राहाणे जाणीजे. तारीख १५ माहे दीशंबर सन १८१८ इ. सर्व.


इंग्रजीत सही - हेनरी पॉटिंजर कलेकटर.


डिसेंबर १५, १८१८


र।। ते दी. १८बार माहे दिशंबर. सन १८१८.


**परिशिष्ट क्र. २ ईस्ट इंडिया कंपनीकालीन महाराष्ट्रातील संकरीत पशुधन**


**विकास धोरण इ.स. १८२२ ते १८४२**


























नकल (३१)

[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]







## परिशिष्ट क्र. २ मधील मोडी कागदपत्रांचे लिप्यांतर

### ईस्ट इंडिया कंपनीकालीन महाराष्ट्रातील संकरीत पशुधन विकास धोरण इ.स. १८२२ ते १८४२

सु ॥ सीन अशरीन मैयातैन व अलफ सन १२३५ फसली, इ.स. १८२५ जाहीरनामा सरकार दैलतमदार कंपनी इंग्रज बहादूर विद्यमान जान अर्दीव डनलोकसाहेब इस्कोयर बहादूर कलकटर सुभे अहमदनर सु ॥ सीत अशरीन मैयातैन व अलफ सन १२३६ फसली सुभे मजकुर येथील सर्व बडे लोक व कुणबी व अवांतर बैल घेणार देणार लोक वैगरे रयत लोक गावगना माहालानिहाय या सर्व लोकांस मालूम होण्याकरीता लिहिले जाते जे या मुलकात गुरांची पैदास चांगली होणे असे सरकारात हनराबल गौरनार कोसलबाहादूर यांनी इच्छा धरुन खाली लिहील्याप्रमाणे बंदोबस्त केला आहे ती कलमे.

१. खानदेशातील खोंडसर १० दाहा व गुजराथी कोकरेना तालुक्यातील खोंड सर १० ऐसे चांगले वीस खोंड आडेल म्हणजे न बडविलेले बैल आणवीले आहेत ते आल्यावर जागजागा सुभे मजकुरचे तालुक्यात ठेविले जातील त्याची खबरही दिल्ही जाईल की अमुक ठिकाणी अमुक माणसाचे गुराचे खिलारात सरकारचे खोंड आहेत आणि त्या ठिकाणीच आसपासचे लोकांनी चांगल्या अरोगी तरण्या गाई व कालवडी माज करतील तेव्हा सरकारचे खोंडाकडे नेवून फलवित जाव्या यास खर्च काही लागणार नाही व चांगल्या जातीच्या जनावरापासून वासरेही चांगली होतील. ज्या जमीनीचा व पाण्याचा व वाण्याचा काही गुण नाही, परंतु या मुलकात कोणी लोक काही नवस करुन आपले घरचा खोंड पोळ सोडीतात त्या पोळ्यास च्यार महिने पावसळ्यावाचून आठ महिने पोटास मिळत नाही व त्याजला कोणी बाळगीतही नाहीत. सबब तो पोळ अगदी खराब होतो, याजकरीता त्या वाईट पोळापासून जी वासरे होतात ती लहान व खराब व कमकुवत होतात. याजकरीता सर्व गावचे पाटील लोकास ताकीद केली जाती की हाली आपले गांवात जे कमकुवत खराब अथवा बेमासलेदार पोळ अडेल असतील ते मांग लोकांकडून आंड बडवुन सोडून देणे आणि ऐसे ऐंदाही कोन्ही सोडणे जाहाले तरी त्याणे डच जातीचा पाहून ज्याणे सोडावयाचा त्याने

बैल चांगला बाळगुन मोठा करावा, ऐसे केल्यावाचून सोडून दिल्यास वर लिहील्याप्रमाणे त्या बैलाचे आंड बडवीले जातील.

२. कलम दुसरे बैल चांगले उत्पन्न व्हावे ऐसे सर्व लोकांचे मन लागले याजकरीता आजपासून दरवर्षास आश्वीन शुध्द १५ ते दिवशी सुभे मजकुराचे सरहदेतील ज्या लोकांची खुसी असेल त्याणी आपलाले बैल घेवून नगर मुकामी यावे तेथे जडजसाहेब व कलकटरसाहेब व चांगले पारख करणार पाटील वैगरे लोक ज्याचे बैल दाखवावयाचे नसतील ते लोक तपास करुन खाली लिहिल्या प्रमाणे वर्षा इनाम बक्षीस देवीतील.

१. जी जोडी असीचे मापे बारा मण गहु भरलेली गाडी दीड कोसाच्या टप्पा चालून आधी घेवून येतील त्या जोडीस शंभर रुपये नख्त अवि वसर ज्या धान्याची जसी खुसी असेल तैसे मिळले.

२. सदर जोडीच्या मागे जी जोडी येईल त्यास सदरहूप्रमाणे पन्नास रुये अथवा वसर मिळेल.

३. सिवाय जी जोडी सर्वापेक्षा मोठी असे ओझे ओढुन पाव कोस उभे राहिल्यावाचून येतील त्याजलाही शंभर रुपये अथवा वसर मिळेल.

४. गोऱ्हा सहादाती सर्व पारखणाराचे पारखीस सर्व गोऱ्ह्यामध्ये चांगला येईल त्याजला शंभर रुये अथवा वसर मिळेल.

५. सदरहू उमरेची गाय सर्व गाईमध्ये पारखणारांनी पसंत करतील त्या गाईचे धन्यास पन्नास रुये मिळतील.

सदरहु लिहीले मतलबावर नाजर ठेवून सर्व लोकांनी याचा विचार करुन जनावरांची पैदास व त्याची नीगा करुन गोऱ्हा अथवा गाई उमेदीस आले म्हणजे ज्याची खुसवी असेल त्याणे अहमदनगर मुकामी दरवर्षास लिहिल्या दिवशी घेवून येत जाणे २ ॥ तारीख २७ माहे संप्टेबर सन १८२५ इसवी.

जान डनलाप

कलेक्टर

पुरंदरे दफ्तर

अभिलेख क्र. ३७

दि. २७.०९.१८२५

जाहीरनामा सरकार दौलतमदार कुंपनी इंग्रज बहादूर वीा ज्यान आद्रीवडनलोप साहेब इस्कोयर बहादूर कलकटर सुभे अहमदनगर सुा सीत अशेरीन मयातैन व अलफे सुभे मार येथील सर्व सिलेदार व पशु घोड्या पाळणार लोक व कारवान सवदागर लोक वैगरे सर्व रयत लोक गावगनै माहालनिहाये या सर्व लोकास मालूम होण्याकरीता लिहिले जाते अैसीजे सरकार मेहेरबान होऊन या मुलकात घोडे चांगले पैदा होवया करीता ईलायेताहून व आरब स्थानातून टोके, कोके घोडे चांगले आणोन सुभे मजकुरी पाच पाठविले आहेत त्यापैकी येक अहमदनगरी ठेविला आहे व येक नेवाशास गंगथडी घोड्याकरीता ठेविला आहे व येक सीरुर घोडनदीचे काठी कर्डे तालुक्यातील आहे तेथे भीवर थडी माहावाना करीता ठेविला आहे. तरी ज्याची घोडी मादवान भरावयाची असेल त्याने सदरीन लिहील्या ठिकाणीहून जो ठिकाणा त्यास जवळ पडेल त्या ठिकाणास नेऊन भरुन नेत जावी वोके घोड्यास चंदी मसाला वैगरे काही देणे लागणार नाही व सरकारकडे उमदे, येमजे घोडे उत्पन्न होतील त्याची वाजवी कींमत हमेशा सरकारचे तुरुक स्वाराकरीता सरकारचे मो......दरवरशास खुद...........वर्शाचे..........प्रतीवर्शी नगर मुक्कामी........ र्णीमस पाहणी होत जाईल आणि तेथे जज्जसाहेब व कलकटर साहेब व आणखी घोड्याची परीक्षा करणार अैसे सरदार लोक सरकारचे हुकूमाने घोड्याची परीक्षा करुन खाली लीहील्याप्रमाणे बक्षीस देण्याचा नेम ठरला आहे.

१. दोन वर्षाच्या उम्बरीवर जे घोडे उत्तम नजरेस येतील त्याचे धन्यास नख्त ४०० रुये च्यारसे अथवा वसर किंवा च्यारसे रुये याचे सोन्याचे कडे यातून जी त्याची खुसी असेल ते त्यास मिळेल.

२. त्याहून दुसरे प्रतीचे जे घोडे नजरेस येतील त्याचे धन्यास नख्त रुये ३००

३. त्याहून तिसरे प्रतीचे घोडे नजरेस येतील त्याचे धन्यास नख्त रुये २००

४. त्याहून तिसरे प्रतीचे घोडे नजरेस येतील त्याचे धन्यास नख्त रुये १००

येणेप्रमाणे सरकारचे घोडे खरेदी करणार ही दरवर्षास सदरी लिहिले ज्या पाहणीचे दिवशी हजर होऊन सरकारी कामा क......जे घोडे विकणार आसो त्यापासून वाजवी किंमत देऊन खरेदी


घेतील अशा करीता जे उत्तम घोडे उत्पन्न करीतील त्यास सरकारातून आबरु मिळेल व दुसरे विकणार असेल त्याजला नफाहालीपरराज्यातून सरकारास घोडे खरेदी करुन आणावी.......कडे .......... आपले रयतेचा ............ अैसी विच्छा धरुन वर लिहिल्याप्रमाणे ............ आहे. त्यासाठी सदर मतलाबर नजर ठेवून सर्व लोकांनी याचा विच्यार धरुन घोड्याची पैदास व निगा चांगली करुन घोडे उमेदीस आले म्हणजे ज्याची खुसी असेल त्यांनी वर लिहिले दिवसी दरवर्षास नगर मुकामी घेऊन येत जाणे २।। ते दिवस २७ माहे सप्टेंबर सन १८२५ इसवी.


सही इंग्रजी

कंपनी कालखंडात महाराष्ट्रातच प्रथमच आधुनिक संकरीत पध्दतीने घोड्याची पैदास करुन क्षमताधिष्ठीत घोडे तयार करण्यास आले. उत्तम प्रतीचे घोडे अरबस्थान. कंदहार, इंग्लंड या ठिकाणाहून आणण्यात येऊन त्यांचा संकर भीमथडीच्या तट्टानिशी करण्यात आला. त्याच बरोबर उत्तम नवीन संकरीत घोड्यांना बक्षिसे देखील ठेवली गेली व ती सरकारतही विकत घेतली गेली. त्यामुळे लोकही या नव्या पध्दतीने अनुकरण करु लागली. तत्कालीन महाराष्ट्रात गायी चांगल्या नव्हत्या तेव्हा ईस्ट इंडीया कंपनीने म्हैसुरहून चांगल्या हनम जातीच्या गायी आणून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना नाममात्र दराने उपलब्ध करुन दिल्या. तत्कालीन दळण वळणात महत्वाचे साधन म्हणजे बैल आणि बैलगाडी तत्कालीन महाराष्ट्रातील बैल सोडलेल्या पोळापासून तयार होत असल्याने कंपनीच्या अधिकाऱ्यांनी खानदेश व गुजरात या ठिकाणाहून उत्तम प्रतीचे बैल आणून ते येथील शेतकऱ्यांना उपलब्ध करुन दिले. त्या बैलाचा संकर हनम जातीच्या गार्यीशी केला व नविन गुणवत्तापूर्ण बैलांची पैदास करण्यात आली. त्या बैलांपासून नवीन संकरीत बैलांना बक्षिसे देण्यात आली आणि त्या शेतकऱ्यांना सन्मानही करण्यात आला. संकरीत उंट तयार करण्याचे केंद्र जुन्नर तालुक्यातील आळे या ठिकाणी होते तर संकरीत घोडे तयार करण्याचे केंद्र शिरुर या ठिकाणी होते. अशा प्रकारे ब्रिटीशांनी आधुनिक पध्दतीने संकरीत गुणवत्ता पूर्ण पशुधन महाराष्ट्रात प्रचलित केल्याने महाराष्ट्रातील दळण वळणाचा विकास होण्यास व महाराष्ट्रातील कृषि उत्पन्न वाढण्यास मदत झाली. परिणामी ब्रिटीशांना जास्तीत जास्त महसूल मिळविण्याचा मार्ग प्रशस्त झाला. जाहीरनामे सुस्पष्ट असल्याने वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता नाही. अशा या

जाहिरनाम्याव्दारेच कंपनी सरकारने महाराष्ट्र सामाजिक व आर्थिक परीवर्तन घडवून आणले व प्राचीन परंपरागत ग्रामीण संस्थानांही बदलण्यास भाग पाडले अशा प्रकारच्या जीवन पध्दतीबदलण्यासंबधीचे अनेक जाहिरनामे ब्रिटीश राज्यकर्त्यांनी वेळोवळी प्रसिध्द करुन गावातील ठिकठिकाणी व मोक्याच्या जागी चिकटविले, लावले. त्याच बरोबर त्याची दवंडी ही दिली जाऊन कंपनी सरकारचे धोरण लोकांपुढे स्पष्ट केले व आपले साम्राज्यवादी धोरण आमलात आणले. किती गावी जाहीरनाम्यासंबंधी दवंडी दिली त्याची नोंद जाहिरनाम्याच्या मागे पाहावयास मिळते असे हे महाराष्ट्रातील आर्थिक व सामाजिक परिवर्तनास साहयभुत व अर्थपुर्ण ठरणाऱ्या जाहिरनामा या अप्रकाशित साधनाकडे सामाजिक शास्त्राच्या व प्राणिशास्त्राच्या अभ्यासकांचे लक्ष वेधले जावे.

**परिशिष्ट क्र. ३ - शिवनेरी किल्ला ताब्यात घेण्याबाबत जेम्स कॅनिंगहॅम ग्रँट डफ व परशराम खंडेराव यांच्यातील चर्चेचा तपशील**


19629




## परिशिष्ट क्र. ३ - मधील मोडी कागदपत्रांचे लिप्यांतर

## शिवनेरी किल्ला ताब्यात घेण्याबाबत जेम्स कॅनिंगहॅम ग्रँट डफ व परशराम खंडेराव यांच्यातील चर्चेचा तपशील

"हुजूर साहेब मेहेरबावे दास्ता परशराम खंडेराव सलामत अजीस सब हनराबल मोठ दक्षवारीट ईलफीसतन (एलफिन्स्टन) साहेब बाहादूर बाद सलाम आलो येथील खैरयेत जाणून हमेशा खत कीताबत पाठउन बीन आराम करीत असीले पाहीजे दीगर अनोहेरबानाकडून त्रींबकपंत व्यंकोपंत सातरयाचे मुकामी येउन सरदार आलीशान ग्रांटसाहेब (जेम्स कॅनिंगहॅम ग्रँट डफ) यांजपासी बोलणे केले की कीले सीवनेरी सरकार कंपनीकडील सरदार याचे हवाली करीतो त्याजवरुन हाली सरदार काही लोक हमराह देउन रवाना जाले आहेत त्यास अनोहेरबानाकडून बोलावणे जाउन हवाली द्यावा जर अनोहेरबानाकडून कारकून... कंपणीकडील सरदार जात आहेत. त्याजकडून कीला मागण्यावीसी काही एक बोलणे  येणार नाही. मागाहून तो जाहला आहे तो येउन पोहचल्यावर कीला हवाली होतील तेस जाहले असता आपणकडून काही एक रवाना हालीचा सवाल जबाब आला असता कबूल होणार नाही. कीला तक्रार न करीता सरदार यांस बोलावण होउन हवाली जाला असता अनोहरबानाचे कील्याचे वगैरे माणसे कील्यावर असतील त्याचे हमराह रहदारीचे बरदास्तीचे बदल लोक पाहिजे ते सरदार आपले कडील देउन रवाना करीतील याजकरीता कलमी केले आहे तरी सरदार याजकडे कोणी कारकून पाठउन हवाली करावा. नकलेयास पुढे रवाना हलीचे बोलणे बोलावयास अनोहरबानाचे जागा राहणार नाही समजून जे करणे ते करावे २।। माहे अप्रिल सन १८३८ ई सी मु।।"

## परिशिष्ट क्र. ४

## किल्ल्याने पाहिलेल्या राजवटी




महाराष्ट्र पुरातत्व खाते, मुंबई

## परिशिष्ट क्र. ५

## माळीवाडा वेश व त्यावरील शिलालेख






'ईश्वर राजाचे रक्षण करो' या जागेवर अहमदनगरचे घनघोर युध्द चालू असताना दि. ८ ऑगस्ट १८०३ रोजी रॉश शाअर हायलँण्ड अठ्याहत्तराव्या रेजिमेंटमधील कॅप्टन थॉमस हंबरसन मॅकेन्झी पडला. तो कर्नल मेकॅन्झी जो १७८३ मध्ये मराठ्यांचे युध्दात पडला. त्याचा पुत्र होता. त्याचप्रमाणे कॅप्टन ग्रॅन्ट ले. अन्डरसन व नॉन कमिशन्ड ऑफिसर्स व रेजिमेंटचे सैनिक जे या युध्दात पडले, त्यांच्या स्मरणार्थ ही शिला लावली आहे.

## परिशिष्ट क्र. ६

## प्रथम कलेक्टर अहमदनगर हेन्री पॉटिंजर (१८१८ ते १८२५)



## परिशिष्ट क्र. ७


## पंडित जवाहरलाल नेहरु दालन



'चले जाव' चळवळीदरम्यान पंडित जवाहरलाल नेहरु अहमदनगरच्या किल्ल्यात बंदिवासात असताना या दालनात त्यांनी 'डिस्कवरी ऑफ इंडिया' हा प्रसिध्द ग्रंथ लिहिला.

## परिशिष्ट क्र. ८

## सीना नदीवरचा लोखंडी पुल









या पुलाची लांबी ५३० फूट असून, रुंदी १८ फूट आहे. आठ धनुष्याकृती लोखंडी कमानी वापरुन ऑगस्ट १८६९ ते जानेवारी १८७३ दरम्यान या पुलाची उभारणी करण्यात आली. पुलाच्या एका बाजूला शिलालेख बसविण्यात आला असून त्यावर मेजर ई. जी. गॅम्बिएर यांच्या हस्ते या पुलाचे भूमिभूजन झाल्याचा तसेच पुलासाठी ९० हजार ३११ रुपये खर्च आल्याचा उल्लेख आहे. लोखंडी पुलाला १०० वर्षे पुर्ण झाल्यानंतर पूल बनवणाऱ्या ब्रिटीश कंपनीने तसे पत्र नगरच्या पालिकेला पाठविले होते.

## परिशिष्ट क्र. ९

## दत्त मंदिर, डांगे गल्ली, अहमदनगर







अहमदनगरमधील हरिजनांसाठी खुले झालेले भारतातील पहिले मंदिर, १९३२

## परिशिष्ट क्र. १०

## ह्यूम मेमोरिअल चर्च




'महाराष्ट्रातील जेरुसलेम' म्हणून ह्यूम मेमोरिअल चर्चला ओळखले जाते. खिस्तगल्लीतील हे चर्च सन १९०२ ते १९०६ या काळात १ लाख रुपये खर्चुन बांधण्यात आले. या दुमजली चर्चमध्ये १ हजार ३०० लोक बसू शकतात.